# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

समाजकार्य विद्याशाखांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर करावयाचा शोधप्रबंध

# ''धरणग्रस्त पुनर्वसीत कुटुंबीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन''

(विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, तालुका जुन्नर आणि डिंभे धरण तालुका आंबेगाव)


संशोधक

**वाय. एम. पलघडमल**

मार्गदर्शक

**डॉ. एस. आय.कुंभार**

सहयोगी प्राध्यापक,

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय,

समाजकार्य विभाग,

एंरडवणे, पुणे



संशोधन केंद्र

समाज कार्य विभाग,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

गुलटेकडी, पुणे-३७

२०१७

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **''धरणग्रस्त पुनर्वसीत कुटुंबीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन''** (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, तालुका जुन्नर आणि डिंभे धरण तालुका, आंबेगाव) या विषयावरील शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे समाजकार्य विद्याशाखांतर्गत समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंधातील माहिती प्राथमिक स्त्रोत, द्वितीय स्त्रोतांमधून संकलित केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केला आहे. आणि इतर सबंधीत स्त्रोताचा अभ्यास करून भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे समाजकार्य विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. एस. आय. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. सदर माहितीचा या शोध प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक :

**वाय. एम. पलघडमल**

संशोधक

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, समाजकार्य विद्याशाखांतर्गत समाजकार्य या विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी **वाय. एम. पलघडमल** यांनी **''धरणग्रस्त पुनर्वसीत कुटुंबीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन''** (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, तालुका जुन्नर आणि डिंभे धरण तालुका आंबेगाव) या विषयावरील शोधनिबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक :

**डॉ. एस. आय. कुंभार**

मार्गदर्शक

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे च्या समाजकार्य विद्याशाखांतर्गत समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी शोध प्रबंध सादर करीत असतांना मनस्वी आनंद होत आहे.

सदर शोध प्रबंध लिहिण्यासाठी ज्यांनी मला मार्गदर्शन सहकार्य केले, प्रेरणा दिली त्या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक ऋण व्यक्त करणे अत्यंत आवश्यक आहे. **''धरणग्रस्त पुनर्वसीत कुटुंबीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन''** (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, तालुका जुन्नर आणि डिंभे धरण तालुका, आंबेगाव) हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला सादर करण्याची संधी निर्माण करून देणारे माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. एस. आय. कुंभार, सहयोगी प्राध्यापक, भारती विद्यापीठ, अभिमत विश्वविद्यालय, पुणे यांनी माझे समायोचित केलेले मार्गदर्शन, आस्थापूर्वक दिलेल्या सुचना, उपलब्ध करून दिलेले सर्वेतोपरी क्रियाशील सहकार्य सततची प्रेरणा आणि अमूल्य वेळ यामुळेच या प्रबंधाचे कार्य अपेक्षित रितीने पूर्ण करता येणे शक्य झाले. त्याबद्दल मी त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करून सदैव ऋणात रहाणे पसंत करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे समाजकार्य विभाग प्रमुख, प्रा. प्रकाश यादव व समन्वयक प्रा. केतकी गोखले यांनी सतत मार्गदर्शन व सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

प्रस्तुत विषयातील माहिती व अनुभव देणारे राष्ट्रीय स्थायी विकास संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाळंदे यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच संस्थेचे सचिव डॉ. चंद्रशेखर दिवेकर व विश्वस्थ श्री बी. बी. मंडलीक यांनी ही मला वेळोवेळी प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो. तसेच संस्थेचे सर्व सहकारी कर्मचारी यांचे ही मी मनपूर्वक आभार व्यक्त करतो.

प्रस्तुत प्रबंधाकरीता सखोल माहिती व सहकार्य देणारे डिंभे धरणग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष मा. श्री प्रकाशराव घोलप तसेच सामाजिक कार्यकर्ते श्री राजाभाऊ घोलप व समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच डिंभे धरणग्रस्त सौ. मंगल विश्वास,

लक्ष्मीबाई खरात, शाश्वत संस्थेच्या मीराताई दांगट, कचेश्वर शेजवळ, लांडे गुरुजी, कारोटे नाना, पुष्पाबाई कोकणे, आशा गणेश मोरे, आणि पिंपळगाव प्रकल्पाचे धरणग्रस्त श्री लक्ष्मण नायकोडी, सुदाम मेमाणे, पिंपळगाव जोगे धरण प्रकल्पाचे माजी अभियंता श्री गिरीश सांगळे यांनी ही हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी माहिती व सहकार्य केले त्यांचाही मी मनपूर्वक आभारी आहे.

नमूद प्रबंधासाठी मार्गदर्शन प्रेरणा व सहकार्य करणारे प्रा. डॉ. अनंत दिवेकर, संगमनेर महाविद्यालय, प्रा. के. व्ही. सोमसुंदरम, प्रा. डॉ. वसावे, प्रा. डॉ. सुनिल थिटमे, डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, प्रा. डॉ. के. के. कनोजिया, प्रा. डॉ. बी. आर. आदिक, श्री सॅम्युअल राजू, श्री जे. जी. त्रिभुवन यांचे मी मनापासून आभार मानतो.

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी सखोल माहिती व अध्ययन विषयक सामग्री पुरविणारे जयकर ग्रंथालय, पुणे, यशदा ग्रंथालय, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, संगमनेर महाविद्यालय ग्रंथालय, संगमनेर नगरपालिका ग्रंथालय या सर्व ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांनी प्रस्तुत प्रबंधासाठी वेळोवेळी माहिती उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

सदर प्रबंध पूर्ण करतांना माझे प्रेरणास्त्रोत माझी आई, श्रीमती शांताबाई मुरलीधर पलघडमल तसेच माझे काका सर्वश्री दिनकर, दाविदराव, बाबुराव व बाळासाहेब पलघडमल माझ्या आत्या सौ. प्रतिभा शिंदे व सौ. लिला आवारे तसेच माझी बहीन स्व. लता रविंद्र अमोलीक माझे सासरे श्री वाय. एस. कदम, माझी सर्व भांवडे यांनी मला सतत आशिर्वाद, प्रोत्साहन व सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचा कायम ऋणी राहील.

सदर प्रबंध लिहितांना मला प्रेरणा, सहकार्य देणारे माझे मित्र श्री दादु बुळे, संशोधन अधिकारी, यशदा, पुणे, श्री दिलीप बटवाल, सचिव, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज व डॉ. प्रशांत वायदंडे, शास्त्रज्ञ (बी), नारी, पुणे यांनी सातत्यपूर्ण सहकार्य व मैत्रीचा हात दिला त्याबद्दल मी सदैव त्यांचा ऋणात राहू इच्छित आहे.

तसेच वरील प्रबंधाकरिता मला सदैव प्रेरणा देणे, माझा उत्साह वाढविणे, मला मदतीचा हात देणे ह्या करिता सदैव पुढे असलेले माझे मित्र परिवार अविनाश कदम, ॲड. राजू खरे, मनोज चौधरी, उमेश वैद्य, रविंद्र पाटील, दिलीप पानसरे, शैलेंद्र सोलंकी, डॉ. वैभव दातरंगे, डॉ. मिलिंद भोईर, अविनाश पाटील, रहिम शेख, प्रविण गायकवाड, हरिश कडलक, श्रीमंत काळभोर, राजू सरोदे, वैभव पलघडमल, संदिप पलघडमल, अभिजित अमोलिक, गोपीनाथ शिरतार, श्रीमती संगिता वराडे, सौ. मंगल काळे, सौ. तृप्ती लाहोटी, सौ. उर्मिला बटवाल यांचे मी मनापासून आभार मानतो.

सदर संशोधन प्रबंधाची आकर्षक संगणकीय मुद्रण व छपाई करून देणाऱ्या सौ. पुष्पा बुळे, वनिता ग्राफिक्स, पुणे यांचे मी मनापासून आभार मानतो.

नमूद शोध प्रबंध पूर्ण करतांना माझ्या पाठिशी सतत खंबीरपणे उभी राहून मला प्रेरणा व साथ देणारी माझी पत्नी सौ. मंगल व माझा मुलगा चिरंजीव निशांत यांचे मी विशेष आभार व्यक्त करतो.

**वाय. एम. पलघडमल**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले** | **प्रस्तावना** | **१–२५** |
| **प्रकरणे दुसरे** | **साहित्याचे सिंहावलोकन** | **२६–३६** |
| **प्रकरण तिसरे** | **संशोधन पद्धती** | **३७–४८** |
| **प्रकरण चौथे** | **महाराष्ट्रातील प्रमुख विकास प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन** | **४९–१६२** |
| **प्रकरण पाचवे** | **संकलित तथ्यांचे विश्लेषण** | **१६३–२३७** |
| **प्रकरण सहावे** | **निष्कर्ष व शिफारशी** | **२३८–२५०** |
| | **संदर्भग्रंथ सूची** | **२५१–२५५** |
| | **परिशिष्ट** | **२५६–२६७** |
| | मुलाखत अनुसूची | २५६–२६१ |
| | छायाचित्रे | २६२–२६५ |
| | शासन निर्णय सूची | २६६–२६७ |
| | नकाशा | २६८–२६९ |

# सारणी सूची


| सारणी क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | पंचवार्षिक योजना आणि सिंचन क्षमता | १० |
| १.२ | पंचवार्षिक योजना निहाय सिंचन क्षेत्र | ११ |
| १.३ | जलविद्युत प्रकल्प क्षमता | १२ |
| ३.१ | नमुना निवड आकृतीबंध | ४७ |
| ४.१ | महाराष्ट्रातील विभागनिहाय पाणी साठे | ५९ |
| ४.२ | भारतातील राज्यनिहाय आदिवासींची लोकसंख्या आणि तिची टक्केवारी | ७८ |
| ४.३ | १९५१ ते १९९० या दरम्यान भारतातील आदिवासी विस्थापनाचे आकडे | ८२ |
| ५.१ | उत्तरदात्याचे  वय | १६४ |
| ५.२ | उत्तरदात्याचा धर्म | १६५ |
| ५.३ | उत्तरदात्यांची जात | १६६ |
| ५.४ | उत्तरदात्याचे  शिक्षण | १६८ |
| ५.५ | उत्तरदात्यांचा व्यवसाय | १६९ |
| ५.६ | सदस्य संख्या | १७१ |
| ५.७ | कुटुंब पद्धती | १७२ |
| ५.८ | कुटुंबातील कमावणारे सदस्य | १७३ |
| ५.९ | उत्तरदात्यांची उपजीविका | १७४ |
| ५.१० | धरणग्रस्त कुटूंबाना शासनाकडून पुनर्वसनाच्या मोबदल्यात मिळालेली जमीन | १७५ |
| ५.११ | धरणग्रस्त कुटूंबाकडे शिल्लक जमीन | १७६ |
| ५.१२ | बागायत जमीन | १७७ |
| ५.१३ | जिरायत जमीनी | १७८ |
| ५.१४ | पडीत जमीनी | १७९ |
| ५.१५ | विस्थापनापूर्वीची जिरायत जमीनी | १८० |
| ५.१६ | जिरायत जमीनी (मूळगावात) | १८१ |

| | | |
|---|---|---|
| ५.१७ | नवीन गावात जिरायती जमिनी धारणा | १८२ |
| ५.१८ | जुन्या गावात पडीत जमीन धारणे विषयी | १८३ |
| ५.१९ | नवीन पुनर्वसित ठिकाणी पडीत जमिनधारणा | १८४ |
| ५.२० | कुटूंबाची इतर मालमत्ता दर्शविते | १८५ |
| ५.२१ | जुन्या मुळ गावातील शाळेची सोय उपलब्धता | १८६ |
| ५.२२ | जुन्या गावातील शाळेचा प्रकार दर्शविते. | १८७ |
| ५.२३ | गावापासून शाळेचे अंतर दर्शविते. (शिक्षणाची सुविधा) | १८८ |
| ५.२४ | गावापासून शाळेत जाण्यासाठी उपलब्ध दळणवळण / वहातूक सुविधा दर्शविते. | १८९ |
| ५.२५ | नवीन पुनर्वसित गावात शाळा (शिक्षणाची सोय )असल्याबाबत दर्शविते. | १९० |
| ५.२६ | पुनर्वसित गावात शाळा व इयत्ता दर्शविते | १९१ |
| ५.२७ | नवीन पुनर्वसित गावापासून शाळेचे अंतर दर्शविते | १९२ |
| ५.२८ | नवीन पुनर्वसित गावात शिक्षणाच्या संधीची उपलब्धतता | १९३ |
| ५.२९ | जुन्या गावापासून नवीन पुनर्वसित गावचे अंतर | १९४ |
| ५.३० | धरणामध्ये गेलेली जमीन दर्शविते. | १९५ |
| ५.३१ | विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडील जनावरांची संख्या दर्शविते. | १९६ |
| ५.३२ | विस्थापनापूर्वी धरणग्रस्तांकडे असणाऱ्या बैलांची संख्या दर्शविते. | १९७ |
| ५.३३ | विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या गार्यीची संख्या दर्शविते. | १९८ |
| ५.३४ | विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या म्हशीची संख्या दर्शविते. | १९९ |
| ५.३५ | जुन्या गावात कुटूंबाकडे असणाऱ्या शेळयांची संख्या दर्शविते. | १९९ |
| ५.३६ | धरणग्रस्त कुटूंबाकडील जुन्या गावात कोंबड्यांची संख्या दर्शविते. | २०० |
| ५.३७ | जुन्या गावात उत्तरदात्यांना जनावरांपासून मिळणारे उत्पन्न दर्शविते. | २०१ |
| ५.३८ | विस्थापनापूर्वी उत्तरदात्यांची बागायती शेती दर्शविते. | २०१ |
| ५.३९ | विस्थापनापूर्वीची बागायती शेतीसाठी सिंचन साधनाची उपलब्धता दर्शविते | २०२ |

| | | |
|---|---|---|
| ५.४० | विस्थापनापूर्वीची शेतीसाठी पाणी उपलबध असण्याचा कालावधी दर्शविते. | २०३ |
| ५.४१ | बागायती शेतीसाठी सिंचनाची सुविधेबद्दल दर्शविते. | २०३ |
| ५.४२ | जुन्या गावात शेतीमध्ये कोणती पिक पध्दती / पिके घेतली जात होती ह्या बाबत दर्शविते. | २०४ |
| ५.४३ | विस्थापनापूर्वी शेतीतून जुन्या गावात मिळणारे उत्पन्न दर्शविते. | २०५ |
| ५.४४ | धरणग्रस्त कुटुंबे विस्थापनापूर्वी शेती कसण्यासाठी कोणती सुविधा वापरत होते ते दर्शविते. | २०६ |
| ५.४५ | विस्थापनापूर्वी शेतीचे काम नसतांना कुटूंबातील व्यक्ती कोणत्या प्रकारचे काम करत होत्या त्याविषयी माहिती दर्शविते. | २०६ |
| ५.४६ | नवीन जमीन खरेदी | २०७ |
| ५.४७ | विस्थापनानंतर नवीन खरेदी केलेल्या जमीनीची स्थिती दर्शविते | २०८ |
| ५.४८ | विस्थापनानंतर मिळालेल्या बागायती जमीनीची माहिती दर्शविते. (एकर) | २१० |
| ५.४९ | जिरायती जमीनीची माहिती दर्शविते. (एकर) | २११ |
| ५.५० | धरणग्रस्त विस्थापीत शेतकऱ्यांना मोबदला मिळालेल्या जमीनीपैकी पडीत जमीनीची माहिती दर्शविते. | २१२ |
| ५.५१ | विस्थापनानंतर धरणग्रस्त शेतकरी कुटूंबे जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या साधनांची माहिती दर्शविते. | २१३ |
| ५.५२ | विस्थापनानंतर धरणग्रस्त शेतकरी कुटूंबे जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या आधुनिक साधनांची माहिती दर्शविते. | २१३ |
| ५.५३ | विस्थापीत कुटूंबाकडे सध्या उपलब्ध असणाऱ्या जनावरांची माहिती दर्शविते. | २१४ |
| ५.५४ | उत्तरदात्यांकडे असलेले पशुधन (बैल) स्थिती दर्शविते. | २१४ |
| ५.५५ | उत्तरदात्यांकडे असलेले पशुधन (गायी) स्थिती दर्शविते. | २१५ |
| ५.५६ | उत्तरदात्यांकडे सध्या असलेली म्हशींची स्थिती दर्शविते. | २१५ |
| ५.५७ | उत्तरदात्यांकडे सध्या असलेली शेळ्यांची स्थिती दर्शविते. | २१६ |
| ५.५८ | उत्तरदात्यांकडे सध्या असलेली कोंबड्यांची स्थिती दर्शविते. | २१६ |
| ५.५९ | विस्थापीत कुटूंबांना नवीन शेतजमीनीचा ताबा मिळविण्यासाठी आल्याच्या अडचणींची स्थिती दर्शविते. | २१७ |

| | | |
|---|---|---|
| ५.६० | पुनर्वसित शेतकऱ्यांना नवीन मिळालेलया जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या अडचणी आल्या त्याबाबतची माहिती दर्शविते. | २१७ |
| ५.६१ | पुनर्वसित शेतकऱ्यांकडे मुळ जमीनी पैकी शिल्लक असलेल्या जमीनीची स्थिती दर्शविते. | २१८ |
| ५.६२ | मुळ जमीनीपैकी शिल्लक जमीनीची एकरानुसार मिळालेल्या बागायती जमीनीची स्थिती दर्शविते. | २१९ |
| ५.६३ | पुनर्वसित शेतकऱ्यांना मिळालेल्या कोरडवाहू जमिनीची स्थिती दर्शविते. | २२० |
| ५.६४ | बागायती जमीनीसाठी उपलब्ध असणाऱ्या सिंचन सुविधा दर्शविते. | २२१ |
| ५.६५ | पुनर्वसितांना जमीन ताब्यात मिळाल्यापासून प्रत्यक्ष उत्पादन होईपय्रत किती कालावधी लागला ते दर्शविते. | २२१ |
| ५.६६ | जमीनीचा ताबा मिळाल्यापासून प्रत्यक्ष पहिले पीक होईपर्यंत लागल्या विलंबात झालेल्या आर्थिक नुकसानी झाल्या बाबतचे माहिती दर्शविते. | २२२ |
| ५.६७ | पुनर्वसित नवीन गावठाण मध्ये शासनाच्या सहकार्याने एखादा नवीन व्यवसाय सुरु केला आहे. | २२३ |
| ५.६८ | जुन्या गावात आपण कोणकोणते सन उत्सव साजरे केले जात होते याबाबतची माहिती दर्शविणारी साधने | २२३ |
| ५.६९ | जुन्या गावात कोणकोणते सामाजिक उपक्रम साजरे करत होता. | २२४ |
| ५.७० | जुन्या गावात करमनुकीची कोणकोणती साधने उपलब्ध होती. | २२४ |
| ५.७१ | जुन्या गावात कोणकोणत्या रूढी परंपरा पाळल्या जात होत्या | २२५ |
| ५.७२ | नवीन गावात कोणकोणते सामाजिक उपक्रम साजरे केले जातात. | २२५ |
| ५.७३ | नवीन गाव व जुने गाव यांच्यामधील सांस्कृतिक फरक/बदल आपणास जाणवतो का? | २२६ |
| ५.७४ | पुनर्वसनापुर्वी धरणग्रस्त कुटूंबाचे जीवन कसे होते ? | २२६ |
| ५.७५ | पुनर्वसनाच्या ठिकाणी त्याचा परिणाम धरणग्रस्त कुटुंबाचे सामाजिक जीवनावर झाला असे वाटते का? | २२७ |
| ५.७६ | नवीन पुनर्वसित ठिकाणी इतर कुटूंबाशी तुमचे संबंध सलोख्याचे आहेत का ? | २२७ |

| | | |
|---|---|---|
| ५.७७ | नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी अनोळखी कुटूंब व लोकांमुळे तुमच्या जिवनावर परिणाम झाला का? | २२८ |
| ५.७८ | पुर्नवसन झालेल्या नविन ठिकाणी तुम्ही पूर्वीसारखे आनंदी व समाधानी सामाजिक जीवन जगता असे तुम्हाला वाटते का? | २२९ |
| ५.७९ | नवीन ठिकाणी काही जातीय व धार्मिक तेढ निर्माण झाली का? | २२९ |
| ५.८० | नवीन ठिकाणी विविध जाती धर्माचे लोक एकत्र आल्यामुळे त्याचा परिणाम तुमच्या सामाजिक जिवनावर झाला का? | २३० |
| ५.८१ | नवीन पुनर्वसन ठिकाणी गेल्यामुळे तुमच्या रुढी परंपरा यामध्ये बदल आहे का? | २३१ |
| ५.८२ | पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाच्या उपायोजना समाधानकारक आहेत का? | २३१ |
| ५.८३ | नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग/वापर | २३२ |
| ५.८४ | योग्य पुनर्वसनाच्या दृष्टीने आपल्या काही सूचना आहेत. | २३३ |


# आलेख सूची


| आलेख क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.१ | कुटुंबातील कमावणारे सदस्य | १६५ |
| ५.२ | उत्तरदात्यांची उपजीविका | १६६ |
| ५.३ | बागायत जमीन | १६८ |
| ५.४ | उत्तरदात्यांचा व्यवसाय | १७० |
| ५.५ | कुटुंब पद्धती | १७२ |
| ५.६ | कुटुंबातील कमावणारे सदस्य | १७३ |
| ५.७ | उत्तरदात्यांची उपजीविका | १७४ |
| ५.८ | धरणग्रस्त कुटूंबाकडे शिल्लक जमीनीबाबतची माहिती | १७६ |
| ५.९ | बागायत जमीन | १७७ |
| ५.१० | पडीत जमीनीबाबतची माहिती | १७९ |
| ५.११ | गावापासून शाळेत जाण्यासाठी उपलब्ध दळणवळणाची सुविधा | १८९ |
| ५.१२ | नवीन पुनर्वसित गावात शाळा (शिक्षणाची सोय) | १९० |
| ५.१३ | नवीन पुनर्वसित गावापासून शाळेचे अंतर | १९२ |

| | | |
|---|---|---|
| ५.१४ | धरणामध्ये गेलेली जमीन | १९५ |
| ५.१५ | विस्थापनापूर्वी धरणग्रस्तांकडे असणाऱ्या बैलांची संख्या | १९७ |
| ५.१६ | विस्थापनापूर्वी शेतीचे काम नसतांना कुटूंबातील व्यक्ती कोणत्या प्रकारचे काम होते | २०७ |
| ५.१७ | नवीन जमीन खरेदी (डिंभे प्रकल्प) बाबतची माहिती | २०८ |
| ५.१८ | नवीन जमीन खरेदी (पिंपळगाव जोगे प्रकल्प) बाबतची माहिती | २०९ |
| ५.१९ | विस्थापनानंतर मिळालेल्या बागायती जमीनीची बाबतची माहिती | २१० |
| ५.२० | नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी अनोळखी कुटूंब व लोकांमुळे उत्तरदात्याचे जिवनावर होणारा परिणाम याविषयी माहिती | २२८ |
| ५.२१ | नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग/वापर | २३३ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ विकासात्मक प्रकल्पाची संकल्पना व गरज

१.३ विकासात्मक प्रकल्पाची ग्रामीण विकासातील आवश्यकता व महत्त्व

१.३.१ कृषी विकास

१.३.२ सिंचन

१.३.३ विजनिर्मिती

१.३.४ औद्योगिक विकास

१.४ विकास प्रकल्पाचे फायदे

१.४.१ स्थानिक भागाचा विकास व रोजगार निर्मिती

१.४.२ शाश्वत विकास

१.५ विकास प्रकल्पाच्या नकारात्मक बाबी

समारोप

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

**१.१ प्रस्तावना :–**

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले व महाराष्ट्राची निर्मिती सन १९६० साली झाली योजनांचा काळ सन १९५१ पासून सुरु झाला. सन १९३० ते १९५४ ह्या पंचवीस वर्षाच्या काळात राज्यात कोठेही नवीन मोठे सिंचन काम सुरु करण्यात आले नाही. वाढत्या लोकसंख्येस अन्नधान्याची कमतरता भासत होती. त्यामुळे शेतीतून उत्पन्न वाढविण्याची गरज निर्माण झाली. मोठी धरणे बांधण्यात परिस्थिती अनुकूल होती. मातीची उंच धरणे बांधण्याचा अनुभव अजिबात नव्हता. प्रकल्पाला लागणाऱ्या माहितीचे संकलन, उदा. पर्जन्यमानाचा तपशिल, भूस्तराचा तपशिल इ. उपलब्ध नव्हता. पिकांना पाणी किती लागेल, कोणते पीक घेणे किफायतशीर राहील इत्यादी बदल देखील अनभिज्ञता होती, पुराचे अनुमान बांधणे कालव्याचे प्रवाहशास्त्र निश्चीत करणे या व तत्सम जलशास्त्रीय ज्ञानाची देखील उणीव होती.

अशा प्रतिकुल परिस्थितीत सुरवातीला प्रामुख्याने अन्नधान्याच्या कमतरतेवर मात करण्याच्या उद्देश्याने प्रकल्पावर पीक रचना ठरविण्यात आली. मातीच्या धरणाचे तंत्रज्ञान परदेशातून आणण्यात आले. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून सर्व प्रथम गंगापूर हे मातीचे धरण बांधण्यात आले त्यानंतर या अनुभवातून घोड, गिरणा, मुळा, पानशेत, दीना, इटिहाडोह, भोर, माना ही मोठ्या धरणांची कामे हाती घेण्यात आली. दगडी धरणांच्या बाबतीत मात्र पूर्वानुभवाचा उपयोग करून कोयना, वीर, एलदरी, सिद्धेश्वर इ. धरणांची कामे पूर्ण केली गेली. ह्या कामात शेतीच्या विकासाला अग्रक्रम देण्यात आला व नियोजन पद्धतीने व्यापक स्वरूपाच्या सिंचनाचा विकास साधण्याचा प्रयत्न झाला.

**१.२ विकासात्मक प्रकल्पाची संकल्पना व गरज :–**

भारताच्या विकास योजनांमध्ये जलसिंचन, वीजनिर्मिती, रस्तेबांधणी, औष्णिक, जल प्रकल्प इ. मोठे मोठे उद्योग, ह्या प्रकल्पांकडे मोठ्या प्रमाणावर देशाचा कल असतो. कारण ह्या

योजनांद्वारेच विकास प्रक्रियेला खरा वेग प्राप्त झाला आहे. भारत हा शेती प्रधान देश आहे. आणि शेती ही पूर्णपणे पाण्यावर अवलंबून आहे. ह्यासाठी जलसिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी अडविण्यासाठी देशात धरणे बांधलेली आहेत. त्याच बरोबर काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी ही धरणांची निर्मिती झालेली आहे. त्याचबरोबर विजनिर्मितीही महत्त्वाचा भाग आहे. कारण  धरणाच्या पाण्यापासून वीजनिर्मितीचे प्रकल्प बहुतांश ठिकाणी मार्गी लागलेले आहेत व त्यासाठी मोठ–मोठ्या प्रकल्पांची निर्मिती देशात झाली आहे.

विकास योजनांमध्ये महत्त्वाचा घटक म्हणजे रस्ते बांधणी आहे. रस्ते बांधणीमुळे दळणवळण जलद गतीने होऊन व्यापारास मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे. त्यामुळे आर्थिक सुबत्ता येण्यासाठी पोषक वातावरण तयार झालेले आहे. रस्तेबांधणीमध्ये आजच्या काळाची वाहनांची संख्या यांचा विचार करून ४ लेन,  ६ लेन किंवा त्यापेक्षाही अधिक रूंदींचे रस्ते बांधणे व त्याचा सतत विस्तार करणे ही निकडीची गरज आहे आणि ह्या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर जागेची आवश्यकता लागत असते म्हणूनच रस्त्यांची निर्मिती करण्यासाठी त्या मार्गात येणाऱ्या लोकांच्या जमीनी, घरे, नैसर्गिक संपत्ती याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. बहुतांश लोकांना आपली जमीनी घरे ही सोडून द्यावी लागतात व वेगळ्या ठिकाणी जावून रहावे लागते.

देशाचा विकास करावयाचा असेल तर धरणे बांधकाम, विजनिर्मिती, रस्तेबांधणी, अणुऊर्जा प्रकल्प मोठ्या उद्योगांची स्थापना हे प्रकल्प हाती घ्यावेच लागतील व ते उभारण्यासाठी लोकांचे विस्थापन करणे ही महत्त्वाची बाब आहे.

कोणताही विकासात्मक उभारणी प्रकल्प उदा. धरणे हे राष्ट्राच्या विकासाचे मानक मानले जाते. ह्या प्रकल्पामुळे आर्थिक सुबत्ता निश्चितपणे येते, परंतु प्रकल्पासाठी विस्थापीत झालेल्या कुटुंब व लोकांसमोर मोठे संकटे व प्रश्न निर्माण होतात.

विस्थापनामध्ये धरणग्रस्तांची स्थायी मालमत्ता, संपत्ती सांस्कृतिक चालीरिती, धार्मिक चालीरिती आणि शैक्षणिक बाबीं ह्या मुळापासून नष्ट होतात व धरण ग्रस्तांसमोर नवीन जागी जावून नव्याने हे सर्व पुन्हा प्राप्त करण्याचे मोठे आव्हान उभे राहते.

भारत हा शेती प्रधान देश आहे. शेती हाच येथील मुख्य व्यवसाय परंतु येथील शेती व्यवसाय हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्याने निर्सगाच्या अनियमितपणाचा परिणाम येथील शेतीवर वाईट तऱ्हेने होतो, यातून मार्ग काढण्यासाठी निरनिराळे पाटबंधारे प्रकल्प हाती घेवून त्याद्वारे शेतीला नियमित पाणीपुरवठा करून उत्पादन वाढवावे अशा विचाराने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात असे निरनिराळे पाटबंधारे प्रकल्प हाती घेऊन पूर्ण केले व काहींची कार्यवाही चालू आहे.


सामान्यपणे असे पाटबंधारे प्रकल्प कार्यान्वीत करतांना, ते ज्या ठिकाणी करावयाचे आहे तेथील मोठ्या प्रमाणात शेती उपयुक्त जमीन, कित्येक गावठाणे व त्यातील घरे नियोजित प्रकल्पाचे (जलमग्न) बुडीत क्षेत्रात येतात त्यामुळे तेथील रहिवाश्यांचे जीवन विस्कळीत होते, त्यांचे पिढ्यानपिढ्यांचे राहणीमान, संसार, इतर भावनिक संबंध उध्वस्त होऊन त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.

आपण लोकशाही प्रधान राज्यव्यवस्थेचा स्विकार केला असल्याने पर्यायाने लोकांचेच राज्य असल्याने याबाबतीत प्रकल्पामुळे जलमग्न (बुडीत) अगर इतर तत्सम कारणाने ज्या लोकांचे नुकसान होत आहे. अशा लोकांचे इतर योग्य ठिकाणी स्थलांतर करून तेथे त्यांची समाधानकारकपणे व सर्व नागरी सुखसोयी पुरवून पुनर्वसन करणे गरजेचे आहे, हे म्हणजेच ''प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन'' होय.

जगात धरण बांधणी प्रकल्पामध्ये जबरदस्तीने/सक्तीने केलेले विस्थापन हा सर्वात मोठा नकारात्मक प्रभाव सर्व मान्य आहे. धरण प्रकल्प उभारणीसाठी संपूर्ण जगात सर्वसाधारणपणे ६० कोटी लोक विस्तापित केले गेले.

जागतिक बँकेच्या सन १९८६ व १९९३ च्या अभ्यासानुसार दरवर्षी ३०० मोठे धरण प्रकल्प उभारले गेले त्यामध्ये अंदाजे ४ कोटी कुटुंबाचे (लोकांचे) विस्थापन करण्यात आलेले आहे. ही सर्व माहिती व सर्व्हेक्षणाचे आकडे अंदाजित आहेत, परंतू प्रत्यक्षात धरण उभारणीच्या इतर कारणांमुळे विस्थापित होणाऱ्या लोकांची संख्या जास्त असू शकते.

आकृती क्र.१.१


Need for Project
Govt. Plan of Action
Role of Govt. Maharashtra
Role of Project Implementation Agency
Role of Rehab Location Community
Role of Project Affected People
Concern of Committee Develop for Rehabilitation
Project Affected Concern
Project Beneficial's Concern
Implementers Concern
Social Research
Social Policy
Community Participation
Project Affected Community
Participation Benefited Community
Project Implementor
Project Newly Rehabliated Location Commnity
Equal Distribution of Project Benefit
50% Benefit
25% Benefit
25% Benefit
Project Affected
Beneficial from Project
New Rehab Location
Sustainable Rehabilitation
Ideal Rehabilitative Development
Community Action
Community Participation
Need Addressed
Need Concerns Solved
Start Development Project
Reuse of unused land-infrastructure for project affected people
Special School, Employment & Health facility for project affected

विस्थापनाबरोबरच विस्थापना संदर्भात आणखी काही गुंतागुंतीचे प्रश्न समोर येतात. उदा. मानवी अधिकार, जमीन संपादन, पर्यायी जमीन, घरे देणे त्या संदर्भातील प्रश्न शासन कशा पद्धतीने सोडविते हे महत्त्वपूर्ण मुद्दे आहेत. ह्या प्रक्रियेत विस्थापित होणाऱ्या लोकांचा सहभाग व आत्मसन्मान ही बाब ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, पुनर्वसनाचे पर्याय व त्यासाठी राबविले जाणारे धोरणे हा घटक पुनर्वसनावर परिणाम करणारा मानला जातो. पुनर्वसनासाठी वापरले जाणारे कायदे व धोरणे पुनर्वसितांच्या जिवनावर महत्त्वपूर्ण परिणाम करतात.

जगामध्ये भारत हा सर्वाधिक धरणे असलेला देश आहे. भारतात एकूण ४२९१ धरणे आहेत. त्यामध्ये ३५९६ बांधले गेलेले आहे व ६९५ बांधकाम सुरू आहे. सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे धरणबांधणीच्या बाबतीत व धरणाचे परिणाम ह्या बाबतीत कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही. भारताचे जलसिंचन विभागाचे बजेट अंदाजे ८० कोटी आहे. ते सर्व छोटे व मोठे सिंचन प्रकल्पामध्ये वापरले जाते. ह्या धरणामध्ये गुंतवलेल्या निधीचा न्याय पद्धतीने विनियोग झाला किंवा नाही हे तपासणे साठी कोणतीही मूल्यमापन पद्धती उपलब्ध नाही. शासनामध्ये ह्या बाबी मध्ये जाणीवेचा अभाव दिसून येतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत अंदाजे ४ कोटी लोक धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेली आहेत.

### १.३ विकासात्मक प्रकल्पाची ग्रामीण विकासातील आवश्यकता व महत्त्व :-

भारत हा शेती प्रधान देश आहे. तसेच भारत देशात अनेक खेडी आहेत. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने भारताची आर्थिक बाजू ही मुख्यत्वे करून शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर शेतीचा विकास होणे गरजेचे आहे. शेतीचे उत्पन्न वाढले तर ग्रामीण भागाचा विकास निश्चितपणे झालेला आहे. म्हणूनच शेती व सिंचन हे मुख्य उद्देश्य ठेवून भारतात विविध विकासात्मक प्रकल्प हाती घेतले गेले ह्या प्रकल्पामध्ये मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाचा समावेश होतो. ह्या प्रकल्पाद्वारे शेतीचे सिंचन वाढवून ग्रामीण विकास साधण्याचा प्रयत्न भारत देशात होत आहे. ह्या संदर्भात पुढील प्रमाणे ग्रामीण विकास महत्त्वपूर्ण आहे.

### १.३.१ कृषी विकास :-

महाराष्ट्राचे, भौगोलिक क्षेत्र ३०.०८ दशलक्ष हेक्टर्स असून, लागवडीलायक क्षेत्र २२.५ दशलक्ष हेक्टर्स आहे. कृषी विकासाकरीता जलसंपदा विभाग महत्वाची भूमिका बजावत आहे. सिंचन क्षमता निर्मितीमध्ये महाराष्ट्राने भरीव कामगिरी केली आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेवेळी राज्याची सिंचन क्षमता ३.८६ दशलक्ष हेक्टर्स एवढी होती. आता ही सिंचन क्षमता १२.६ दशलक्ष हेक्टर्स पर्यंत पोहोचली आहे. यापैकी ८.५ दशलक्ष हेक्टर्स सिंचन क्षमता भूपृष्ठीय जलामुळे व ४.१ दशलक्ष हेक्टर्स भूपृष्ठाखालील जलामुळे निर्माण झाली आहे. जून २०१० पर्यंत भूपृष्ठावरील पाण्यामुळे निर्माण झालेली सिंचन क्षमता ४.६ दशलक्ष हेक्टर्स एवढी आहे. राज्याच्या एकूण पाणीवापरापैकी, ८०% पाणीवापर सिंचनाकरीता, १२% पाणीवापर घरगुती वापराकरीता, ४% पाणीवापर औद्योगिक वापराकरीता, व उर्वरीत पाणीवापर औष्णिक, जलविद्युत ऊर्जा किंवा इतर कारणांसाठी होत आहे. महाराष्ट्रातील बहुतांश लोकांचे जीवन शेती किंवा शेतीसंबधीत व्यवसायांवर अवलंबून आहे. राज्यांच्या अर्थकारणामध्ये शेती आणि कृषीविषयक व्यवसायांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे कृषी उत्पादनवाढीसाठी पुरेसे, वेळेवर व खात्रीशीरपणे सिंचन होणे अत्यंत महत्वाचे व आवश्यक आहे. आतापर्यंत सिंचनाकरीता ८६ मोठे प्रकल्प, २५८ मध्यम प्रकल्प व ३१०८ लघू प्रकल्प जलसंपदा विभागाने पूर्ण केले आहेत. विदर्भामध्ये दोन शतकांपूर्वी मालगुजारी तलावांचे बांधकाम करण्यात आले. खडकवासला, दारणा व भंडारदरा या धरणांची कामे सन १९२६ पूर्वी झालेली आहेत. कोल्हापूरचे संस्थानिक श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी राधानगरी धरण बांधले. धरणातील पाणी नदीमध्ये सोडून विविध ठिकाणी छोटे बंधारे बांधून, तेथे पाणी अडवून, त्याद्वारे सिंचन करण्यात आले. हे बंधारे त्या काळात अतिशय लोकप्रिय ठरले. या बंधाऱ्यांना कोल्हापूर पद्धतीचे बंधार म्हणून ओळखण्यात येते. महाराष्ट्र राज्यच्या निर्मितीनंतर १९६२ साली, पहिला सिंचन आयोग स्थापन करण्यात आला. पाण्याचे स्त्रोत तसेच उपलब्ध स्त्रोतांचा काटकसरीने वापर करण्यासाठीचे दूरगामी धोरण ठरविण्यासाठी, या आयोगाची स्थापना करण्यात आली. तद्नंतर जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर प्रकल्पांची बांधकामे हाती घेण्यात आली.

सिंचन व्यवस्थापनाच्या सुधारणेसह धरणांची बांधकामे व प्रकल्पामध्येही सुधारणा करण्यांत आल्या. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची योग्य देखभाल व दुरूस्ती करून, पाण्याचा अपव्यव थांबवून अधिकाधिक पाणी अबाधित ठेवून, सिंचन करण्याची संकल्पना ही याच काळात रुजली गेली. महाराष्ट्र शासनाने, पाटबंधारे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याकरीता पाच विकास महामंडळांची स्थापन केली. त्यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांचा समावेश आहे.

**१.३.२ सिंचन :-**

सिंचनाची संकल्पना म्हणजे पाणी स्रोत आणि नियमन करण्यासाठी एक व्यवस्था, स्त्रोतापासून उगवलेल्या पिकांना पाणी पुरवठा करणे. जगातील सर्वात जुने सिंचन धरण, ३५५ फुट लांब आणि ५००० वर्षांपूर्वी बांधलेली ४० फूट उंच. एक प्राचीन राजा अश्शूरच्या काळात ४००० वर्षापूर्वी सिंचन क्षेत्रात कार्य करतांना, नदीचे पाणी अडवून ते सिंचनासाठी वापरले होते. सिंचन म्हणजे शेतीला किंवा जमीनीस कृत्रीमरित्या पाणी पुरवठा करण्याचे विज्ञान होय. जेथे पावसाचे पाणी आवश्यकते पेक्षा कमी असते वा नसतेच अशा शेतीस जमीनीस पाणी पुरवठ्याची केलेली व्यवस्था म्हणजे सिंचन होय. सिंचनामध्ये भूस्तरीय सिंचनाद्वारे धरणे व कालव्याचे जाळे निर्माण करून पावसाचे पाणी धरणात साठविले जाते व वर्षभर त्या भागातील शेतीला पाणी पुरवठा केला जातो. ह्या मध्ये शेतीवर अवलंबीत शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर फायदा होतो व शेतीद्वारे त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढून त्या संपूर्ण भागाचा विकास साधला जातो. अलीकडच्या काळात झालेली प्रचंड लोकसंख्या वाढ बदलते, राहणीमान व औद्योगिकरण यामुळे एकंदरच पाण्याची गरज वाढली. पिण्याचे पाणी, कारखानदारी व विद्युत निर्मिती या करिता पाण्याचे आरक्षण करावे लागत आहे. पाण्याच्या चौफेर मागणीमुळे पिण्यासाठी सिंचनासाठी व कारखानदारीसाठी पाण्याच्या गरजांना प्राधान्यक्रम ठरविणे अगत्याचे बनले आहे. राज्यातील सिंचनाच्या वाढत्या गरजांचा व वाढत्या ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठी लागणाऱ्या पाण्याचा विचार केला तर सिंचन व्यवस्थापकाचा महत्त्वाचा मुद्दा समोर येत आहे.

**सिंचन महत्त्व**

पारंपारिकपणे मान्सुनवर भारतातील शेती अवलंबून आहे. म्हणूनच भारतीय शेतकरी सिंचनाला महत्व देतात. शतकानुशतके पूर्वी मान्सूनच्या वेधशाळेचा प्रतिकार करण्यासाठी सिंचनचे महत्त्व एन. डी. गलती यांनी उत्तमरित्या सांगितले आहे, अनेक देशांमध्ये सिंचन ही जुनी कला आहे. भारतामध्ये मोठ्या धरणाचे बांधकाम राष्ट्रीय प्राधान्यसह अग्रगण्य मॉडेल मानून कृषी उत्पादन वाढविण्यासाठी मदत करते. त्यामुळे सिंचनामुळे कृषी उत्पादनातील उल्लेखणीय वाढ करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सिंचन सुविधा विस्थारल्यामुळे देश सक्षम झालेला आहे. लोकसंख्या वाढीसोबतच अन्नधान्याच्या उभारणीची वाढ करण्यासाठी सिंचन महत्त्वाची भूमिका पार पाडली जाते.

१.३ भारतात सिंचन विकास पहिले योजना सुरू झाल्याने, सिंचनला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे देशाचे विकास कार्यक्रम परिणामी, सिंचन क्षमता आहे १ ९५०–५१ मध्ये ते २२.६ दशलक्ष हेक्टरवरून वाढून ८५.७ दशलक्ष हेक्टर एवढे झाले १ ९९४–९ ५ मध्ये २८५ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. योजनेनुसार सिंचन क्षमता विकास खाली सारणी १.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे आहे.

**महाराष्ट्रातील सिंचन**

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने श्री एस. जी. बर्वे (अर्थशास्त्रज्ञ आणि नंतर राज्याचे सिंचन मंत्री) यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोग नेमला, १९६२ मध्ये ह्या आयोगाने राज्यातील सिंचन आणि समस्याबाबतच अहवाल सादर केला. अहवालात खरंच राज्याच्या विकासाचा पाया घातला गेला. सिंचन धोरण आणि सिंचन विकासासाठी एक विशिष्ट दिशा दिली. १९५५ ते १९८० या कालावधीत कृषी तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावली. पिकांच्या संकरित जाती, रासायनिक खते, कीटकनाशके आणि तणनाशकांचा व्यापक उपयोग झाला होता. परिणामी वरील कालावधीमध्ये पिकांचे उत्पादन वाढत होते. त्याचबरोबर महाराष्ट्रात दगडी व मातीची धरणे कशी उभारणी करता येईल

याबाबतची माहिती अहवालात दिली होती. या कालावधीत बांधकाम क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान उपकरणे यांचा वापर धरणे बांधकाम, कालवे बांधकाम यामध्ये मोठ्या प्रमाणात झाला.

महाराष्ट्र राज्यात सुमारे ३८० मोठ्या आणि लहान अशा सुमारे २०,००० किलोमीटरच्या सामूहिक लांबीच्या नद्या आहेत. राज्यातील भौगोलिक क्षेत्र मुळात चार मोठ्या नद्यांच्या खोऱ्यात विभागलेले आहे– गोदावरी, कृष्णा, तापी आणि नर्मदा. याव्यतिरिक्त, कोकणातील लहान–मोठ्या २२ पश्चिमवाहिण्या आहेत. महाराष्ट्रातील सह्याद्री आणि महादेव पर्वतरांगाना कृष्णा खोरे असे म्हणतात. कृष्णा खोऱ्याचे क्षेत्रफळ एकूण ६९०२९ चौ.कि.मी. आहे व कृष्णा नदीचा उगम समुद्रसपाटीपासून १३३३ मी. उंची वरील महाबळेश्वर येथे होतो. व कृष्णा नदी पूर्वस जवळपास १४०१ कि.मी. महाराष्ट्र, कर्नाटकमधून वाहते आणि बंगालच्या उपसागराला मिळण्यापूर्वी आंध्र प्रदेशात कृष्णेला उपनद्या मिळतात. खालील तक्ता महाराष्ट्र १९५१ ते १९९७ या कालवधीतील सिंचन क्षमतेचा विकास दर्शविते.

**सारणी क्र.१.१**

**पंचवार्षिक योजना आणि सिंचन क्षमता**

| अ.क्र | वर्ष | सिंचन क्षमता विकास (हेक्टर लाखांमध्ये) | लागवडीखालील सिंचन क्षेत्राची टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | १९५१ (पंचवार्षिक योजनेपूर्वी) | २.७४ | १.२२ |
| २. | १९५१ ते १९५६ (पहिली पंचवार्षिक योजना) | ३.१४ | १.३९ |
| ३. | १९५६ ते १९६१ (दुसरी पंचवार्षिक योजना) | ३.९८ | १.७७ |
| ४. | १९६१ ते १९६६ (तिसरी पंचवार्षिक योजना) | ५.७० | २.५३ |
| ५. | १९९० | २६.३१ | ११.६७ |
| ६. | १९९५ | २९.४२ | १३.०५ |
| ७. | १९९६ | ३१.२० | १३.८४ |
| ८. | १९९७ | ३२.२८ | १४.३२ |

स्त्रोत : महाराष्ट्र पाणी व सिंचन आयोग अहवाल १९९९ अंक–१, पृ.२०३

१९४७ ते १९९७ दरम्यान ५० वर्षातील काळात महाराष्ट्रातील सिंचन क्षमता १२ पटीने वाढली आहे.

**सारणी क्र. १.२**

**पंचवार्षिक योजना निहाय सिंचन क्षेत्र**

| अ.क्र. | योजना | मोठे व मध्यम प्रकल्प | लहान प्रकल्प | सिंचन क्षेत्र विकास |
|---|---|---|---|---|
| १. | पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते ५६) | १२.२० | १४.०६ | २६.२६ |
| २. | दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते ६१) | १४.३३ | १४.७५ | २९.०८ |
| ३. | तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते ६६) | १६.५७ | १७.०० | ३३.५७ |
| ४. | वार्षिक योजना (१९६६–६९) | १८.१० | १९.०० | ३७.१० |
| ५. | चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते ७४) | २०.७० | २३.५० | ४४.२० |
| ६. | पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते ७८) | २४.७२ | २७.३० | ५२.०२ |
| ७. | वार्षिक योजना (१९७८–८०) | २६.६१ | ३०.०० | ५६.६१ |
| ८. | सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते ८५) | २७.७० | ३७.५२ | ६५.२२ |
| ९. | सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते ९०) | २९.९२ | ४६.६१ | ७६.५३ |
| १०. | वार्षिक योजना (१९९०–९२) | ३०.७४ | ५०.३५ | ८१.०९ |
| ११. | आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते ९७) तरतूद | ३२.९६ | ५६.६० | ८९.५६ |
| १२. | नववी पंचवार्षिक योजना (१९९७–२००२) | १०३.३१ | १७५.८० | २७९.३१ |
| १३. | दहावी पंचवार्षिक योजना (२००२–२००७) | ११२.२७ | १८२.४० | २९७.२१ |
| १४. | अकरावी पंचवार्षिक योजना (२००७–२०१२) | १३४.२३ | २२७.१६ | ३४५.७२ |
| १५. | बारावी पंचवार्षिक योजना (२०१२–२०१७) | १६७.१४ | ३११.१३ | ४१२.१७ |

स्त्रोतः भारत–२००१ –२०१७(भारत सरकार, माहिती व प्रसारण मंत्रालय) पृ.४०७

टीप : पहिल्या पंचवार्षिक योजनेत सिंचन प्रकल्प हे तीन स्तरात विभागले होते. मोठ्या प्रकल्पांवरील खर्च ५ कोटी पेक्षा जास्त, मध्यम प्रकल्प रु.१० लाख ते ५ कोटी, लहान प्रकल्प १० लाखापेक्षा कमी. एप्रिल १९७८ मध्ये हे स्तर पुनर्रचित करण्यात आले. मोठ्या प्रकल्पाची मर्यादा १० हजार हेक्टर लागवडीक्षम क्षेत्र, मध्यम प्रकल्पात २ हजार ते १० हजार हेक्टर लागवडीक्षम क्षेत्र, लहान प्रकल्पात २ हजार हेक्टर पेक्षा कमी लागवडीक्षम क्षेत्र

### १.३.३ विजनिर्मिती

महाराष्ट्र राज्यात स्वातंत्र्यपूर्व काळात टाटा इलेक्ट्रिक कंपनीने एकूण २७६ मेगावॅट स्थापित क्षमता असलेल्या तीन खाजगी जलविद्युत निर्मिती केंद्राची उभारणी केली. स्वातंत्र्योत्तर काळात राधानगरी व कोयना हे प्रकल्प अनुक्रमे १९५४ व १९६६–६७ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यानंतर विविध पंचवार्षिक योजनांमधून स्थापित विद्युत क्षमतेत भरीव वाढ करण्यात आली आणि मार्च १९९८ अखेर ती सुमारे १२२३८ एवढी झाली. यामध्ये जलविद्युत प्रकल्प औष्णिक प्रकल्प, अनुशक्ती प्रकल्प तसेच केंद्र सरकारने उभारलेल्या प्रकल्पातील महाराष्ट्राच्या वाट्याचा खालील प्रमाणे समावेश आहे.

**सारणी क्र. १.३**

**जलविद्युत प्रकल्प क्षमता**

| **क्र.** | **जलविद्युत प्रकल्प** | **क्षमता** |
|---|---|---|
| १. | जलविद्युत | १७५८ मेगावॅट |
| २. | औष्णिक | ७६५५ मेगावॅट |
| ३. | गॅस व टाकावू ज्वलनशील | १०९२ मेगावॅट |
| ४. | अनुशक्ती (महाराष्ट्राचा वाटा) | १९० मेगावॅट |
| ५. | केंद्रीय निर्मिती (महाराष्ट्राचा वाटा) | १५४३ मेगावॅट |
| | **एकूण** | **१२२३८ मेगावॅट** |

उपलब्ध जलसंपदेच्या वापराचे नियोजन पाहता व राज्याच्या एकूण भौगोलिक परिस्थितिमुळे मोठ्या क्षमतेचे स्वतंत्र जलविद्युत प्रकल्प महाराष्ट्रात उभारणे शक्य नसल्यामुळे, पुढील काळात पाटबंधारे धरणाशी निगडित सर्व मोठे, मध्यम व लघु प्रकल्पातून विजेच्या निर्मितीत वाढ करून, जलविद्युत निर्मितीच्या स्थापित क्षमतेतील तूट कशी कमी करता येईल याचा स्वतंत्र अभ्यास करणे गरजेचे आहे. आवश्यक तेथे धरणांत पाणी साठवणीची उंची वाढवून यापुढील दीर्घकालीन नियोजनाचा अहवाल तयार करणे आवश्यक वाटते.

पश्चिम घाटातील उंचीचा फायदा घेऊन, पाण्याचा ऱ्हास न होता उदंचन योजनेद्वारे मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती शक्य आहे. जपानच्या सहभागाने प्राथमिक अन्वेषण केलेल्या उदंचन प्रकल्पांच्या यादीनुसार (विवरणपत्र १०.५.२ क) सुमारे १५४०० मेगावॅट वीजनिर्मिती शक्य आहे. त्यांचाही सर्वप्रथम विचार होणे आवश्यक आहे. अशाच प्रकारची सूचना बर्वे आयोगाने (१९६२) व राष्ट्रीय सिंचन आयोगाने (१९७२) त्यांच्या अहवालात केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या आजवरचा कल मुखतः औष्णिक विद्युत निर्मितीकडेच दिसून येतो. याचा परिणाम जल विद्युत निर्मितीच्या विकासावर झालेला आहे. नुसतीच औष्णिक वीज निर्मिती वाढवून राज्याचा विजेचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार नाही तर त्या बरोबरीने जलविद्युत निर्मिती देखील वाढविणे आवश्यक आहे.

- **आंतरराज्यीय प्रकल्प**

आंतरराज्यीय प्रकल्पातून महाराष्ट्राला वीजेची पुष्कळ आपूर्ती होणे शक्य आहे.

**क) सरदार सरोवर प्रकल्प :**

महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांमध्ये सरदार सरोवर हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. सध्या या प्रकल्पाचे बांधकाम या प्रकल्पाच्या भुयारी विद्युतगृहात व कालव्याद्वारे एकूण १४५० मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामध्ये महाराष्ट्राचा वाटा २७ टक्के म्हणजे ३९१.५ मेगावॅट इतका आहे.

**ख) भोपालपट्टणम प्रकल्प :–**

मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यांमध्ये हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा खर्च व फायदे मध्यप्रदेश व महाराष्ट्र ५५:४५ या प्रमाणात वाट्याला येणार आहेत. या प्रकल्पाच्या भुयारी विद्युतगृहात एकूण १००० मेगावॅट वीज निर्माण होणार आहे. महाराष्ट्राचा ह्यामध्ये ४५० मेगावॅट चा हिस्सा आहे. या प्रकल्पाची महाराष्ट्रातील प्राथमिक कामे डिसें. ८२ मध्ये हाती घेण्यात आली होती परंतु १९८६ पासून ती बंद करण्यात आली.

**ग) इंचमपल्ली प्रकल्प :-**

महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये हा प्रकल्प आहे. या प्रकल्पातून एकूण ९७५ मेगावॅट वीज निर्माण हा आहे. महाराष्ट्राचा यामध्ये ४३१ मेगावॅटचा वाटा आहे.

वीजेची गरज भागविण्यासाठी जलविद्युत निर्मितीचे आकर्षक, कमी वेळात कार्यान्वित होणारे, कमी खर्चाचे व प्रदूषण मुक्त प्रकल्प हाती न घेता खर्चिक, जास्त वेळ लागणारे आणि प्रदूषणाची तीव्र समस्या निर्माण करणाऱ्या (कोळसा, राख इ.) प्रकल्पांना चालना देणे हे एकूणच सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय दृष्टीने कितपत हितावह आहे याचा गांभीर्याने विचार व्हावा. या प्रकल्पामुळे वन क्षेत्रात घट होऊन जो वनसंपत्तीचा तोटा होणार आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने पर्यावरणीय तोटा औष्णिक वीज केंद्रामुळे होणार आहे. ही वस्तुस्थिति आहे.

- **भारतातील प्रमुख जलविद्युत प्रकल्प**

हायड्रो पॉवर हे सर्वात आर्थिक आणि गैर प्रदूषणकारी ऊर्जा स्त्रोतांपैकी एक मानले जाते. पाण्यापासून बनविलेली ऊर्जा हा हायड्रोइलेक्ट्रीसीटी म्हणून ओळखला जातो. हायड्रो वीज अर्थाता जलविद्युताने उत्पन्न होणारी वीज किंवा गिरणीत किंवा वाहत्या पाण्यातील गुरुत्वाकर्षण शक्तीचा वापर. ऊर्जेच्या या स्वरूपातून वीजनिर्मितीचे सर्वात सामान्य प्रकार म्हणजे एकतर थेट कचरापेटी निर्माण होत नाही आणि ते संपुष्टात येत नाही. भारतामध्ये स्थापित क्षमतेच्या दृष्टीने हायड्रो-इलेक्ट्रिकल क्षमतेची क्षमता सुमारे १४८,७०० मेगावॅट इतकी आहे ज्यामध्ये ४२,७८३ मेगावॅट (२८.७७ टक्के) ची क्षमता विकसित झाली आहे आणि १३,६१६ मेगावॅट (९ .२ टक्के) क्षमतेची क्षमता बांधकाम चालू आहे.

- **टिहरी धरणाची (तीन टप्पे) उत्तराखंड**

टिहरी धरणाची (तीन टप्पे) टीएचडीसी लिमिटेड, उत्तराखंड २४०० मे.व्ही. टिहरी बांध व्हींवी इलेक्ट्रिक प्रकल्प २००६ मध्ये कार्यान्वित भारत सर्वात उच्च हायडल प्रकल्प आहे. त्याचे बांधकाम यूएसएसआर पासून तांत्रिक सहकार्याने १९७८ मध्ये सुरु झाले.

- **कोयना हायड्रोइलेक्ट्रिक प्रोजेक्ट (४ टप्पे) महाराष्ट्र**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती सहकारी संस्था महाराष्ट्र १ ९ ६० मेगावॅट कोयना हाइड्रो विद्युत प्रकल्प हा भारतातील सर्वात मोठा पूर्ण हाइडल पॉवर प्रकल्प आहे. महाराष्ट्रातील कोयना नदीत बांधण्यात आलं आहे.

- **श्रीशैलम (आंध्र प्रदेश)**

श्रीशैलम एपीएनजीएनओ आंध्र प्रदेश १६७० मेगावॅट आंध्र प्रदेश आणि तेलंगाना जिल्ह्यातील अनुक्रमे कुरणूक मेहबूबनगर जिल्ह्यांच्या सीमेवर कृष्णा नदीवर उभारण्यात आलेला श्रीशैलम धरणाचा बांधकाम आहे. हा भारतातील दुसरा सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प आहे.

- **नाथापा झाक्री (६ टर्बाइनक्स २५ मेगावॅट) हिमाचल प्रदेश**

नाथापा झाक्री (६ टर्बाइनक्स २५ मेगावॅट) सतलज जल विद्युत निगम हिमाचल प्रदेश १५०० मेगावॅट हिमाचल प्रदेशातील सतलुज नदीवर बांधण्यात आलेला कन्जेंट ग्रॅविटी धरण नाथापा झाक्री धरणाचा आहे.

- **सरदार सरोवर बांध (गुजरात)**

सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेड नेवागम, गुजरात १४५० मेगावॅट. सरदार सरोवर बांध हे नर्मदा घाटी प्रकल्पाचे सर्वात मोठे धरण आहे, हे गुजरातमधील नवगमजवळील नर्मदा नदीवर एक ठोस गुरुत्व धरण आहे.

- **भाक्रा नांगल धरण (गोविंद सागर) हिमाचल प्रदेश**

भाखडा नांगल धरण (गोविंद सागर) भाखड बियास व्यवस्थापन मंडळ सतलज नदी, बिलासपूर–हिमाचल प्रदेश १३२५ मेगावॅट भाक्रा धरम हिमाचल प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यातील भाखरा विद्यामधे सतलज नदीत बांधलेला एक ठोस गुरुत्व धरण आहे. येथे जनरेट करण्यात आलेली वीज हिमाचल प्रदेश आणि पंजाब यांच्यात विभागली जाते आणि पंजाब आणि हरियाणाने सिंचनसाठी अधिक निचरा पाण्याचा वापर केला जातो.

- **शरवती प्रोजेक्ट (कर्नाटक)**

शरवती प्रोजेक्ट कर्नाटक पावर कॉर्पोरेशन लिमिटेड कर्नाटक १०३५ मेगावॅट शर्वती डॅम अधिकृतपणे लिंगनमककी जलाशय म्हणून ओळखले जाते, जोग फॉल्स पासून सुमारे ६ किलोमीटर दूर शारवती नदीत बांधले आहे.

- **इंदिरा सागर धरण (मध्य प्रदेश)**

इंदिरा सागर धरण, नर्मदा नदी नर्मदा व्हॅली विकास प्राधिकरण मध्य प्रदेश १००० मेगावॅट. इंदिरासागर धरम मध्य प्रदेशचा एक बहुउद्देशीय प्रकल्प असून तो मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील नर्मदनगर येथे नर्मदा नदीवर आहे. कर्चाम वांग्टा जलविद्युत प्रकल्प जयपी ग्रुप हिमाचल प्रदेश १००० मेगावॅट कर्चाम वांग्टा जलविद्युत प्रकल्प हिमाचल प्रदेशच्या किन्नौर जिल्ह्यातील सतलज नदीवर नदीच्या पाण्याच्या १२०० मेगावॅट क्षमतेचा एक प्रकल्प आहे.

- **देहूर (पंडो) वीज प्रकल्प (हिमाचल प्रदेश)**

देहूर (पंडो) वीज प्रकल्प भाकरा बियास व्यवस्थापन मंडळ हिमाचल प्रदेश ९०९ मेगावॅट हिमचिल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील ब्यास नदीवर पांडोह धरण बांधले आहे. १९७७ मध्ये जलविद्युत ऊर्जानिर्मितीच्या प्राथमिक उद्देशासाठी हे कार्यान्वित करण्यात आले.

- **अपर इंद्रवती (ओरिसा)**

अपर इंद्रवती ओरिसा हायड्रो पॉवर कार्पोरेशन ओरिसा ६०० मेगावाट अपर इंद्रवती धरण ६०० मेगावॅटच्या स्थापित क्षमतेसह इंद्रवती नदीवरील गुरुत्वाकर्षण धरण आहे.

- **नागार्जुन सागर धरण गुंटूर (आंध्रप्रदेश)**

नागार्जुन सागर धरम गुंटूर आंध्रप्रदेश पॉवर जनरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड आंध्र प्रदेश ९६० मेगावाट नागार्जुन सागर धरणाची निर्मिती एनजे सागर धरणातून कृष्णा नदीत बांधण्यात आली आहे, आंध्र प्रदेशच्या नलगोंडा जिल्ह्यात पसरली व आंध्रप्रदेशातील गुंटूर जिल्ह्यात म्हटले आहे. १ ९ ६७ मध्ये धरणाची निर्मिती झाली.

- **पश्चिम बंगाल वीज वितरण कंपनी (पश्चिम बंगाल)**

पश्चिम बंगाल वीज वितरण कंपनी पश्चिम बंगाल ९०० मेगावाट पुरूलिया पंप स्टोरेज पश्चिम बंगाल स्टेट इलेक्ट्रिक वितरण कंपनी लिमिटेड हाइड्रोइलेक्ट्रिक पॉवर प्लांट हा एक प्रकल्प आहे जो रिव्हर्सिबल पंप टर्बाइनच्या माध्यमाने अपर डॅम ते लोअर डॅमपर्यंत साठवलेले पाणी निर्जंतुक करून ९०० मेगावॅट वीज निर्मिती करू शकते.

- **जनरेटर इडुक्की (केरळ)**

जनरेटर इडुक्की केरळ स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड केरळ ७८० मेगावॅट इडुक्की धरम केरळच्या इडुक्की जिल्ह्यातील पेरियार नदीत बांधण्यात आली आहे. १९७६ मध्ये आयोगाने तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राष्ट्राला समर्पित केले. राज्यातील वीज निर्मिती हा सर्वात मोठा स्त्रोत आहे.

- **सलल आय (जम्मू व काश्मिर)**

सलल आय आणि दुसरा एनएचपीसी लिमिटेड जम्मू व काश्मिर ६९० मेगावॅट सीलल हायड्रोएलेक्ट्रिक पॉवर स्टेशन स्टेज–१ आणि स्टेज–२ हे जम्मू आणि काश्मीरमधील चिनाब नदीवर बांधण्यात आले आहे.

- **चामेरा (हिमाचल प्रदेश)**

चामेरा एनएचपीसी लिमिटेड हिमाचल प्रदेश १०७१ मेगावॅट चामरा धरण हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील डलहौसी शहराजवळ स्थित रवी नदीवरील जलविद्युत प्रकल्प आहे.

- **रंजीत सागर धरण (पंजाब)**

रंजीत सागर धरण पंजाब राज्य वीज महामंडळ मर्यादित पंजाब ६०० मेगावॅट पंजाबच्या रवी नदीवर पंजाब सरकारद्वारे बांधण्यात आलेल्या हायड्रो इलेक्ट्रिक सह सिंचनाचा उद्देश बांधण्यात येत असलेल्या ६०० मेगावॅट क्षमतेचा रिनजीत सागर धरण हा थिन बांध म्हणून ओळखला जातो.

- **ओंकारेश्वर नर्मदा (मध्यप्रदेश)**

ओंकारेश्वर नर्मदा हायड्रोइलेक्ट्रीक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन मध्यप्रदेश ५२० मेगावॅट ओंकारेश्वर धरम हा मध्यप्रदेशातील खांडवा जिल्ह्यात नर्मदा नदीवर एक गुरुत्व धरण आहे. त्याची जलविद्युत केंद्र येथे ५२० मेगावॅटची स्थापित क्षमता आहे.

- **बेलीमेला धरण (ओरिसा)**

बेलीमेला धरण ओरिसा हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन ओरिसा ५१० मेगावॅट, ओडिशातील मलकानगिरी जिल्ह्यात गोदावरी नदीच्या उपनदी असलेल्या सिलेरू नदीवर बेलीमेला जलाशय आहे. बेलीमेला हा आंध्र प्रदेश आणि ओरिसा सरकारचा संयुक्त प्रकल्प आहे.

- **तिस्ता बाँह (सिक्किम)**

तिस्ता बाँह एनएचपीसी लिमिटेड सिक्किम ५१० मेगावॅट तिस्ता–वी, पूर्व सिक्कीम जिल्ह्यातील तिस्ता नदीतील सहा जलविद्युत प्रकल्पांपैकी एक आहे. यापैकी ५१० मेगावॅट क्षमतेच्या तीन टर्बाइन आहेत.

- **हायड्रो पॉवर स्टेशन – महाराष्ट्र**

भातसा धरण हे महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या जवळ भातसा नदीवर एक गोडफिल आणि गुरुत्व धरण आहे.

**१.३.४ औद्योगिक विकास :–**

विकास हा मानवी समाजाचा स्थायी भाव आहे. आदीम काळापासून मानवी समाज सातत्याने विकास करत आला आहे. त्या त्याच्या प्रवासात पाण्याचे अनन्य साधारण महत्व आहे. आपल्याला उपलब्ध असलेल्या जमीन, पाणी आणि हवा या तीन नैसर्गिक संसाधनापैकी एक पाणी हे साधन नसेल तर विकास जवळजवळ अशक्यच आहे. शेती असो, नाही तर औद्योगिक विकास असो, पाण्याशिवाय ते शक्य नाही, हे आता जवळजवळ मान्यच झाले आहे. पाण्याशिवाय विकास ही संकल्पनाच आता अशक्य बनली आहे पाण्याशिवाय औद्योगिक विकास अशक्य आहे. भारताने हा घटक मध्यवर्ती ठेवून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्रोत्तर कालखंडात मोठी धरण उभारली. काही ठिकाणी नव्याने बांधली जात आहेत व त्याचा उपयोग विज निर्मितीसाठी केला जात आहे. भारताचा विकासदर दिवसेंदिवस वाढत आहे. विजेची आणि पाण्याची गरज वाढत चालली आहे. ही गरज भारतातील काही मोठी धरणे पूर्ण करित आहे.

प्रत्येक उत्पादनासाठी पाण्याची गरज असते. काही उद्योगांना भरपूर पाणी लागते. तर काहींना कमी पाणी लागते. एक कागदाचा तक्ता करायला १० लिटर पाणी लागते, तर ५०० ग्रॅम प्लास्टिक तयार करण्यास ९१ लिटर पाणी खर्ची पडते. एक कार निर्माण करण्यासाठी एका मोठ्या पोहण्याच्या तलावात भरण्यास जेवढे पाणी लागते त्यापेक्षा अधिक पाणी आवश्यक असते. औद्योगिकरण ही लोकसंख्या वाढीमुळे आवश्यक बाब झाली आहे. लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी, उत्पादनांची संख्या आणि गुणवत्ता वाढीसाठी आणि आर्थिक उत्पन्न मिळवण्यासाठी औद्योगिकरणाशिवाय पर्याय नाही. शाश्वत विकासासाठी शेतीचेही औद्योगिकरण आता करण्यात येवू लागले आहे. त्यामुळे निव्वळ रोजगार निर्मिती, उत्पादन वाढ, गुणवत्ता वाढ आणि नफ्यात वाढ यावरच औद्योगिक जगताचे लक्ष असते. त्यासाठी वापरण्यात येणारी संसाधने कुठून येतात, त्यांचे संधारण होते का ? पाणी किती आणि कसे वापरले जाते ? त्यात काटकसर करता येईल का ? याकडे त्यांचे लक्ष नसते. त्यांच्या कृतीमुळे पर्यावरणाचे कसे आणि किती नुकसान होत आहे हे पहाण्यास त्यांना सवड नसते. औद्योगिकरण आवश्यकच आहे, कारण वाढत्या लोकसंख्येच्या हाताला काम देणे महत्वाचे आहे. पण त्याच बरोबर हेही पहाणे महत्वाचे आहे की उपलब्ध जलसाठे प्रदूषित होणार नाहीत किंवा संपणार नाहीत. कृत्रिम

वस्तू तयार करण्यास सुरूवातीला नैसर्गिक संसाधने लागतातच. त्यात पाणी नसेल तर, कोणतीच औद्योगिक प्रक्रिया करता येणे अशक्य होवून बसेल. तेव्हा शाश्वत विकासासाठी औद्योगिकरणाबरोबरच जलसाठ्यांचे संरक्षण आणि संधारण करणे आवश्यक आहे. सन २००० ते २०५० पर्यंत औद्योगिक वापरासाठी पाण्याची मागणी ४०० टक्के वाढण्याची शक्यता आहे. आणि हे सर्व विकसनशील देशात घडणार आहे. त्यामुळे तेथे वापरले जाणारे उत्पादन तंत्रज्ञान शक्यतो जलविरहीत असावे किंवा कमीतकमी पाण्याचा वापर करणारे असावे. उत्तम जल किंवा सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पातील गुंतवणूक परत मिळण्यास बरीच वर्षे जातात. त्यापेक्षा लवकर उत्पादनातून फायदा होतो. त्यामुळे जल किंवा सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पावर खर्च करण्यास उद्योगांना कायद्याने सक्ती करावी लागते.

नवीन तंत्रज्ञानाने आता पाण्याचा वापर कमी करण्यात यश येवू लागले आहे. टेक्स्टाईल मिल्स, कोका कोलासारख्या मोठ्या सरबत आणि थंड पेयांच्या कंपन्या गेल्या १० वर्षांपासून त्यांच्या उत्पादन विभागातील पाण्याचा वापर कमी करण्यासाठी प्रयत्नशील असून त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या संशोधनात भांडवल गुंतवू लागल्या आहेत. आपल्याकडे जसे उद्योग वाढत आहेत तशी त्यांची पाण्याची गरजही वाढत आहे. त्यामुळे औद्योगिक वसाहतींना धरणातून पाण्याचा पुरवठा करण्याची वेळ येवू लागली आहे. यातून औद्योगिक घटक आणि शेतकरी यांच्यात तेढ निर्माण होत आहे. शेतकऱ्यांना वाटते की उद्योगांना पाणी दिल्यास त्यांना सिंचनास पाणी कमी पडेल. यातून मार्ग काढण्याची कसरत शासनास करावी लागत आहे. पण, शाश्वत औद्योगिक विकासासाठी शाश्वत पाण्याचा पुरवठा उद्योगांना होणे आवश्यक आहे. शाश्वत औद्योगिक विकास झाला, तरच तरूणांना रोजगार उपलब्ध होईल, जागतिक बाजारपेठेत आपल्या मालाला मागणी असेल, देशाची आर्थिक स्थिती सुधारेल आणि जगात महासत्ता बनणे शक्य होईल.

औद्योगिक प्रकल्पासाठी पाण्याचा वापर होत असतांना एक महत्त्वाचा व लक्ष वेधक उद्योग म्हणजे मद्यनिर्मिती. मद्य व बीअर निर्मितीसाठी कच्चा माल म्हणून पाण्याचा वापर केला जातो. एक लिटर बीअर व मद्य निर्मितीसाठी सुमारे चार लिटर पाण्याची गरज असते. हे गणीत

विचारात घेतल्यास भारतभर मद्यनिर्मितीसाठी किती प्रचंड प्रमाणात पाण्याचा वापर होत आहे हे लक्षात येईल. त्यामुळे औद्योगिक प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो.

राज्यातील उद्योगांना प्रतिदिन १९४ कोटी लिटर पाण्याची गरज असून सध्या १२८.६ कोटी लिटर पाण्याचा वापर औद्योगिक क्षेत्रातून केला जातो. औद्योगिक प्रकल्पांसाठी वापरल्या जाणाऱ्या एकूण पाण्यापैकी ६५ टक्के पाणी हे सिंचन प्रकल्पातून पुरविले जाते. ३४ टक्के पाणी औद्योगिक महामंडळाच्या प्रकल्पातून उपलब्ध होते तर १ टक्के पाणी इतर स्त्रोतांद्वारे मिळते. महाराष्ट्रातील शहरीकरण व औद्योगिकरणाचा प्रमाणातील वाढीबरोबरच शेतीचे पाणी हे शहरे व उद्योगासाठी राखून ठेवले जात आहे. याचा परिणाम म्हणून राज्यातील सिंचन क्षेत्रात अपेक्षित वाढ घडून येत नाही.

### १.४ विकास प्रकल्पाचे फायदे :–

विकास हा मानवी समाजाचा स्थायी भाव आहे. आदिम काळापासून मानवी समाज सातत्याने विकास करत आला आहे. त्याच्या या प्रवासात पाण्याचे महत्त्व अनन्य साधारण आहे. आपल्याला उपलब्ध असलेल्या जमिनी, पाणी आणि हवा या तीन नैसर्गिक संसाधनापैकी एक पाणी हे साधन नसेल तर जवळ–जवळ विकास अशक्यच आहे. शेती असो किंवा औद्योगिक विकास पाण्याचा वापर जास्तीत जास्त करावा लागतो. आता हे सर्वमान्य आहे की, पाण्याशिवाय विकास ही संकल्पना अशक्य बनली आहे.

### १.४.१ स्थानिक भागाचा विकास व रोजगार निर्मिती :–

धरण बांधकाम प्रकल्पामुळे स्थानिक भागाचा विकास हा महत्त्वपूर्ण मानला जाणारा बदल घडून येतो. प्रत्यक्ष धरण बांधकाम करते वेळी धरणाचे आस पास असणाऱ्या गांवामधील लोकांना रोजगार निर्मिती होत असते. कोणत्याही मध्यम धरणांचे बांधकाम हे जवळपास ५ ते १० वर्षे सुरु असते. ह्या कालावधी साठी पुरुष व महिलांना रोजगार मिळतो. त्यामुळे आर्थिक सुब्बता ह्या भागामध्ये निर्माण होत असते. धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर धरणातील पाण्यामुळे धरणक्षेत्राच्या लाभक्षेत्रातील गावांमध्ये शेती, पिण्याचे पाणी व इतर वापरासाठी पिण्या पाण्याची अखंड उपलब्धता निर्माण होत असते. त्याचप्रमाणे धरण हे डोंगरदऱ्या व

निसर्गरम्य वातावरणात असल्याने धरणात पाणी साठ्यामुळे आणखी सौंदर्यात भर पडते व हा भागच निसर्ग पर्यटनासाठी विकसित केला जाऊ शकतो व वर्षभर ह्या ठिकाणी पर्यटनासाठी खुला करता येऊ शकतो व त्यामुळे आर्थिक विकास साधता येऊ शकतो. त्यामुळे स्थानिक भागाचा विकास हा आपोआपच होवून त्याचा फायदा स्थानिक रहिवाश्यांना होऊ शकतो.

**१.४.२ शाश्वत विकास :-**

पृथ्वी तलावर पाण्याचे वितरण व त्यांची गुणवत्ता यात खूप असमानता आहे. विकास आणि शाश्वत विकास यात मोठा फरक आहे. शाश्वत विकासासाठी पुढील मुद्यांवर मांडता येतील.

**१. पाणी आणि आरोग्य-**

मनुष्यास पाणी म्हणजे जीवन तसेच सर्व परजीवांना पाणी हे अतिशय आवश्यक संसाधन आहे. सजीवांच्या शरीराचा ५० टक्के पेक्षा अधिक भाग हा निव्वळ पाण्यानेच बनलेला असतो. पाणी नसेल तेथे वनस्पती वाढू शकत नाही. आपल्याला आपले अस्त्वित्व ठिकवायचे असेल तर शरीर सशक्त ठेवावे लागेल आणि ते पाण्याशिवाय शक्य नसते. पाण्यामध्ये अनेक प्रकारचे सूक्ष्म जीवन जगत असतात त्यात काही विषाणूही असतात. विशेष करून जे पाणी प्रदूषित झाले आहे ते पाणी पिल्याने साहजीकच मानवाचे आरोग्य धोक्यात येते. त्यात जलजन्य आजार उदा. टायफाईड, डायरिया, कॉलेरा, कावीळ, मलेरिया इ. रोगांचा प्रादूर्भाव होता. मानव जातीला पिण्यासाठी मुबलक व स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी धरणे ही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यातूनच सर्व मानव जातीचे कल्याण साधता येते.

**२. पाणी आणि शहरीकरण-**

सध्या शहरीकरण अतिशय वेगाने होत आहे. जगातील एकूण शहरीकरणांपैकी ९३ टक्के शहरीकरण विकसनशील देशात होत आहे. त्यातील ४० टक्के जनता झोपडपट्ट्यांमध्ये राहत आहेत. शहरांच्या आजू-बाजूचा ग्रामीण भाग हळूहळू अदृश्य होऊ लागला आहे. शहरांमध्ये मोठ-मोठ्या इमारतीची बांधकामे झाल्याने भूभागावर जास्तीत जास्त लोकसंख्येची व्यवस्था करता येते. या सर्व लोकसंख्येला पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे व त्यांच्या आरोग्याची निगा

राखणे यासाठी विविध शासकीय योजनांमार्फत पिण्याच्या पाण्याची सोय शहरांमध्ये केली जाते. तसेच शहरांच्या आजू–बाजूच्या भागात शहरातील लोकांसाठी अन्न–धान्य व भाजीपाला इ. उत्पादन होत असते. त्यासाठी पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे. एकूणच शहरीकरणामध्ये पाण्याचा वाटा मोठा आहे. ही गरज धरणाद्वारेच पूर्ण होऊ शकते.

**३. पाणी आणि औद्योगिकरण–**

लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी, उत्पादनांची संख्या आणि गुणवत्ता वाढीसाठी तसेच आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी औद्योगिकरणाशिवाय पर्याय नाही. शाश्वत विकासासाठी शेतीचेही औद्योगिकरण आता करण्यात येत आहे. तसेच या कृतींमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. औद्योगिकरणासाठी मोठ्याप्रमाणावर पाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जलसाठ्यांची निर्मिती व्हावी यादृष्टीने धरणांची बांधणी केली जाते. शाश्वत विकासासाठी जलसाठ्यांची निर्मिती मोठी भूमिका बजावत आहे. शाश्वत औद्योगिक विकास झाला तरच तरूणांना रोजगार उपलब्ध होईल, देशाची आर्थिकस्थिती सुधारेल आणि देश जगात महासत्ता बनणे शक्य होईल.

**४. पाणी आणि उर्जा–**

पाणी आणि उर्जेचा परस्पर संबंध आहे. ऊर्जा निर्माण करण्यास पाण्याचा उपयोग केला जातो तर पाणी मिळविण्यासाठी ऊर्जेचा वापर केला जातो. पूर्वीपासून नद्यांवर धरणे बांधून जलविद्युत निर्मिती केली जात आहे. आजही ऊर्जेची गरज भागविण्यासाठी सर्वात प्रथम जलविद्युत प्रकल्पाचा उपयोग केला जातो. या प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता असावी लागते व त्यासाठी मोठ–मोठ्या धरणांचा वापर करता येऊ शकतो. जगातील एकूण जलविद्युतचा वाटा १६ टक्के इतकाच आहे. परंतु तो वाढविण्यासाठी जगभर प्रयत्न सुरु आहेत. ऊर्जेच्या बाबतीत शाश्वत विकास साधायचा असेल तर मोठ्याप्रमाणात धरण प्रकल्पाद्वारे जलविद्युत निर्मिती केली जाऊन विकास प्रक्रियेत शाश्वत विकास साधता येईल.

**१.५ विकास प्रकल्पाच्या नकारात्मक बाबी :-**

धरणांच्या सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय परिणामांचा विचार करता, पाणलोटक्षेत्र व लाभक्षेत्रात त्याच्यामुळे कोणती हानी होते यांचा विचार करणे गरजेचे आहे. धरणांच्या भिंतीमुळे पाणीप्रवाह आडतो व पाणी भोवतालच्या भागात पसरते. पाणलोटक्षेत्रातील जमीन व जंगल पाण्याखाली जाते. लोक मोठ्याप्रमाणावर विस्थापित होतात या सर्वांचा एकमेकांशी परस्पर संबंध आहे. यामध्ये पुढील मुद्यांच्या आधारे विकास प्रकल्पाच्या नकारात्मक बाबी स्पष्ट करता येतील.

सामान्यतः धरणे उताराचा फायदा घेण्यासाठी डोंगराळ भागात बांधली जातात, त्या भागात जंगले असतात आणि तेथे राहणारा समाज असंघटित असतात. त्यामुळे सरकारला जास्त विरोध होत नाही. १९५० ते १९७५ दरम्यान भारतात ४.७९ लाख हेक्टर जंगल मोठ्या धरणांमुळे नष्ट झाले. आज वर जंगलांचे प्रमाण देशातील एकूण जमिनीच्या ३३ टक्के असावे असे मानले असले तरी आज देशात केवळ १० टक्के जमिनीवरच जंगल उरले आहे आणि उरलेल्या जंगलांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. जंगल बुडाले की वैविध्यपूर्ण वनस्पती, औषधी व उपयुक्त वनस्पती नष्ट होतात. जंगल हे प्राण्यांचे नैसर्गिक वस्तीस्थान आहे. जंगलाशी त्यांचे अस्तित्व अनेक प्रकारे निगडीत असते. वन्य प्राणी, पक्षी, जीवजंतू हे निसर्गामध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न करतात. त्याच्या अनेक जाती धरण प्रकल्पामुळे नष्ट होतात.

धरणांच्या जलाशयांमुळे कित्येकदा सुपीक शेत जमीनही बुडते. सुपीक जमीनीची किंमत बाजारभावाप्रमाणे काढणे हे आर्थिक हिशोबासाठी ठिक आहे. परंतु जमीनेचे माल अमर्याद आहे. मातीवरचा सुपिक स्थर तयार करण्यासाठी निसर्गाला शेकडो वर्ष लागतात. धरणांमुळे फार मोठ्या प्रमाणात सुपिक शेत जमीन पाण्याखाली जाते व त्यामुळे अन्नधान्यांचे उत्पादन यामध्ये मोठी घट होते. धरणाच्या बुडित क्षेत्रात मनुष्य वस्ती राहू शकत नाही. डोंगरांमध्ये व घनदाट जंगलांमध्ये राहणारे आदिवासी जनसमूहाच्या भावनांची कदर इतर लाभक्षेत्रातील लोकांना नसते. धरणाच्यावेळी विस्थापित होणाऱ्या लोकांची दखल घेतली जात नाही. पिढयांपिढ्यांची वस्ती असलेले स्वत:चे मूळ गाव सोडून पोट भरण्यासाठी स्थलांतर करणारी माणसे आज

मोठ्याप्रमाणावर आहेत. पण हे स्थलांतर विकास प्रकल्पांमुळेच होते. धरणांमुळे होणारे विस्थापन हा महत्त्वाचा मुद्या आहे. यात होणारे विस्थापन हे परिस्थितीच्या दडपणाखाली झालेले असते त्यामुळे नविन ठिकाणी पुन्हा नविन जीवन सुरु करणे विस्थापितांसाठी मोठा प्रश्न निर्माण होत आहे.

**समारोप :–**

नमूद प्रकरणामध्ये संशोधकाने विकासात्मक प्रकल्पाची संकल्पना व आवश्यकता या बाबींमध्ये कृषी विकास, सिंचन, वीजनिर्मिती, औद्योगिक विकास यादृष्टीने विकासात्मक प्रकल्पाची ग्रामीण भागातील गरज व महत्त्व या बाबी अभ्यासल्या आहेत. वरील तीनही बाबी विकास प्रक्रियेत मोठा सहभाग देत असतात. विकसनशील देशांमध्ये कृषी विकास सिंचन विकास झाल्यास विकास प्रक्रियेची गती वाढून देशाची आर्थिक सुब्बता अबादित राहू शकते. तसेच विकास प्रकल्पांचे महत्त्वाचे फायदे उदा. स्थानिक भागांचा विकास, रोजगार निर्मिती, विकास प्रकल्प उभारणीमुळे होणारा शाश्वत विकास याबाबत अभ्यास करून त्याची मांडणी या प्रकरणामध्ये करण्यात आली आहे. विकास प्रकल्पाच्या सकारात्मक बाबींसोबतच विकास प्रकल्पांमुळे होणारी हानी व नकारात्मक बाबींचा आढावा घेऊन त्यांचे दुष्परिणाम विस्थापितांच्या संपूर्ण जीवनशैलीवर होत आहे. लाभक्षेत्रातील गांवामध्ये धरणामुळे येणारी सुब्बता बघता विस्थापनामुळे धरणग्रस्तांची झालेली हानी मोठ्याप्रमाणावर आहे. ह्या सर्व विस्थापन प्रक्रियेमध्ये धरणग्रस्तांची मोठ्याप्रमाणावर हेळसांड होते. त्यांचा वर्षानुवर्ष स्थापित असलेली कुटुंब पद्धती, गावे, नाती–गोती संबंध सांस्कृतिक चालीरिती, सामाजिक प्रथा या सर्व बाबींचा मोठ्या प्रमाणात हानी होवून नविन ठिकाणी पुर्नस्थापित होवून आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घडी बसविण्याचे मोठे आव्हान धरणग्रस्त कुटुंबासमोर निर्माण होते. वरील सर्व बाबींचा अभ्यास करून त्यांची मांडणी या प्रकरणामध्ये केलेली आहे.

***

# प्रकरण दुसरे
# साहित्याचे सिंहावलोकन

**प्रास्ताविक**

भारतातील विविध विकास प्रकल्पामुळे झालेल्या विस्थापनामुळे झालेल्या लोकांचे विस्थापन, पुनर्वसन ह्या संबंधी विविध लेखकांनी मांडलेली मते यांचा अभ्यास करून त्यांची मते जाणून घेऊन त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व करत असतांना त्यांच्या मुळ हेतू, मते व अबाधीत राहिल याची काळजी संशोधकाने घेतली आहे. त्यातील बहुतांश लेखन इंग्रजी भाषेमध्ये आहे.

'महाराष्ट्र पाणी परिषद' ही कॉम्रेड दत्ता देशमुख यांनी लिहिलेल्या पुस्तीकेत सरकारच्या दुर्लक्षामुळे विस्थापित लोकांचे पुनर्वसन हा विस्पोटक मुद्दा बनेल व त्यामुळे लोकांमध्ये धरण विरोधी एकत्रीत भूमिका तयार होईल.

नुसते समाधानकारक पुनर्वसन करून चालणार नाही तर ते विकास केंद्रीत पुर्वसन व्हावे अशी चळवळ उभी रहायला पाहिजे. जास्तीत जास्त लोकांच्या विकास प्रकल्पासाठी प्रकल्पग्रस्त लोकांना त्यांची पारंपारिक जागा, घरे, पारंपारिक उत्पन्नाची साधने सोडावी लागतात परंतु ह्या बाबींकडे शासनाने लक्ष केंद्रीत केले तर प्रकल्प ग्रस्त लोक सुरक्षित व चांगले जीवन जगू शकतील. तसेच पुनर्वसनाचे जे कायदे आहेत त्यांचे पालन योग्य रितीने केले जावे.

पुनर्वसनामध्ये सत्ताधारी व विरोधी पक्षांनी सारखी जबाबदारी घेऊन विकास केंद्रीत पुनर्वसन होण्यासाठी प्रयत्न करावेत त्याचप्रमाणे पुनर्वसनासाठी अधिकार प्राप्त स्वतंत्र यंत्रना उभी करून त्याद्वारे योग्य पुनर्वसन होण्यासाठी प्रयत्न व्हावेत. या सर्व प्रक्रियेमध्ये लाभधारक व विस्तापित लोकांचे मते विचारात घेतली जावी.

विकास ही जागतिक स्तरावर मोठी चिंता आहे. समाजासाठी मोठ्या प्रमाणात फायदे निर्माण व्हावेत यासाठी विकास हाती घेतला जातो तसेच देशातील नैसर्गिक साधने, संसाधनाचे व्यवस्थापन हा विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. विकासाचे पाणी व ऊर्जा हे दोन महत्त्वाचे

स्रोत मानले जातात व धरण हे विकासाचे चिन्ह मानले जाते असे दक्षिण अफ्रिकेचे शिक्षणमंत्री व जागतीक आयोगाचे अध्यक्ष प्रो. कादर अस्माल (डिसेंबर २०००) यांनी या बाबत सांगितले आहे की, देशाची आर्थिक प्रगती आणि जीवन गुणवत्ता वाढ हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे.

**डॉ. भारत पाटणकर–** प्रसिद्ध लेखक व प्रकल्पग्रस्त चळवळीचे नेते यांनी आपल्या कृष्णाखोऱ्याचे पाणी या पुस्तिकेत राबणाऱ्या जनतेचा पर्याय (१९९७) भारतासारख्या मोठ्या देशात अर्ध्याहून अधिक धरणे महाराष्ट्रात आहेत, विकास विस्थापितांचे पुनर्वसन ह्या मुद्यांवरील विविध अंदोलने देखील महाराष्ट्रात झालेली आहेत. या सर्वांची दखल घेत राज्य सरकारने १९७६ साली प्रथमच पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी केली. चळवळीतील नेते, लोकांनी 'आधी पुनर्वसन मग धरण' हा मुद्या लावून धरला व त्यावर स्थिर राहिले परंतु कधीही धरण विरोधी भूमिका घेतली नाही. इ.स. १९५९–६० च्या काळात बांधल्या गेलेल्या कोयना व पानशेत धरणातील पुनर्वसीतांचे अध्यापही पुनर्वसन पूर्ण झालेले नाही. या कायद्यामध्ये विस्थापनाचा कमीत कमी परिणाम ठेवण्यावर भर दिला गेला.

पाणी साठा वाढविण्यासाठी मोठे धरण बांधण्याऐवजी छोटी–छोटी अनेक धरणे बांधावित त्यामुळे पाणी साठा ही वाढेल व जास्तीत जास्त लोकांना फायदा मिळून पुनर्वसनाचे परिणाम कमीत कमी लोकांना सोसावे लागतील. तसेच या सिंचनासाठी छोट्या सिंचन योजना निर्माण केल्यास त्याचा अधिक चांगला परिणाम होऊ शकतो. सरकारचा मोठ्या बांधण्याचा हट्ट कायम आहे परंतु असे मोठे धरण बांधले गेले तर सरकारने त्वरीत पुनर्वसन केल्यास सरकार आपली विश्वासहर्ता पुन्हा स्थापित करू शकते. तसेच बांधकाम सुरू करण्यापूर्वी विस्थापित लोकांचे पुनर्वसन सुरू करावे असे सूचविले आहे.

**कुसुम कर्णिक–** यांनी १९९९ साली लिहिलेल्या आपल्या मुक्तलेखात धरणग्रस्तांच्या कहाण्या व बेपर्वाह सरकार यामध्ये नर्मदा बचाव आंदोलनात एकत्रित केलेल्या अहवालात धरणात विस्थापित झालेल्या लोकांच्या व्यथा व व्यथांवर प्रकाश टाकलेला आहे. या विस्थापित विभागातील कुटुंबे, मुले व जनावरे यांच्यावर आलेल्या संकटाबाबत मांडणी केलेली आहे. तर साठलेल्या पाण्यामुळे पसरणारे विविध आजार जसे सेलेब्रल मलेरिया सारख्या साथींच्या

आजारांच्या फैलावामुळे निर्माण झालेल्या आरोग्य विषयक प्रश्नांवर प्रभाव टाकलेला आहे त्याचबरोबर विस्थापनात नुकसान भरपाईसाठी गावस्तरीय प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार, आंदोलनकांवर केलेली दडपशाही याबाबत लेखिकेने आपल्या लेखात नमूद केले आहे. विस्थापितांच्या प्रत्यक्ष प्रश्नावर उपाय सूचविण्यात प्रशासनाला अपयश आलेले आहे व वास्तविकता सरकारच्या बेपर्वाई बद्दल नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र जल विभागाच्या सिंचन आयोग अहवालात अध्यक्ष माधवराव चितळे (१९९९) सिंचन प्रकल्पातील जनतेचे पुनर्वसनाबाबत महाराष्ट्र सिंचन आयोगाने केलेल्या शिफारशींचा आढावा घेण्यात आलेला आहे. १९६६ च्या प्रकल्प बाधित व्यक्तिंचे पुनर्वसन कायद्यांच्या अहवालात सूचविल्याप्रमाणे महसूल व सिंचनांबाबतच्या तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी अवघड जात असल्याने महसूल खात्यामार्फत प्रतिनियुक्तीद्वारे अधिकाऱ्यांच्या नेमणूका करून महसूल व सिंचन ह्या बाबी हाताळल्या जाव्यात या अहवालात असे ही सूचविण्यात आले आहे की, प्रकल्पग्रस्तांना जमिन, निवासी घरे व इतर मालमत्तांपासून मिळणारी नुकसान भरपाई आणि इतर पुनर्वसनाच्या बाबी जसे नविन वसाहतींमध्ये सामाजिक सुविधांची तरतूद १ वर्षाच्या आत पूर्ण करावी तसेच प्रत्येक प्रभावित कुटुंबासाठी किमान २५ चौ.मि. जागा विनामूल्य पुरविली जावी. जेणे करून त्यांचे जीवन पुढे सुरळीतपणे चालू राहू शकते. त्याचबरोबर प्रभावित कुटुंबातील किमान एक पात्र व अनुभवी व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून दिला जावा. सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींना शासकीय अनुदानीत संस्था, सहकारी संस्था, महापालिका, महामंडळे औद्योगिक केंद्रे, शाळा व महाविद्यालये यामध्ये नोकरी द्यावी. तसेच लाभक्षेत्रामधील साखर कारखान्यांना मोठ्या लाभ मिळालेला आहे. त्यामुळे साखर कारखान्यांमध्येही नोकरी विषयाची तरतूद करता येईल. शेवटी अहवाल असे सूचवितो की, स्थानिक सल्लागार समितीच्या देखरेखी खाली व मार्गदर्शनाखाली अराजकीय, अशासकीय, ज्ञानी, सामाजिकदृष्ट्या बांधिल व सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली पुनर्वसन अधिकाऱ्याने कार्य करावे यामुळे प्रकल्पग्रस्ताच्या मनात शासनाबाबत असलेला अविश्वास कमी करता येईल व हे प्रकल्पग्रस्तांना सुनिश्चित करणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**डॉ. विजय शिगणापुरे** यांचे राष्ट्रीय परिषदेमधील अध्यक्षिय भाषण (२००२) विषय– प्रकल्प प्रभावित लोक– सामाजिक विकास आणि सामाजिक कार्य २७ नोव्हेंबर २००२ रोजी राष्ट्रीय समाजकार्य संस्थेचे भैयाजी पांढरीपांडे, महाराष्ट्र राज्य समाजकार्य शिक्षक संघटना व गोसी खुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या परिषदेमध्ये प्रकल्पग्रस्तांची स्थितीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आलेला होता या भाषणात त्यांनी विशेष करून प्रकल्पग्रस्तांना त्यांचे मूळ गाव, ठिकाण सोडून इतर ठिकाणी जावे लागते याचा परिणाम म्हणून सामाजिक, आर्थिक परकीयपणा, वंचितपणा, असामानता आणि अपमान ह्या गोष्टींना सामोरे जावे लागते व सोसावे लागते. व्यावसायिक समाजकार्याची या सर्व बाबींवर सहभाग घेण्याची व देखरेख ठेवण्याची जबाबदारी महत्त्वपूर्ण आहे. व्यावसायिक समाजकार्याद्वारे सामाजिक वकिली, लोकसंख्यतील सहभागी व्यवस्थापन, लोकसंस्थांचे आयोजन, क्षमता वाढविणे सामग्री वाहतूक करणे ह्या विद्यमान गरजा ओळखणे व त्यावर प्रतिसाद देणे याबाबींमध्ये हस्तक्षेप केला जावा त्यामुळे प्रभावित लोकांना सक्षम बनविण्याचे मोठे कार्य सिद्ध होऊ शकते. प्रकल्प बाधित लोकांना याचा निश्चित फायदा होऊ शकेल.

**विनायक एम. देशपांडे** यांनी २००२ साली राष्ट्रीय परिषदेमध्ये सादर केलेल्या शोध पत्रिकेमध्ये ''प्रकल्प प्रभावित लोक–एक आर्थिकदृष्टिकोन'' ह्या शोध पत्रिकेमध्ये लेखकांने मांडणी केली आहे की, पुनवर्सनाची पारंपारिक संकल्पना अपूरी आहे. प्रकल्प ग्रस्तांचे भौतिक पुनर्वसन करून चालणार नाही तर त्यात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक व इतर पैलूंचा ही विचार व्हावा. प्रकल्पग्रस्त लोकांना ह्या भावनांचा सामना करण्यासाठी मदत केली गेली पाहिजे. विस्तापनासाठी योजना तयार करणारे सक्षम असणे आवश्यक आहे कारण विस्थापित लोक एक नविन प्रकारचे जीवनसंक्रमण करत असतात त्यामुळे त्यांच्या पारंपारिक ज्ञानाचा आदर करा व त्यांचा दृष्टिकोन समजून घ्यावा. पुरेसे आणि योग्य पुनर्वसन हा पुनर्वसन धोरणाचा महत्त्वाचा पैलू असावा.

भूसंपादन कायद्याच्या व्याप्ती व तरतूदी अतिशय अपुऱ्या आहेत असे काहींचे मत आहे वर्तमान वास्तविकता समस्या आणि प्राधान्यक्रम द्यावा. कारण विस्थापितांच्या स्थायी जीवनात

हस्तक्षेप करणे व ते नष्ट करण्याचा अधिकार नाही. आर्थिक बाबींचा विचार करतांना पुनर्वसनाची भरपाईची रक्कम निश्चित करण्यासाठी मार्ग विकसित करणे गरजेचे आहे. स्पर्धात्मक बाजारात नुकसान भरपाई, आर्थिक मूल्ये निश्चित करण्यासाठी त्यांच्या संस्कृती, उपासनेची ठिकाणे, संस्कार ह्याचा विचार व्हायला हवा आहे. त्यानंतर लेखकाने भरपाईच्या चार वेगवेगळ्या पद्धतींवर मनन केले. गमावलेल्या मालमत्तेसाठी रोख मोबदल्याबद्दल त्यांनी सांगितले की, प्रथा व अकृषी जमिनीचा अपुरेपणा असल्यामुळे पुनर्वसनाच्या आधारित धोरणावर गंभिर लक्ष देणे गरजेचे आहे. प्रभावित लोकांचे पुनर्वसनानंतरचे जीवन यासाठी मानक ठरविणे गरजेचे आहे. विस्थापितांना प्रकल्पाच्या वेळेनुसार अंमलबजावणीसाठी मदत करणे, पण आर्थिक विश्लेषण आणि संस्थात्मक दृष्टीकोन विश्लेषण करणे भरपाईची रक्कम अमंलात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

**डॉ. ॲड. शिरिश देशपांडे व ॲड एस. आर. कोमावर** यांची शोध पत्रिका विषय– विस्थापन, मदत व पुनर्वसन : कायद्याची गरज (२००२) नमूद राष्ट्रीय परिषदेमध्ये पुनर्वसन समस्या, कायदेशीर बाबींची अमंलबजावणी, समस्या सोडविण्यासाठी व्यापक कायदे याबाबतच्या कायद्यातील तरतूदींबद्दल राष्ट्रव्यापी चर्चा करण्यात आली. पुनर्वसन कायद्याने खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. पुर्नस्थापनेच्या ठिकाणी विस्थापनाचे विकल्प निवडण्यासाठी लोकांचा सहभाग.
२. इतर, शेजारील गावांमध्ये विस्थापीत लोकांसाठी राबविण्यात आलेल्या कृषी सिंचन योजना.
३. पुनर्वसन समितीची स्थापना
४. पुनर्वसन कॉलनीमध्ये घरांचे बांधकाम स्थापना करतांना प्रकल्प ग्रस्तांच्या रूढी, परंपरा, श्रद्धा व धार्मिक बाबी व इतर अधिकार यांचा विचार व्हावा.
५. पुनवर्सन नवीन कॉलनीमध्ये धार्मिक स्थळांची निर्मिती करणे
६. एकात्मिक धार्मिक–सांस्कृतिक वातावरण आणि संस्कृतीचे समग्र स्वरूपाचे जतन
७. सांस्कृतिकदृष्टया योग्य विकास योजनांची सुरूवात करणे.

८. प्रकल्पग्रस्त  व अशासकीय संस्थांचे प्रतिनिधीत्व असणारी देखरेख संस्था स्थापन करणे.

९. पुनर्वसन पूर्ण झाल्याशिवाय प्रकल्पग्रस्तांसाठी कोणतेही नविन उपक्रम सुरू करण्यासाठी मर्यादा असावी.

१०. योग्य तक्रार निवारण यंत्रणेची निर्मिती करणे.

**डॉ. व्ही. व्ही. देवासिया** यांची शोध पत्रिका, विषय– विस्थापन, पुर्नस्थापना व सामाजिक कार्य (विशेष संदर्भ विदर्भ २००२) ह्या विशेष संदर्भीय शोध पत्रिकेमध्ये लेखकाने मांडले आहे की, प्रकल्प प्रभावीत लोकांच्या समस्या ह्या पूर्णपणे आर्थिक नाहीत परंतु सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक समस्या देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत. विस्थापनामुळे लोकांचा समुदाय, नातेसंबंध पूर्णपणे विस्कळीत होतात त्यामुळे त्याचा परिणाम विस्थापितांच्या जीवनावर होत असतो. विस्थापित लोकांमध्ये अलिप्तपणाची भावना, कमजोरी व सांस्कृतिक एकात्मिकता गमावून बसण्याची संभावना आहे. म्हणूनच पुनर्वसनाचे धोरण हे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक व अध्यात्मिक घटकांवर आधारित असावे. याचा लाभ निश्चितपणे विस्थापितांच्या मनात एकात्मकता भावना, शाश्वत उत्पादन, संसाधित विकासाची भावना निर्माण होवून स्वतःचा विकास साधण्याचे बळ निर्माण होईल.

लेखक पुढे असे म्हणतात की, सामाजिक कार्यकर्ते विशेषतः समूहातील कामगार आणि समुदाय विकास कार्यकर्ते यांनी भूमिका बजावली पाहिजे कारण त्यांच्या आधाराने संस्थात्मक माध्यमांचा पाठिंबा मिळविणे, संसाधनांची जुळवाजुळव व स्वतःचा विकास यामध्ये लोक यशस्वी होऊ शकतात. तसेच समुदाय विकास कार्यकर्त्यांनी विस्थापित लोक, राज्यकर्ते व शासन यांच्याशी संवाद निर्माण करणे महत्त्वाचे आहे. पुनर्वसन धोरणामध्ये पुनर्स्थापना करण्याचे उद्देश असणे आवश्यक असते. पुनर्वसन हे सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे यात राज्यशासन, अशासकीय संस्था यांची आर्थिक मदत महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक कार्यकर्त्याने पुनर्वसन धोरणाची तरतूद लोकाभिमूख निकषावर आधारित असावी. ह्या योजनांमध्ये न्याय्य भरपाई, शारिरीक हस्तांतरण, गृहनिर्माण, गरिबी निर्मुलन कार्यक्रम व इतर विकास या विषयी निष्पक्ष तरतूदी असणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर पुनर्वसीतांना आर्थिक संच प्रदान, जमिन सुधारणा, सिंचन, सुधारित पिक पद्धतीची निवड, वाढीव कृषी उत्पादन, पुनर्वनीकरण, रोजगार निर्मिती, व्यावसायिक प्रशिक्षण, बिगरशेती रोजगार आणि इतर प्रकारच्या स्थायी उत्पन्नासाठी उपक्रम निर्मिती ह्या गरजा सामाजिक कार्यकर्त्यांने समजून घेण्याची गरज आहे.

लेखकाने असा निष्कर्ष काढला की, पारंपारिक पद्धतीचा वापर करून पुनर्वास करणे हा पायाभूत सुविधांमधील दुय्यम सामाजिक घटक म्हणून आवश्यक आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी सरकारवर दबाव आणला पाहिजे आणि संबंधित संस्थांमध्ये अडचणी टाळण्याचा एक उत्कृष्ट दृष्टिकोन व सामाजिक–आर्थिक आणि पर्यावरणीय घटकांना प्रभावीपणे संबोधित करून पुनर्स्थापना केली जावी. प्रकल्प ग्रस्ताना अशा परिस्थितीपासून सावध करणे, संपूर्ण पुनर्वसन प्रकल्पाचा सल्ला प्रभावीत लोकांना देणे व प्रकल्पग्रस्तांना नवीन तडजोडींमध्ये समायोजित करण्याचा प्रयत्न करावा.

**नंदा पांगुल** यांची शोध पत्रिका– विषय : नेर तलाव धरण प्रकल्प एक वास्तविकता (२००२) मिलमिली नदीवर नेर गावात जिल्हा यवतमाळ येथे बांधण्यात आलेल्या धरणामुळे पुनर्वसित झालेल्या चार गावच्या जनतेशी प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखतीवर आधारीत सदर शोध पत्रिका सादर केलेली आहे. एकूण २४१ हेक्टर जमिन धरणासाठी जलाशयात गेलेली आहे व एकूण ७४५ हेक्टर जागेवर थेट सिंचन उपलब्ध झालेले आहे. तसेच एकूण ११६५ हेक्टर क्षेत्र हे लाभ क्षेत्रासाठी उपयुक्त आहे.

१९८७–८८ साली धरणाचे बांधकाम सुरू झाले व १९९५ मध्ये ते पूर्ण झाले. धरणाचे जास्तीत जास्त काम २००२ पर्यंत पूर्ण झालेले नाही. लेखिकेने शोधपत्रिकेच्या सारांशामध्ये सांगितले आहे की, जी जमिन धरणासाठी संपादित केली गेली ती जमिन अतिशय सुपिक होती व त्याचबरोबर या क्षेत्रात जवळपास पन्नास लाख रूपये किंमतीची उभे झाडे होती. नुकसानीची भरपाई तात्काळ मिळेल या आश्वासनावर विस्थापित शेतकऱ्यांनी कोऱ्यापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या परंतु पुढील चार वर्षानंतरही शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण केले गेले नाही कारण प्रकल्प विस्थापन अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या होत होत्या त्यामुळे नुकसान भरपाईचे पैसे

प्रभावित शेतकऱ्यांना देण्यास उशिर झाला. दरम्यानच्या काळात प्रभावित शेतकऱ्यांवर मोठा मानसिक आघात झाला. परंतु २००२ पर्यंत याबाबत प्रभावित शेतकरी व प्रकल्पाचे प्राधिकारी यांच्यात जमिनीचे योग्य मूल्यनिर्धारण झाले नसल्याबाबत वाद सुरू होता.

धरणात पाणी भरण्याअगोदर झाडे तोडली न गेल्यामुळे धरणाचे उपयुक्त आयुष्य कमी झाले. दुसरे म्हणजे पाण्याखाली उभे असणारी झाडे मच्छीमारांना न दिसल्यामुळे त्यांची मच्छिमारीची जाळी फाटली जात होती त्यामुळे लोकांचे मच्छीमारीचे नुकसान होत होते. यासाठी प्रभावित लोकांनी जमिन संपादनास विरोध केला व ह्या सर्वांसाठी शासनाचे प्राधिकारी जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढला.

लेखकाने सदर शोधपत्रिकेमध्ये काही सूचना सादर केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे–

१. प्रभावित व्यक्तींचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांच्या सहभागाने मूल्यांकन समितीने शेतकऱ्यांच्या गमावलेल्या मालमत्तेचे मूल्यांकन करावे व नुकसान भरपाई ताबडतोब द्यावी.
२. प्रकल्प अधिकाऱ्यांची प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बदली केली जाऊ नये.
३. बांधकाम आणि पूनर्वसन प्रगती निरिक्षण करण्यासाठी समिती गठित करणे.
४. नुकसानीचे व फायद्याचे मूल्यमापन व्यवहार्यता अभ्यास करणारी एक समिती मार्फत तपासावी व सामाजिक व पुनर्वसन खर्च जास्त असेल तर प्रकल्प सोडून द्यावा.

**टी. एम. सरोदे** यांची शोधपत्रिका– शिर्षक विस्थापितांच्या समस्या व पुनर्वसन (२००२) लेखकानने शोधपत्रिकेची सुरुवात विशिष्ट महत्त्वाच्या सादरीकरणाने केली आहे. ज्यामध्ये भारतामध्ये मोठ्या धरणांची संख्या एकूण ४२९१ आहे त्यापैकी १५२९ धरणे महाराष्ट्रातील ४५० नद्यांवर आहेत. या सर्व धरणांमुळे एकूण २.१३ करोड लोक विस्थापित झाले आहेत त्यापैकी २५% लोकांचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे. बाकीचे विस्थापित आहेत. १९५४ च्या कोयना हायड्रोलिक प्रकल्पाच्या राज्य सरकारच्या महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसनाबाबत तिरस्कारणीय कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. त्यामध्ये सचिव पातळीवरील अधिकाऱ्यांपासून शेवटपर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या चूका व अनेक त्रुटी दाखविण्यात

आल्या होत्या. जिवनावश्यक वस्तूंचे उत्पन्न मिळविल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना ताकद मिळते या मुद्यावर भर देण्यात आला.

**डॉ. बी. एल. जोशी** यांची शोधपत्रिका– शीर्षक : विस्थापित समस्या आणि पुनर्वसन, विस्तापितांना एका जागेवरून दुसऱ्या जागी पाठविले जातात हे अगदी सहजतेने घेऊ नये याची जाणीव असावी व यास मानवीय दृष्टीकोनातून पाहिले जावे. त्यांच्या मते याबाबत तीन दृष्टीकोन आहेत. पहिला म्हणजे विस्थापित लोक नाखुशिने विस्थापित होतात हा इतिहास आहे. म्हणूनच ते मोठ्या धरणांचा विरोध करतात.

दुसऱ्या दृष्टीकोनातून विश्वासणारे असे मानतात की, सर्व संबंधित गोष्टींचा एकत्रीत प्रयत्न विस्थापित लोकांच्या पुनर्वसनास कारणीभूत ठरेल आणि तिसरे गट यांना असे वाटते की समाजाच्या मोठ्या हितसंबंधांना प्राधान्य आवश्यक आहे. तात्पुरते नुकसान आणि लाभ याकडे पाहू नये तर पहिले प्राधान्य धरण असावे.

**राघवेंद्र कुलकर्णी व विलास पवार** यांचे जल आशय हे पुस्तक २००२ साली प्रसिद्ध झाले यामध्ये धरणांचा इतिहास, धरण आणि पर्जन्यमान संबंध, धरण व जलसिंचन, धरणाचे विविध घटक, धरणांचे बांधकाम, धरण प्रकल्पपूरक सेवा, धरण व भूकंप, धरण डागडुजी, कालवे लाभक्षेत्र व सिंचन, जलविद्युत प्रकल्प, अंतर्राज्यीय पाणी वाटप तंटे व लवाद निर्णय, पर्यावरण व वन जमिन, पुनर्वसन व भूसंपादन, पाण्याचे स्वामित्व पाणी पट्टी व स्वामीत्व शुल्क, पाणी वाटपातील काटकसर व उपाययोजना या विषयांची सविस्तर चर्चा लेखकांनी केली आहे. पाणी आणि त्याच्याबरोबरचे राजकारण, पाण्यामुळे निर्माण होणारे वर्णभेद उदा. एकाच गावातील शेतकरी एक कालव्याच्या खालच्या भागाला तर दुसरा वरच्या भागाला सर्वांबरोबरच पाण्याच्या गैरवापराचे प्रकार सुद्धा या पुस्तकात स्पष्टपणे उल्लेखलेले आहेत. धरण, धरणांशी संबंधित घटक आणि प्रेरक घटकांची विस्तृत माहिती लेखकांनी या पुस्तकात दिली आहे.

**समारोप :–**

वरील प्रकरणामध्ये संशोधकाने भारतातील विविध विकास प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे विस्थापन व पुनर्वसन ह्या संबंधी विविध लेखकांनी लिहिलेली पुस्तके, लेख, शोधपत्रिका ह्या माध्यमातून लेखकाने मांडलेली मते अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांची विस्थापन व पुनर्वसनाच्या बाबतची मते जाणून त्यांची मांडणी केलेली आहे. शासनाकडून विस्थापित, पुनर्वसीत लोकांच्या कुटुंबाकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे लोकांमध्ये धरण विरोधी भूमिका तयार झाल्याचे मत बऱ्याच लेखकांनी मांडले आहे. विस्थापनानंतर जास्तीत जास्त लोकांना आपली जुनी घरे, जागा व इतर उत्पन्नाची साधने सोडावी लागतात ही अधोरेखीत करण्याजोगी बाब आहे. ह्यामुळेच शासनाचे लक्ष पुनर्वसन लोकांकडे केंद्रीत केल्यास लोक सुरक्षित राहू शकतील.

मागील जवळ जवळ ५० वर्षापूर्वी सुरू झालेले धारण बांधकाम व धरणाचे पुनर्वसनामध्ये जवळपास ७० टक्के लोकांचे पुनर्वसन पूर्ण स्वरूपात झालेले नाही. प्रत्येकाची ह्या बाबतीत काही तरी समस्या आहे. ह्या समस्याबाबत विविध लेखकांनी केलेले लिखाण संशोधकाने जाणून घेतले आहे. देशातील व महाराष्ट्रातील विविध धरणांचा मुख्य उद्देश्य सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या वापरासाठी ठरविण्यात आला आहे. बांधलेल्या धरणामुळे लाभक्षेत्रातील लोकांना त्यांच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्याचे दिसून येते परंतु त्याचबरोबर धरणामध्ये ज्यांचे सर्वस्व गेले त्या धरणग्रस्तांना लाभ क्षेत्रात त्या धरणाच्या पाण्यामुळे सिंचनाचा झालेला फायदा हा अतिशय कमी प्रमाणात दिसून येत आहे. त्या बाबत विविध लेखकांनी प्रकल्पग्रस्तांच्या मांडलेल्या अडचणी, समस्या याची केलेली मांडणी संशोधकाने अभ्यासली आहे.

विस्थापन व पुनर्वसनामध्ये भूसंपादन कायद्यातील तरतुदी विषयी विविध लेखकांनी मांडलेली मते म्हणजे वर्तमान व वास्तविक समस्या आणि प्राधान्यक्रम, आर्थिक बाबींमध्ये पुनर्वसनाची भरपाईची रक्कम निश्चिती करण्यासाठी मार्ग विकसीत करणे गरजेचे

असल्याबाबतचे मत विविध लेखकांनी मांडलेली आहेत. त्याचबरोबर पुनर्वसन व भूसंपादन बाबतीत कायदेशीर बाबींची अंमलबजावणी व कायद्यातील तरतूदीचा उहापोह केला आहे.

धरणग्रस्तांचे विस्थापनानंतर निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठी सक्षम, प्रभावी यंत्रणा स्थापीत करण्याबाबत विविध लेखकांनी मांडलेले आहे. ज्यामुळे धरणग्रस्त विस्थापितांचे प्रश्न लवकरात लवकर सोडविता येणे शक्य होईल असे मत विविध लेखकांनी मांडले आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा घेतांना विविध पातळ्यांवर केले गेलेले लेखन, लेख शोधपत्रिका, वृत्तपत्रे यांचे लेख, पुस्तके व लेखकांनी मांडलेल्या भूमिका संशोधकाने जाणून घेऊन आपल्या अभ्यास विषयामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ह्यामुळे संशोधकास व्यापकदृष्टीने पुनर्वसनासंदर्भातील बाबींचा अभ्यास करता आलेला आहे.

***

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

३.१ प्रस्तावना

३.२ प्रश्नाचे स्वरूप

३.३ संशोधन साहित्याचे अध्ययन

३.४ संशोधन अभ्यास विषयाची उपयुक्तता

३.५ विषयांची व्याप्ती

३.६ संशोधनाची उद्दिष्टे

३.७ संशोधनाची गृहीतकृत्ये

३.८ संशोधन पध्दती

- ३.८.१ तथ्य संकलनाची साधने
- ३.८.२ द्वितीय सामग्री
- ३.८.३ प्राथमिक साधने
- ३.८.४ नमुना निवड

३.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

३.१० संशोधनाची नैतिकता

# प्रकरण तिसरे
# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना

जगात धरण बांधणी प्रकल्पामध्ये सक्तीने केलेले विस्थापन हा सर्वात मोठा नकारात्मक प्रभाव सर्वमान्य आहे. धरण बांधणी प्रकल्पामध्ये सर्वसाधारणपणे संपूर्ण जगामध्ये एकुण ६० कोटी लोक विस्थापित केले गेले असल्याचे सद्यस्थितीच्या आकडेवारीवरुन निर्दशनास येते.

जागतिक बँकेच्या १९८६ व १९९३ च्या अभ्यासानुसार दरवर्षी ३०० मोठे धरण प्रकल्प उभारले गेले आहेत. त्यामध्ये अंदाजे ४ कोटी लोकांचे विस्थापन करण्यात आले आहे. ही सर्व माहिती सर्वेक्षणातील आकडे अंदाजित आकडेवारी आहे परंतु प्रत्यक्षात धरण उभारणीमुळे विस्थापित होणाऱ्या लोकांची संख्या जास्त असु शकते.

सदर विषयातील संशोधनात विस्थापनाबरोबरच विस्थापन संदर्भातील आणखी काही गुंतागुंतीचे प्रश्न समोर येतात. उदा. मानवी अधिकार, जमीन संपादन, पर्यायी जमीन देणे, पर्यायी घरे देणे इत्यादी संदर्भातील प्रश्न शासन कशा पध्दतीने सोडविते हे महत्वपुर्ण मुद्दे आहेत. ह्या प्रक्रियेत विस्थापित होणाऱ्या लोकांचा सहभाग व आत्मसन्मान ही बाब महत्वपुर्ण भुमिका बजावते. विस्थापन पुनर्वसनाचे पर्याय व त्यासाठी राबविले जाणारे धोरणे व कायदे ह्या घटकांचाही पुनर्वसनावर परिणाम झाल्याचे दिसुन येतो.

जगामध्ये भारत हा सर्वाधिक धरणे बांधलेला देश आहे. भारतात एकुण ४२९१ धरणे आहेत.

सर्वात आश्र्चर्यकारक बाब म्हणजे धरणबांधणीच्या बाबतीत व धरणांचे परिणाम ह्या बद्दलची कुठलेही आकडेवारी उपलब्ध नाही. भारताचे जलसिंचन विभागाचे बजेट अंदाजे ८० कोटी रुपये आहे. ही रक्कम ते सर्व छोटे व मोठे सिंचन प्रकल्पामध्ये वापरले जाते. ह्या धरणांमध्ये गुंतविलेल्या निधीचा न्याय पध्दतीने विनियोग झाला किंवा नाही हे तपासण्यासाठी कोणतीही

मुल्यामापन पद्धती किंवा यंत्रणा कार्यरत नसल्याचे दिसुन येते. तसेच शासनामध्ये यासंदर्भात जाणिवेचा अभाव असल्याचे ही निदर्शनास येते.

स्वातंत्र्य मिळाल्यापासुन ते आजपर्यंत १ लाख ६४ हजार ते ४ कोटी लोक धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेले आहेत.

एकुण होणाऱ्या वेगवेगळ्या विस्थापनामध्ये धरणांमुळे होणारे विस्थापन हे सर्वात मोठे कारण असल्याचे दिसुन येते. त्या विस्थापितांची संख्या ७५% ते ८०% असताना फक्त २५% लोकांचे पुर्नवसन कार्य पुर्ण झालेले आहे. उर्वरीत सर्व विस्थापित लोकांचे पुर्नवसन कार्य अजुन देखील अपुर्ण स्थितीत आहे.

प्रामुख्याने पुनर्वसन न झालेल्या विस्थापितांमध्ये ४०% विस्थापित हे आदिवासी व दुर्बल व गरीब घटकांमधील आहेत. महाराष्ट्रात एकुण १८२१ धरण बांधलेली आहेत. त्यापैकी जास्तीत जास्त धरणे हे आदिवासी व मागास भागांमध्ये बांधलेली आहेत.

महाराष्ट्रात कुकडी प्रकल्प हा महत्व पुर्ण प्रकल्प मानला जातो. यात पाच धरणे एकत्रित नियोजन करुन बांधलेली आहेत. ही सर्व धरणे प्रामुख्याने भिमा व तिच्या उपनद्यांवर बांधलेली आहेत. ह्या धरणामध्ये येडगाव, माणिकडोह, डिंभे, वडज व पिंपळगावजोगा ह्या धरणांचा समावेश होतो. ह्या धरणामध्ये जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात आदीवासी गावे व कुटूंब विस्थापित झालेली आहेत.

## ३.२ प्रश्नाचे स्वरूप (Statement of the Problem)

विस्थापितांचे पुनर्वसन शासन निर्णय/धोरण/कायदे यांच्या अधिनराहून करणे/होणे गरजेचे आहे. परंतू त्या करीता मूल्यमापन पद्धती/यंत्रणा कार्यरत नसल्याचे दिसून येते. प्रामुख्याने विस्थापित झालेल्या आदिवासी व मागास–दुर्बल घटकातील व्यक्तिंचे प्रश्न, ठळकपणे नमुद करून त्यांच्यावर संशोधकाने प्रकाश टाकला आहे.

मुख्यतः वे संशोधक सदर संशोधन अभ्यासाद्वारे अभ्यासक्षेत्रातील धरणग्रस्तांचे विस्थापन व त्यामुळे उद्‌भवलेले प्रश्न यांचा अभ्यास केला आहे.

नियमानुसार धरणग्रस्तांचे विस्थापितांचे प्रामुख्याने दोन प्रकारे पुर्नवसन करणे अपेक्षित आहे, परंतु सदर शासन नियमाला रितसर बगल देऊन, विस्थापितांच्या प्रश्नांकेंद्र भागी न ठेवता/विचार करता मनमानी पद्धतीने काम उरकण्याकरिता त्यांचे पुनर्वसन केले जाणे ते पुढे जाऊन विस्थापितांच्या जीवनापुढे प्रश्नचिन्हच उभे करते. त्याकरिता जबाबदार असलेली सर्व शासकीय, निम-शासकीय व खाजगी यंत्रणा एकमेकांच्या हाताहात घालून विस्थापितांच्या प्रश्नांचे निरसन न करता प्रकल्प कामे लावणे हेच त्यांचे लक्ष्य असते. परंतु संशोधक ते विस्थापितांचे प्रश्न म्हणून उपस्थित करत आहे.

विस्थापितांचे पुनर्वसन त्यांच्या मुळ गावाजवळ होणे गरजेचे आहे परंतू ते तसे होत नाही, ५० ते १०० कि.मी. अंतरावर केले जाते जे कि अभ्यासाचे कारण आहे. ज्याकडे सामाजिक कार्य संशोधनच्या पद्धतीने पाहणे गरजेचे आहे. विस्थापन पुनर्वसनाचे पर्याय व त्यासाठी राबविले जाणारे धोरणे व कायदे ह्या घटकांचा पुनर्वसनावरील परिणाम देखिल करणे गरजेचे आहे. संशोधक सदर संशोधन अभ्यासामध्ये धरणग्रस्तांचे विस्थापन झाल्यामुळे उदभावणाऱ्या अनेक प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचे ठरविले आहे. धरणग्रस्त विस्थापितांचे प्रामुख्याने दोन प्रकारे विस्थापन केले जाते, मुळ गावाजवळच करण्यात येते, मुळ गावापासुन ५० ते १०० किलोमीटर दुर अंतरावर पुनर्वसन केले जाते.

पुर्नवसन प्रक्रियेमध्ये व्यापक प्रमाणात भिन्नता आढळुन येते. या दोन्ही पध्दतीमधील पुनर्वसन प्रक्रियेमधील भिन्नतेचा (फरकाचा) विस्थापितांवरती होणारे परिणाम हे वेगळे व गंभीर स्वरुपाचे आहेत. त्यातुन विस्थापितांचे अनेक सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक प्रश्न निर्माण होऊन त्यांच्या सामाजिक जीवनावर परिणाम होऊन शासनाने मोठ्या प्रमाणात प्रकल्प व पुनर्वसन खर्च करुन सुध्दा त्याचे परिणाम मात्र नकारात्मक झाल्याचे दिसुन येतात. तसेच विस्थापितांना त्याचे काहीही फायदे न झाल्याचे सद्य स्थितीवरुन दिसुन येते. संशोधनामध्ये संशोधकाने डिंभे व पिंपळगाव जोगे या धरणांच्या विस्थापिताचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे ठरविले आहे. कारण दोन्ही प्रकारच्या पुनर्वसनामधील प्रश्न भिन्न स्वरुपाचे आहेत. पुनर्वसनामुळे त्यांना भेडसावणारे कौंटुबिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकिय प्रश्न निरनिराळे असु शकतात.

त्यामुळे जे प्रश्न आहेत त्या बाबत अभ्यास करुन कोणत्या पुनर्वसनामध्ये प्रश्न जास्त आहेत याचा सखोल अभ्यास करणे. ही गरज संशोधकाला वाटते. त्यामुळे संशोधकाने हा विषय निवडला आहे.

## ३.३ संशोधन साहित्याचे अध्ययन (Review of Literature)

पुनर्वसन, पुनर्वसनाचे प्रश्न, संख्याशास्त्रीय पद्धती याबाबत शासकिय योजना व कार्यपद्धती याबाबत माहिती वर ह्यापुर्वी कमी संशोधन उपलब्ध आहेत. आजवर फारसे सखोल संशोधन झालेले नाही. हे अभ्यासकाला आढळुन आले आहे. त्यामुळे मागील अभ्यास फारसे उपलब्ध होऊ शकले नाही.

संशोधक कुकडी प्रकल्पातील डिंभे व पिंपळगाव जोगे या धरणाच्या पुनर्वसित झालेल्या कुटूंबांचा अभ्यास केलेला आहे. संशोधकाने अभ्यासाकरीता निवडलेल्या धरणांच्या पुनर्वसनावर यापुर्वी अशाप्रकारचा अभ्यास झालेला नाही. मुख्यतः अभ्यास क्षेत्रातील प्रकल्प हे आदिवासी पट्ट्यात अति दुर्गम भागात येतात व त्यामुळे आदिवासी भाग व दुर्गम भाग ही नेहमी दुर्लक्षित राहिलेला आहे. त्यामुळे स्वतःच्या गावाजवळ व स्वतःच्या गावापासून दूर होणाऱ्या पुनर्वसनाच्या प्रश्नाचा अभ्यास व्हावा असे संशोधकाला वाटत असल्याने नमुना निवड म्हणून पुणे जिल्ह्यातील डिंभे व पिंपळगाव जोगा या धरणांची व त्यामुळे होणाऱ्या विस्थापिताच्या समस्यांचा अभ्यास सदर प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन हे नियमानुसार जरी करण्यात आले असले तरी, दोन्ही प्रकल्पांपैकी एक प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन प्रकल्पाच्या जवळ करण्यात आले आहे, तर दुसऱ्याचे प्रकल्पापासून दूर करण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाच्या जवळ पुनर्वसन झालेल्याच्या प्रश्नांची तिव्रता कमी आहे तर दूर झालेल्यांच्या प्रश्नाची तीव्रता जास्त आहे. दोन्ही प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या संधी, काळानुरूप बदलांचा परिणामांचा अभ्यास करणे ही गरज आहे. या अभ्यास मुळे शासन, स्वयंसेवी संस्था, संघटना यांना मार्गदर्शक सुचना मिळतील व त्यामुळे पुनर्वसनातील त्रुटी कमी होण्यास मदत होईल.

### ३.४ संशोधन अभ्यास विषयाची उपयुक्तता

ह्या अभ्यासामुळे शासन स्वयंसेवी संस्था संघटना यांना पुनर्वसन करताना कोणकोणते सुक्ष्म मुद्दे विचारात घेवून पुनर्वसन केले जावे याबाबत  मार्गदर्शक सुचना देता येतील तसेच या प्रश्नाच्या मुळ कारणांचा ही अभ्यास यामध्ये मांडलेला आहे. त्यामुळे पुढील काळात प्रकल्पाग्रस्तांच्या मानसिकतेचाही विचार करून व शास्त्रीय, तांत्रिक व सध्यस्थितीला अशा मार्गदर्शक सुचना करणे. सदर संशोधनातून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची तिव्रता धोरणकर्त्यान पर्यंत पोहचविणे. प्रकल्पग्रस्तांच्या चळवळीला धोरणात्मक योगदान देणे, शासकीय प्रणाली व कायदे यांची योग्य ती सांगड घालून भविष्यातील प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनासाठी आदर्शवत प्रणाली तयार करणे, सकृत/वाजवी व शास्त्रीय तांत्रिक मुद्यांवर आधारित आकृतिबंध देणे, जो कि पुनर्वसितांच्या फायद्यांचा असेल व प्रकल्पामुळे उपयुक्त ठरेल.

### ३.५ विषयांची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव व जुन्नर तालुका डिंभे व पिंपळगाव जोगे या धरणांचे पुनर्वसन झालेल्या पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यामध्ये पुनर्वसन झालेल्या गावापुरते मर्यादित आहेत. डिंभे धरण हे आंबेगाव तालुक्यात बांधलेले आहे व या धरणामुळे विस्थापित झालेल्या  कुटूंबाचे पुनर्वसन मूळगावापासून ५० ते १०० किलोमीटर लांब असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व शिरुर गावामध्ये झालेले आहे, जे कि कमी आदिवासी व दुर्गम भागात येते. त्यामुळे संशोधक या गावातील पुनर्वसित कुटुंबाचा संशोधनासाठी उपयोग केला आहे. पिंपळगाव जोगे हे धरण जुन्नर तालुक्यात बांधलेले आहे व या धरणातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन त्याच तालुक्यात जवळच तसेच मुळ गावापासुन अत्यंत जवळच्या अंतरावर करण्यात आलेले आहे, जे कि जास्त आदिवासी व दुर्गम भागात येते, म्हणुन जुन्नर तालुक्यातील हि गावे व ह्या गावातील कुटुंबे यांची निवड अभ्यासासाठी संशोधकाने केली आहे.

अभ्यासक्षेत्रातील प्रकल्पग्रस्त हे जरी आदिवासी व दुर्गम भागातील जरी असले तरी त्यांच्या प्रश्नांची दखल/तीव्रता ही कमी जास्त प्रमाणाची आहे. त्यामागील सुक्ष्म त्रुटींचा अभ्यास व्यापक प्रमाणात करण्यात आलेला आहे. दोन्ही प्रकल्पग्रस्तांच्या जीवनावर झालेला

सामाजिक, शैक्षणिक, व उदरनिर्वाहाच्या परिणांमाचा सुक्ष्म पातळीवर अभ्यास म्हणजेच समाजकार्य संशोधन ह्या शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून सर्व समाजकार्य पद्धतींचा व्यापक प्रमाणात उपयोग करून संशोधन प्रश्नांची दाहकता अभ्यासणे.

## ३.६ संशोधनाची उद्दिष्टे

१. महाराष्ट्रातील मोठे, मध्यम व लघू प्रकल्प व त्यामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांचे मूळगावापासून जवळ आणि मूळगावापासून दूर झालेल्या पुनर्वसनातील तफावतीचा अभ्यास करणे.
२. धरणग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन शासनाने कोणत्या पद्धतीने केलेले आहे याचा अभ्यास करणे.
३. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचा अभ्यास करणे.
४. विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन झालेल्या ठिकाणी स्थानिकांमार्फत निर्माण होत असलेल्या अडथळ्यांचा अभ्यास करणे.
५. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या तरतूदींनुसार झालेल्या पुनर्वसनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
६. शासनामार्फत केलेल्या पुनर्वसनाबाबत धरणग्रस्तांच्या प्रतिक्रियेचा अभ्यास करणे व संशोधनाच्या माध्यमातून आदर्शवत पुनर्वसन प्रारूप सुचविणे.

## ३.७ संशोधनाची गृहीतकृत्ये

सदर संशोधनासाठी संशोधकाने खालील गृहितकृत्यांची मांडणी केलेली आहे.

१. पिंपळगाव जोगे आणि डिंभे येथील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे स्वरूप, पद्धती व धरणग्रस्तांच्या मतांचा विचार केला जात नाही तसेच सहभागी पुनर्वसनाची प्रक्रियेचा योग्य पद्धतीने वापर होत नाही.
२. धरणग्रस्तांचे मुळगावाजवळ झालेल्या पुनर्वसनापेक्षा प्रकल्पस्थळापासून दूर अंतरावर झालेल्या पुनर्वसनामुळे सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक व कौटुंबिक इ. बाबतीत आर्थिक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

३. कोणतेही प्रकल्पासाठी शेतकऱ्यांकडून भूसंपादन करून प्रकल्प कार्य सुरू करण्यापर्यंत शासनाचा पुढाकार हा प्रभावशाली व सहभागी पद्धतीचा असतो. परंतु त्या तुलनेत प्रकल्प कार्य पूर्ण झाल्यानंतर धरण ग्रस्तांकडे तुलनेन शासनामार्फत कमी लक्ष दिले जाते. त्यामुळे बऱ्याच परिस्थितिमध्ये धरणग्रस्त हे आधारहिन व एकीकडे पडल्यासारखे वाटतात.

४. धरणग्रस्तांना शासनाकडून मिळणारी नुकसान भरपाई व मोबदला यांचा योग्य पद्धतीने नियोजनपूर्वक गुंतवणूक व वापर झाला तरच धरणग्रस्तांना त्याचा लाभ होऊ शकतो. अन्यथा अनेक धरणग्रस्तांच्या बाबतीत ह्या बाबींचा विवेकपूर्वक वापर झाला नसल्याचे दिसून येते.

५. धरणग्रस्तांच्या पुनर्वसन व विकास कार्यात शासनाबरोबरच अलिकडच्या गेल्या २० वर्षात काही स्वयंसेवी संस्था, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.

**चले–**

| **स्वतंत्र चले** | **अवलंबित चले** |
|---|---|
| पुनर्वसन | मुळ गावापासून जवळ, मूळ गावापासून दूर<br>स्थानिकांचा विरोध/अडथळे, व्यवसाय, उत्पन्नाची साधने,<br>वार्षिक उत्पन्न, मोबदला, पर्यायी मोबदला, लोकसहभाग<br>मानवी अधिकार, विस्थापन आणि पुनर्वसनाचे पर्याय, समाधान<br>शासनाची जबाबदारी, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग |
| पूर्ण पुनर्वसन | आर्थिक–सामाजिक सांस्कृतिक बदल |
| विस्थापन | उत्पन्नाचे साधने, व्यवसाय, शिक्षण, सोयी–सुविधा, सिंचनांची साधने, मोबदला जमिनी, विस्थापनातील अडचणी, नविन गावात मूळ गावकऱ्यांशी संबंध आणि समन्वय, सन, समारंभ, समाधान, सामाजिक जिवनावरील परिणाम, परिणामकारकता, राजकीय घटक, मानसिक जडण–घडण, राजकीय विकास, विस्थापितांचा विकास, लाभक्षेत्रातील लोकांचा विकास, जातीय व धार्मिक तेढ, न्यायालयीन विलंब व लढे, शासकीय अधिकाऱ्यांची कृती |
| व्यवसाय | विस्थापनापूर्वीचा व्यवसाय, विस्थापनानंतरचा व्यवसाय, उत्पन्न, शासकीय लाभ |

### ३.८ संशोधन पद्धती (Research Methodology)

"धरणग्रस्त कुटुंबियांच्या पुनर्वसनामुळे उद्‌भवणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समस्यांचा अभ्यास" (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर आणि डिंभे धरण ता. आंबेगाव, जि. पुणे) या अभ्यासासाठी दोन्ही धरणग्रस्तांच्या समस्यांचा अभ्यास सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या निकषांच्या आधारे करण्यात आलेला आहे. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कार्यात होत असलेली दिरंगाई तसेच नकारात्मक भूमिकेमुळे मोठ्याप्रमाणावर सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रश्नांमुळे धरणग्रस्त कुटुंबांची संस्कार उद्धवस्त झालेली दिसून येतात. धरणाच्या लाभ क्षेत्रामधील शेतकरी व धरणाच्या जलाशयात जमिन गेल्यामुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या समस्यांचा सविस्तर अभ्यास या संशोधनात करण्यात आलेला आहे. यासाठी पिंपळगाव जोगे व डिंभे धरण क्षेत्रातील धरणग्रस्तातील पुनर्वसनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा (Discriptive Research Method) अवलंब केलेला आहे.

### ३.८.१ तथ्य संकलनाची साधने (Tools of Data Collection)

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोत (*Primary & Secondary Source*) या दोन्ही साधनांचा वापर करून माहिती संकलीत करण्यात आलेली आहे.

### ३.८.२ द्वितीय सामग्री (Secondary Data):-

नमूद संशोधनासाठी धरणग्रस्त व धरणग्रस्तांचे पुनर्वसन या विषयासंबंधीत महाराष्ट्र सिंचन आयोग, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ आणि भूसंपादन अधिनियम, १८९४ हे दोन कायदे, शासनाचे वार्षिक अहवाल, आदिवासी उपयोजना, कार्यक्रम अंदाजपत्रके, मासिके, त्रैमासिके, नियतमालिके, वृत्तपत्रे तसेच प्रकाशित व अप्रकाशित संदर्भांच्या सहाय्याने द्वितीय सामुग्रीचे संकलन करण्यात आलेले आहे.

### ३.८.३ प्राथमिक साधने (Primary Data):-

प्राथमिक सामग्रीसाठी पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर आणि डिंभे धरण ता. आंबेगाव, जिल्हा पुणे या क्षेत्रातील प्रकल्प बाधित कुटुंबियांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची, व्यष्ठी अध्ययन, गट चर्चा, निरीक्षणे इ द्वारे तथ्य संकलन करण्यात आलेले आहे.

### ३.८.४ नमुना निवड (Sampling Selection):-

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी साधा यादृचिक नमुना निवड पद्धती (Simpal Random Selection Method) चा अवलंब करण्यात आलेला आहे. पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर येथील धरण क्षेत्रातील २०० विस्थापित कुटुंबे आणि डिंभे धरण ता. आंबेगाव, जिल्हा पुणे या धरण क्षेत्रातील २०० विस्थापित कुटुंबे अशी एकूण ४०० विस्थापित कुटुंबाची निवड करण्यात आलेली आहे. या दोन्ही धरण क्षेत्रामध्ये 'महादेव कोळी' या आदिवासी जमातीची दाट लोकवस्ती आढळते. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांचा समावेश होतो. त्यामुळे बहुतांशी विस्थापित कुटुंबे ही आदिवासी जमातीची आहेत. या बाधित क्षेत्रातील कुटुंबांची निवड करून मुलाखत अनुसूची द्वारे तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. नमुना निवडीकरीता सारणी क्र.३.१ मधील आकृतीबंधाचा वापर करण्यात आलेला आहे.

सारणी क्र. ३.१ मधील आकृतीबंधात दर्शविल्याप्रमाणे आंबेगाव तालुक्यातील १४ आणि जुन्नर तालुक्यातील ११ गावांमधून एकूण ४०० प्रकल्प विस्थापित कुटुंबाची निवड करण्यात आलेली आहे. ही गावे आदिवासी बहुल असल्याने या ठिकाणी कोळी महादेव या जमातीची घनता मोठ्या प्रमाणावर होती. सर्वप्रथम धरणग्रस्त झालेल्या कुटुंबाची माहिती संशोधकाने पुनर्वसन व पाटबंधारे विभागाकडून मिळविली. त्या आधारे प्रत्येक धरणक्षेत्रातील २०० कुटुंबांची निवड अभ्यासासाठी करण्यात आलेली आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करून प्रकल्प बाधित कुटुंब प्रमुखांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या

आहेत. प्राथमिक तथ्यांचा अभ्यास करत असताना संशोधकाने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या गुणक घटकांच्या सहाय्याने अभ्यास केलेला आहे.

**सारणी क्र. ३.१**

**नमुना निवड आकृतीबंध**

| क्र. | गावांची नावे | धरणक्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पिंपळगाव जोगे | | डिंभे धरण | |
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १. | आंबेगाव | – | – | 34 | 8.5 |
| २. | अवसरी | – | – | 7 | 1.8 |
| ३. | देवगाव | – | – | 3 | .8 |
| ४. | चांडोली | – | – | 3 | .8 |
| ५. | वडगाव काशिंबे | – | – | 1 | .3 |
| ६. | आमोंडी | – | – | 22 | 5.5 |
| ७. | चास | – | – | 8 | 2.0 |
| ८. | खडकीफाटा | – | – | 13 | 3.3 |
| ९. | गावडेवाडी | – | – | 21 | 5.3 |
| १०. | निरगुडसर | – | – | 27 | 6.8 |
| ११. | लाखणगाव | – | – | 18 | 4.5 |
| १२. | जवळे | – | – | 5 | 1.3 |
| १३. | म्हसे | – | – | 5 | 1.3 |
| १४. | कळंबई | – | – | 33 | 8.3 |
| १५. | भोईरवाडी | 20 | 5.0 | – | – |
| १६. | सांगणोरे | 22 | 5.5 | – | – |
| १७. | गवारवाडी | 13 | 3.3 | – | – |
| १८. | साबळेवाडी | 1 | .3 | – | – |
| १९. | कोल्हेवाडी | 25 | 6.3 | – | – |
| २०. | खिरेश्वर | 28 | 7.0 | – | – |
| २१. | वाटखळ | 18 | 4.5 | – | – |
| २२. | पांगरी | 44 | 11.0 | – | – |
| २३. | मढ | 9 | 2.3 | – | – |
| २४. | सितेवाडी | 10 | 2.5 | – | – |
| २५. | कोळवाडी | 10 | 2.5 | – | – |
| | एकूण | 200 | 50 | 200 | 50 |

### ३.९ संशोधनाची नैतिकता

सहभागीतांची नैतिक/अधिकार, सहभागीतांची गुप्तता, सहभागीतांचा सहभाग, सहभागीतांचा फायदा, अभ्यासाची उपयुक्तता. सदर अभ्यासाकरीता तथ्य संकलन करताना संशोधकाने प्रकल्पग्रस्तांच्या नैतिक अधिकारांची पूर्णपणे दखल घेतली आहे. सहभागीतांना त्यांचे अधिकार, गुप्तता, त्यांचा सहभाग, नकाराचा अधिकार, अभ्यासाचे फायदे व उपयुक्तता सविस्तर सांगून त्यांच्या सहमतीने तथ्य संकलन करण्यात आले आहे.

सदर अभ्यासातून प्राप्त होणाऱ्या तथ्यांचे सादरीकरण हे सहभागीतांच्या कोणत्याही नावानिशी न करता अभ्यास क्षेत्रातील पुनर्वसितांचे प्रश्न  या स्वरूपात मांडण्यात येतील या निकषांवर त्यांचा सहभाग घेण्यात आला आहे. सदर प्रकरणात अभ्यासक्षेत्रातील प्रश्नांचे सविस्तर स्वरूप अभ्यास शास्त्रीय संशोधन प्रक्रियेनुसार करण्यात आलेला आहे. पुढील प्रकरण हे सदर संशोधनाकरीता गोळा करण्यात आलेल्या तथ्यांचे सविस्तरपणे मांडण्यात आलेले आहे.

### ३.१० संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील पिंपळगाव जोगे धरण आणि डिंबे धरण क्षेत्रापुरते मर्यादित आहे. धरण क्षेत्रामुळे विस्थापित झालेल्या गावांतील कुटुंबांचा अभ्यास या संशोधनात करण्यात आलेला आहे. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या तीन गुणक या मर्यादीत घटकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विस्थापित झालेल्या कुटुंबांचा राजकीय, मानसिक घटकांचा अभ्यास नमूद अभ्यासामध्ये करण्यात आलेला नाही. त्यामुळे विस्थापित कुटुंबांचा राजकीय विकास आणि मानसिक जडण–घडणीवर प्रकाश टाकता आलेला नाही. विस्थापित झालेल्या कुटुंबियामध्ये बहुसंख्य कुटुंबे ही आदिवासी जमातींची असल्याने त्यांच्या मूळ ठिकाणी झालेला विकास आणि विस्थापित ठिकाणी झालेला विकास याची तुलना नमूद संशोधनात करण्यात आलेली नाही. संशोधकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे व आकडेवारीवारीवरून निष्कर्ष काढलेले आहेत. विस्थापित झालेल्या कुटुंब प्रमुखांनी प्रामाणिकपणे व खरी माहिती दिली असेल तरच निष्कर्ष खरे ठरतील अन्यथा नाही.

***

# प्रकरण चौथे

# महाराष्ट्रातील प्रमुख विकास प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

४.१ विकास प्रकल्प ऐतिहासिक पार्श्वभूमी

- ४.१.१ भारतातील स्वातंत्र्यापूर्वीचे विकास प्रकल्प
- ४.१.२ भारतातील स्वातंत्र्यानंतरचे विकास प्रकल्प
- ४.१.३ महाराष्ट्रातील विकास प्रकल्प

४.२ अभ्यासक्षेत्रातील विकास प्रकल्प

- ४.२.१ डिंभे धरण प्रकल्प
- ४.२.२ पिंपळगाव जोगे धरण प्रकल्प

४.३ विकास प्रकल्प आणि आदिवासी समाज

४.४ प्रकल्प ग्रस्त व पुनर्वसन

- ४.४.१ प्रकल्प ग्रस्त चळवळी
- ४.४.२ प्रकल्प ग्रस्त सध्यस्थिती
- ४.४.३ प्रकल्प ग्रस्तांबाबत शासनाचे धोरण
- ४.४.४ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील महत्त्वाची तरतूदी
- ४.४.५ भूमि संपादन अधिनियम, १८९४
- ४.४.६ पुनर्वसन सद्यस्थिती
- ४.४.७ पुनर्वसन धोरण व कार्यक्रम (महत्त्वाचे शासन निर्णय) आढावा
- ४.४.८ पुनर्वसन कार्यात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग
- ४.४.९ प्रकल्पबाधित व्यक्तींचा पुनर्वसन कार्यातील सहभाग

समारोप

# प्रकरण चौथे

# महाराष्ट्रातील प्रमुख विकास प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

**प्रस्तावना :–**

नदीच्या अथवा कुठल्याही जलप्रवाहाच्या पात्रात पाण्याचा प्रवाह अडवून त्याचा मोठ्या प्रमाणावर साठा करण्यासाठी बांधण्यात येणारी भिंत म्हणजे धरण होय. धरण हे योग्य स्थळी जलप्रवाहाच्या खोऱ्याच्या एका काठापासून दुसऱ्या काठापर्यंत बांधलेली एक विस्तृत भिंतच असते. पुष्कळ वेळा धरणावरून वाहतूक करण्यासाठी योग्य रुंदीचा रस्ताही ठेवतात. ही भिंत जर कमी उंचीची असेल तर त्यावर पाण्याचा साठा करण्याकरिता लोखंडी दारे बसविलेली असतील तर त्याला बंधारा म्हणतात. अनेक वेळा लहान मोठ्या नाल्यामधून वाहत्या पाण्याची पातळी उंचावणे आणि ते वळविणे यांकरिता जलप्रवाहाच्या पात्रात जी लहान भिंत बांधतात तिला लघुबंधारा म्हणतात. लघुबंधाऱ्याला लोखंडी दारांची आवश्यकता नसते. तसेच यामुळे होणारा पाण्याचा साठा अतिशय कमी प्रमाणात असतो. पावसाळ्यात पूराच्या वेळी संपूर्ण बंधाऱ्यावरून तसेच लघुबंधाऱ्यावरूनही पाणी वाहते. या उलट धरणाच्या बांधणीमध्ये धरणाच्या एकूण लांबीपैकी फक्त काही विवक्षित लांबीवरूनच पाणी वाहू देण्याची मुभा असते धरणाचा बाकीचा भाग हा जलाशयाच्या पाण्याच्या कमाल पातळीच्यावर काही उंचीपर्यंत बांधलेला असतो.

## ४.१ विकास प्रकल्प ऐतिहासिक पार्श्वभूमी

धरणांचा इतिहास फार पुरातन आहे. प्राचीन काळी इजिप्त, मेसोपोटेमिया, चीन आणि भारत या देशात कोरड्या ऋतूंत शेतीसाठी व माणसांच्या उपयोगासाठी आणि पुरांपासून संरक्षण करण्याकरिता अनेक धरणे बांधली गेली होती. नाईल नदीवरील कोशेश येथे इ. स. पू. २९०० च्या सुमारास बांधलेले १५ मी. उंचीचे धरण हे सर्वांत प्राचीन धरण मानण्यात येते. हे धरण मीनीझ या राजाच्या मेंफिस येथील राजधानीला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधले होते. ईजिप्तमधील इ. स. पू. २७०० च्या सुमारास नाईल नदीवर बांधलेले साद–एल्–काफारा नावाचे दगडी धरणही जगातील एक जुने म्हणून मानण्यात येते व या धरणाचे अवशेष अद्यापही

पहावयास मिळतात. ते धरण कैरोपासून सु. ३० किमी. अंतरावर होते आणि त्याची लांबी १०६ मी. व उंची १५ मी. होती. हे धरण बांधल्यानंतर थोड्याच काळात सांडव्याच्या अभावी पुरामुळे पडले व त्यानंतर अनेक शतके ईजिप्तमधील लोकांनी दगडाची धरणे बांधली नाहीत. अद्यापही उपयोगात असलेले सर्वांत जुने धरण सिरियातील ओरॉंटीझ नदीवरील असून ते ६ मी. उंचीचे व दगडी भरावाचे आहे.

इ. स. पू. १००० पर्यंत सिरियन लोकांनी शेतीसाठी पाणी वळविण्याकरिता टायग्रिस नदीवर समारा आणि इतर ठिकाणी धरणे बांधली. यांपैकी काही दगडाची होता. इ. स. पू. ७०० च्या सुमारास सिरियन लोकांनी निनेव्ह या शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी टायग्रिस नदीवर एक धरण बांधले.

चीन मध्ये इ. स. पू. २२८० च्या सुमारास सम्राट याव यांनी लोकांना व जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठी धरणे आणि कालवे बांधले. इ. स. पू. ३०० च्या सुमारास मिन नदीवर बांधलेल्या धरणांच्या मालिकेद्वारे विस्तृत प्रदेशाला पाणी पुरविले जात होते.

भारतात व श्रीलंकेत प्राचीन काळी लोकांना व जमिनीला पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक मातीची धरणे बांधण्यात आलेली होती. उत्तर भारतात नद्यांना बारमाही पाणी असल्याने त्यांवर कमी उंचीची व फारच थोडा साठा करणारी धरणे बांधून पुराचे पाणी शेतात घेतले जाई व त्या पाण्यावर चांगली पिके काढण्यात येत. द. भारतात अशा बारमाही पाणी असलेल्या नद्या फारशा नसल्याने पाणी साठविण्यासाठी मातीची व क्वचित दगडी बांधकामाची छोटी धरणे बांधली गेली. इ. स. ५०० ते १८०० या काळात द. भारतात पल्लव आणि इतर राजांनी अनेक मातीची धरणे बांधल्याचे उल्लेख आढळतात. इ. स. दुसऱ्या शतकात करिकाल या चोल राजांनी बांधलेल्या कावेरी नदीवरील महान अनईकट्टु (ग्रँड निकट) या दगडी बंधाऱ्यापासून आजही तंजावर जिल्हातील हजारो हेक्टर शेतीसाठी पाणी पुरविले जात आहे. इ. स. पू. चौथ्या शतकात श्रीलंकेतील अनुराधपूर या प्राचीन शहराच्या आसपासच्या प्रदेशाला शेतीसाठी पावसाळ्यातील पाणी साठविण्याकरिता कालाबालाला नावाचा जलाशय (तलाव) बांधण्यात आलेला होता. या जलाशयाकरिता बांधलेल्या मातीच्या धरणाची उंची सर्वांत खोल ठिकाणी २४ मी. आणि लांबी

जवळजवळ ६ किमी होती. या जलाशयाचा परिघ सु. ६० किमी. होता. श्रीलंकेत बांधलेले असे काही जलाशय अद्यापही उपयोगात आहेत. भारतामध्ये मातीच्या धरणाच्या भिंतीच्या उतरत्या भागावर तासलेले दगड बसविण्याची पद्धत प्रचारात होती. या पद्धतीने इ. स. १०११ ते १०३७ या कालखंडात बांधलेल्या तमिळनाडूतील वीरनाम धरणाची लांबी सु. १६ किमी. होती. भारतातील पहिले मोठे दगडी धरण म्हणजे पुण्याजवळील खडकवासला येथे १८७९ साली बांधलेले धरण होय.

साबा (आताचे येमेन) येथील राज्यात इ. स. पू. ७५० च्या सुमारास प्राचीन काळातील एक मोठे म्हणून मानण्यात येणारे धरण बांधण्यात आले. हे धरण कोणत्याही संयोजकाशिवाय जोडलेल्या दगडाचे बांधलेले होते. हे धरण इ. स. सहाव्या शतकात कोसळले. तथापि त्याच्या भिंतीचे सु. १५ मी. उंचीचे काही भाग अद्यापही उभे आहेत.

रोमन लोकांनी इटली, उ. आफ्रिका व इतरत्र अनेक मोठी दगडी धरणे बांधली आणि त्यांतून शहरांना पाणीपुरवठा करण्यासाठी बांधलेल्या काही जलवाहिन्या अद्यापही चांगल्या अवस्थेत आहेत. सध्याच्या लिबियामध्ये रोमन लोकांनी शहरांना पाणीपुरवठा करण्यासाठी व जमिनीची धूप थांबविण्यासाठी कमी उंचीच्या धरणांचा एक व्यूह तयार केलेला होता. दक्षिण स्पेनमध्ये रोमन लोकांनी बांधलेले सुप्रसिद्ध कोरनाल्डो धरण २३ मी. उंच व १८३ मी. लांब होते.

इराणमध्ये चौदाव्या शतकाच्या प्रारंभी केबर नावाचे एक आद्य कमानी धरण बांधण्यात आले. त्याची उंची २६ मी. व जाडी ५ मी. पेक्षा कमी होती. त्याच्या मधल्या वक्र भागाची लांबी व त्रिज्या ३८ मी. होती आणि हा भाग दोन सरळ टेक्यांवर आधारलेला होता.

रोमन साम्राज्य लयाला गेल्यानंतर मोठी धरणे बांधण्याची कला सोळ्याव्या शतकापर्यंत फारशी प्रगत झाली नाही. या शतकात स्पॅनिश स्थापत्यविज्ञांनी सिंचाईसाठी मोठी धरणे बांधली. १५८९ मध्ये त्यांनी बांधलेल्या टिबी धरणाची उंची ४६ मी. होती आणि एकोणिसाव्या शतकापर्यंत हा उच्चांकच राहिला होता.

यूरोपीय अभियंत्यांनी एकोणिसाव्या शतकात केलेल्या कार्यामुळे धरणांच्या बांधकामाला बळकट शास्त्रीय आधार मिळाला व त्यामुळे ४६ ते ६१ मी. उंचीची धरणे बांधणे शक्य होऊ लागले. यापूर्वीच्या २५० वर्षांच्या कालखंडात गॉलिलिओ, न्यूटन, जी. डब्ल्यू फोन लायप्निट्स, रॉबर्ट हूक, दान्येल बेर्नुली, लेनर्ट ऑयलर, द ला हायर आणि शार्ल कुलंब यांनी केलेल्या सैद्धांतिक कार्यामुळे द्रव्यांचे गुणधर्म व संरचना सिद्धांत यांच्या ज्ञानात फार मोलाची भर पडलेली होती. फ्रेंच अभियंते द सँझिली (१८५३) व स्कॉटिश अभियंते डब्ल्यू. जे. एम्. रँकिन (१८७०) यांनी असे दाखवून दिले की धरणांच्या बांधकामात अंतर्गत प्रतिबले (विकृती निर्माण करणाऱ्या प्रेरणा) विचारात घेणे आवश्यक आहे. यामुळे दगडी धरणे त्यांच्या जाडीच्या मानाने पुष्कळच उंच बांधणे शक्य होऊ लागले. एकोणिसाव्या शतकातील प्रगतीच्या आधारे बांधलेले पहिले धरण म्हणजे १८६६ मध्ये बांधलेले फ्रान्समधील फ्यूरें धरण (उंची ५२ मी.) होय.

विसाव्या शतकात बांधकामाच्या यंत्रसामग्रीतील प्रगती, काँक्रीटचा उपयोग व मृदा यामिक विषयी (प्रतिबलांमुळे वा झिरपणाऱ्या पाण्याच्या क्रियेमुळे मातीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याचा शास्त्राविषयी) झालेले संशोधन यांमुळे धरणांच्या बांधकामात जलद प्रगती झाली. यामुळे धरणांच्या उंचीत १९०४ मधील अमेरिकेतील चीझमन धरणाच्या ७२ मी. उंचीपासून १९७२ मध्ये रशियातील नूऱ्येक धरणाच्या ३१७ मी. उंचीपर्यंत उच्चांक गाठण्यात आला. याशिवीय धरणाच्या आकारातही फरक पडला. काही काँक्रीटची धरणे अधिक सुबक व कमी जाडीची बांधण्यात आली.

फ्रेंच अभियंते आंद्रें कॉयन (१८९१–१९६०) यांनी अरुंद कमानींची अनेक धरणे बांधली व त्यामुळे धरणाच्या बांधकामात नवीनच युग सुरू झाले. कमानींच्या अभिकल्पात (आराखड्यात) झालेल्या प्रगतीमुळे खूप उंच व अतिशय अरुंद अशी कमानी धरणे बांधणे शक्य झाले आहे. फ्रान्समध्ये १९५४ साली बांधलेल्या गेज धरणाची उंची ३८ मी. असून त्याच्या पायाची जाडी २.६ मी आहे आणि त्याची उंची व जाडी यांचे गुणोत्तर केवळ ०.०६७ आहे. प्रतिकृतींच्या व अंकीय संगणकांच्या सहाय्याने प्रतिबलांचे गणित करणे सुकर झाल्यामुळे

एकाच कमानी आकाराऐवजी दुहेरी वक्रता असलेल्या अरुंद कमानी धरणांचे बांधकामही आता करण्यात येऊ लागले आहे (उदा. कोलोरॅडोतील मॉरो पॉईंट धरण) पाण्याच्या व वीजपुरवठ्याच्या वाढत्या गरजेमुळे धरणांचे आकारमान दिवसेंदिवस वाढत आहे. जगातील प्रमुख उंच धरणापैंकी जवळजवळ सर्व धरणे १९३० साला नंतर बांधली गेलेली आहेत.

### ४.१.१ भारतातील स्वातंत्र्यापूर्वीचे विकास प्रकल्प

गेल्या दोन तीन शतकापूर्वीपासून महाराष्ट्रातील सिंचन परंपरा चालत आली आहे. सिंचनाची गरज, पाण्याची उपलब्धता आणि अनुभवाधारित तंत्रज्ञान व व्यवस्थापन येथपासून सुरूवात होऊन प्रकल्प उभारणीच्या व सिंचन पध्दतींच्या अधुनिक तंत्रावर आधारित निर्मिलेल्या सिंचनप्रणालींच्या आजवरच्या प्रवासाचा आढावा घेणे फार उद्बोधक ठरेल.

गेल्या दोन तीन शतकापूर्वीपासून महाराष्ट्रातील सिंचन परंपरा चालत आली आहे. सिंचनाची गरज, पाण्याची उपलब्धता आणि अनुभवाधारित तंत्रज्ञान व व्यवस्थापन येथपासून सुरूवात होऊन प्रकल्प उभारणीच्या व सिंचन पध्दतींच्या अधुनिक तंत्रावर आधारित निर्मिलेल्या सिंचनप्रणालींच्या आजवरच्या प्रवासाचा आढावा घेणे फार उद्बोधक ठरेल. गेल्या शतकाच्या मध्यापासून सतत वाढत जाणाऱ्या पाण्याच्या विविध मागण्या आणि त्या भागविण्यासाठी केलेल्या प्रयत्नाबरोबरच, मानवी समुहाच्या सामाजिक व आर्थिक विकासात अधोरेखित झालेले पाण्याचे स्थान आणि पर्यावरण संवर्धन व पाणीप्रदूषण निर्मूलन याबाबत झालेली जाण यातून जलसंपत्ती विकास व वापर यांना प्राप्त झालेली नवी दिशा समजून घेणे महत्वाचे ठरते.

- **स्वातंत्र्यपूर्व काळातील सिंचन पध्दती :**

सुमारे २–३ शतकापूवीर्पासून महाराष्ट्रात दोन सिंचनप्रणाली प्रचलित होत्या. पहिली म्हणजे धुळे जिल्ह्यातील पांझरा, कान, मोसम व आराम या नद्यांवरील एकाखाली एक बांधलेल्या दगडी बंधाऱ्याद्वारे पाणी वळवून कालव्याने होणारे सिंचन, हे बंधारे मोगल सुभेदारांनी तसेच पेशवांच्या काळात बांधले गेले. नदीखोऱ्यातील बरीच जमीन जंगलांनी व्यापली असल्यामुळे आणि भूजलाचा उपसा फारसा नसल्यामुळे या सर्व नद्या बारमाही वाहत असत. कालव्याखालच्या लाभधारकांकडून सिंचन व्यवस्थापन होत असलेली ही फड पध्दत गेल्या ३–

४ दशकांपर्यंत व्यवस्थित चालू होती. परंतु वनाखालचे क्षेत्र बरेच कमी झाल्यामुळे आणि भूजलाचा उपसा वाढल्यामुळे नद्यांचा प्रवाह कमी होऊन या पध्दतीवर विपरित परिणाम झाला. दुसरी पध्दती म्हणजे पूर्व विदर्भात असलेले मालगुजारी तलाव. सामुहिक प्रयत्नातून किंवा मोठ्या जमीनदारांमार्फत बांधलेल्या मातीच्या धरणामागे पाणी साठले जाऊन मधेच पावसाने ताण दिल्यास, लावणीचे वेळी किंवा पावसाळा लवकर संपला तर भातपिकासाठी कालव्याद्वारे पाणी दिले जात असे. त्यापैकी काही तलावांची फूटतूट झाली व काही गाळाने भरून गेले, तरी सध्या सुमारे १००० तलाव राज्यात कार्यरत आहेत. या तलावांवरील सिंचन व्यवस्थापनही लाभधारकांमार्फत होत असे. पारतंत्र्याचे काळात राज्यात गेल्या शतकाच्या दुसऱ्या तिसऱ्या दशकात ५ धरणे बांधून त्यांचे पाणी पश्चिमेकडे वळवून टाटा कंपनीमार्फत वीजनिर्मिती केली. या पाण्यावरही कोकणात मोठ्या प्रमाणात सिंचन होत आहे. तसेच भंडारदरा, चणकापूर, दारणा, भाटघर, खडकवासला यासारखी मोठी दगडी धरणे बांधून ते पाणी पूर्वेकडील अवर्षण प्रवण क्षेत्रास पुरविण्याच्या योजनाही तत्कालीन राज्यकर्त्यांनी राबविल्या. त्यावरील सिंचन व्यवस्थापन पूर्णपणे शासनामार्फत होत होते. परंतु सुरूवातीस पाणी वापर अत्यंत कमी होता. ब्लॉक सिस्टिमने पाणी देण्यास सुरूवात केल्यावर ऊस आणि इतर हंगामी पिकांसाठी पाणी वापर बराच वाढला. कालव्यांच्या समादेश क्षेत्रात विहिरीखालील सिंचनाचे प्रमाण वाढून या प्रकल्पाखालची लाभक्षेत्रे ही सुबत्ता केंद्रे बनली. पूर्व विदर्भात त्याच सुमारास सात मातीची धरणे बांधून त्यांच्या कालव्याखाली भातपिकासाठी पाण्याचा पुरेपूर वापर होऊ लागला. त्यावरील सिंचन व्यवस्थापनही शासनामार्फत केले जात होते.

- **स्वातंत्रोत्तर काळात झालेली प्रगती :**

मातीच्या धरणाच्या अधुनिक तंत्रज्ञानामुळे तशी बरीच मोठी धरणे राज्याच्या सर्व भागात गेल्या शतकाच्या उत्तरार्धात बांधली गेली आणि सिंचन क्षमता फार मोठ्या प्रमाणात वाढली. सिंचन लाभाचे सर्वत्र विखरण व्हावे या हेतूने प्रथम मध्यम व नंतर लघु प्रकल्पांना प्राधान्य देऊन असे बरेच प्रकल्प पूर्ण केले. त्यामुळे उपलब्ध जलसंपत्तीचा समन्यायी पध्दतीने वापर होऊ लागला. मोठ्या प्रकल्पावर बारमाही पीक पध्दती तर मध्यम व लघू प्रकल्पांवर हंगामी पीक पध्दती असून सिंचन व्यवस्थापन पूर्णपणे शासन यंत्रणेमार्फत होत होते. मोठ्या प्रकल्पावरील

उपलब्ध पाण्याचा वापर अधिकाधिक उत्पादनासाठी व्हावा म्हणून लाभक्षेत्राचा सर्वंकष विकास ही संकल्पना १९७४ पासून राबविली गेली परंतु या योजनेस अपेक्षेप्रमाणे यश प्राप्त होऊ शकले नाही.

नदी खोऱ्यातील वरच्या भागास सिंचन लाभ व्हावा म्हणून १०० ते २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमतेचे प्रकल्प लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभागामार्फत, तर १०० हेक्टर खालचे प्रकल्प जिल्हा परिषदांमार्फत राबविले गेले.

- **सिंचन क्षमता निर्मिती :**

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी असलेली निर्मित सिंचन क्षमता केवळ २.७४ लक्ष हेक्टर होती, ती पुढील प्रमाणे वाढली. मोठ्या प्रकल्पांद्वारे २४.५७ लक्ष, मध्यम प्रकल्पाद्वारे ७.४० लक्ष व लघु प्रकल्पांद्वारे ११.३५ लक्ष अशी एकूण ४३.२० लक्ष हेक्टर येवढी सिंचन क्षमता २००७–०८ पर्यंत निर्माण झाली आहे. १०० हेक्टरचे आत सिंचन क्षमता असलेल्या लघु प्रकल्पांद्वारे ११ लक्ष आणि १०० ते २५० हेक्टर पर्यंतच्या लघुप्रकल्पांद्वारे १.८५ लक्ष हेक्टर अशी एकूण १२.८५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता २००७ पर्यंत निर्माण झाली आहे.

- **भूजल विकास :**

स्वातंत्र्योत्तर काळातही सुरूवातीस भूजलविकास हा खोदलेल्या विहीरंद्वारे बैलांच्या मोटांनी किंवा डिझेल इंजिन पंपानी पाणी उपसून होत होता. नंतर जेथे जेथे वीज उपलब्ध होत गेली तेथे विजेवर चालणारे पंप चालवून भूजल वापर वाढत गेला. १९७१–७३ च्या दुष्काळानंतर भूजलविकासाला खरी चालना मिळाली. त्यानंतर विंधनविहिरी मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाऊन खोलवरच्या भूजलाचा वापर वाढला. दुसरे कारण म्हणजे वारसा कायद्यानुसार जमिनीची सतत वाटणी होत गेल्यामुळे कुटुंबाकडील जमिनीचे सरासरी क्षेत्र स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ६० वर्षात १/४ ते १/३ एवढे कमी झाले. तेवढ्या कमी क्षेत्रातून कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या हेतूने भूजलवापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये भूजलभरण कमी आणि उपसा जास्त होत असल्याने भूजलपातळी खोल जात होती. पाणलोटक्षेत्र विकास योजनांतर्गत जलसंधारण कामे हाती घेऊन कृत्रिम भूजलभरण करण्याच्या योजना १९९० सालापासून शासनामार्फत राबविल्या जाऊ लागल्या. सन २००८ पर्यंत एकूण १६.७६ लक्ष खोदलेल्या विहीरी आणि १.९१ लक्ष विंधन विहीरीद्वारे १५.९५ घन किलोमीटर पाणी उपसून सुमारे ३४.०९ लक्ष हेक्टर क्षेत्रास सिंचनसुविधा पुरविल्या जात आहेत (सरासरीने दर विहिरीवर २.१४ हेक्टर सिंचन) त्या आधीची चार वर्षे भूजल सिंचन वाढीचा वेग प्रतिवर्षी २ टक्के येवढा होता.

- **विविध सिंचन प्रणालींबद्दल काही समज – गैरसमज :**

विस्थापितांच्या प्रश्नामुळे मोठी धरणेच नको अशी भूमिका पर्यावरणवादी व आंदोलनकर्ते घेतात. परंतु मोठ्या धरणांचा प्रति दशलक्ष घनमीटर पाणी साठविण्याचा खर्च लघु धरणांच्या केवळ २५ ते ३० टक्के असतो, पाणी साठण्याची सरासरी खोली जास्त असल्यामुळे जलाशयाखाली जाणारी जमीनही कमी असते व बाष्पीभवनाने वाया जाणाऱ्या पाण्याची टक्केवारीही कमी असते. तथापि लहान धरणांमुळे खोऱ्याच्या वरच्या भागातील कोरडवाहू जमिनीस सिंचनसुविधा मिळाल्यामुळे सिंचन लाभाचे विखरण होते. मोठ्या धरणातील पाणीसाठण्याची विश्वासार्हता अधिक असल्यामुळे त्यावर प्रत्यक्ष सिंचनाची टक्केवारी ही बागायती पिके धरून ५० टक्के आहे. त्या तुलनेत मध्यम व लघु प्रकल्पाखाली सिंचनाची टक्केवारी हंगामी पिकाखालीच सरासरी ३६ टक्के आहे. केवळ मध्यम व लहान धरणे बांधल्यास नदीखोऱ्यातील उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर वापर होणार नसल्याने मोठी धरणे अत्यावश्यक आहेत हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील अंतिम सिंचन क्षमता ही वहितीक्षम क्षेत्राच्या ६३ टक्के असून त्यापैकी ३२ टक्के मोठ्या धरणाद्वारे, १० टक्के मध्यम व लघु धरणांद्वारे आणि २१ टक्के भूजलाधारे (कालवे सिंचन आणि पाणलोट क्षेत्र वितासातून होणारे भूजलभरण विचारात घेऊन) निर्माण होऊ शकेल. त्यामुळे उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर वापर होण्यासाठी आणि तिचे समन्यायी वाटप होण्यासाठी हे सर्व प्रकार एकमेकास पर्यायी नसून पूरक आहेत हे दिसून येईल.

कालव्याखालील सिंचन क्षेत्रातून जमिनीत मुरणाऱ्या पाण्यामुळे नैसर्गिकरित्या होणाऱ्या भूजल भरणाच्या २५ टक्के येवढे वाढीव भूजल उपलब्ध होते असे भूजलसर्वेक्षण यंत्रणेच्या अहवालात म्हटले आहे. भूपृष्ठावरील सिंचन योजनांचा हा अप्रत्यक्ष फायदा आहे.

धरण–कालवे प्रकल्प उभारणासाठी लागणारा भांडवली खर्च शासनामार्फत केला जातो व पाणी वापर आकारणीतून मिळालेल्या उत्पन्नातून प्रकल्पांच्या देखभाल – दुरूस्तीचा खर्च जेमतेम भागतो. त्यावरील सिंचन वापर कार्य क्षमताही केवळ ३०–३५ टक्केच असते. याउलट विहीरीखालील सिंचन यंत्रणेसाठीची गुतंवणूक (कर्जासाठी, सूक्ष्मसिंचन यंत्रणेसाठी व वीज वापरासाठीचे अनुदान सोडून) खाजगी क्षेत्रातून होते, तसेच त्यावरील सिंचन वापर कार्य क्षमताही ६०–६५ टक्के असते. त्यावर सूक्ष्म सिंचन पध्दती वापरली तर कार्यक्षमता ८५–९० टक्के येवढी वाढू शकते. विहिरीखालील सिंचनात बहुमूल्यदायी नगदी पिके घेतली जातात.

- **सिंचन व्यवस्थापनेमध्ये आवश्यक असलेल्या सुधारणांची दिशा :**

पूर्ण झालेल्या सर्व सिंचन प्रकल्पांचे, विशेषत: ज्या धरणांमध्ये सरासरी टक्केवारीने प्रत्यक्ष पाणीसाठा चांगला होत असूनही पाणीवापर कमी होत आहे अशा प्रकल्पांचे उद्दिष्ट्य साधता मूल्यांकन (Performance Evaluation) करून त्यामध्ये आवश्यक असलेल्या सुधारणा (अधुनिकीकरण) करण्यात याव्यात. यामुळे तुलनेने कमी खर्चात सिंचन क्षेत्रात वाढ होईल.

ज्या धरणात साठवण क्षमतेच्या तुलनेत येवा (Yield) जास्त आहे किंवा ज्या धरणांची साठवण क्षमता गाळामुळे बरीच कमी झाली आहे आणि जेथे प्रत्यक्ष पाणीवापर चांगला आहे अशा धरणांची साठवणक्षमता कशी वाढविता येईल यासाठी सर्वेक्षण करून त्यानुसार कार्यवाही केली पाहिजे.

१९९६–९७ ते २००५–०६ या १० वर्षाच्या कालावधीत राज्यातील धरणात सरासरीने झालेल्या प्रत्यक्ष साठ्याची आकडेवारी पाहता आणि त्या साठ्याची विविध प्रकारच्या मागण्यांसाठी झालेली प्रत्यक्ष वापराची आकडेवारी पहाता दिशादर्शक चित्र दिसते.

सारणी क्र. ४.१
महाराष्ट्रातील विभागनिहाय पाणी साठे

| प्रदेश | प्रत्यक्ष पाणी प्रत्यक्ष साठलेल्या | |
|---|---|---|
| | साठ्याची संकल्पित वापराची टक्केवारी | पाण्याच्या प्रत्यक्ष पाणीसाठ्याशी टक्केवारी |
| १. कोकण | ८५ | ३२ |
| २. नाशिक | ५६ | ९४ |
| ३. पुणे | ७३ | ८४ |
| **उर्वरित महाराष्ट्र** | ६९ | ८२ |
| ४. मराठवाडा | ४८ | ६५ |
| ५. अमरावती | ६५ | ५६ |
| ६. नागपूर | ७४ | ७६ |
| एकूण विदर्भ | ७० | ६८ |
| एकूण महाराष्ट्र | ६४ | ७६ |

यावरून दिसून येईल की साठलेल्या पाण्याचा प्रत्यक्ष वापर हा कोकण आणि अमरावती प्रदेशात बराच कमी आहे. तो वाढविण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत याची पहाणी करून त्या अंमलात आणून पाणीवापर वाढला पाहिजे. केवळ सिंचन निर्मितीतील अनुशेष दूर करण्यासाठी भांडवली गुंतणूक करण्यापेक्षा बऱ्याच कमी खर्चात सिंचन वापरात वाढ होऊन त्या भागांचा अनुशेष दूर होण्यासाठी नियोजन पूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

शासकीय उपसासिंचन योजनांवर बारमाही पिकांसाठी सूक्ष्मसिंचन पध्दतीचा वापर अनिवार्य केल्याने भागणार नाही तर त्याची कसोशीने अंमलबजावणी केली तरच पाणी वापरात बरीच बचत होऊ शकेल. यथावकाश भूपृष्ठ योजनांखालील बारमाही पिकासाठीही या नियमाची अंमलबजावणी करावी.

सन २००७–०८ पर्यंत मोठ्या प्रकल्पाखालील प्रत्यक्ष सिंचन सुमारे १२.३४ लक्ष (क्षमतेच्या ५० टक्के), मध्यम प्रकल्पांखाली २.८३ लक्ष (३८ टक्के) व लघु प्रकल्पाखाली ३.८० (३४ टक्के) असे एकूण १८.९७ लक्ष (४४ टक्के) आहे. मोठ्या प्रकल्पात बारमाही पिकांची टक्केवारी जास्त असल्यामुळे क्षेत्र कमी दिसते. मध्यम व लघु प्रकल्पात पाणीसाठा कमी होत असल्यामुळे टक्केवारी कमी दिसते. (अवर्षणप्रवण तालुके सिंचन अनुशेष समिती (रंगनाथन समिती) अहवाल – नोव्हेंबर २००९)

मोठ्या प्रकल्पाच्या कालव्याच्या सुरूवातीच्या लांबीमध्ये (जेथवर सरासरी वर्षात बारमाही पिकास पाणी उपलब्ध होऊ शकेल येवढ्या लाभक्षेत्रासाठी) वितरण यंत्रणेवर सूक्ष्म सिंचन पध्दतीचा वापर करण्यासाठी पाणीवपर संस्थांना पथदर्शक योजनांसाठी अनुदान द्यावे. यापैकी काही प्रकल्पांवर खाजगी व शासकीय गुंतवणूकीतून (Public-Private–Partnership) अशा प्रकारच्या योजना राबविता येतील यासाठी प्रत्यन केले पाहिजेत.

सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थांकडे सोपविण्यापूर्वी कालवा व वितरण यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असते. महाराष्ट्र जल सुधार प्रकल्प (Maharashtra Water Improvement Project) च्या धर्तीवर सुधारणा केल्यास हे हस्तांतरण सुकर होईल असे वाटते.

पाणीवापर संस्था या लोकशाही पध्दतीने कार्यक्षम रितीने चालल्या तर कायम बागायतीखालचे (ऊस, केळी वगैरे) एकूण क्षेत्र तेवढेच राहिले तरी लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या वाढून बहुतेक शेतकऱ्यांना थोड्या थोड्या क्षेत्रावर नगदी पिके घेता येतील. यासाठी सूक्ष्मसिंचन (ठिबक सिंचन) यंत्रणेचा वापर केला तर वाचलेले पाणी हंगामी पिकास वापरता येईल. थोडक्यात म्हणजे सिंचन लाभाचे समन्यायी वाटप होऊन तेवढ्याच पाण्यात अधिक उत्पादन, अर्थनिर्मिती व रोजगार निर्मिती होईल.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, विशेषत: अवर्षणप्रवण क्षेत्रात राबवून कृत्रिम भूजलभरणाद्वारे अधिक भूजलसिंचन क्षमता निर्माण झाल्यामुळे त्या क्षेत्राचा विकास होईल व रोजगाराच्या शोधार्थ शहराकडे जाणाऱ्यांचे प्रमाण कमी होईल.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबवितांना लाभधारकांचा पूर्ण सहभाग हा चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, जलसंधारण कामात साठलेला गाळ काढून शेतात पसरणे व पुनर्भरण क्षमता वाढविणे, बागायती पिके न घेता हंगामी पिके घेऊन सिंचन लाभ जास्तीत जास्त लोकांना होईल असे पहाणे, माणसांना व जनावरांना पाणी पिण्यासाठी लागणाऱ्या विहीरी राखून ठेवणे, या सर्व कामात राहील हे पहाण्यासाठी आवश्यक अशासकीय संस्थांची मदत घेण्याचा प्रयोग केला पाहिजे. लाभधारकांचे असे सहकार्य लाभले तरच या योजना यशस्वी होतील.

प्रत्येकी २५० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेल्या धरण योजनांद्वारे २००७ साला अखेरपर्यंत सुमारे १२.८५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. परंतु जलसंधारण व जिल्हापरिषद यामार्फत राबविल्या जाणाऱ्या या योजनांतर्गत दरवर्षी धरणामध्ये प्रत्यक्ष किती पाणी साठले किंवा प्रत्यक्ष किती सिंचन झाले, त्यावर आजवर किती खर्च झाला याची काहीही माहिती संकलित केली जात नाही. त्यामुळे यापैकी काही टक्के प्रतिनिधिक (Representative) योजना निवडून त्यांचे उद्दिष्ट्य साधता मूल्यांकन त्रयस्थ अशासकीय संस्थांमार्फत केले पाहिजे. येवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करून बांधलेल्या धरणात दरवर्षी होणारा साठा व प्रत्यक्ष सिंचन याची आकडेवारी संकलित करून वार्षिक अहवाल प्रसिध्द करण्याची जबाबदारी जलसंधारण विभाग व जिल्हा परिषद यांच्यावर सोपविली पाहिजे. या कामात आजवर केलेल्या प्रचंड गुंतवणुकीचा प्रत्यक्ष फायदा किती होत आहे हे पहाण्याची कोणतीही यंत्रणा कार्यरत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

बऱ्याच मोठ्या–मध्यम धरणातील पाणी नागरी वस्तीसाठी व उद्योगांसाठी वापरले जाते. त्यामुळे सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध होऊन शहरी–ग्रामीण संघर्ष वाढत आहे. अशा वापरातून ते प्रदूषित सांडपाणी निर्माण होते त्यापैकी थोड्याच सांडपाण्यावर प्रक्रिया करून उरलेले पाणी तसेच नदीत सोडल्यामुळे बऱ्याचशा नद्यांचे आणि त्या नद्या ज्या जलाशयात जाऊन मिळतात त्यांचे पाणी प्रदूषित होत आहे. या प्रदूषित पाण्याचा वापर पिण्यासाठी केल्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रदूषित पाण्याचा वापर शेतीसाठी केल्यामुळे प्रदूषित शेतमालाची निर्मिती होते आणि तेथील भूजलाचेही प्रदूषण होत आहे. निर्माण झालेल्या

१०० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा वापर सिंचनासाठी केला तर सिंचन क्षेत्रात वाढ होईल. आणि जलपरिसंस्थांचे प्रदूषणही थांबून आरोग्याचे प्रश्न निर्माण होणार नाहीत. सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणेचा भांडवली खर्च अंशत: भागविण्यासाठी नागरी वस्तीवर आवश्यक ते कर बसवण्याची कार्यवाही केली पाहिजे. उद्योगातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावरील प्रक्रिया होण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी चोख झाली पाहिजे.

भूपृष्ठावरील व भूजलावरील प्रत्यक्ष होणाऱ्या सिंचनाचे मापन उपग्रहामार्फत उपलब्ध होणाऱ्या छायाचित्रांच्या (Satellite imageries) सहाय्याने करण्याची अधुनिक व वस्तुनिष्ठ पध्दत वापरल्यास सिंचन क्षेत्राचे योग्य मापन होऊन सर्व सिंचनप्रणालींच्या उपयुक्ततेचे यथार्थ मूल्यमापन होईल.

वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यास सिंचन व्यवस्थापनाची सध्याची दशा सुधारून एक नवी दिशा प्राप्त होईल आणि केलेल्या प्रचंड भांडवली गुंतवणुकीमधून होणाऱ्या लाभांचे प्रमाण बरेच वाढेल असे वाटते. (Report on the Dynamic Ground Water Resources of Maharashtra ( 2008-09) by GSDA CGWB - March 2011)

### ४.१.२ भारतातील स्वांतत्र्यानंतरचे विकास प्रकल्प

भारतामध्ये स्वांतत्र्यानंतर अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून मोठे प्रकल्प हाती घेण्यात आले. हरितक्रांतीच्या उत्थानासाठी या प्रकल्पांचा मोठ्याप्रमाणावर हातभार लागला. कृषी व औद्योगिक विकासाकरीता धरणांबरोबरच जलविद्युत निर्मिती, अणु विद्युत प्रकल्प, औष्णिक विद्युत प्रकल्पांची निर्मिती करून देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलेले गेले. या प्रकल्पांमध्ये मुख्यत्वे– दामोदर खोरे योजना, भाक्रा नागल योजना, राजस्थानचा कालवा, कोसी योजना, हिराकुड योजना, नागार्जुन योजना, चंबळ योजना, फराक्का योजना, नर्मदा प्रकल्प, तिहारी प्रकल्प, जायकवाडी प्रकल्प, पेरियार प्रकल्प, सायलेंट व्हॅली प्रोजेक्ट (केरळ) या प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे–

१) **दामोदर खोरे योजना –** स्वतंत्र भारताची ही पहिली योजना आहे. ही अमेरिकेतील टेनेसी व्हॅली प्रोजेक्ट वर आधारीत आहे. ही योजना १९४८ मध्ये सुरु झाली. या योजनेचे

पूरनियंत्रण, विद्युत निर्मिती, जलसिंचन, मृदाधूप नियंत्रण इ. उद्देश होतो. या अंतर्गत दामोदर नदीच्या उपनद्यांवर तालैया, कोनार, मैथान व पांचेत ही धरणे जलविद्युत निर्मितीसाठी बांधली. तर बोकोरो, दुर्गापूर, व चंद्रपूर येथे औष्णिक विद्युत प्रकल्प सुरु होते. दुर्गापूरच्या धरणातून २५०० कि.मी. चा कालवा काढून वाहतुक सिंचनासाठी वापरतात.

२) **भाक्रा नागल योजना –** हा पंजाब, हरियाणा व राजस्थानचा संयुक्त प्रकल्प आहे. या अंतर्गत हिमाचल प्रदेशात भाक्रा येथे सतलज नदीवर २२६ मी. उंचीचे व ५१८ मी. लांबीचे भारतातील सर्वांत उंच धरण आहे. याच्या जलाशयास गोविंद सागर जलाशय म्हणतात. या धरणापासून ११०० कि.मी. लांबीचे कलवे व ३४०० कि.मि. लांबीच्या वितरीका काढून १४ लाख हेक्टर क्षेत्र सिंचित केले अहे. पंजाब मधील नांगल येथे दुसरे धरण बांधून १२०४ मेगावॅटच्या जलविद्युत प्रकल्प उभारला गेला आहे.

३) **राजस्थानचा कालवा –** यानुसार बियास व रावी नदीचे पाणी स्सतलज नदीत सोडले आहे. बियास नदीवर पोंग येथे धरण बांधले आहे. सतलज व बियास नद्यांच्या संगमावर हरिके येथे धरण बांधून राजस्थान कालवा काढला आहे. यामुळे पंजाबचा काही भाग व राजस्थानचा वाळवंटी भागाला पाणी पुरवठा केला जात आहे. याच्या मुख्य कालव्याला इंदिरा गांधी कालवा या नावाने ओळखतात. या कालव्याची लांबी ४६८ कि.मी. असून हा जगातील सर्वांत लांब कलव्यांपैकी एक आहे.

४) **कोसी योजना –** बिहारचे अश्रु असणाऱ्या कोसी नदीवर पूर नियंत्रणाच्या उद्देशाने उभारलेला बिहार व नेपाळ सरकारचा संयुक्त प्रकल्प आहे. या अंतर्गत नेपाळमध्ये हनुमान नगर येथे धरण बांधले आहे.

५) **हिराकुड योजना –** ओरिसा राज्यात संबळपूर जवळ १९४८ मध्ये महानदीवर हा प्रकल्प उभारलेला आहे. या अंतर्गत ४८०० मी. लांब व ६१ मी. उंचीचे धरण बांधले असून दोन्ही बाजूस मिळून २१ कि.मी. संरक्षक भिंती बांधल्या आहेत. हे भारतातील सर्वाधिक लांबीचे धरण आहे.

**६) नागार्जुन योजना –** आंध्र प्रदेशात कृष्णा नदीवर हैद्राबादपासून १४४ कि.मी. वर नंदिकोना येथे धरण बाधले आहे. या ठिकाणी प्रचीन मंदिरे होती. ती स्थालांतरित केली होती.

**७) चंबळ योजना –** ही राजस्थान व मध्यप्रदेश सरकारची संयुक्त योजना आहे. या अंतर्गत मध्यप्रदेश मध्ये गांधी सागर, राजस्थानमध्ये कोटाजवळ धरण व रावताभाटा येथे राणाप्रताप सागर हे कोटापासून २१ कि.मी. वर धरणे उभारली आहेत.

**८) फराक्का योजना –** या योजने अंतर्गत पश्चिम बंगालमध्ये गंगा नदीवर फराक्का व भागिरथी नदीवर जांगीपूर येथे धरणे बांधली आहे. हुगळीचा प्रवाह कायम ठेवून कोलकाता बंदर कायम ठेवण हा या योजनेचा उद्देश आहे.

**९) नर्मदा प्रकल्प–** या प्रकल्पातील ३००० लहान मोठी धरणे बांधण्यात आलेली आहेत. मध्यप्रदेशात इंदिरा सागर (नर्मदा धरण) हे निमार जिल्ह्यात व गुजरात राज्यात सरदार सरोवर हे धरण बांधले आहे.

**१०) तिहारी प्रकल्प –** उत्तराखंडमध्ये भारत सरकार व उत्तराखंड यांच्या सहकार्याने भागिरथी नदी व मिलनगंगा नदीवर तिहारी जिल्ह्यात हा प्रकल्प आहे. या प्रकल्पात रशियाने सहाय्य केले आहे. याचा जलाशय रामतिर्थ सागर म्हणून ओळखतात. तिहारी पासून २२ कि.मी. वर कोटेश्वर धरण आहे.

**११) जायकवाडी प्रकल्प –** जपानच्या सहकार्याने पैठण जवळ गोदावरी नदीवर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. (१९६५) यातून वीज निर्मिती केल्यानंतर पाणी पुन्हा धरणात सोडले जाते. अशी ही देशातील एकमेव योजना आहे.

**१२) पेरियार प्रकल्प –** केरळमध्ये पेरियार या पश्चिम वाहिनी नदीवर धरण बांधून पुर्वेकडे वाहणाऱ्या वैगई नदीत पाणी सोडले आहे. या प्रकल्पामुळे तामिळणाडूच्या मदुराई व केरळमधील एर्नाकुलम जिल्ह्यांना लाभा झाला आहे.

**१३) सायलेंट व्हॅली प्रोजेक्ट (केरळ) –** पर्यावरणास घातक असल्यामुळे रद्द

**१४) नद्या जोडण्याचा प्रकल्प –** डॉ. के.एल. राव यांनी १९७२ मध्ये गंगा कावेरी या नद्यांच्या कालव्याने जोडण्याची कल्पना मांडली. १९७७ मध्ये के. दस्तुर यांनी अशा प्रकारची योजना माडली. सध्या हिमालयातील १४ व पठारावरील १६ नद्या जोडण्यासाठी सुरेश प्रभु यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट नेमण्यात आला होता. न्यायालयाने ही योजना २०१६ पर्यंत पूर्ण करण्यास सांगितले आहे. यास ५, ६०, ००० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता.

**१५) रिहांद धरणाच्या जलाशायास नाव आहे –** गोविंद वल्लभपंत सागर प्रकल्प धरण, नदी व स्थळ सहयोगी राज्य मुख्य उद्देश

**विविध राज्ये व जलविद्युत प्रकल्प जलविद्युत प्रकल्प** राज्ये प्रमुख जलविद्युत प्रकल्प महाराष्ट्र खोपोली, भिरा, भिवपुरी, कोयना, वैतरणा आंध्रप्रदेश नागार्जुनसागर, मुचकुंद, श्रीशैलशम, सिलेरु कर्नाटक शरावती, काळी, शिवसमुद्र, जोग, भद्रावती तामिळनाडू केत्तुर, पैकारा, कुंदा, पापनाशम केरळ इदुक्की, साबगिरी, पेन्नीयार, सेलगुम, शोलयार जम्मू काश्मिर दाल, दलहस्ती (चिनाब) बारामुल्ला, सिंधू खोरे राजस्थान राणाप्रताप सागर, कोल (हि.प्रदेश) हि. प्रदेश पार्वती, भाक्रा, मंडी उ. प्रदेश मलेरी, यमुना, रामगंगा, रिहांद, शारदा बिहार गंडक, कोसी, दामोदर नागालँड दोयांग आसाम बारपानी, कोपिली ओरिसा हिराकुड, बाल्लीमेळा गुजरात कदाना, उकाई म. प्रदेश गांधी सागर

**जलविद्युत निर्मितीची सर्वाधिक क्षमता असणारे नदी खोरे– ब्रम्हपुत्रा** भारतातील ८०% जलविद्युत निर्मिती होणारे क्षेत्र– पश्चिम घाट भारतातील पहिला जलविद्युत प्रकल्प – १) दर्जिलींग–१९९८ २) शिव समुद्र–१९००

**भारतातील अणु विद्युत प्रकल्प** राज्य प्रस्तावित प्रकल्प राज्य तारापूर महाराष्ट्र राणाप्रताप सागर राजस्थान उमरेड (नागपूर) महाराष्ट्र कैगा कर्नाटक– (रावता भाटा) जैतपूर (रत्नागिरी) महाराष्ट्र कल्पकम तमिळणाडू कुंडकुलम तामिळनाडू फतेहाबाद हरियाणा.

**भारतातील प्रमुख औष्णिक विद्युत प्रकल्प** राज्य औष्णिक विद्युत प्रकल्प उ. प्रदेश ध्रुवण, हरदुआगंज, पंकी, परिच्छा, ओबरा, दोरहीघाट, रेणुसागर, अरैया प. बंगाल विरभूम,

दुर्गापूर, कोलकाता, टिटाधर, बांदेल म. प्रदेश सातपूडा, सिंग्रोली, भोपाळ, इंदोर छ्त्तीसगड कोर्बा, अमरकंटक तमिळनाडू एन्नूर, नैबेली, तुतिकोरीन आं. प्रदेश विजयवाडा, रामगुंडम, कोथयागुंडम, नेल्लोर बिहार बरौनी, चंद्रपूर ओरिसा तालचेर, बालिमेला, कटक हरियाणा पानिपत, बरापूर, फरिदाबाद पंजाब भटींडा, रुपनगर झारखंड बोकारो, सिंद्री, जमशेदपूर मणिपूर लोकटक कर्नाटक रायचुर दिल्ली बरादपूर, राजघाट, इंद्रप्रस्थ काश्मिर कालाकोट.

- **हिराकुड**

जगातील सर्वात लांब धरण. ओरीसा राज्यातील महानदीवर संबलपुर पासुन १५ कि.मी. अंतरावर हे धरण बांधलेले आहे. हे धरण १९५६ साली बांधले गेले. १९३७ साली आलेल्या महापुरामुळे या धरणाची संकल्पना सर विश्वेश्वैरय्या यांनी मांडली. ह्या धरणाच्या सर्वेक्षणासाठी एक समिती नेमुन सर्वे करण्यात आला. या धरणाची कोनशिला ओरीसा या राज्याच्या राज्यपालांच्या हस्ते १५ मार्च १९४६ साली ठेवली गेली. हिराकुड धरणाचे उद्‌घाटन १३ जानेवारी १९५७ साली पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते झाले. या धरणाला एकुण खर्च १००.०२ करोड आला आहे. १९५६ पासुन शेतीला पाणीपुरवठा करण्याला सुरूवात झाली. आणि वीज उत्पादन १९६६ सालापासून सुरु झाली.

- **भाक्रा नागल**

भारतातील पंजाब, हरयाणा व राजस्थान या तीन राज्यांनी संयुक्तपणे सतलज नदीवर उभारलेला सर्वात मोठा बहूद्देशीय प्रकल्प. हिमाचल प्रदेश राज्यातील बिलासपूरच्या वायव्येस भाक्रा येथे एक भारस्थायी काँक्रीटचे धरण बांधण्यात आले. भाक्रा धरणाच्या खालच्या बाजूस सु. १३ किमी. अंतरावर रुपार जिल्हयातील नानगल येथे दुसरे धरण बांधण्यात आले. त्यातील पाण्याचा उपयोग मुख्यत्वे विजनिर्मितीसाठी करुन घेण्यात आलेला आहे.

भाक्रा नानगल प्रकल्पास १९४६ मध्ये प्रारंभ झाला. यातील भाक्रा व नानगल ही दोन्ही धरणे तसचे नानगल हायडेल चॅनेल यांचे बांधकाम जुलै १९५४ मध्ये पूर्ण करण्यात आले. जानेवारी १९५५ मध्ये नानगल वीज उत्पादनकेंद्राच्या पूर्ततेनंतर प्रकल्पाची एकूण प्रतिष्ठापित वीज उत्पादनक्षमता ४८,००० किवॉ. होती. ती जुलै १९५६ मध्ये १९५८–५९ मध्ये भाक्रा

धरणातून कालव्यांद्वारे पंजाब व राजस्थान राज्यांच्या काही भागांस पाणीपुरवठा होऊ लागला. हा २३६ कोटी रु. खर्चाचा संपूर्ण प्रकल्प १९६३ मध्ये पूर्ण होऊन २२ ऑक्टोबर १९६३ रोजी पंडीत नेहरुंच्या हस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आला. हा प्रकल्प म्हणजे 'देशाच्या प्रगतीचे प्रतीक' असे गौरवोद्गार पंडितजींनी काढले. या प्रकल्पामुळे हरयाणा राज्यातील सर्व गावांना वीज उपलब्ध झाली, तसेच पंजाब व हरयाणा या दोन्ही राज्यांची कृषिक व औद्योगिक प्रगती शक्य झाली. राजस्थान राज्य व केंद्रशासित प्रदेश दिल्ली या दोघांनाही या प्रकल्पामुळे वीज उपलब्ध झाली आहे.

### ४.१.३ महाराष्ट्रातील विकास प्रकल्प

देशाबरोबरच विकास प्रकल्पांमध्ये राज्यांचा विकास महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये महाराष्ट्रामध्ये भारतातील जास्तीत जास्त प्रमाणात विकास प्रकल्प हाती घेण्यात आले होते. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता धरण निर्मितीसाठी पूरक अशी भौगोलिक रचना असल्यामुळे धरण प्रकल्पांची मोठ्याप्रमाणात निर्मिती करून कृषी सिंचन, वीजनिर्मिती, औद्योगिक विकास साधण्यात आला. महाराष्ट्रामध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, विदर्भ पाटंबधारे विकास महामंडळ, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ या पाटबंधारे प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणावर शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांची निर्मिती करण्यात आली. विकास या प्रकल्पांचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे–

#### १. जायकवाडी धरण

जायकवाडी धरण हे गोदावरी नदीवर असलेले महाराष्ट्रातील एक प्रमुख धरण आहे. विदर्भातील जवळजवळ २.४० लाख हेक्टर क्षेत्र या धरणामुळे ओलिताखाली आलेले आहे. औरंगाबादचे जायकवाडी धरण हे देशातील धरणांपैकी एक महत्वाचे धरण आहे. जायकवाडी धरण हिवाळ्यात परदेशी पक्षांचे हक्काचे घर समजले जाते. या धरणात हजारो विदेशी पक्षी दाखल झाले आहेत या परदेशी पाहुण्यांना पाहण्यसाठी पर्यटकांनी जायकवाडी धरणावर गर्दी केली आहे. हे पक्षाचे थवे कधी संथ गतीने नाथ सागरावर मुक्त विहार करताना पाहावयास

मिळतात तर कधी आकाश कवेत घेताना दिसतात. हे परदेशी पक्षी काही दिवस पाहुणे म्हणून जायकवाडी धरणावर येतात आणि पक्षी मित्रांच्या मनात घर करून जातात. अगदी रशिया, मध्य रशिया, सैबेरिया, युरोप, बलुचिस्तान यासह अन्य प्रांतातून हे पक्षी स्थंलतर करून हिवाळ्यात जायकवाडी धरणावर येतात. यामध्ये सर्वसाधारणपणे पिनटेल, शॉवेलर, व्हीजन, कॉमन टिल, ब्ल्यू विंग टिल, टफटेड पोचार्ड या बदकांची संख्या अधिक असते. तर गॉडवीट, गीन शँक, रेड शँक, सॅडपायपर, स्टीलट करल्यू, रफ ऍंड रिव्ह, स्नाई या वेडर्स प्रकारातील पक्ष्यांचा मुक्त संचार असतो. हे पक्षी काही कालावधीसाठी जायकवाडी धरणात थांबतात. जायकवाडी आणि परिसरात उन्हाचा तडाखा वाढल्यानंतर पुन्हा सुरू होतो परतीचा प्रवास, आपल्या हक्काच्या घराकडे. औरंगाबादचे पक्षीमित्र दरवर्षी या पक्षाची जनगणना करतात.

सह्याद्रीच्या कुशीतील धरणांच्या पाण्याची वाफ होत असताना जायकवाडी धरण मात्र कोरडे आहे. केवळ शासकीय धोरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सह्याद्रीच्या कुशीतील धरणाचे पाणी जायकवाडीत सोडण्यात यावे, अशी मागणी गोदावरी पाणी हक्क संघर्ष समितीने केली आहे. परभणी जिल्ह्यातील सिचनाचे क्षेत्र आता केवळ कागदावरच शिल्लक आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठ्या जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील गावांची अवस्था बिकट आहे. वेळेवर पाणी मिळत नाही. आता तर जायकवाडीचे पाणी कायमचेच बंद झाल्यासारखी अवस्था आहे. जायकवाडीचे पाणी नसल्याने शेतकरी नैराश्येच्या गर्तेत आहेत. जायकवाडी प्रकल्पाच्या वरच्या बाजूस ११२ टी.एम.सी. पाण्याचा वापर मंजूर असताना सुमारे १८७ टीएमसी पेक्षा जास्त पाणी अडविण्यात येते. त्यामुळे जायकवाडी धरण कधी तरी भरते. निळवंडे धरण ९९ टक्के भरलेले असून, या धरणाला कालवेच नाहीत. त्यामुळे धरणातील पाण्याची वाफ होत आहे. अशीच परिस्थिती भंडारदरा आणि दारणा या धरणांची आहे. सह्याद्रीच्या कुशीतील या धरणांची वाफ होत असताना मराठवाड्यातील गोदाकाठ मात्र पाण्याअभावी कोरडाठाक आहे. ही परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने समन्यायी तत्वाने जायकवाडी प्रकल्पात पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी परभणी

येथून करण्यात आली आहे. जवळपास ३०० द.ल.घ.मी. पाणी जायकवाडी प्रकल्पात सोडण्यात यावे व एप्रिल व मे महिन्यात किमान ३ रोटेशन पाणी लाभक्षेत्रात उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**२. कोयना**

पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रचंड जलविद्युत प्रकल्प. महाबळेश्वर येथे कृष्णा नदीच्या उगमाजवळच कोयना नदीचा उगम आहे. कृष्णा नदी पूर्ववाहिनी आहे. कोयना मात्र उत्तर दक्षिण दिशेने ६४ किमी. जाऊन व प्रतापगडला वळसा घालून हेळवाकजवळ पुर्वभिमुख होते. तेथून ५६ किमी. वरील कराडजवळ कोयनेचा कृष्णेशी संगम (प्रीतिसंगम) झाला आहे. कोयनेच्या ८९२.० चौ. किमी. क्षेत्रफळाच्या खोऱ्यात सु. ५०८ सेंमी. पाऊस पडतो. कोयना खोरे सहयाद्रीच्या पश्चिमेकडील पायथ्यापासून ४२७ मी. उंच आहे. या ठिकाणी जलविद्युत् प्रकल्प उभारण्याच्या योजनेस १९५४ च्या जानेवारीत प्रारंभ झाला.

मुंबई प्रांताच्या बांधकाम खात्यातील एक स्थापत्यविशारद बिल यांनी १९०८–०९ साली महाराष्ट्रात दौरा करून तत्कालीन सरकारला निरनिराळया ३२ पाटबंधारे योजना सुचविल्या. त्यांत कोयना पाटबंधारे योजनेचा समावेश होता. परंतु त्याबाबतीत सरकारने कार्यवाही केली नाही. जमशेटजी टाटा यांनी १९२०–२५ सालांत पूर्ण केलेल्या मुळशी योजनेनंतर कोयना धरण योजना हाती घेण्याचा संकल्प सोडला होता. परंतु मुळशी धरणाविरूध्द सेनापती बापट यांनी उभारलेल्या सत्याग्रहामुळे टाटांची योजना बारगळली. अखेरीस स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जागतिक बँकेने दिलेल्या १२ कोटी रू. किंमतीच्या परदेशी हुंडणावळीच्या साहाय्याने कोयना प्रकल्पास सुरूवात झाली.

कोयना जलविद्युत प्रकल्प हा भारतातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे चार टप्पे आहेत. जास्त मागणीच्यावेळी सर्व मिळुन या टप्प्यातून १९२० मेगावॅट वीज निर्मिती केली जाऊ शकते. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (म.रा.वि.मं./MSEB) या कंपनीच्या विधमाने चालविला जातो. सह्याद्री डोंगराच्या पोटात ३०० मीटर खोलीवर हा टप्पा आहे. या टप्प्यातुन लेक टेपिंग पध्दतीने १००० MW (मेगावॉट) वीज निर्मिती केली जाते.

कोयना जलविद्युत प्रकल्प महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी आहे. या लक्ष्मीचे कथास्तोत्र उषा तांबे यांनी 'कहाणी कोयनेची' या पुस्तकातून अतिशय साध्या, सोप्या व समर्पक मराठी भाषेत सांगितली आहे. प्रकल्प निर्मितीसाठी अपार परिश्रम, निष्ठा, हातोटी, कसोटी लागते. प्रकल्पाची संकल्पना, योजना, आखणी, सर्वेक्षण याचा एतिहासिक मागोवा घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय, सामाजिक, अभियांत्रिकी औद्योगिक, आर्थिक क्षेत्रातील अनेकांची तपश्चर्या पुस्तकरूपाने प्रकाशात आणली नि कोयना प्रकल्प निर्मितीचा आनंद सर्वांपर्यंत पोचविला. बांधकामाची तांत्रिक पद्धत किचकट असते. त्यातून कोयना प्रकल्पाच्या बांधकामात बोगद्याचे काम प्रचंड प्रमाणात असल्याने अधिकच क्लिष्ट होती, तरीही अभियंत्यांनी अनेक संकटांना सामोरे जात प्रकल्प यशस्वी केला. भूगर्भ; तसेच भूपृष्ठ सर्वेक्षण, आखणी, बांधणी, बोगद्याचे खोदाईकाम आदी बांधकामांची माहिती हे तपशील अत्यंत सुबोध भाषेत वर्णन केले आहेत.

ऊर्जाविषयाची मूलतत्त्वे देऊन वीज-ऊर्जेची ओळख, औष्णिक वीज व जलविद्युत यांचे सैद्धांतिक आर्थिक मुदद्यांसह तौलनिक विश्लेषण केले आहे. वीज वितरण व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करताना वीजबचतीचा उल्लेख केला आहे. कोयना प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यातील जलाशयविधन (सेक टॅपिंग) या अभिनव धाडसी प्रयत्नातील नाटय व थरार सांगून या शाआरधयगाथेच्या मानकरी अभियंत्यांचा गौरव केला आहे. विस्थापितांचे पुनर्वसन हा आजही एएरणीवर असलेला प्रश्न, भूसंपादन, जंगलनाश, पर्यावरण, नुकसानभरपाई, रोजगार, शेती, रस्ते, शाळा, आरोग्य, कौटुंबिक-सामाजिक-सांस्कृतिक जीवन, मानसिकता आदी बाबींचे वर्णन शासनास व समाजास मार्गदर्शन करणारे आहे. रक्षण निसर्गाचे का माणसाचे, असा प्रश्न उपस्थित करून धरणामुळे निसर्गाचा असमतोल होत नाही हे जागतिक अनुभवांनी स्पष्ट केले आहे. कोयना भूकंप संकटांची कथा सांगताना प्राणहानी, वित्तहानी, लोकांचे पुनर्वसन, धरण मजबुती बांधकाम आदी माहिती दिली आहे. धरणामुळे भूकंप होत नाही ही तज्ज्ञांची ग्वाही स्पष्ट केली आहे.

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात नदी प्रकल्पांमध्ये अनेक ठिकाणी धरणे, जलाशयांचे बांधकाम आणि कालवे बांधणे समाविष्ट आहे आणि ह्यामुळे बहुसंख्य समुदायांमध्ये मोठ्या

प्रमाणावर उलथापालथ होऊन त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक असते. परिमाणे, आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर विस्थापन महत्वाचे आहे. सर्व पैलू मानवी जीवनाचा अंतर्निहित भाग आहेत आणि ते आहेत ओव्हरलाप्ड सीमारेषसह समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, विविध त्रास सहन करावा लागतात ज्यामुळे प्रभावित झाले. लोक आणि विविध निषेध आंदोलने, आणि त्यांना दडपण्याची पद्धतींची तपासणी केली जाते. केंद्रीत माइल व्हॅली प्रोजेक्ट, तेहरी धरण, कोएल करो प्रोजेक्ट सारख्या मोठ्या प्रमाणावरील प्रकल्पांवरील हालचाली. वापर कायदा १९२३, द ऑफिशियल प्रोसीक्चर कोड १९७३, द टेररिस्ट अँड डिस्ट्रिक्टेक्ट एक्टिविटी (प्रिव्रेनन) एक्ट (टाडा), प्रिव्हेंशन ऑफ आतंकिस्ट एक्टिविटीज एक्ट (पोटा) और काही सिंचन कायदे निषेध चळवळी दडपणे मध्ये ठळकपणे आहे. विसाव्या शतकातील सर्वात प्रभावी विकासाचे मॉडेल म्हणजे जल संपदा वाढविण्यासाठी भारतातील समाजवादी तत्त्वज्ञान देखील आहे एक महत्त्वाची भूमिका बजावली विसाव्या शतकातील सर्वात प्रभावी विकासाचे मॉडेल हे औद्योगिक विकास आहे. जलसंपदा वाढवण्यासाठी बांध, धरणासह मोठ्या आणि मोठ्या प्रकल्पांशी अनिश्चिततेने जोडलेले होते. मोठ्या प्रमाणात बांधकाम, ज्यात जमिनीचा अधिग्रहण आणि ज्यामुळे विस्थापन होण्याची शक्यता असते, ती एक म्हणून पाहिली जात होती विकासासाठी आवश्यक विस्तार आणि प्रकल्पाच्या समीक्षकांना केवळ प्रकल्पविरोधी आणि विरोधी विकासासाठी असे म्हटले जाणार नाही, परंतु निषेध मोर्चेसारख्या राष्ट्रीय आणि लोकशाही कार्यास सार्वजनिक ऑर्डर समस्येच्या स्वरुपात देखील वागवले जात असे.

भारताच्या पहिल्या प्रमुख नदी–दरीचा पायाभरणीचा कार्यक्रम ओरिसातील हिराकुड प्रकल्पाचे उद्घाटन करताना पंडित नेहरू म्हणाले होते की जर तुम्हाला दुःख सहन करावे लागले तर देशाचे हित जपावे. ३० ऑगस्ट १९८४ रोजी बाबा आमटे यांना लिहिलेल्या पत्रात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी म्हटले होते, विकास प्रकल्पामुळे प्रकल्प ग्रस्तांना त्यांच्या निवासस्थानापासून वेगळे करावे लागते. प्रभावित लोकसंख्येचे योग्यरित्या पूनर्वसन करणे शक्य होत नाही परंतु ते योग्य व्हावे याची काळजी प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. परंतु काही वेळा पर्याय नसतो या सर्वांतून आपल्याला पुढे जायचे आहे. यामध्ये एक महत्त्वाचे तत्व

आहे की, कमीत कमी नुकसार व जास्तीत जास्त लोकांना फायदा मिळावा. व्यक्तिगत हितापेक्षा सार्वजनिक हित विचारात घेणे अधिक आवश्यक आहे.

**४.२ अभ्यासक्षेत्रातील विकास प्रकल्प (कुकडी प्रकल्प) :–**

पुणे जिल्ह्यामध्ये येडगाव, माणिकडोह, डिंभे, वडज आणि पिंपळगाव जोगे ह्या पाच धरणांचा कुकडी प्रकल्प आहे. भिमा व कृष्णा ह्याच्या उपनद्यांचा ह्या मध्ये समावेश आहे. तसेच कॅनॉल सिस्टीम सुद्धा उपलब्ध आहे. ह्या प्रकल्पामुळे पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील एकूण १५६२७८ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली आहे. त्याच प्रमाणे डिंभे धरणावर ५ मेगावॅट व माणिकडोह धरणावर ६ मेगावॅट क्षमतेची विद्युत निर्मिती यंत्रणा उभारलेली आहे. ह्या प्रकल्पासाठी नियोजन, आयोगाने अंदाजीत रक्कम रूपये १७.९० कोटी रुपयांची मंजूरी ऑक्टोबर १९६८ मध्ये दिलेली होती.

१९९९–२००० च्या एस.ओ.आर.नुसार प्रकल्पाची शेवटच्या काळातील किंमत १४३०.७८ करोड रुपये होती. हा प्रकल्प १९६९साली सुरू होऊन २००८–०९सालात पूर्णत्वास आला. कुकडी प्रकल्पांतर्गत असणाऱ्या धरणांची माहिती–

१. येडगाव धरण– हे धरण कुकडी नदीवर, येडगाव, ता. जुन्नर (Impound 93.436) जिल्हा पुणे ह्या गावाजवळ बांधण्यात आले.
२. माणिक डोह धरण– हे धरण कुकडी नदीवर माणिक डोह (Impound 307.91) ह्या गावाजवळ ता. जुन्नर जि. पुणे येथे बांधण्यात आले.
३. वडज धरण– वडज धरण हे मीना नदीवर वडज ह्या गावाजवळ बांधण्यात आले, ह्या धरणाचे वैशिष्ट म्हणजे हे धरण मातीचे बांधलेले आहे. (Impound 35.94 mcum)
४. डिंभे धरण– हे धरण घोड नदीवर डिंभे गावाजवळ बांधण्यात आले. (Impound 387.06 Mcum of Water)
५. पिंपळगाव जोगे धरण– हे धरण मातीचे असून आर नदीवर पिंपळगाव जोगे गावानजीक बांधण्यात आलेले आहे. (Impound 217.91 Mcum of Water)

### ४.२.१ डिंभे धरण प्रकल्प

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातून वाहनारी घोडनदीवर डिंभे गावाजवळ डिंभे धरण प्रकल्प १९७६ मध्ये सुरू करण्यात आला. मध्यम पाटबंधारे क्षमतेचे हे धरण असून एकूण १३ टीएमसी क्षमता आहे. या धरण प्रकल्पामुळे एकूण २४ गावे बाधित झाली आहेत. यामध्ये ११ गावे बुडीत पाणलोट क्षेत्रात आलेली असून एकूण बिगर खातेदार २२८ आणि खातेदार ७५५ असे एकूण ९८३ कुटुंबे बुडीत क्षेत्रात समाविष्ट होती. बाधित गावांसह एकूण १२३६ खातेदार बाधित झालेले आहेत. बाधित क्षेत्र २२०२ हेक्टर असून लाभ क्षेत्र आंबेगाव तालुका १४६८.५५ हेक्टर आणि पारनेर तालुका ४२३.१४ हेक्टर क्षेत्र लाभ क्षेत्रात आलेले आहे. शासकीय आकडेवारीनुसार ६३१ खातेदारांना जमिन वाटप केलेली असून ती ६८५.३१ हेक्टर दर्शविण्यात आलेली आहे. २२८ बिगर खातेदारांना जमिन वाटप करण्यात आलेली नाही. २५३ खातेदारांना जमिन वाटप बाकी असल्याचे दिसून येते.

या धरणाला डिंभे डावा तर कालवा आणि डिंभे उजवा कालवा असे कालवे असून डाव्या हा कालंवा डिंभे धरणातून सुरू झालेला असून ह्या कालव्यामुळे २६३ हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे. तर डिंभे उजवा कालवा हा कालवा डाव्या तर कालव्या सोबत २७५ कि.मी. पर्यंत जावून तेथून पुढे ११६ कि.मी. पर्यंत गेलेला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ह्या कालव्याअंतर्गत अंदाजे १४५४९ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली आहे. एकूण १ ते ९९ कि.मी. पर्यंत कालव्याचे काम पूर्ण झालेले असून आता पर्यंत एकूण ८० कि.मी. पर्यंत कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आलेले आहे.

या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करताना मोठ्या प्रमाणावर त्रुटी राहिलेल्या आहेत. पुनर्वसन झाल्यानंतर या नागरी सुविधांचा अभाव म्हणजेच, या पुनर्वसन आदिवासींची शासनाने हेळसांड केलेली आहे. या नागरिकांना जमिनी मिळाल्या. परंतु त्या जमिनी घरापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावरील चास, महाळुंगे पडवळ, नांदुर, चांडोली, कळंब, एकलहरे, सुलतानपुर येथे तर घर एकीकडे तर जमिन दुसरीकडे अशी अवस्था या नागरिकांची झाली आहे. एवढे होऊनही जमिन खडकाळ व मूळ मालकांच्या अडवणुकीमुळे या

धरणग्रस्तांची अवस्था 'आगीतून फुपाट्यात' पडल्यासारखी झाली आहे. या जमिनींना पाणी नसल्यामुळे धरणग्रस्तांची शेती पावसावरच अवलंबून आहे. मूळ जमिन मालकांचे धरणग्रस्तांना मिळालेल्या जमिनीत दगड टाकणे, ताळी फोडणे, नांगरट करताना अतिक्रमण करणे इत्यादी समस्यांमुळे धरणग्रस्त शेतकरी हैराण झालेले आहेत. पैशाअभावी या मालकांच्या विरोधात न्यायालयात जाणे परवडत नसल्याने विस्थापित कुटुंब अडचणीत आहेत.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. ५.२.१९९६ नुसार महाराष्ट्र संयुक्त पाटबंधारे प्रकल्प अंतर्गत विभागाने कुकडी, कृष्णा, भिमा–उजनी, माजलगांव व अप्पर पैनगंगा प्रकल्पांच्या कालव्याची कामे जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हाती घेतली होती. पाटबंधारे विभागाने १९९३ मध्ये जागतिक बँकेबरोबर याबाबत करार केला आहे. या कराराच्या अटींमध्ये उपरोक्त पाच प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन हे पुनर्वसन कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी करण्यात आलेले असल्याने त्यांच्या सद्यस्थितीची पाहणी सल्लागारांकडून सामाजिक–आर्थिक सर्वेक्षणाद्वारे करून घेण्यात आलेली आहे. या सर्वेक्षणामध्ये पुनर्वसित कुटुंबांचे जीवनमान उंचावण्यास वाव असून यासाठी विशेष योजना हाती घेणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे. सामाजिक–आर्थिक सर्वेक्षणांनी या प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान उंचावण्यासाठी पुढील ४ प्रवर्गांमध्ये या आर्थिक पुनर्वसनाच्या कृती योजना अंमलात आणावयाच्या होत्या.

१. प्रकल्पबाधितांना शेतजमिनीसाठी विहिरीसाठी अथवा उपसा जलसिंचनाद्वारे पाटबंधाऱ्याच्या सोयी उपलब्ध करून देणे.
२. प्रकल्पबाधितांच्या घरांच्या मजबूतीकरणासाठी/दुरुस्तीसाठी सहाय्य करणे.
३. प्रकल्पबाधितांना त्यांच्या गुणकौशल्यानुसार व स्थानिक परिस्थितीप्रमाणे उत्पन्नाची साधने निर्माण करणे.
४. पुनर्वसित वसाहतीमध्ये अपुऱ्या नागरी सुविधांची कामे पूर्ण करणे.

प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले आहे की, या प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन पुनर्वसन कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी

करण्यात आले आहे. त्यामुळे पुनर्वसित गावठाणात प्रचलित कायद्यानुसार देय असलेल्या पुढील १३ नागरी सुविधां पैकी काही सुविधा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

- **डिंभे डावा तर कालवा–**

हा कालवा डिंभे धरणातून सुरू झालेला असून ह्या कालव्यामुळे २६३ हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे.

- **डिंभे उजवा कालवा–**

हा कालवा डाव्या तर कालव्या सोबत २७५ कि.मी. पर्यंत जावून तेथून पुढे ११६ कि.मी. पर्यंत गेलेला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ह्या कालव्याअंतर्गत अंदाजे १४५४९ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली आहे. एकूण १ ते ९९ कि.मी. पर्यंत कालव्याचे काम पूर्ण झालेले असून आता पर्यंत एकूण ८० कि.मी. पर्यंत कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आलेले आहे.

- **घोड शाखा कालवा**

हा कालवा डिंभे डावा तर कालव्याचीच शाखा आहे. ह्या कालव्याद्वारे अंदाजे ४३३० हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली आहे. हा कालवा ४१.६ किमी लांबीचा आहे.

- **कुकडी डावा कालवा–**

हा कालवा येडगाव धरणातून सुरू होऊन त्याच्या चिल्हेवाडी व पोंदेवाडी ह्या दोन उपशाखा आहेत ह्या मुळे सिना खोऱ्यातील ६७,३५५ हेक्टर जमीन ओलीताखाली आली. तसेच हा कालवा २४९ कि.मी. पर्यंत लांबीचा आहे.

### ४.२.२ पिंपळगाव जोगे धरण प्रकल्प

- **पिंपळगाव जोगे धरण :–**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात आर नदीवर बांधण्यात आलेले मातीचे धरण. पिंपळगाव जोगे हे धरण १९९९ साली पूर्ण झाले. या धरणाची उंची २८.६ मीटर आणि १५६० मीटर लांबी आहे. मुख्यत्वे सिंचनासाठी हे धरण बांधण्यात आलेले असून त्याची क्षमता ७

टीएमसी आहे. या धरणामुळे एकूण ११ गावे बाधित झाली आहेत. हे धरण कुकडी प्रकल्पातील ५ धरणापैकी एक आहे. कुकडी प्रकल्पासाठी जागतिक बँकेने अर्थसहाय्य केलेले होते. धरणाचा डावा तट कालवा मुख्य धरणातून निघतो आणि त्याद्वारे १२३७५ हेक्टर जमिनीला सिंचनासाठी पाणी पुरविले जाते. उरलेले पाणी पिंपळगाव धरण क्षेत्राच्या खाली असलेल्या येडगाव धरणाच्या लाभ क्षेत्रासाठी सोडण्यात येते.

पिंपळगाव जोगे धरण क्षेत्रात भोईरवाडी, सांगणोरे, कोल्हेवाडी–१ व २, खिरेश्वर, कोळवाडी, पांगरी, वाटखळ, सितेवाडी, करंजाळे, खुबी आणि मढ अशी मुख्य ११ गावे आणि या गावांची मिळून एकूण २६ वाड्या आहेत. या सर्वांची एकत्रित कुटुंब संख्या  २०६३ इतकी आहे. तर एकूण ५४५२ पुरुष आणि ५४०३ स्त्रिया असे एकूण १०८५५ लोकसंख्या या प्रकल्पामुळे बाधित झालेली आहेत. धरण परिसरामध्ये जवळपास कोणतेही छोटे किंवा मोठे कारखाने उपलब्ध नाहीत. ह्या परिसरातील कुटुंबे ही मुख्यत्वे करून शेतमजूरीवर अवलंबून आहेत. सध्या ह्या परिसरातील कुटुंबे जवळपासच्या २५ ते ३५ कि.मी. अंतरावरील लाभक्षेत्रातील गावांवर शेतमजूरीसाठी अवलंबून आहेत. परंतु ही शेतमजूरी हंगामी स्वरूपाची असल्याने मर्यादीत काळासाठीच रोजगार येथे उपलब्ध होतो. कुटुंबातील व्यक्ती दिवसभर रोजगारानिमित्त बाहेर असल्यामुळे मुलांचा सांभाळ, आहार व शिक्षण याकडे दुर्लक्ष होते. जवळपास १८ कि.मी. पाण्याचा साठा उपलब्ध असतांना सिंचन सुविधा नसल्यामुळे शिल्लक असलेल्या शेतीला पाणी पुरवठा करता येत नाही. त्यामुळे शेतीमध्ये वर्षातून एकदाच पावसाळी हंगामातील पिके घेतली जातात. प्रकल्प ग्रस्तांच्या शिल्लक जमिनी ह्या डोंगर उतारावरील आहेत त्याचबरोबर ह्या जमिनी खडकाळ आहेत. जमिनीखालील दगडाचा प्रकार हा टणक असल्यामुळे येथे विहिरी किंवा सिंचन विहिरींना पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे एका पिकावरच समाधान मानावे लागते आणि उर्वरित काळात शेतमजूरी शोधल्याशिवाय येथील कुटुंबे उपजीविका करू शकत नाहीत.

पिंपळगाव जोगे धरणाचे चार गावे ही अतिशय दूर्गम भागात आहेत एका बाजूला पाणी तर दुसऱ्या बाजूला डोंगर अशा स्थितीत ही लोक राहतात. भाग दूर्गम असल्यामुळे शासकीय

सोयी, शासकीय अधिकारी ह्या भागाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. तसेच शासनाच्या विविध योजना ही या कुटुंबांपर्यत पोहचत नाहीत. रस्ते व दळणवळणाच्या सुविधा नसल्यामुळे या परिसरातील सामाजिक–आर्थिक विकासावर परिणाम झालेला दिसून येतो. पिंपळगाव जोगेधरणामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबापैकी ७५% टक्के आदिवासी कुटुंबे आहेत. ९ % कुटुंबे ही अनुसूचित जातीची आहेत. ह्या विभागामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीचा प्रभाव असल्यामुळे कुटुंबातील व्यक्तिंची संख्या जास्त आहे. ही कुटुंबे अतिशय गरिब असून विस्थापनामुळे विस्थापित कुटुंबियांच्या जीवनामध्ये आर्थिक व सामाजिक प्रकारचे प्रश्न मोठ्याप्रमाणावर निर्माण झालेले आहेत. यामध्ये भूमिहिनता, बेरोजगारी, अन्न सुरक्षा, आरोग्य व स्वच्छतेचा आभाव याचा समावेश होतो.

### ४.३ विकास प्रकल्प आणि आदिवासी समाज

संशोधकाने निवडलेल्या अभ्यास विषयातील दोन्हीही धरणे सह्याद्रीच्या विभागात आहेत व ह्या धरणामध्ये आदिवासी कुटुंबांचे विस्थापन झालेले आहे. धरण बांधकामात आदिवासींचे महत्त्वाचे योगदान आहे. विस्थापनानंतर आदिवासीच्या सांस्कृतिक प्रश्न मोठ्या प्रमाणात सहन करावे लागतात. त्यामुळेच आदिवासींबद्दलची माहिती पुढे देणे संयुक्तीक ठरते. आधी महाराष्ट्रातले आदिवासी नेमके किती आणि कुठे आहेत, तसेच आज ते कुठल्या परिस्थिती जगत आहेत हे आपण समजून घेऊ.

महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत. यापैकी २०११ च्या जनगणनेनुसार भिल्ल, गोंड, महादेव कोळी, वारली, कोकणा आणि ठाकूर यांची एकत्रित संख्या महाराष्ट्रातील एकुण आदिवासींच्या ७३.३% एवढी आहे. भिल्लांची संख्या सर्वात जास्त, म्हणजे (२१.२%), त्यानंतर गोंड (१८.१%), महादेव कोळी (१४.३%), वारली (७.३%), कोकणा (६.७%) आणि ठाकूर (५.७%) अशी लोकसंख्येची विभागणी आहे. महाराष्ट्रात एकुण १९ आदिवासी जमाती अशा आहेत ज्यांची संख्या १००० पेक्षाही कमी आहे. महाराष्ट्रातील तीन आदिवासी जमाती या आदिम जमाती (Primitive Tribes) म्हणून भारत सरकारने जाहीर केल्या आहेत. यामध्ये कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (ठाणे आणि रायगड जिल्हा) आणि माडिया गोंड

(गडचिरोली जिल्हा) या जमातींचा समावेश आहे. भारताच्या जवळ जवळ प्रत्येक राज्यात आदिवासी राहतात. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८७% एवढी म्हणजे १ कोटी ५ लाख एवढी आहे . देशाच्या आदिवासी लोकसंख्येच्या ५.१% आदिवासी हे महाराष्ट्रात आहेत. आदिवासी लोकसंख्यच्या बाबतीत पूर्वेकडील राज्ये सोडल्यास महाराष्ट्र हे मध्यप्रदेश पाठोपाठ दुसऱ्या नंबरचे राज्य आहे.

सारणी क्र. ४.२

भारतातील राज्यनिहाय आदिवासींची लोकसंख्या आणि तिची टक्केवारी

**आदिवासींची राज्य निहाय्य लोकसंख्या (%)**

| क्र. | राज्य | २०११ | | २००१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लोकसंख्या | लोकसंख्या | लोकसंख्या | लोकसंख्या |
| **१** | **भारत** | **८.६** | **१०४२८१०३४** | **८.२** | **८४३२६२४०** |
| २ | जम्मु आणि काश्मिर | ११.९ | १४९३२९९ | १०.९ | ११०५९७९ |
| ३ | हिमाचल प्रदेश | ५.७ | ३९२१२६ | ४ | २४४५८७ |
| ४ | पंजाब | ० | ० | ० | ० |
| ५ | चंदीगड | ० | ० | ० | ० |
| ६ | उत्तराखंड | २.९ | २९१९०३ | ३ | २५६१२९ |
| ७ | हरीयाणा | ० | २८ | ० | ० |
| ८ | दिल्ली | ० | ० | ० | ० |
| ९ | राजस्थान | १३.५ | ९२३८५३४ | १२.६ | ७०९७७०६ |
| १० | उत्तरप्रदेश | ०.६ | ११३४२७३ | ०.१ | १०७९६३ |
| ११ | बिहार | १.३ | १३३६५७३ | ०.९ | ७५८३५१ |
| १२ | सिक्कीम | ३३.८ | २०६३६० | २०.६ | १११४०५ |
| १३ | अरुणाचल प्रदेश | ६८.८ | ९५१८२१ | ६४.२ | ७०५१५८ |
| १४ | नागालँड | ८६.५ | १७१०९७३ | ८९.१ | १७७४०२६ |
| १५ | मनिपूर | ३५.१ | ९०२७४० | ३४.२ | ७४११४१ |
| १६ | मिझोराम | ९४.४ | १०३६११५ | ९४.५ | ८३९३१० |
| १७ | त्रिपुरा | ३१.८ | ११६६८१३ | ३१.१ | ९९३४२६ |
| १८ | मेघालया | ८६.१ | २५५५८६१ | ८५.९ | १९९२८६२ |
| १९ | आसाम | १२.४ | ३८८४३७१ | १२.४ | ३३०८५७० |
| २० | पश्चिम बंगाल | ५.८ | ५२९६९५३ | ५.५ | ४४०६७९४ |
| २१ | झारखंड | २६.२ | ८६४५०४२ | २६.३ | ७०८७०६८ |
| २२ | ओरिसा | २२.८ | ९५९०७५६ | २२.१ | ८१४५०८१ |
| २३ | छत्तीसगड | ३०.६ | ७८२२९०२ | ३१.८ | ६६१६५९६ |
| २४ | मध्यप्रदेश | २१.१ | १५३१६७८४ | २०.३ | १२२३३४७४ |

| क्र. | राज्य | २०११ | | २००१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लोकसंख्या | लोकसंख्या | लोकसंख्या | लोकसंख्या |
| २५ | गुजरात | १४.८ | ८९१७१७४ | १४.८ | ७४८११६० |
| २६ | दमण आणि दीव | ६.३ | १५३६३ | ८.८ | १३९९७ |
| २७ | दादरा आणि नगर हवेली | ५२ | १७८५६४ | ६२.२ | १३७२२५ |
| २८ | महाराष्ट्र | ८.८७ | १०५१०२१३ | ८.९ | ८५७७२७६ |
| २९ | आंध्र प्रदेश | ७ | ५९१८०७३ | ६.६ | ५०२४१०४ |
| ३० | कर्नाटक | ७ | ४२४८९८७ | ६.६ | ३४६३९८६ |
| ३१ | गोवा | १०.२ | १४९२७५ | ० | ५६६ |
| ३२ | लक्षद्विप | ९४.८ | ६१११२० | ९४.५ | ५७३२१ |
| ३३ | केरळ | १.५ | ४८४८३९ | १.१ | ३६४१८९ |
| ३४ | तामिळनाडू | १.१ | ७९४६९७ | १ | ६५१३२१ |
| ३५ | पुडूचेरी | ० | ० | ० | ० |
| ३६ | अंदमान व निकोबार बेटे | ७.५ | २८५३० | ८.३ | २९४६९ |

राज्यातील फक्त सुमारे १५ लाख आदिवासी शहरी भागात वास्तव्यास आहेत ४. त्यामुळे ९० लाख आदिवासी हे ग्रामीण तसेच जंगलांमधे आजही राहात आहेत. महाराष्ट्रात मुख्यत: चौदा जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य आहे. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड, नागपुर, गोंदिया, भंडारा आणि अमरावती (गोंडवाना विभाग) हे जिल्हे, तर खानदेशातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पुणे, ठाणे आणि रायगड (सह्याद्री विभाग) हे जिल्हे मुख्यत: आदिवासी जिल्हे म्हणूनच ओळखले जातात.

**आदिवासी म्हणजे काय** एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात. या व्याख्येवरुन आदिवासी समाजाची लक्षणे स्पष्ट होतात. विशिष्ट भूप्रदेश, समान बोलीभाषा पण लिपी नाही, निसर्गावर अवलंबून असलेली अशी वेगळी जीवनपद्धती, साधी अर्थव्यवस्था, सामाजिक एकजिनसीपणा इत्यादी वैशिष्ट्यांनीच या समाजाचे वेगळेपण नजरेत भरते.

- **आदिवासींच्या समस्या**

आदिवासींना त्यांचं स्वत:चं एक अस्तित्व आहे, हे मुळात महाराष्ट्रातील जनतेने मान्य करायला हवं. आजही आदिवासींमधे चांगल्या प्रथा आहेत. सामुहिक जीवनपद्धती, सामुहिक

निर्णय, आवश्यक तेवढेच पिकवणे, जंगलाचे संरक्षण करणे, अशा एक ना अनेक गोष्टी आदिवासींकडून शिकण्यासारख्या आहेत. त्यातून आपल्याला बरेच शिकण्याजोगे आहे, त्या तशाच पुढे आल्या पाहिजेत. आदिवासी समाजाने निसर्गाच्या विरुद्ध कधी पाऊल टाकले नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणे आदिवासी आपले जीवन जगत असतो. म्हणून इतरांनीही निसर्गाला समजून घेणे आवश्यक आहे. आदिवासींनी खऱ्या अथाने जंगलाचे रक्षण केले. समतोल राखण्याचे काम केले. आदिवासींना जंगलाचे, वनस्पतींच्या वापराबद्दलचे ज्ञान आहे, ते जतन करावयास हवे. त्यांचे सण, उत्सव, वेगवेगळे विधी हे निसर्गाला कोणतीही हानी न करता साजरे केले जातात. गोंगाट, वारेमाप खर्च, इतरांना त्रास होईल असा कोणताच सण, उत्सव किंवा विधी आदिवासींमधे नाही. तरीही आजचा आदिवासी चूकीच्या आणि अपूऱ्या विकास नियोजनांमुळे अनेक समस्यांनी ग्रस्त आहे.

- **जंगल संरक्षण कायद्यांच्या आडून आदिवासींची पिळवणूक**

जंगल आणि जंगलातील प्राण्यांचे संरक्षण करण्याच्या निमित्ताने इंग्रजांनी जंगल कायदा बनविला. यामुळे जंगलावरील आदिवासींचा हक्क आपोआपच हिरावला गेला. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे आदिवासींबाबतचे धोरण हे आदिवासींना आहे त्या स्थितीत ठेवण्याचेच होते. आदिवासींवर हुकुमत गाजवणे तसे त्यांनाही अवघड होते. आदिवासींचे दूर्गम भागातील वास्तव्य हे एक त्यामागील कारण होते. आदिवासींनी इंग्रजांना त्यांच्या इलाक्यात वा जंगलात यायला प्रतिबंध केल्याची उदाहरणे पहायला मिळतात. आदिवासींनी इंग्रजांच्या विरोधात बंड केल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळेच आदिवासींमध्ये राजकीय जागृती होऊ न देणे, ते एकत्र येणार नाहीत याची इंग्रजांनी 'कायदेशीर' तरतूद केली. १८६४ सालचा जंगल संरक्षण कायदा हा त्यासाठीच आणला. जंगल संरक्षण करण्याच्या बहाण्याने इंग्रजांनी मग जंगलावरच आक्रमण करायला सुरुवात केली. अक्षरशः जंगलाची लूट केली.

या जंगलसंरक्षण कायद्याच्या अतिरेकी धोरणामुळे आदिवासींना त्यांच्या पारंपारिक अशा अनेक हक्कांना मुकावे लागले. सुरुवातीस आदिवासी गावाची सामुदायिक असणारी जमिन वैयक्तिक करण्यावर इंग्रजांनी सुरुवात केली. फूट पाडून त्यांचे जंगल आणि जमिन ही

उदर्निर्वाहाची साधने व्यापारी वृत्तीच्या लोकांनी बळकावली. त्यांच्या निरक्षरतेचा, अज्ञानाचा, दुबळेपाणाचा फायदा सावकार, कंत्राटदार, दलाल यांनी घेतला. कायद्यांमुळे व्यापारी वृत्तीच्या आधूनिक अर्थव्यवस्थेत ते खेचले जाऊन अनेक समस्यांच्या फेऱ्यात ते अडकले. त्याचा परिणाम आत्यंतिक दारिद्र्य, वेठबिगारी, स्थलांतर, कुपोषण आणि बालमृत्यू असे अनेक आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. त्यांच्या आयुष्यात गुंतागुंत वाढली.

आदिवासींच्या दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतरही जंगल कायद्यामधे त्यांना हवी ती सुधारणा झाली नाही. आदिवासींचा राज्यकर्त्यांनीही फारसा विचार केला नाही. धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग न घेता धोरणांची अंमलबजावणी करण्याचे शासनाने एकांगीपणे निर्णय घेतले. त्यांना नको असलेल्या 'मुख्य प्रवाहात' आणण्यासाठी, त्यांची जीवनपद्धती विचारात न घेता 'कल्याणकारी' योजनांची त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. यातील बहुतांशी योजना या वैयक्तिक लाभाच्या असल्याने त्यांच्या सामुहिक जीवन प्रक्रियेलाच तडे जाऊ लागले. याचा परिणाम म्हणून आजही या समस्या स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतर तशाच आहेत.

- **विस्थापन**

जगात मोठी धरणं बांधण्यामधे भारत हे सर्वात मोठे राष्ट्र आहे. आजमितीला भारतात एकुण ४२९१ एवढी मोठी धरणे आहेत. यापैकी आत्तापर्यंत ३५९६ बांधून पुर्ण आहेत तर ६९५ धरणांचे काम चालू आहे ६. भारतातील ६ ते ६.५ कोटी लोक हे विकासासाठीच्या मोठ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झाले आहेत. सरासरी दरवर्षी १० लाख भारतीय विस्थापित होत आहेत. आपल्या देशाच्या विकासासाठी सर्वात जास्त कोणी किंमत चुकवली असेल तर ती आदिवासींनी. कारण ९० टक्के कोळशाच्या खाणी आणि अंदाजे ५० टक्के इतर खनिजांच्या खाणी या आदिवासी राहात असलेल्या पट्ट्यांमधे आहेत. त्याशिवाय जंगले आणि त्या आधारित वनौत्पादने (उदा. लाकूड, औषधी वनस्पती, इ.) ही संसाधने सुद्धा आदिवासी रहात असलेल्या भागातच आहेत. ज्या आदिवासींची संख्या देशाच्या तुलनेत ९% एवढी आहे, तरीसुद्धा एकूण विस्थापितांपैकी ५५% हे आदिवासी आहेत. ही आकडेवारी १९९० पर्यंतचीच आहे. म्हणजे मुक्त आर्थिक धोरण स्विकारण्यापूर्वीची. १९९० नंतर म्हणजे मुक्त आर्थिक धोरण आल्यानंतर

अजूनच आदिवासी विस्थापितांची संख्या वाढली. भारतात दोन कोटीपेक्षाही जास्त आदिवासी (२००४–०५ पर्यंत) विस्थापित झाले आहेत. बरं, यामुळे आत्तापर्यंत आदिवासींना किती फायदा मिळाला? तर काहीच नाही. १९९३–९४ साली ५१.९% आदिवासी हे दारिद्रय रेषेखाली होते. दहा वर्षानंतर (२००४–०५) त्यात फक्त ४.६ टक्यांनीच घट होऊन हे प्रमाण ४७.३ % एवढे झाले (एकुण दारिद्रय रेषेखालील घट ही ३७ % ते २७ % अशी आहे). मुक्त आर्थिक धोरणाचा आदिवासींना किती फायदा झाला? हे यावरुनच समजते.

सारणी क्र. ४.३

**१९५१ ते १९९० या दरम्यान भारतातील आदिवासी विस्थापनाचे आकडे (लाखात)**

| अ.नं. | प्रकल्पाचा प्रकार | एकूण पुर्नवसित आणि त्यांची टक्केवारी | एकूण आदिवासी पुर्नवसन आणि त्यांची टक्केवारी | एकूण पुर्नवसनापैकी आदिवासी पुर्नवसनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | धरणे | १६४.० (२५.०%) | ६३.२ (२५.०%) | ३८.५ |
| २ | खाणी | २५.५ (२५.५%) | १३.३ (२४.८%) | २५.० |
| ३ | औद्योगिक वसाहती | १२.५ (३०.०%) | ३.१ (२५.६%) | २५.० |
| ४ | व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये, इ. | ६.० (२०.८%) | ४.५ (२२.२%) | ७५.० |
| ५ | इतर | ५.० (३०.०%) | १.३ (२०.०%) | २५.० |

आदिवासींच्या जबरदस्तीच्या पुर्नवसनामुळे त्यांची पारंपारिक सामुहिक जगण्याची पद्धत मोडीत निघते. त्यांचे सांस्कृतिक जीवन उध्वस्त होते. विकासाचे लाभार्थी होण्याएवजी ते विकासाचे बळी झालेलेच दिसतात. वर्षानुवर्षे प्रकल्पांचे काम रखडल्याने आदिवासींचे पुर्नवसनही अनेक प्रकल्पांमध्ये धोक्यात आले आहे. उदा. डिंभे धरणामुळे आदिवासींचे झालेले विस्थापन.

**चौकट क्र. १** – महाराष्ट्रातील डिंभे आणि पिंपळगाव जोग या धरणांच्या बाबतीत 'आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे' यांनी केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष असे मिळतात (२००२)

- आदिवासी कुटूंबाच्या आर्थिक विकासात कमालीची घसरण झाली.
- ५४ टक्के आदिवासी कुटूंबांना प्रत्यक्ष लाभक्षेत्रात जमीन न मिळाल्याने प्रकल्पाचा फायदा झाला नाही.

- ५७ टक्के आदिवासी कुटूंबांना जमीनीच्या बदल्यात जमीन मिळाली नाही.
- पाळीव प्राण्यांचे प्रमाण ८२ टक्यांनी घसरले (६५२० पाळीव प्राणी पुर्नवसनाआधी ते १२२० पाळीव प्राणी पुर्नवसनानंतर).
- पुर्नवसित गावांमधे शाळा, रस्ते बांधले पण बाजार, दवाखाने, स्मशानभूमी अशा सोयी गावांमधे उपलब्ध नव्हत्या. पुर्वीपेक्षा गावांपासूनचे त्यांचे अंतर वाढले होते.
- **स्थलांतर**

बाजारू शेतीच्या एकूणच अयोग्य नियोजनामुळं आदिवासींचं जगणंच अवघड होऊन गेलं. त्यातूनच मग भूकबळी, कुपोषणासारखी परिस्थीती निर्माण झाली. पैसा मिळवणे ही मुख्य गरज निर्माण झाली. रोजगार हमी योजनेसारख्या माध्यमातून ती गरज भागणे शक्य होते. पण शासनाच्या अंमलबजावणीतील फोलपणामुळे लोकांना त्याचा फायदा झालाच नाही. आदिवासींना मात्र त्यामुळे कामासाठी वणवण करावी लागली.

बांधकाम, शेती यासाठी सर्वात स्वस्त मजूर कोण असेल तर तो आदिवासी. त्याला शोधायची गरज नाही. एखादा एजंट गावात पाठवायचा, थोडीशी रक्कम लोकांना उचल म्हणून द्यायची आणि मेंढर कोंबल्यागत गाडीत घालून हवं तिथ घेऊन जायचं. शक्यतो रात्रीचा प्रवास करायचा. १२–१५ तासाच्या प्रवासानंतरच थांबायचं. कोठे घेऊन जात आहोत हे लोकांना सांगायचं नाही. सरळ कामाच्या ठिकाणी नेऊन कामाला सुरुवातच करायची. कामाला गेलेल्या लोकांना नेमकं कोठे आहोत हे सांगताही येत नाही. आधीच शहरातील लोकांना बघून भांबावणारी ही लोकं मग दलालाच्या तालावर नाचतात. काम संपेपर्यंत लोकांना मजूरी देत नाहीत. फक्त तांदूळ, डाळ याची कामापूरती सोय केली जाते. काम झाल्यावर हाकलून देणे, कमी मजूरी देणे, मुद्दाम भांडणे करणे, मारपीट करणे असले प्रकार केले जातात. पुरुष मजूरांसोबत जर महिला असतील तर त्यांची छेडछाड, मुद्दाम लगट असले प्रकार तर नेहमीचेच. महिलांचे, मुलींचे शारिरिक शोषण करणारे दलाल तर आदिवासी भागात फिरतच असतात. फक्त महिलांना आणि मुलींनाच कामाला घेऊन जाणारे दलालही आहेत.

आज आदिवासी भागातील २५ ते ४० % लोकसंख्या कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी

कामानिमित्त स्थलांतरीत झाली आहे. रोजगार हमीसारखा क्रांतिकारी कायदा महाराष्ट्रात असताना आदिवासींवर ही पाळी आहे. कायदा कागदावरच आहे. अंमलबजावणीमधील फोलपणा, भ्रष्टाचार आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ही यामागील कारणे म्हणता येतील.

- **शिक्षण**

सर्वोच्च न्यायालयाने अनेक खटल्यांमध्ये जगण्याच्या मुलभूत अधिकाराचा (अनुच्छेद २१) विस्तार केला असून तो सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, असे प्रतिपादन केलेले आहे. प्राथमिक शिक्षणाशिवाय हा अधिकार अपूर्ण राहात असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेले होते. त्यामुळे आपल्या देशाच्या संसदेने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा नुकताच संमंत केला (बालकांचा मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, २००९). भारतातील सर्व मुलांना, गरीबातल्या गरीबाला प्राथमिक शिक्षण मिळावे, कोणीही यापासून वंचित राहू नये यासाठी हा कायदा करण्यात आला. ज्यांची पहिली पिढी शिकतेय अशा आदिवासींसाठी, भटक्या–विमुक्तांसाठी, स्थलांतर करणाऱ्या ऊसतोडणी अथवा बांधकाम मजुरांसाठी, अपंगांसाठी, बालकामगारांसाठी आणि आर्थिक–सामाजिक विषमतेचे बळी ठरलेल्या लाखोंसाठी हा कायदा आहे.

आदिवासींचा विकास आणि शैक्षणिक प्रगती हे एकमेकांशी निगडीत आहेत. स्वातंत्र्यानंतर शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक सवलती देऊ केल्या. आश्रमशाळा, वसतिगृहे, शिष्यवृत्या, इ. मार्गाने सरकारने प्रयत्न केले आहेत. असे असूनही आदिवासींची शैक्षणिक प्रगती झाली नाहीच. आदिवासी भागातील शाळांमधे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची पातळी अजून फार निकृष्ट आहे. दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षणाभावी दारिद्र्यातून सुटका नाही, अशाच दुष्टचक्रात आदिवासी वावरत आहेत. स्थानिक भाषेतून शिक्षण देणे आवश्यक असताना अनोळखी आणि न समजणाऱ्या भाषेतून शिक्षण देण्याचा जबरदस्तीने प्रयत्न केला जात आहे. स्थानिक शिक्षकांची कमतरता असल्याने समाजाबाहेरचे शिक्षक नेमले गेले. त्यांना आदिवासींबद्दल कधी आपुलकीच नसल्याने किंवा सक्तीने अशा भागात पाठवल्याने कामात चाल ढकल करणे आणि 'नोकरी करणे' इतपतच

त्यांनी त्यांचे कर्तव्य केले. परिणामी आदिवासी मुलांची, जे पहिल्यांदाच शाळेत जात होते, त्यांची पुर्ण पिढी खऱ्या अर्थाने शिकलीच नाही.

- **आरोग्य**

कुपोषण, बालमृत्यू आणि साथीच्या आजारांनी विळखा घातलेल्या आदिवासींच्या आरोग्याच्या गरजा पुर्ण करण्यासाठी विद्यमान योजना अपुऱ्या किंवा निरुपयोगी ठरत आहेत. त्यामुळे आदिवासींची संस्कृती, जीवनपद्धती आणि राहणीमान यांना अनुकुल आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

भारत सरकारच्या Micro Economics & Health च्या अहवालानुसार आज आपल्या देशातील एकुण बाह्यरुग्ण तपासणीत ७८ टक्के रुग्ण हे खाजगी दवाखान्यात तर फक्त २२ टक्के रुग्ण हे सरकारी दवाखान्यात आरोग्य सेवा घेतात. वैद्यकिय सेवा न परवडल्याने वर्षानुवर्षे दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्यांची संख्या आपल्या देशात लाखोंनी आहे. महाराष्ट्रातील आदिवासी भागापुरते बोलायचे झाल्यास वैद्यकिय सेवा देणाऱ्या डॉक्टरांची सरकारी दवाखान्यातील कमतरता ही चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण, विशेषत: आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधे आज घडीला १४०० पेक्षा जास्त डॉक्टरांच्या जागा या भरलेल्याच नाहीत. याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील आदिवासींना दुर्गम भागात योग्य आणि तात्काळ आरोग्य सेवा आजही उपलब्ध नाही.

राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचा दावा सरकारकडून करण्यात येत असला तरी कुपोषणाची गंभीर स्थिती असलेल्या अमरावती, ठाणे, नंदुरबार, नाशिक आणि गडचिरोली या जिल्ह्यातील स्थितीत फारसा फरक पडलेला नाही, हे वास्तव आहे. अशी आकडेवारीही उपलब्ध आहे. जव्हार (ठाणे) आणि धारणी (अमरावती) एकात्मिक बालविकास योजनेच्या क्षेत्रात मध्यम आणि तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण ६ टक्यांनी वाढल्याचे निदर्शनास आले आहे. राजमाता जिजाऊ माता बाल पोषण मिशनच्या ताज्या अहवालानुसार राज्यातील आदिवासी क्षेत्रातील एकात्मिक बालविकास प्रकल्पातील क्षेत्रात मध्यम आणि तीव्र कुपोषित बालकांची संख्या २० % च्या वर आहे. हे सर्व प्रकल्प आदिवासी जिल्ह्यांमधील आहेत. गेल्या

अनेक वर्षात या भागातील कुपोषणाच्या स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. जव्हार, धडगाव आणि धारणी प्रकल्पाच्या क्षेत्रात तर हे प्रमाण ४२ ते ५२ टक्क्यांपर्यंत आहे.

आदिवासींना त्यांच्या भागात रोजगार पुरवण्यात यंत्रणांना अपयश आले. माता-पित्यांसह बालकेही कामाच्या ठिकाणी स्थलांतरीत झाली. या काळात लहान बाळांची आबाळ होते. आधीच प्रतिकार शक्ती कमी असलेल्या बालकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास ही बालके कुपोषणाच्या तीव्र श्रेणीत ढकलली जातात. आदिवासी भागातील ही वाढ थांबताना मात्र दिसत नाही.

- **अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगल रहिवासी कायदा २००६ (वन हक्क कायदा) (Forest Rights Act, 2006)**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगल रहिवासी कायदा (वन हक्क कायदा) २००६, हा आदिवासी आणि जंगलावर आधारित ज्यांचे जीवन आहे, अशा जनसमुहांवर, ज्यांच्यावर ऐतिहासिक अन्याय झाला आहे त्यावर उपाय म्हणून लागू करण्यात आला. जंगलाधारित जीवन जगणाऱ्या लोकांचे या कायद्यान्वये सुरक्षित करण्यात आलेले अधिकार जोपर्यंत त्यांना मिळत नाहीत तो पर्यंत त्यांना जंगलातून जायला सांगता येणार नाहीत असे हा कायदा सांगतो. शिवाय या लोकांचे जंगल व संसाधनावरील अधिकारही मिळायला हवेत असा हा कायदा सांगतो.

सरकार, प्रशासन, वनविभाग आणि राजकिय पक्षांचाही असा समज आहे की, वनाधिकार कायदा हा आदिवासींना जमीन देण्याचा कायदा आहे. काही ठिकाणी हा समज अज्ञानातुन आहे तर काही ठिकाणी लबाडीतून आहे. राज्य सरकारच्या जाहीरातीतही 'वनाधिकार कायदा, आदिवासींना जमीन देण्याचा वायदा' असे स्पष्टपणे पण चूकीचे म्हटले आहे. प्रत्यक्षात या कायद्यामधे वेगळी जमीन देण्याचे काहीही प्रावधान नाही. परंपरेने अस्तित्वात असणाऱ्या अधिकारांना मान्यता देणारा हा कायदा आहे. अशा अधिकारांपैकी पहिला अधिकार हा वस्तीसाठी आणि कसण्यासाठी जमीन धारणेचा अधिकार आहे. जी जमीन आदिवासी पुर्वापार कसतो आहे, त्या जमीनीवर त्याला कायदेशीर अधिकार मिळावा, असा कायद्याचा उद्देश आहे.

हा कायदा जंगलतोडीस उत्तेजन देत नाही आणि प्रत्येकाला अमूक एवढी जमीन मिळेल, याची हमीपण देत नाही. जी जमीन लोक पुर्वापार कसत आहेत आणि ज्यासाठी त्यांनी वन अधिकार्यांचे जुलूम सहन केले आहेत, दंड भरला आहे, डोळ्यासमोर पिके तुडविलेली पाहिली आहेत, घरांना आगी लावताना पाहिले आहे, बायका मुलांसमोर अधिकाऱ्यांचा बेदम मार खाल्ला आहे, त्या जमिनीवरुन आता त्यांना कोणीही हुसकून लावणार नाही, एवढीच हमी हा कायदा देतो. असे वनहक्क न्याय्यपणे नोंदवून त्यांचे अभिलेख तयार करणे आणि आवश्यक असलेले सर्व पुरावे/दाखले सुनिश्चित झाल्यानंतरच जमिनीवरचा हक्क संबंधित आदिवासी, पारंपारिक वननिवासी किंवा समूह यांना मिळण्याची खात्री या कायद्याद्वारे देण्यात आली आहे.

वनहक्कांमधे संसाधनाचे शाश्वत वापरासाठीचे अधिकार व जबाबदारी यांचा समावेश होतो. तसेच वापराच्या क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण व पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन करण्याचे अधिकार गाव समाजाला दिले आहेत. वनव्याप्त क्षेत्राचा विकास करण्याचे सर्व अधिकार आणि जबाबदारी स्थानिकांना देऊन त्यांची उपजिविका व अन्न सुरक्षा यांची खात्री हा कायदा देत आहे.

आदिवासींची जीवनपद्धती ही सामुहिक प्रकारची आहे. म्हणूनच वैयक्तिक हक्कांपेक्षा सामुहिक हक्कांना अधिक प्राधान्य असायला हवे. तसे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेल्या नियमांतही म्हटले आहे. पण दुर्दैवाने लोकांचा आणि शासन यंत्रणेचा सारा भार हा वैयक्तिक जमिनीच्या दाव्यांवर आहे. सामुहिक वनहक्क म्हणजे गावातील शाळा, दवाखाने यांच्या जागांचा वापराचा हक्क असा चूकीचा समजही सगळीकडे पसरला आहे.

**४.४ प्रकल्प ग्रस्त व पुनर्वसन :–**

पाटबंधारे प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर शेत जमिनीचे संपादन करावे लागते. त्याचप्रमाणे बुडीत क्षेत्रातील गावठानामध्ये सुद्धा संपादन करावे लागते त्यामुळे त्या गावातील रहिवाशांचे पुनर्वसन हा एक महत्त्वाचा घटक प्रकल्पाच्या उभारणीमध्ये असतो.

प्रकल्पामुळे जे लोक बाधीत होतात त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी शासनाची असते. स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळात विस्थापित होणाऱ्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात स्वतंत्र अशी यंत्रणा नव्हती. प्रकल्पनिहाय काही व्यवस्था अमंलात आल्या होत्या. महाराष्ट्र सिंचन आयोगाने १९६२ साली पुनर्वसनासंबंधी खालील शिफारशी केल्या होत्या.

१. पुनर्वसनाच्या योजना हा त्या प्रकल्पाच्या आराखड्याचा एक भाग म्हणून मंजर कराव्यात.

२. पुनर्वसित शेतकऱ्यांचे प्रत्यक्षात पुनर्वसन करण्याची जबाबदारी सरकारने उचलावी म्हणजे त्यांना तशीच किंवा सामान्यपणे त्याच प्रकारची जमीन व घरे मिळवून द्यावीत.

३. पुनर्वसनासाठी लागणाऱ्या जमीनीचे संपादन करण्यासाठी कायदे करून जरूर ते अधिकार सरकारने आपल्याकडे घ्यावेत.

४. संपादीत केलेल्या मालमत्तेची काढलेली बाजार किंमत त्या बदल्यात नविन मालमत्ता विकत घेण्यासाठी जो खर्च येईल त्यापेक्षा कमी असते. या बाजार किंमतीवर आधारलेली भरपाई देणे म्हणजे त्या मालकाचे नुकसान करणे होय. म्हणून बाजार किंमतीवर आधारेल्या भरपाई शिवाय शासनाने आणखी रक्कम देणगी म्हणून द्यावी. ही देणगीची रक्कम भरपाईची रक्कम आणि मालमत्ता पुन्हा विकत घेण्यासाठीची किंमत यातील फरका इतकी असावी.

सन १९६५ साली शासनाने विस्थापित होणाऱ्या व्यक्तीचे पुनर्वसन निट करण्यासाठी स्वतंत्र्य 'पुनर्वसन संचालनायलया'ची स्थापना केली. विस्थापित व्यक्तींना वहितीसाठी पर्यायी शेतजमीन व राहण्यासाठी भूखंड देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या नविन वसाहतीमध्ये आवश्यक त्या नागरी सुविधा प्रकल्पाच्या खर्चाने करण्यासाठी निर्णय घेण्यात आला.

प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ दिनांक ११ मार्च १९७७ पासून अंमलात आला त्यामुळे विस्थापितांना

पुनर्वसनाबाबत कायदेशीर हक्क प्राप्त झाला असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

### ४.४.१ प्रकल्प ग्रस्त चळवळी :–

प्रत्येक धरण हा भारतात स्थानिक संघर्षाचा, लोक लढ्याचा मुद्दा बनला आहे. मोठ्या धरणांच्या विरोधी लढा त्या त्या धरणाने ग्रस्त लोकांचे समाधानकारकरित्या पुनर्वसन घडवून आणण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. 'आधी पुनर्वसन मग धरण' ही घोषणा होऊन अनेक लढे आजपर्यंत उभे राहिलेले आहेत. मोठ्या धरणांना होणाऱ्या विरोधाने लोक बुचकाळ्यात पडतात विरोध करणारी मंडळी अविवेकी, विघ्नसंतोषी आहेत आणि त्यांना लोकांना गरीब व मागासच ठेवायचे आहे असा ग्रह करून देणे सोपे जाते. मोठ्या धरणांच्या बाबतीत नाण्याची दुसरी बाजू नुकसान/हानी स्पष्ट करणारी बाजू लोकांना सहसा दिसत नाही. जे उध्वस्त होतात त्यांना ती अनुभवावीच लागत असल्याने ते विरोधात उभे राहतात व त्यातूनच प्रकल्प ग्रस्तांच्या चळवळी उभ्या राहते. आपल्या न्याय मागण्यांसाठी झगडत आहेत. ह्यातील निवडक चळवळींचा संशोधकांने आढावा घेऊन त्या मांडल्या आहेत.

पुणे जिल्ह्यात मुळशी धरणाखाली जाणाऱ्या जमिनीच्या मुद्यावर शेतकऱ्यांचे १९२१ मध्ये आंदोलन पेटले. **सेनापती बापट** यांनी त्याचे नेतृत्व केले. हा लढा पेटा सत्याग्रह या नावाने प्रसिद्ध आहे. येथे मुंबईला वीज पुरवठा करण्यासाठी एक धरण बांधण्याचे ठरले. त्यात चोपन्न खेड्यांतील शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार होत्या व त्याबदल्यात मिळणारी रक्कम फारच अल्प होती आणि विस्थापितांना काहीही भरपाई नव्हती. हजारो कुटुंबे देशोधडीला लागणार म्हणून शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी व टाटा कंपनी यांच्याकडे अर्ज–विनंत्या केल्या, पण काहीच निष्पन्न होईना तेव्हा शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्यास काँग्रेसच्या नेत्यांनी सहकार्य दिले. खुद्द महात्मा गांधींनी प्राण घ्या किंवा जमीन घ्या असा ठराव या संदर्भात केला. हजारो अशिक्षित शेतकऱ्यांचे संघटन सेनापतींनी केले, मात्र ब्रिटिश शासनाने सेनापती बापटांना नऊ वर्षे तुरूंगात डांबून हे आंदोलन मोडून काढले. धरणामुळे होणाऱ्या विस्थापन विरोधातील देशातील हे पहिले आंदोलन ठरले.

विद्यमान पुणे जिल्ह्यातील भूतपूर्व भोर संस्थानात शेतकऱ्यांनी जंगल सत्याग्रह, कादवे (भोर संस्थानातील एक खेडे) सत्याग्रह व हिरडा सत्याग्रह अशी तीन महत्त्वाची आंदोलने केली. त्या प्रत्येकाचे स्वरूप आणि कालावधी वेगळा असला, तरी तत्कालीन राजेशाहीविरूद्धची ती आंदोलने होती आणि त्यांत अखेर शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागले. त्यांपैकी जंगल सत्याग्रह हा धरणाखाली ज्यांच्या जंगलातील जमिनी गेल्या आहेत, त्यांवरील शेतसारा वसुलीविरूद्ध होता. धरणामध्ये गाळ साचू नये म्हणून डोंगरावरील शेतीला बंदी घालण्यात आली होती. जंगलाच्या ज्या हद्दीत शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या होत्या, त्यांना त्यांची किंमत तर मिळाली नव्हतीच पण दरवर्षी त्यांच्याकडून शेतसारा सक्तीने वसूल केला जाई. हा संघर्ष १८८० पासून १९३८ पर्यंत म्हणजे सु. ६० वर्षे धुमसत होता. अखेर प्रजापरिषदेच्या मध्यस्थीने हा अन्याय दूर झाला. कादवे या लहान खेड्यातील जमिनी, भोर संस्थानातील तत्कालीन सरदार नातू यांनी तेथील जमिनी लिलावात विकत घेतल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची उपासमार होऊ लागली आणि त्यांनी आंदोलन छेडले व लिलावात गेलेल्या जमिनी परत मिळविल्या (१९२६). याव्यतिरिक्त भोरमधील शेतकऱ्यांवर हिरडेफळावर निर्बंध, लग्न टक्का, पाटदाम, म्हैसपट्टी असे काही पुस्तकात न सापडणारे कर लादण्यात आले होते. प्रजापरिषदेच्या आंदोलनामुळे १९२२ मध्ये संस्थानच्या गादीवर आलेल्या बाबासाहेब पंतसचिव यांनी ते रद्द केले. पुढे हिरडा विकण्याच्या मक्तेदारीविरूद्ध शेतकऱ्यांनी आंदोलन केले (१९२५). भोरमधील जंगलातील काही क्विंटल हिरडा निर्यात होत होता. त्यावर भोर संस्थान रॉयल्टीनामक निर्यात कर घेत असे. हा सर्व व्यवहार मुंबईतील एका कंपनीस संस्थानाधिपतींनी मक्त्याद्वारे दिला होता. त्यामुळे मावळे शेतकऱ्यांनी संस्थानाबाहेर हिरडा निर्यातीस परवानगी द्यावी म्हणून हिरडा सत्याग्रह केला.

- **गोसेखुर्द पुनर्वसनाच्या लढ्याची २७ वर्षे**

जमिनी धरणात गेल्यांना मोबदला द्यावा. कोर्ट केसेस वापस घेणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना पॅकेजचे वाटप करावे. धार्मिक स्थळांना जागा त्वरित उपलब्ध करून द्याव्यात. गोसेखुर्दच्या मच्छीमारांना व मच्छीमार सोसायटीला गोसेखुर्द धरणात कायम मच्छीमारी करण्याचे अधिकार असावे. नवीन पुनर्वसित प्रकल्पग्रस्त गावात ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या नसल्याने नवीन विकासाचा निधी गावाला मिळत नाही. जिल्हा परिषदेच्या योजनांचा लाभ गावाला व

गावकऱ्यांना मिळत नाही. ग्रामपंचायतला नव्या गावातील घरांचा कर वसुल करता येत नाही परंतु जुने ग्रामपंचायतचे पदाधिकारी आणि ग्रामसेवक मिळून कर वसुली करतात या पैशाचे काय होते गावकऱ्यांना माहीत नाही. गावांना महसुली दर्जा देणे व गावागावात ग्रामपंचायतच्या निवडणूका घेऊन लोकशाही प्रक्रिया सुरू करणे जबाबदार शासन प्रशासनाचे काम आहे. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासनाने रोजगार उपलब्ध करून दिल्या शिवाय खऱ्या अर्थाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होऊ शकत नाही या बाबीकडे शासनाने गंभीरपणे लक्ष देवून प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचे निराकरण करावे ह्या बाबतीची मागणी ह्या लेखात केली आहे. (Maharashtra Times & Updated Jun 13, 2015, 11.49PM IST)

- **निरा–देवधर प्रकल्प**

पुणे निरा देवघर प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना निरा उजवा कालवा आणि वीर धरण जलाशयावरुन विशेष बाब म्हणून पाणी उचलण्याची परवानगी देणे प्रस्तावित करण्यात आली आहे. निरा देवघर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या बुडीत क्षेत्रातील ज्यांचे पुनर्वसन नवीन गावठाणात खंडाळा आणि फलटण तालुक्यात करण्यात आले आहे. या प्रकल्पग्रस्तांना निरा देवघर प्रकल्पाच्याव्दारे अद्याप सिंचनाचा लाभ मिळू शकत नाही, अशा प्रकल्पग्रस्तांना निरा उजवा कालवा, वीर धरण जलाशयावरुन विशेष बाब म्हणून वरील जमिनींच्या सिंचनासाठी पाणी उचलण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली. त्यासाठी कार्यकारी अभियंता, निरा देवधर प्रकल्प विभाग यांना निवेदन देण्यात आले.

- **गडनदी प्रकल्प, संगमेश्वर, रत्नागिरी–**

'आधी पुनर्वसन नंतर धरण' हे ब्रीद घेऊन राज्य सरकारने संगमेश्वर तालुक्यात गडनदी प्रकल्प उभारण्यास प्रारंभ केला होता. आज वीस वर्षानंतरही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन योग्य प्रकारे झालेले नाही. प्रशासनाने एकेरी आकड्याच्या कोटीत योजलेल्या या धोरणातील अत्यंत रटाळ कारभारामुळे ठरलेल्या निधीत कित्येक पटीने वाढ होत आहे. या एकूणच कारभारावर कडक भूमिका घेत, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रकल्प करण्यासाठी

प्रकल्पग्रस्तातर्फे प्रकल्पस्थळी प्रशासनाविरोधात उपोषण आंदोलन करण्यात आले. प्रकल्पग्रस्त समितीचे कार्यकर्ते सूर्यकांत साळुंखे यांनी हे आंदोलन केले.

संगमेश्वर तालुक्यात गडनदी प्रकल्पांतर्गत पुनर्वसित झालेले प्रकल्पग्रस्त गेल्या अनेक वर्षापासून मागण्यांबदल्यात त्यांच्या डोळ्यात वारंवार केवळ धूळफेकच करण्यात आली आहे. कुचांबे-पाचांबे या खोऱ्यात वीस वर्षापूर्वी या धरणाचे बांधकाम सुरू करण्यात आले. मात्र, स्वेच्छा पुनर्वसितांना देण्यात येणारे अनुदानही येथील स्थानिकांना अद्याप मिळालेले नाही. या धरणग्रस्तांनी पायाभूत सुविधांसाठी केलेल्या अनेक मागण्या आजवर प्रलंबितच राहिल्या आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती स्थापण्यात आली आहे. या समितीने विविध आंदोलने, उपोषण ह्या सारखे आंदोलनाचे मार्ग अवलंबिले. याबाबतचे निवेदनही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

२० वर्षापूर्वी सुरू झालेला हा प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आला आहे. असे असतानाही अजूनही प्रकल्पग्रस्तांचे शंभर टक्के पुनर्वसन झालेले नाही. नेहमी प्रथम पुनर्वसन, नंतर धरण अशा प्रकारची घोषणा सरकारतर्फे केली जाते. मात्र या प्रकल्पाबाबतीत या घोषणेची पूर्तीच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे झालेली नाही. या धरणबाधित क्षेत्रात राजीवली, रातांबी, कुटगिरी आदी गावातील धरणग्रस्तांचे खेरशेत-नांदगाव येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. चांगला धरण प्रकल्प व्हावा, या भावनेतून सरकारला सहकार्य केले. याची जाण तर सोडाच, पण अजूनही सरकार निद्रावस्थेतच असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. राजीवली गावातील घाडगेवाडी, शिर्केवाडी येथील रहिवाशांचे शासकीय पुनर्वसन करण्यात आले. त्यातील ३५ टक्के काम अजूनही बाकी आहे. रस्त्याचे आश्वासन हवेतच विरले.

स्वेच्छा पुनर्वसन अनुदान नाही, धरणाची उंची वाढवण्याची माहिती थेट बुडीत क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली नाही, असा आरोप प्रकल्पग्रस्त समितीचे प्रमुख यांनी केला. बुडीत क्षेत्रातील जमिनीचा मोबदला जुन्या दराने देऊन शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी केली आहे. पुनर्वसितांना सहा वर्षात सातबाराचा उताराही देण्यात आलेला नाही. धरणाचे काम पावसाच्या

तोंडावरच सुरू केले जाते. यामुळे होणारी संपूर्ण कामे ही खराब होतात. अशा स्थितीतच पैशाचा अपव्यय होत असल्याचे प्रकल्पग्रस्त समितीचे प्रमुख यांनी सांगितले होते.

रातांबी काळंबेवाडी ही गावे १०० टक्के बुडीत क्षेत्रात असतानाही त्यांच्या पुनर्वसनाचे काम अद्याप रखडलेलेच आहे. धरणग्रस्त भूमिहीन झाल्यास त्यांना सरकारतर्फेच जमीन उपलब्ध करून द्यावयाची असते, हा नियम आहे. या नियमानुसारच जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. धरणक्षेत्रातील उर्वरित कामे त्वरित सुरू करावीत, अशा प्रकारच्या मागण्या निवेदनात केल्या होत्या.

- **धरणाला सामोरं जाताना**

शहरं वाढत चालली आहेत. त्यासोबत त्यांची पाण्याची तहानही वाढत चालली आहे. पाणी पाहिजे तर धरणं बांधायला हवीत, हे सूत्र आपण स्वीकारलेलं आहे. पण जेव्हा एखादं धरण बांधण्याचा निर्णय होतो तेव्हा एक ना अनेक प्रश्न निर्माण होतात. आपल्यासारखे शहरी लोक हे प्रश्न दृष्टिआड करून सुखी होतात. पण त्यामुळे प्रश्न सुटत नाहीत. उलट त्यामुळे गुंता वाढत जातो. पडणारे प्रश्न दृष्टिआड न करता त्यांना सामोरं गेलं तर काय घडतं याबाबतचा हा लेख ठाणे जिल्ह्याच्या जव्हार पासून पंधरा किलोमिटर अंतरावर पवनमाळ हे गाव आहे. गाव छोटस पण परिसर विस्तीर्ण होता.

नदीजोड प्रकल्प, धरण, प्रकल्पग्रस्त, फिजिबिलिटी स्टडी, बुडीत क्षेत्र, विस्थापन, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, सरकार असे निर्णय परस्पर कसं घेऊ शकतं? मुंबईला २०२५ साली पाणी मिळावं म्हणून आमची घरं का बुडावीत इतर कुठलाच पर्याय नाही बर, सरकारने ग्रामसभेशी चर्चा करावी, विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामसभेला जे अधिकार मिळालेले आहेत ते वापरले जाणार आहेत. इतर धरणांच्या बाबतीत काय झालं. प्रकल्पग्रस्त म्हणून साधा दाखला मिळायची मारामार–पुनर्वसन तर दूरच! अनेक मुद्दे मांडले गेले. पाणी, जंगल कुणाचं? बुडीत क्षेत्रातील आदिवासी गावं आजही पिण्याच्या पाण्यासाठी झगडत असताना मुंबईला तेरा वर्षांनी पाणी हवं म्हणून आतापासून नियोजन आणि गावांच्या पाणीपुरवठ्याचं काय जे प्रश्न आजवर माझ्यासमोर केवळ तात्त्विक चर्चा म्हणून येत होते ते प्रश्न या लोकांसाठी जगण्या–मरण्याचे प्रश्न आहेत,

याची जाणीव अस्वस्थ करते आहे. ज्या धरणातलं पाणी मी आता हक्काने वापरतोय, त्या धरणामुळे विस्थापन झालेल्यांनीही तेव्हा असेच प्रश्न विचारले असतील का? त्यांचे प्रश्न त्या वेळी कुणी ऐकले की नाही. ही धरणं झाली नसती तर आपण काय केलं असतं. शहरं कशी वाढली असती. मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील आणि आदिवासी स्वशासन कायद्यातील कलमांचा उल्लेख करून, कायद्यानुसार सरकारने ग्रामसभेशी बोलणी करणं कसं बंधनकारक हे विनायक थाळकर यांनी मांडले. प्रस्तावित धरणाला विरोध करायचाच, यावर सर्वांचं एकमत होऊन प्रत्येक गावाने प्रत्येकी पाच (तीन पुरुष आणि दोन स्त्रिया) प्रतिनिधी निवडून संघर्ष समिती स्थापन करावी असे ठरले. ढाढरी, कोकणपाडा, रुईपाडा, खर्डी, पवनमाळ या गावांतील प्रतिनिधी निवडले गेले.

- **भूगड, खरगी हिल आणि पिंजाळ धरण :–**

दमणगंगा–पिंजाळ नदीजोड प्रकल्पात तीन प्रस्तावित धरणं आहेत. भूगड, खरगी हिल आणि पिंजाळ. दमणगंगा नदीवर भूगड इथे आणि वाघ नदीवर खरगी हिल इथे धरणं बांधून ते पाणी पिंजाळ धरणात आणलं जाणार आणि पुढे ते मुंबईला पुरवलं जाणार आहे. २०२५ सालची मुंबईची तहान लक्षात घेऊन हा प्रकल्प आखण्यात आला आहे. या प्रकल्पाबरोबरच ठाणे व रायगड जिल्ह्यात इतरही प्रकल्प होऊ घातले आहेत. मुंबईला पाणी मिळेल याची दुसरी काहीच उपाययोजना करता येणार नाही का, या कळीच्या मुद्द्याबरोबरच, पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असलेला पश्चिम घाट, तिथे येणारे प्रकल्प, त्यांच्या निविदा– प्रक्रियेतील घोटाळे, धरणांवरील आवाक्याबाहेर वाढणारा खर्च हे सगळेच प्रश्न डोकं वर काढत आहेत. जव्हारच्या परिसरातील आठ गावांनी खरगी हिल धरणाला विरोध करायचं ठरवलं आहे. प्रकल्पग्रस्त आणि सरकार यांच्यातला संघर्ष पुन्हा एकदा उभा राहणार असं दिसतं आहे. आपली वाढती शहरं, तिथल्या शहरी नागरिकांच्या आरामाच्या–चैनीच्या रोजच्या विस्तारत्या कल्पना, त्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारी उत्पादनं, तशाच जीवनशैलीला पूरक योजना आखणारी सरकारं आणि दुसरीकडे शहरांच्या गरजा पुरवण्याच्या प्रक्रियेत नाहीशी होणारी गावं, विस्थापनामुळे जगण्याचा पोतच विस्कटून गेलेली माणसं. काही आदिवासी, काही शेतकरी, काही भटके–विमुक्त. या सगळ्यांमध्ये मी कुठं आहे? कोणाच्या बाजूने आहे? पवनमाळच्या

सभेने हे प्रश्नासमोर उभे केले आहेत. मोठी धरणं चांगली की वाईट, योग्य की अयोग्य हा प्रश्न गेली कित्येक वर्षं आहेच.

मोठी धरणं हवीत का नकोत याबाबत आजवर पुष्कळ चर्चा झालेली आहे, अजूनही होत असते. प्रामाणिकपणे सांगायचं, तर नदी अडवून, धरण बांधून ते पाणी पिण्यासाठी, वीजनिर्मितीसाठी, शेतीसाठी उपयोगात आणायचं ज्यांना सुचलं, ज्यांनी ते आव्हान स्वीकारलं, ज्यांनी प्रत्यक्षात आणलं त्या सर्व तंत्रज्ञांना आणि नियोजनकारांना सलाम. विज्ञानाची कास धरून लोकहितासाठी असे अवघड प्रकल्प योजणं, ते यशस्वी करणं हे निश्चितच कौतुकास्पद आहे. गेल्या पन्नास–साठ वर्षांमध्ये आपण जो विकास केलाय, त्याबद्दल लेखकांनी थक्क झाल्याचे सांगितले आहे. विज्ञानाच्या बळावर विकास साधत देशातील सर्व नागरिकांना एक चांगलं आयुष्य जगायला मिळणं, ही माझ्या दृष्टीने प्रगतीची एक साधी व्याख्या आहे. पण काही नागरिकांचं भलं दुसऱ्या नागरिकांच्या जिवावर उठत असेल तर काय? मानवी बुद्धीचा पराक्रम जर काही माणसांच्या आयुष्यावर उठत असेल, तर त्या बौद्धिक पराक्रमाकडे लेखक निखळ कौतुकाने नाही बघू शकत. इथे लेखकाला मागे एकदा (बहुधा अरूंधती रॉयच्या पुस्तकात) वाचलेलं एक वाक्य नमुद केलेले आहे. खरं कौशल्य कशात आहे अणुबॉम्ब बनवण्यात की भारतातील प्रत्येक खेड्यातील प्रत्येक घरात पिण्याचं पाणी पुरवण्यात.

जगात इतरत्र मोठी धरणं होत नाहीत का आणि तिथे माणसं विस्थापित होत नाहीत का, हा प्रश्न लेखाच्या मनात जन्म घेतोय. शिवाय आपल्याकडे पुनर्वसन योग्य रीतीने होत नाही, त्यामुळेच विस्थापनाचा प्रश्न गंभीर बनतो. प्रकल्पाला सुरुवात होण्याआधीच पुनर्वसन झालं, प्रकल्पग्रस्तांना बाजारभावाने योग्य मोबदला मिळाला तर काय हरकत आहे, असा सवाल या विषयावर वाद–विवाद होतो तेव्हा हमखास उठतो. नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. एन. सी. सक्सेना यांनी आपल्या विस्थापितांवरच्या अहवालात नन्हेरामची कहाणी लिहिली आहे. मध्य प्रदेशातल्या एका धरणामध्ये विस्थापित झालेलंपैकी एक नन्हेराम. या धरणात त्याचं घर, गाव, शेत सगळं जातं. कोणत्या तरी संस्थेने आंदोलन उभारल्यावर त्याला आणि इतरांना नुकसानभरपाई मिळते. सरकार धरणाजवळच त्यांना सिमेंटची खुराडी बांधून देतं पण जवळ

शाळा नाही, दुकान नाही, काहीही नाही. जवळपास सगळीच माणसं जमेल तशी ती जागा सोडतात व शहराचा, दुसऱ्या गावांचा आश्रय घेतात पण नन्हेरामला ते जमत नाही. तो तिथेच राहतो. जमेल तसा एकेक दिवस पुढे ढकलत राहतो. विस्थापितांच प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी सक्सेना त्याला भेटतात, तेव्हा नन्हेराम जवळपास मुका झालेला असतो. बराच प्रयत्न करूनही तो काहीच बोलत नाही. ते त्याला घेऊन होडीने धरणाच्या पाण्यात जातात. पाण्याच्या मध्यावर आल्यानंतर तो त्यांना म्हणतो, इथेच माझं शेत होतं. बस, एवढंच. आपलं शेत, घर पाण्याखाली गेलं याच्या मानसिक धक्क्यातून नन्हेराम बाहेरच येऊ शकलेला नाही. नन्हेरामची कहाणी अशा सगळ्या युक्तिवादांना आव्हान देत राहते. आयुष्यातून उठवणाऱ्या या विस्थापनाची भरपाई पुनर्वसनाने, पैशाने होऊ शकते का, या प्रश्नाचा मला मुळातूनच विचार करावासा वाटतोय. मला माझ्या जागेवरून कोणी उठवलं तर मी तो त्याग हसत हसत करेन का? तुम्ही काय कराल?

- **दिंदोडा प्रकल्प :-**

दिंदोडा प्रकल्पाकरिता संपादित केलेली जमीन परत करण्याच्या मागणीसाठी दिंदोडा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्यावतीने प्रकल्पस्थळी धरणे आंदोलन करण्यात आले. यात प्रकल्पग्रस्तांनी मोठा सहभाग नोंदवित मागण्या मान्य केल्याशिवाय माघार घेणार नसल्याचे जाहीर केले. यावेळी जिल्हा प्रशासनाला निवेदनही देण्यात आले. (First Published :24-April-2017 : 00:22:52)

वारंवार आंदोलन करूनही दखल घेतली जात नसल्याने आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार यावेळी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने केला. प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष पुंडलिक तिजारे, उपाध्यक्ष अभिजीत मांडेकर, सचिव चंपतराव साळवे, कोषाध्यक्ष पी.जी. भिडकर यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. अनेक वर्षे उलटली तरीही दिंदोडा बॅरेज प्रकल्पाला शासकीय मान्यता मिळत नाही. शिवाय प्रकल्पाच्या उभारणीकरिता निधीचीही तरतूद केली जात नाही. अलीकडेच राज्य शासनाने २१ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली; पण त्यात दिंदोडा बॅरेज प्रकल्पाचा समावेश नाही. वर्धा, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सुपिक जमीन या

प्रकल्पासाठी अनेक वर्षांपूर्वी शासनाने अल्प मोबदला देत संपादित केली; पण त्यानंतर शासनाने मान्य केल्याप्रमाणे अद्याप प्रती एकर एक लाख रुपये अनुदान दिले नाही. प्रकल्पग्रस्त कुटुंबातील बेरोजगाराला नोकरी देण्यास टाळाटाळ केली जात आहे. सर्व बाजूने प्रकल्पग्रस्तांची शासनाने कोंडी केली आहे. यामुळेच आमची संपादित केलेली २ हजार ८०६ हेक्टर ७८ आर शेतजमीन आम्हाला परत द्यावी, अशी मागणी दिंदोडा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने केली आहे. आमचे म्हणणे शासन समजून घ्यायला तयार नसेल व मान्य केल्याप्रमाणे अनुदानस्वरुप मोबदला देत नसेल तर आमची जमीन परत मागण्याशिवाय पर्यायच नसल्याचेही शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. संपादित जमिनीचा जेमतेमच मोबदला सन २००० मध्ये शेतकऱ्यांना देण्यात आला होता. शेतकऱ्यांनी मोबदला कमी मिळाल्याचा आक्षेप घेतला असता प्रती एकर एक लाख रुपये अनुदान देण्याचे मान्य करण्यात आले होते पण शासनाने एक रुपयाही न दिल्याने शेतकऱ्यांत असंतोष पसरला आहे. शासनाने प्रती एकर एक लाख रुपये व १७ वर्षांचे व्याज द्यावे वा जमिनी परत करीत शासनाच्या मालकीची नोंद काढावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी निवेदनातून केली आहे.(कार्यालय प्रतिनिधी)

- **सुपीक जमिनी पडिक :-**

२०१५ व १६ मध्ये शासनाने संपादित जमिनीवर आपला ताबा दाखविण्याकरिता सातबारावर नोंद करून घेतली. प्रकल्प होत नाही, अनुदान दिले जात नाही व जमिनीही परत केल्या जात नसल्याने सुपीक जमिनी पडिक आहेत. यामुळे जमिनी परत कराव्या, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. २०१४ च्या शासकीय परिपत्रकात सलग पाच वर्षांच्या कालवधीत संपादित जमिनीवर प्रकल्प न उभारल्यास ती जमीन संबंधित शेतकऱ्याला परत करण्यात यावी, असे स्पष्ट नमूद केले आहे. असे असताना शासनाचाच कायदा शासकीय अधिकाऱ्यांनी बासनात गुंडाळून ठेवल्याचे प्रकल्पग्रस्तांनी निवेदनात नमूद केले आहे.

औद्योगिकीकरणाचा पहिला टप्पा आपल्या देशाने ओलांडला. पण संपूर्ण देशात मालगाड्यांसाठी स्वतंत्र ट्रॅक नाहीयेत. मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूकीच्या ट्रेन एकाच रुळांवर चालवल्या जातात. याचा परिणाम म्हणून मालवाहतूकीच्या ट्रेन आणि प्रवासी

वाहतूकीच्या दोन्ही ट्रेन्सच्या वेगांवर होतो. यावर पर्याय म्हणून केंद्रीय मंत्रालयानं एक योजना आखली. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर योजना...जपान सरकारच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प राबवला जातोय. त्याबदल्यात जपान सरकारला उद्योगधंद्यांच्या विविध सवलती भारतात दिल्या जातील. असा हा करार आहे. या अंतर्गत संपूर्ण देशात डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर बांधले जातील. दोन फेजमध्ये हा कॉरिडॉर बांधला जाईल. यापैकी इस्टर्न कॉरिडॉर महाराष्ट्रातून जातो. लुधियाना–हावडा आणि दिल्ली–जेएनपीटी असा हा कॉरिडॉर आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरयाय़ाणा, दिल्ली या पाच राज्यातल्या मिळून सात हजार हेक्टर जागेवर हा कॉरिड़ॉर उभा राहील. महाराष्ट्रातल्या ठाणे, रायगड जिल्ह्यातल्या १२० गावांतली अंशत: जमीन मिळून या प्रकल्पासाठी ५६५ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे.

हा प्रकल्प दूरदृष्टीने विकासाला चालना देणारा, आयात निर्यातीला आणि उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी उपयुक्त असाच आहे. याबद्दल कुणाचंचं दुमत असण्याचं कारण नाही. पण २००८ साली रेल्वे प्रकल्पांसाठी तयार केलेल्या विशेष कायद्याचा आधार घेत संबंधित गावांमध्ये सक्तीने भूसंपादनाची मोहीम राबवण्यात येतेय. काही गावांत ती राबवण्यात आलेय. राज्याच्या महसूल विभागातर्फे या प्रकल्पासाठीचं भूसंपादन रेल्वेला करुन दिलं जातंय. जमींनींना कुठल्या भावाने मोबदला द्यायचा हे राज्य सरकार ठरवणार. प्रकल्प केंद्राचा. त्यामुळे मुंबईमध्ये दिल्ली जेएनपीटी फ्रेट कॉरिडॉरचे विशेष अधिकारी म्हणून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना तो प्रकल्प पूर्ण होणं जास्त महत्वाचं वाटतं. महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या धुडकावून लावलेल्या हरकतींविषयी त्यांना बोलायचं नसतं. प्रकल्पग्रस्त लबाड असतात, दूहेरी फायदा मिळवण्यासाठी ते ढोंगं करतात. अशा टीका प्रकल्पग्रस्तांविरोधात खूप सहजपणे केल्या जातात. काही अंशी आणि काही ठिकाणी असं घडलंही असेल. पण म्हणून प्रकल्पग्रस्तांना प्रश्नच नसतात. आणि त्यांच्या हरकती या खऱ्याखुऱ्या नसतातच असाही त्याचा अर्थ लावण चुकीचं ठरेल. म्हणूनच या प्रकल्पाची वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी लेखक ठाणे डोंबिवलीतल्या निळजे गावात गेले. ग्रामपंचायतीचं कार्यालय गावकऱ्यांनी फूलून गेलं होतं. प्रत्येक प्रकल्पग्रस्ताला आपली व्यथा मांडायची होती.

प्रसारमाध्यमांनी कैफियत मांडली तर आपल्याला न्याय मिळेल, अशी आशाही प्रत्येकाला वाटत होती. या सगळ्या लढ्याचं सर्वपक्षीय बचाव संघर्ष समितीचं नेतृत्व ७२ वर्षांचे वसंत पाटील यांनी केले. गावकऱ्यांनी याआधी कोकण रेल्वेला, सेंट्रल रेल्वेला, एमआयडीसीला, एमएसईबीला, जीईएल ला (गॅसप्रकल्प), आणि रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी (पनवेल–गोवा, पनवेल–कर्जत, मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवे यासाठी) शहरं वसताना जमीनी दिल्या होत्या. पण गावकऱ्यांचा अनुभव असा होता की, जमीनी घेतात आणि कागदावर दिलेली पुनर्वसनाची आश्वासनं सरकार पाळत नाही. मग प्रकल्पग्रस्तांनी आपले हे हक्क मिळवण्यासाठी कोर्ट–कचेऱ्या करत बसावं, अशीही अपेक्षा असते. त्यापेक्षा सरकारला जमीनच देण्याच्या फंदात न पडलेलं बरं, असाच पवित्रा फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाच्या वेळी शेतकऱ्यांनी घेतला होता. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनीही भूसंपादनाच्या प्राथमिक नोटीस पहिल्यांदा थेट वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या. त्यानंतर घरोघरी नोटीसा मिळाल्या. त्यामुळे गावकरी संतापलेले होते. त्याशिवाय, डोंबिवलीच्या–निळजे वडवलीच्या नागरिकांना स्वत:च्याच जमिनी टिकवण्यासाठी सुनावणीकरता डहाणूला भूसंपादन अधिकाऱ्यांकडे जावं लागत होतं. तिथं त्याचं म्हणणं नीट ऐकून घेतलं गेलं नव्हतं. २००८ च्या रेल्वे ॲक्टनुसार शेतकऱ्यांच्या या हरकती फेटाळून लावण्याचा अधिकार शासनयंत्रणेकडेच ठेवण्यात आलाय. त्यामुळे नोंदवलेल्या हरकती फेटाळून लावण्यात आल्या होत्या. शहरी रेडी रेकनर दर तरी या जमिनी ताब्यात घेताना दिला जावा, अशी शेतकऱ्यांची मागणी होती. ती पण ऐकून घेतली जात नव्हती. त्यामुळे शेतकरी बिथरले होते. महसूल विभागाच्या आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांना मोजणीसाठी आणि प्रकल्पाच्या कामासाठी जमीनीत पाय ठेऊ देणार नाही, असा दावा त्यांनी केलाय. यासंदर्भात शासन न्याय देऊ न शकल्याने अखेर तीन याचिका हायकोर्टात दाखल झाल्यात. जमीन संपादनही अद्याप पूर्ण होऊ शकलेलं नाहीये.

रायगड जिल्ह्यातला मुकेश अंबानी यांचा रिलायन्सचा महामुंबई सेझ अपेक्षेएवढं भूसंपादन करु शकला नाही. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने भूसंपादनाची ही मुदत वाढवून द्यायला नकार दिला. महामुंबई सेझ जवळपास रद्द झाल्यात जमा आहे. पण रिलायन्सचे सेझ पनवेल आणि रायगड अशा दोन ठिकाणी मिळून होणार होते. आणि त्याची कनेक्टिव्हिटी साधली

जाणार होती. रायगडचा सेझ रद्द झाला तरी पनवेलचा सेझ रद्द झालेला नाही. खांदा कॉलनी, नवीन पनवेलच्या टेंभोडे–वळवली गावच्या शेतकऱ्यांनी द्रोणागिरीच्या कुशीत होत असलेल्या या प्रकल्पाला तीव्र आक्षेप घेतलाय. त्यांचे दोन मुद्दे खूपच स्पष्ट आहेत. या शेतकऱ्यांच्या जमिनी स्वस्त दरात चाळीस वर्षांपूर्वी सिडकोने कॉलनी बांधण्यासाठी घेतल्या होत्या. त्यामुळे ज्या कारणांसाठी जमीनी शेतकऱ्यांकडून घेण्यात आल्या त्याच कारणासाठी त्याचा वापर करावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. दुसरा मुद्दा आहे तो सेझच्या कंपन्या गावात सुरु झाल्यावर स्थानिकांचा रोजगार मिळणार याची हमी त्यांनी रिलायन्सकडे वारंवार मागितली. ती मिळाली नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा रिलायन्सचे अधिकारी, पोलिस फौजफाट्यासह गावात भिंतीचं उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यासाठी येतात तेव्हा तेव्हा गावकरी निकराने लढा देतात. हा प्रकल्प असाच ठप्प आहे. रिलायनसने गावामध्ये स्वतच्या जमिनीभोवती आठ ते दहा फूटांचा बंधारारुपी पक्की भिंत बांधायचं ठरवलंय. त्याचं अर्ध बांधकामही केलंय. पण हे गाव डोंगराच्या पायथ्याशी येतं. सगळ्या डोंगराचं पाणी गावात येतं. त्याची वाट जर अशा भिंतीने अडवली तर गावातली वस्तीच पाण्याखाली जाणार. पारंपारिक बांध बंदिस्तीचा अनुभव असलेल्या गावकऱ्यांचा भिंतीच्या बांधकामाला तीव्र विरोध असण्याचं हे सुद्धा एक महत्वाचं कारण आहे.

गावच्या अनेक पायवाटा या भिंतरुपी कुंपणात गायब होतायत. आणि याबद्दल गावकऱ्यांना कुठलीच कल्पना देण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यांच्यात आता फसवले गेल्याची भावना वाढलेय. इथल्या आंदोलनाचं नेतृत्व करतायत तरुण शेतकरी प्रकाश म्हात्रे हे करत आहेत. त्याचं एकूणं म्हणंणं मी समजावून घेतलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की, विकास कामांसाठी जमिनी हव्यात हे गावकऱ्यांनाही पटतंय. विकासाचे प्रकल्प आले तर विकास होईल, इकॉनॉमी बदलेल आणि पारंपारिक शेतीधंद्यापेक्षा त्यातून चांगली आर्थिक कमाई होईल, हे सुद्धा शेतकऱ्यांना पटतंय. शेती फायद्याची नाही हे सुद्धा पटतंय. पण शेती हक्काची आहे. शेती असताना ते जमिनीचे मालक असतात. ही शेतजमीन विकल्यावर आपण शहरात मजूरी करायची आणि मालकाचे मजूर बनायचं हे त्यांना पटत नाहीये. आपल्याच गावातून, जमिनीतून आपल्याला उपरं केलं जाणारं ही वस्तुस्थिती निश्चितच क्लेशदायी असते. ती सहजपणे पचवण्याइतकी सोपी प्रक्रिया नक्कीच नसते. त्यासाठीच प्रकल्पग्रस्त आणि भूसंपादनाच्या या

वादात इथं गरज असते ती संवादाची. सरकारच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन सामंजस्याने तोडगा काढण्याची. पण त्याचाच बऱ्याचदा अभाव असतो. म्हणून वाद चिघळत जातात. आणि प्रकल्पच हटवा हे टोक प्रकल्पग्रस्त गाठतात किंवा आधीचा पुनवर्सनातला त्यांचा अनुभव हा सरकारतर्फे विश्वासाहर्ता निर्माण करणारा नसतो. बाळगंगा धरणाच्या प्रकल्पग्रस्तांकडे बघितल्यालवर ही वस्तुस्थिती समजून घेता येते. रायगड जिल्ह्यातल्या पेण तालुक्यात वरसई बाळगंगा नावाचं एक धरण प्रस्तावित आहे. विभागाच्या वाढत्या पाण्याची तहान भागवण्यासाठी हे धरण बांधलं जाणार आहे. गावकऱ्यांचा विरोध तुडवत, भूसंपादानाची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी गावात दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात मध्यरात्री पोकलेन मशीन्स आणि बुलडोझर घालण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतातले बांध तोडून हे बुलडोझर जमिनीच्या एका अशा तुकड्यावर नेण्यात आले ज्या जागेच्या मालकाने धरणाला जमीन देण्याचं ना हरकत प्रमाणपत्र दिलं होतं. पण तिथपर्यंत पोचण्यासाठी कायदेशीर, सनदशीर मार्गाने पोचण्यासाठी थांबायचा धीरही खाजगी विकासकाकडे नव्हता. धरणाचं हे बांधकाम सिडको आऊटसोर्सिंग करुन बांधून घेतेय. पर्यायी जमीन, आर्थिक मोबदला आणि पुनवर्सनाची संपूर्ण हमी मिळेपर्यत गावकऱ्यांनी धरणाच्या कामाला विरोध करायचं हे ठरवलेलं आहे.

- **कोयना प्रकल्प ग्रस्त–**

या प्रकल्पग्रस्तांमध्ये कोयना धरणाचे प्रकल्पग्रस्त सुद्धा पुन्हा एकदा विस्थापित होणार आहेत. त्यांच्यावतीने रघुनाथ भोसले मुंबई हायकोर्टात खटला लढत आहेत. कोयना धरण प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती त्यांनी पेण वरसई–बाळगंगा धरणाविरोधात स्थापन केलेय असे रघुनाथ भोसले यांनी सांगितले. कोयनेसाठी त्यांनी सरकारला जमीन दिली. पण त्याचं पुनर्वसन झालच नाही. त्यांना सोलापूर जिल्ह्यात ज्या गावात सरकारने जमिनी दिल्यात, त्या गावचे गावकरी त्या जमिनींचा ताबा त्यांना द्यायला तयार नाहीयेत आणि या जमिनी विखुरलेल्या आहेत. कोयनेतल्या या काही प्रकल्पग्रस्तांनी स्वत:च्या कमाईतून पेण तालुक्यात जमिनी खरेदी केल्या होत्या. या पिकत्या जमिनी आता पुन्हा एकदा हिरावल्या जाणार, याचं त्यांना दु:ख होतं आणि वयाच्या ६० पर्यंत जमिनींची मालकी मिळवण्यासाठी कष्ट केले आता ती टिकवण्यासाठी झगडावं लागणार. दुसऱ्यांदा विस्थापिताचं आयुष्य जगावं लागणार याने भोसले व्यथित होते.

रायगड जिल्ह्यातल्या शहापूर–धेरंड गावासह नऊ गावांत तर सरकार विरुद्ध शेतकरी असा सरळसरळ संघर्षच गेली दोन वर्ष उभा राहिलाय. याचं कारण या नऊ गावांमधली घरं विस्थापित न करता येऊ घातलेल्या औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी गावची शेतजमीन संपादित केली जाणार आहे. साडे सहाहजार मेगावॅटचे टाटा, रिलायन्स, इस्पातचे ४ प्रकल्प इथं प्रस्तावित आहेत. ही वीज शेतकऱ्यांची जगण्याची हक्काची साधनं हिसकावून घेऊन तयार केली जाणार, हे उघड आहे. पण त्याबदल्यात कोणतही लेखी ठोस आश्वासन सरकार किंवा खाजगी कंपनी गावकऱ्यांना देत नाहीये. आता गावकऱ्यांनी हा औष्णिक उर्जा प्रकल्पच नको, अशी भूमिका घेतलेय. शहरांसाठी वीज हवी तर शहरातच प्रकल्प उभारा, असं डॉ. विष्णू पाटील सांगतात.

डॉ. पाटील गावचेच रहिवासी. तरुण डॉक्टर. प्रॅक्टिस करुन स्वत:पुरत न जगता कायद्याचा कीस पाडून सगळ्यांना कायदा समजवण्यात त्यांचा मोठा पुढाकार आहे. स्थानिकांना भकास करुन कुणाचा विकास साधणार? हा प्रश्न ते थेट विचारतात. डॉ. विष्णू यांना साथ आहे ती प्रत्येक शेतकऱ्याची. कमळपाडा इथले द्वारकानाथ नामदेव पाटील हे अस्सल पेणच्या बाजात बोलतात. शेतीत त्यांनी आयुष्य खपवलंय. समुद्राचं पाणी शेतात शिरु नये म्हणून बंधारे घालण्यापासून ते नवनवी पीकं घेण्यापर्यंत सगळं जीव लावून केलं. आणि आता तीच जमीन जाणार, हे त्यांना मान्यच नाही. ते विचारतात की, शरद पवार एवढे मोठे शेतकरी आहेत. महाराष्ट्राचे आजचे नेते ते म्हणवतात. मग का नाही, त्यांच्या जमिनीवर ते हे प्रकल्प सुरु करत, शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्रकल्प येतात. मग कृषीमंत्र्यांच्या का नाही? धेरडं आणि नऊ गाव संघर्ष समितीने विद्युत प्रकल्पाचं हे फक्त विरोधाचं आंदोलन नाही चालवलं. तर नऊ गावांना लागणाऱ्या एकूण वार्षिक वीजपुरवठ्याचा अभ्यास ते करतायत. एवढी मेगावॅट वीज गावात कचऱ्यापासून तयार होऊ शकते. याचा अभ्यास त्यांनी केलाय. आणि गावामध्ये लवकरच बायोमास वीजनिर्मितीचा हा प्रकल्प ते ट्रान्स्फपरंट एनर्जी या कंपनीच्या टेक्निकल सपोर्टने सुरु करणार आहेत. त्यासाठीची सरकारी मान्यता अद्याप न मिळाल्यामुळे बायोमासपासून गावची वीजनिर्मित रखडलेय. त्यांच्या या लढ्यात ग्रीनपीस सारख्या आंतरराष्ट्रीय एनजीओची मदतही त्यांनी घेतलीय.

मुंबईमधल्या मल्टीप्लेक्स सिनेमांमध्ये ग्रामीण विकासाचा स्वदेस पहायला लोकांना आवडतो. पण जेव्हा असे अस्सल स्वदेसी हिरो गावागावांत आज विकासाचे पर्यायी, खेड्यांना, तिथल्या गरजांना केंद्रस्थानी ठेवलेले पर्याय पुढे आणतात, तेव्हा त्यांच्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष केलं जातंय. किंवा त्यांना प्रोत्साहन तरी दिलं जात नाहीये. धेरंड्चं आंदोलन गावकऱ्यांच्या एकीमुळे राज्यभरात गाजतंय. गावात पिकणारं पिवळधम्मक भाताचं पीक, प्रत्येक शेतकऱ्याच्या मालकीचं असलेलं एक शेततळं त्यातून जिताड्याचं मिळणारं वार्षिक हमखास उत्पादन हे सगळं सोडून गावात औष्णिक वीज निर्मितीचं प्रदूषण येऊ द्यायचं नाही हा मार्ग गावकऱ्यांनी विचाराअंती स्विकारलाय. त्याही पुढे जाऊन सरकारला जर हा प्रकल्प याचं भागात आणायचा असेल तर शेतकऱ्यांच्या पडीत वरकस जमीनी त्यासाठी तपासून बघाव्यात, आणि पडीत जमिनीत तो प्रकल्प आणावा, यासाठी आता धेरंडवासीयांचं आंदोलन सुरु आहे.

सिंचनाखाली असलेल्या, तीन पीकं देणाऱ्या जमिनींचं मोल शेतकऱ्यालाच कळू शकतं. शेतीला तो माय म्हणतो. त्यामुळे फक्त पैशांच्या सौद्यांनी शेतकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे हे प्रश्न चुटकीसरशी सुटतील, असं मानणंचं चूक ठरतं. त्यांच्या भावना, गावची संस्कृती, परंपरा, आणि ग्रामीण जीवनशैलीमध्ये होऊ घातलेल्या बदलांचा हा टप्पा असतो. त्याची पूर्वतयारी सरकारने करणं गरजेचं असतं. विदेशी गुंतवणूक, उद्योगधंद्यांना द्यावयाच्या सवलती यांची धोरणं ठरवताना या संवेदनशील प्रश्नाचा विचार तांत्रिक पद्धतीने होतोय. आणि त्यामुळेच विकास प्रकल्पांची ही गणितं चुकतायत, असं दिसतंय. तळकोकणातील कुडाळ तालुक्यातील टाळंबा धरणातील प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न गेली ३० वर्ष पेटलेला आहे. ना टाळंबा धरण पूर्ण झालंय. ना प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटलेयत.

- **इंदिरा सागर गोसेखुर्द–प्रकल्प**

विदर्भातील महत्वाकांक्षी इंदिरा सागर गोसेखुर्द प्रकल्प परिसरातील राजीव गांधी टेकडीवर गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्यावतीने शेकडो प्रकल्पग्रस्तांनी धरणे आंदोलन केले. विविध समस्यांचे निवेदन तत्कालीन तहसिलदार व ठाणेदार यांना निवेदन देवून न्याय मागणी केली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत मौजे गोसेखुर्द व मौजे गोसी बु. या गावातील

तसेच इतर गावातील भूमिसंपादन अधिनियम १८९४ नुसार संपादीत केलेल्या खातेदारांना १८ जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार विशेष आर्थिक पॅकेजचा लाभ देण्यात यावा, प्रकल्पात पुनर्वसनासाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादीत केली आहे. त्या शेतकऱ्यांना २०१३ चे विशेष आर्थिक पॅकेज देण्यात यावे, तसेच कॅनलसाठी संपादीत केलेल्या शेतजमीन धारकांना ही २०१३ पॅकेजचा लाभ देण्यात यावा, पाथरी पुनर्वसनस्थळी रस्त्यावर आलेले अतिक्रमण हटविण्यात यावे, पूर्व ले–आऊटचे मोजमापन करून सिमांकन करण्यात यावे, गावाला संपूर्ण तारेचा सुरक्षा कुंपण करण्यात यावे, पुनर्वसन स्थळी सोडलेली जमीन संपादित करून पाथरी गावाच्या उपयोगासाठी आणावी, धरणासाठी ज्या शेतातील माती आणलेली आहे, त्या शेतकऱ्यांना मोबदल्याचे पुनर्वसन २०१३ पॅकेजचा लाभ द्यावा, ज्या शेतकऱ्यांची उपजिवीका भागविणारी शेती प्रकल्पाच्या कुठल्याही कामासाठी शेती संपादित केली असेल किंवा जागा संपादित केली असेल त्या सर्व खातेदारांना पॅकेजचा लाभ देण्यात यावा, गोसेखुर्द परिसरातील सर्व वहिवाटीचे रस्ते दुरूस्त करून देण्यात यावे, प्रकल्पग्रस्तांच्या दुरूस्तीला व उपलब्धतेला प्राधान्य देण्यात यावे व दुरूस्ती तात्काळ करण्यात यावी. भुसंपादन प्रकरणातील मोबदला पुनर्वसन अनुदान, नागरिसुविधा व २०१३ च्या पॅकेजमधील वाटपाच्या अंमलबजावणीतील त्रृटीमुळे व प्रशासनाने कर्मचाऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांना योग्य ते सहकार्य मिळत नसल्याने अनेक प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना विनाकारण त्रास व मनस्ताप सहन करावा लागतो आहे. हा मनस्ताप संतापात व्यक्त होऊ शकतो याची वरिष्ठांनी नोंद घ्यावी आदी मागण्याचे निवेदन देण्यात आली. धरणे आंदोलनाला गोसे परिसरातील चिचाळ, सौंदड, पाथरी, कुर्झा, वासेळा, मालची, पेंढरी, सावरला, नेरला आदी गावातील प्रकल्पग्रस्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. धरणे आंदोलन सभेत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. विविध समस्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती संयोजक विलास भोंगाडे, दादा आगरे, शेखर रामटेके, गुलाब उके, सिताराम रेहपाडे, गुणवंत तागडे, शिवशंकर माटे, माणिक दुबे, शेखर मेश्राम, रमेश भेंडारकर, नरेंद्र बिलवणे, वामन भोयर, केशव नखाते, भिमराव भिमटे, सुदाम मेश्राम, राजानंद वानखेडे, पांडू चन्ने, गोमा भेंडारकर, परसराम काटेखाये, श्रीराम भेंडारकर, माधो आगरे, रामरतन काटेखाये, विनोद नखाते, केशव भुरे, राजु मेश्राम,

देवराम मोहरकर आदी उपस्थित होते. यावेळी पवनी पोलीस स्टेशनचे ठाणेदार मधुकर गीते यांचा कडक बंदोबस्त होता.

- **तिलारी प्रकल्प–**

वनटाईम सेटलमेंटची रक्कम म्हणून गोवा व महाराष्ट्राने देऊ केलेल्या पाच लाख रुपयांवर तिलारी प्रकल्पग्रस्त समाधानी नाहीत. त्यांनी ती रक्कम वाढवून देण्याची मागणी केली. तथापि, वाढीव रक्कम देण्याबाबत निर्णय न झाल्यास तिलारी बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल, अशी भूमिकाही प्रकल्पग्रस्तांनी आज आयनोडे झरे येथील भूतनाथ मंदिरात झालेल्या बैठकीत मांडली. तिलारी आंतरराज्य धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या पाल, पाटये, आयनोडे, सरगवे, शिरंगे, केंद्रे, कोनाळ–भरडोंगरवाडी आदी गावांतील प्रकल्पग्रस्त या बैठकीला उपस्थित होते. तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, आमदार दीपक केसरकर, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, पाटबंधारे मंत्री सुनील तटकरे व दयानंद मांद्रेकर आणि संघर्ष समितीच्या पाठपुराव्यांमुळे प्रत्येक दाखलाधारक प्रकल्पग्रस्त कुटुंबाला पाच लाख रुपये रक्कम देण्याची घोषणा दोन्ही राज्यांच्या संयुक्त बैठकीत करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर संघर्ष समितीने प्रकल्पग्रस्तांची जाहीर सभा भूतनाथ मंदिरात बोलावली होती.

मुंबई येथे प्रकल्पग्रस्त समितीची बैठक झाली त्यात प्रकल्पग्रस्तांनी पाच लाख रुपये ही रक्कम आपल्याला योगदानाच्या मानाने फारच कमी असल्याचा मुद्दा उपस्थित केला. प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरी देण्याच्या अटीवर धरण उभारणाऱ्या शासनाने गेल्या पस्तीस वर्षांत उण्यापुऱ्या दोनशे लोकांना नोकऱ्या दिल्या. उर्वरित हजारभर प्रकल्पग्रस्त बेरोजगार आहेत. त्यांना नोकरी न देता केवळ पाच लाख रुपयांवर त्यांची बोळवण केली जातेय, हे न पटणारे आहे, असा मुद्दा मांडला. त्यामुळे पाच लाख रुपयांऐवजी मोठी रक्कम शासनाने द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. पाच लाख रुपये मान्य असणाऱ्यांची संख्या अत्यल्प तर अमान्य असणाऱ्यांची संख्या मोठी होती. त्यामुळे संघर्ष समिती पदाधिकाऱ्यांनी वाढीव रक्कम मिळावी असा शब्द पदाधिकारी यांनी बैठकीत दिला होता. प्रकल्पग्रस्तांना जाहीर झालेली रक्कम अल्प

आहे, ती वाढून मिळावी हे आपलेही मत आहे; पण तसे झाले नाही तर समिती जो निर्णय घेईल तो आपल्याला मान्य असेल का, असे विचारले असता प्रकल्पग्रस्तांनी सहमती दर्शविली.

- **अरुणा प्रकल्प, वैभववाडी**

अरुणा प्रकल्पग्रस्ताचे काम गेली अकरा वर्षे सुरू आहे. ५४ कोटींची मंजुरी असलेल्या या प्रकल्पावर आतापर्यंत पावणे चारशे कोटी रूपये खर्च झाले आहेत. धरणाच्या भिंतीचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे; मात्र त्या तुलनेत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम दहा टक्केसुद्धा झालेले नाही, हे वास्तव आहे. २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार प्रकल्पग्रस्तांचा निवाडा करावा, अशी मागणी तेथील प्रकल्पग्रस्तांची आहे. मोबदला देताना पंचनाम्यानुसार द्यावी, अशा काही प्रमुख मागण्या त्यांच्या आहेत. या मागण्यांसाठी गेली काही वर्षे प्रकल्प संघर्ष समिती आणि अन्य मंडळी झटत आहेत.

धरणाचे काम ७० ते ८० टक्के पूर्ण झाल्यानंतरच पुनर्वसनाच्या कामाला सुरवात होते, हे कटू असले तरी सत्य आहे. ती सुरुवात होण्याकरितासुद्धा तेथील प्रकल्पग्रस्तांना वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. अरुणा धरणदेखील त्याला अपवाद ठरलेले नाही. या धरणाचे काम आणि प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम याचा कुठेही ताळमेळ बसत नाही. ज्यांनी आपल्या लाखमोलाच्या जमिनी धरणाकरिता दिल्या, त्यांची परवड थांबविण्याच्या दृष्टीने राजकारण्यांनी उपाययोजना करण्याऐवजी एकमेकांवर राजकीय कुरघोडी करून प्रकल्पग्रस्तांना संकटात टाकले आहे.

- **सरदार सरोवर प्रकल्प :–**

नर्मदा खोऱ्यात वसलेली, जगातील सर्वात प्राचीन संस्कृती आज विनाशाच्या कडयावर उभी आहे. २ महाकाय, ३० मोठया व १३५ मध्यम धरणांनी नर्मदा नदीला जखडून टाकले आहे. प्रत्येक धरणामुळे उद्धस्त होणाऱ्या लाखो लोकांबरोबरच येथील अत्यंत सुपीक जमीन, शेती–बागायती, जंगल, प्रत्येक गावातील हजारो वृक्ष, उद्योग, व्यापार, कारागिरी, शाळा–महाविद्यालये, मंदिरे–मशिदी, सर्व काही जलाशयाच्या पोटात गडप होणार का? आजवर अनेक धरणे बांधली गेली तेथील गावे नष्ट झाली, शहरे जलमग्न झाली आणि विस्थापित झालेले लोक

आजही पुनर्वसित होऊ शकले नाहीत. नर्मदा खोऱ्याचेही तेच होणार का? सरदार सरोवर धरण मोदी सरकारने अखेर पूर्ण केलेच. दरवाजेही बसवून धरणाची उंची पूर्ण १३८.६८ मीटर्सपर्यंत नेली. दरवाजे अद्याप बंद केले नाहीत, एवढेच. सुमारे ५०००० कुटुंबांचे पुनर्वसन पूर्ण झालेले नसताना, हजारो शेतकरी कुटुंबांना जमीन, भूमिहीनांना पर्यायी उपजीविकेचे साधन, घरप्लॉट, नागरी सुविधा यांसह गावठाणे झालेली नसतानाही ही सर्व २४५ गावे, घरे, शेते बुडवणे हा कुठला न्याय आहे? अगदी विकासाच्या नावावरही हा अन्याय समर्थनीय होईल काय? हे बेकायदेशीर बुडित नर्मदा खोऱ्यावर थोपण्याचा निर्णय नव्या केंद्र सरकारने सत्तेवर येताच घेऊन अंमलात आणला आणि ३१ वर्षांच्या मैदानी व न्यायालयीन संघर्षाच्या दरम्यान जे विकसनशील पुनर्वसनाचे धोरण व योजना बनवली गेली, सर्वोच्च न्यायालयाचे जे आदेश मिळाले, त्या सर्वाला धाब्यावर बसवत अखेर धरण पूर्ण केले. (नर्मदा जल–जंगल–ज़मीन हक्क सत्याग्रह राजघाट बुलेटिन सुनीती सु. र. २८ जुलै २०१६) आंदोलनाच्या दबावामुळे गुजराथ व महाराष्ट्रातील १४००० कुटुंबांचे जमिनीसह पुनर्वसन झाले, परंतु आजही गुजराथ, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील पहाडी आदिवासी क्षेत्रात सुमारे १५०० आदिवासी कुटुंबे पुनर्वसनाशिवाय बाकी आहेत आणि मध्यप्रदेशातील मैदानी प्रदेशात, मोठया लोकसंख्येची, पक्क्या घरांची ४५००० हून अधिक कुटुंबे! या सर्वांना जलसमाधी देण्याचे हे क्रूर कारस्थान आहे. केवळ नर्मदा खोऱ्यातील नैसर्गिक साधन संपत्तीच्याच नव्हे तर नर्मदा नदीच्याच अस्तित्वाचा हा प्रश्न आहे. गुजराथमध्ये कच्छ–सौराष्ट्रमधील दुष्काळग्रस्तांच्या तोंडाला पाने पुसत कोकाकोला, अंबानी, अडानीकडे नर्मदेचे पाणी वळवणे केंव्हाच सुरू झाले आहे. कोकाकोला कंपनीला दररोज ३० लाख लीटर्स, मोटार इंडस्ट्रीला दररोज ६० लाख लीटर्स पाणी देण्याचे करार झाले आहेत तर इंडस्ट्रियल कॉरिडॉरच्या क्षेत्राला तर तब्बल ४ लाख हेक्टर्स जमीन व बहुतांश पाणी वळवले जाणार आहे. तीच गोष्ट पेयजलाची. हजारो गावांना पेयजल पुरवण्याचा वायदा कागदावरच राहिला. प्रत्यक्षात कच्छ व अन्य जिल्ह्यांतील गावांना नगण्य पाणी देऊन गांधीनगर, अहमदाबाद, वडोदरा या शहरांनाच पेयजलही वळवले जात आहे. हे सारे मूळ योजनेच्या हेतूलाच हरताळ फासणारे आहे. सर्वात गंभीर बाब ही की धरणाचा मूळ ४२०० कोटी रुपयांचा संभाव्य खर्च आज अधिकृतरीत्या ९०००० कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. मात्र मागील ३० वर्षांत केवळ ३० ते ४० टक्के

कालवे बांधले गेले आहेत, यावरून धरणाचे केवळ 'राजकीय' व 'आर्थिक' उद्देशच सफल झालेले दिसत आहेत.  या धरणामधली महाराष्ट्र, मध्यप्रदेशची गुंतवणूक हजारो कोटी रुपयांची व हजारो कुटुंबांच्या विस्थापन–पुनर्वसनाची असूनही, धरणाचे लाभ मात्र या राज्यांना अद्यापही मिळत नाहीत. त्यांच्या हक्काची वीजही त्यांना मिळत नाहीय. पाण्याच्या तर एका थेंबावरही या राज्यांना अधिकार नाही. या सर्व परिस्थितीत, किमान सर्व विस्थापितांचे पुनर्वसन होईपर्यंत धरण थांबवण्याचे लेखी आश्वासन मागील सरकार व माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिले होते. मात्र मोदी सरकारने ते देखील धुडकावले व धरण पूर्ण केले. पुनर्वसनामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या झा आयोगाने ७ वर्षे केलेल्या तपासाचा अहवाल खुला करण्यास उच्च न्यायालयालाही रोखले गेले. या अहवालातून हजारो विस्थापित कुटुंबांच्या पुनर्वसनामध्ये झालेला हजारो कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस येऊ नये म्हणून हे सर्व प्रयत्न चालू आहेत. आज हा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने मध्यप्रदेश सरकारकडे सुपूर्द केला आहे.  आता तर मध्यप्रदेश सरकारने बॅकवॉटर लेव्हल्स बदलून बुडित क्षेत्रातील १६००० कुटुंबे बुडितात येत नसल्याचे सांगितले आहे. वस्तुत: त्यातील कित्येक गावांमध्ये पूरस्थिती नसताना, सामान्य स्थितीतही याआधी बुडित आलेले आहे. विस्थापितांची संख्या कमी दाखवण्यासाठी हा खेळ चालू आहे. खुद्द न्यायालयालाही पुनर्वसनाचा झीरो बॅलन्स (म्हणजे सर्वांचे पुनर्वसन झालेले असल्याचा) चा अहवाल सरकारने दिला आहे. अशा स्थितीत येणारा पावसाळा किती बुडित, किती हाहा:कार, किती वंचना सोबत घेऊन येईल याची कल्पना आपण करू शकतो. मात्र हे सर्व आम्ही चुपचाप सहन करणार नाही तर आपल्या हक्कांसाठी बुडिताशीही टक्कर घेऊ या निर्धारासह यावर्षीचा सत्याग्रह राजघाट, बडवानी येथे सत्याग्रह सुरु झाला. या सत्याग्रहाच्या मागण्या आहेत–

- सरदार सरोवर धरणाचे दरवाजे बंद करू नका.
- कुणाही विस्थापिताची मालमत्ता पुनर्वसनाशिवाय बुडवू नका.
- २०१३ च्या नव्या भूसंपादन कायद्यानुसार, विस्थापितांच्या संपत्तीवर त्यांचा हक्क मान्य करा.

- मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजराथ येथील वस्तुस्थितीची खरी माहिती देणारे शपथपत्र संबंधित सरकारांनी द्यावे. ज्यांचे पुनर्वसन झालेले नाही त्या सर्वांना कायदेशीररीत्या जमीन व नागरी सुविधांसह गावठाण देऊन त्यांचे पुनर्वसन पूर्ण करा.
- न्या. झा आयोगाचा अहवाल सार्वजनिक करा.
- सरदार सरोवराच्या पर्यावरणीय परिणामांचे तसेच लाभहानीचे मूल्यांकन करा.
- धरणाचे लाभ गुजराथमधील शेतकरी, आदिवासी, दुष्काळग्रस्त भागांनाच मिळू द्या. लाभक्षेत्रातील जमीन उद्योगपतींना देऊ नका. या सर्व मुद्यांसोबतच नर्मदेच्या अस्तित्वाचा मुद्दाही जोडलेला आहे. नर्मदेमधून क्षिप्रा, गंभीर, मही, कालीसिंध या नद्यांमध्ये प्रतिसेकंद ५००० ते १५००० लीटर्स पाणी उचलून टाकण्याची मध्यप्रदेश शासनाची लिंक योजना, नर्मदेचे पाणी तर प्रदूषित करेलच, त्याशिवाय नर्मदेचे अस्तित्वच धोक्यात आणेल, हे नक्की. या सर्वाकडे हा सत्याग्रह लक्ष वेधणार आहे. म्हणूनच देशभरातील शाश्वत विकासवादी, मानवअधिकारवादी, संवेदनशील व विचारशील नागरिक, नर्मदेचे भक्त, जनआंदोलनांचे साथी या सत्याग्रहास समर्थन देण्यास येत आहेत...

### ४.४.२ प्रकल्प ग्रस्त सध्यस्थिती

हक्कांसाठी शासन दरबारी नागरिकांची वर्षानुवर्षे फरफट : नागरी सुविधांचा केवळ आभास घोडेगाव–आंबेगाव तालुक्यातील पुनर्वसन गावठाण आंबेगाव गावठाणातील नागरिकांना गेली २५ वर्षे नागरी सुविधांपासून वा हक्कांच्या उपाययोजनापासून वंचित राहिल्याने अनेक वर्षे हक्कांसाठी शासन दरबारी नागरिकांची फरफट सुरूच आहे. प्रकल्पग्रस्त झाल्यानंतर दैनंदिन जीवनही प्रकल्प बाधितच राहिले आहेत. (पुनवर्सन होऊनही प्रकल्पग्रस्त शापितच!, लेख, महाराष्ट्र टाईम्स)

डिंभे प्रकल्पासाठी तालुक्यातील पश्चिम भागातील आंबेगावसह २० गावे व वाड्यावस्त्या यांचे पुनर्वसन करण्यात आले. यात तालुक्याचे गाव असणारे आंबेगावचे पुनर्वसन घोडेगाव लगत ५०० मीटर अंतरावर पुनर्वसन आंबेगाव गावठाण म्हणुन करण्यात आले. याठिकाणी कृष्णा खोरे महामंडळाने गावठाण तयार करून **१३** नागरी सुविधा देण्याचे

नियोजन केले. यात भूखंड, अंतर्गत रस्ते, विजेचे खांब, स्मशानभूमी, दफनभूमी, बसथांबा, पाणी योजना, शाळा इमारत, बखळ जागा, मुख्य रस्ता, सार्वजनिक शौचालय आदी देताना या ठिकाणी वास्तव्यास येणाऱ्या कुटुंब संख्या यांचा विचार न करता अंदाजे व मनमानी करत चुकीच्या पद्धतीने नियोजन केले असल्याने भूखंड ताबा देताना एकच भूखंड दोनदा वाटप करणे आदी प्रकार वारंवार घडत गेले. त्यामुळे कमी भूखंड व जादा ताबे यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांत वाद वाढू लागले आहेत. यातील अनेक केसस जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस ठाणे, कोर्टात दाखल झाले आहेत. ज्या पुनर्वसन ठिकाणी गावठाण बसविले त्याठिकाणी नागरिक टप्याटप्याने स्थलांतरित झाले गरजेनुसार आपले बस्तान बांधु लागले; परंतु नागरिक सुविधांचा आभास असल्याने त्या मिळविण्यासाठी नागरिकांना शासनदारी हेलपाटे मारीत पायपीट करावी लागली. यातच पुनर्वसन विभाग हे धरणग्रस्त यांच्याबाबत नेहमीच उदासीनता दाखवत गेल्याने शासन दरबारी हेलपाट मारूनही हाती फक्त निराशा आली. त्याची साधी दादही आणि फिर्यादही ऐकण्यास कुणाला वेळ नाही. त्याने प्रकल्पग्रस्त होऊन जणू स्वत:ला व कुटुंबालाही याप्रकल्पात बाधित करून एकप्रकारचे शापच घेतले आहेत. धरणग्रस्तांबरोबर पुनर्वसनचे अधिकारी व कर्मचारी हे आमचे काम नाही, वरच्या साहेबांचे काम आहे असे म्हणून वेळ टाळून नेत आहेत. त्यामुळे नागरिकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे धरणग्रस्तांची फरफट अजूनही थांबलेली नाही. यात जे भूखंड पाडले जे कमी जास्त उताराचे नाले, ओढे असल्याने अनेक भूखंडांना रस्ते नाही भूखंडाचे नियोजन अंदाजे झाल्याने आज घरे बांधताना धरणग्रस्तांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यात प्रकल्पग्रस्त यांच्यात भांडणे होऊन वाद वाढले आहेत. हे वाद जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस ठाणे यांच्या दारी धडका घेऊ लागले आहेत. येथेही नेहमीप्रमाणे हे आमचे काम नाही. हे पुनर्वसन विभागाचे काम आहे. तर काही जण कायद्याचा बडगा उगारू लागले. त्यामुळे हतबल धरणग्रस्त हे मेटाकुटीला आले व निराश हती होऊन स्वत:च्याच तोंडात मारल्यासारखे माघारी येऊ लागले आहेत. आंबेगाव गावठाण येथील गावाचे पुनर्वसन होऊन ३० वर्षे होऊनही येथे अद्याप स्मशानभूमी, दफनभूमी, बसथांबा झाला नसल्याने येथील लोकांना एखादी मयत झाल्यानंतर घोडेगाव येथील स्मशानभूमिचा आसरा

घ्यावा लागत आहे. ही स्मशानभूमी साधारण ३ किमी आंतरावर आहे. यात होणारा त्रास व मनस्ताप हा मेलेल्या व्यक्तीपेक्षाही भयान असे आहे. स्मशानभूमी व दफनभूमी जागा संपादन असून, केवळ कृष्णा खोरे व पुनर्वसन विभाग यांच्या हलगर्जीपणामुळे निधी असूनही व ताबा होऊनही अद्यापही उभारणी झाली नाही. यातच भूखंडामध्ये असणारे विजेचे खांब हे चुकीच्या पद्धतीने मध्येच उभे केले आहे. त्यावरून जाणारी विद्युत वाहिनी तारा लोंबकळू लागल्याने अनेक अपघात वारंवार घडत आहेत. यातच अनेक कुजलेले खांब अचानक पडले आहेत. या बाबींकडेही विद्युत वितरण विभागाचे नेहमीच दुर्लक्ष होत आहे. भविष्यात मोठी अपघात घटना होण्याची दाट शक्यता येथील ग्रामस्थांमध्ये आहे.

- **धरणग्रस्तांच्या जमीनी**

या गावठाणात असणाऱ्या धरणगस्तांच्या जमीनी ८ ते १० किलोमीटर अंतरावर आहे. त्या जमिनींना पाणी सुविधा नाही त्यामुळे पडणाऱ्या पावसावर त्यांची शेती अंवलंबून आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबांची पोटाची खळगी भरण्यासाठी रोजंदारीने काम करण्याशिवाय पर्याय नाही यातच होतकरू तरूण शिक्षित मुले धरणग्रस्त दाखले असूनही त्यांना नोकरी अथवा रोजगार नसल्याने मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. त्यामुळे या धरणग्रस्तांकडे शासन लक्ष देईन का, त्यांचे प्रश्न सोडविल का, शासन जागे होईल का, असे अनेक प्रश्न डोके वर काढत आहे.

- **शेतकऱ्यांचा टाहो**

भारत हा कृषिप्रधान देश असला तरी, स्वातंत्र्यानंतरच्या ६७ वर्षानंतरही या अन्नदात्या बळीराजाची विटंबना, फरपट आणि ससेहोलपट थांबलेली नाही. गेल्या २० वर्षात महाराष्ट्रासह देशभरात दोन लाखांवर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्यांचे हे दुर्दैवी सत्र अद्यापही थांबलेले नसतानाच आता उत्तर प्रदेशातील मथुरा परिसरातील ११ गावातील २५ हजार धरणग्रस्त-विस्थापित शेतकऱ्यांनी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याकडे अर्ज पाठवून स्वातंत्र्यदिनी सामूहिक आत्महत्येला परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे. राज्य सरकारे आणि केंद्र सरकारने व्यापक उपाययोजना अंमलात आणूनही शेतकऱ्यांच्या मूळ समस्या सुटलेल्या तर नाहीतच. उलट राज्य सरकारांच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे आणि विकासाच्या गोंडस

नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने हिसकावून घेऊन त्यांना देशोधडीला लावायच्या कुटील कारस्थानामुळेच मथुरेतील शेतकऱ्यांवर सामूहिक आत्महत्येचा विचार करायची वेळ आली आहे. १७ वर्षांपूर्वी ११ गावातील ९४३ शेतकऱ्यांच्या ७०० एकर जमिनी उत्तर प्रदेश सरकारने त्यांना फसवून सक्तीने ताब्यात घेतल्या. या जमिनी पिकाऊ असतानाही या जमीन मालक शेतकऱ्यांना सरकारने तेव्हा, या जमिनींच्या मोबदल्यात पिकाऊ जमिनी देऊ अशी ग्वाही दिली होती. प्रत्यक्षात मात्र कोणतीही नुकसान भरपाई आणि पर्यायी जमिनी न देताच १९९२ मध्ये या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतून हाकलून लावण्यात आले.

गोकुळ धरणासाठी त्यांच्या या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. पिकाऊ जमिनी तर गेल्याच आणि १९९८ मध्ये धरणाच्या पाण्यात त्या बुडाल्या. पर्यायी जमिनी नाहीत आणि नुकसान भरपाई मिळाली नसल्याने, या शेतकऱ्यांची हजारो कुटुंबेही देशोधडीला लागली. त्यांचे उत्पन्नाचे–उदरनिर्वाहाचे वडिलो–पार्जित साधनच सरकारने काढून घेतल्यामुळे त्यांच्यावर रोजगारी करायची वेळ आली. रोजगारी मिळाली नाही तर, त्यांना उपासमारीला सामोरे जावे लागले. या धरणग्रस्त शेतकऱ्यांनी आपल्या अन्यायाविरोधात वारंवार मोर्चे काढून आणि आंदोलने करूनही सरकारवर काही परिणाम झाला नाही. उलट पोलिसांच्या बळावर सरकारने त्यांची ही आंदोलने चिरडून टाकली. पुढे या धरणग्रस्त शेतकऱ्यांना काही नुकसान भरपाई दिली, पण २०११ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी मात्र अद्यापही केलेली नाही. सरकारकडून आपल्याला अद्याप ८०० कोटी रुपयांची नुकसान भरपाई मिळालेली नाही, असे या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. संघ परिवारातील भारतीय किसान संघाच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षी या शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनावर राज्य सरकारने लाठीमार केला होता. शेतकऱ्यांवर खोटे खटले भरून त्यांचा छळही सुरुच आहे. तातडीने नुकसान भरपाई देऊ हे आश्वासन राज्य सरकारने गेल्या १७ वर्षात पाळलेले तर नाहीच, उलट हे सरकारच शेतकऱ्यांना आपले शत्रू वाटत आहे, ही लोकशाहीला आणि देशालाही शरमेची बाब होय.

सरकारच वैरी मथुरा परिसरातील ११ गावातील धरणग्रस्त शेतकऱ्यांचीच ही करुण कहाणी नाही. स्वातंत्र्यानंतरच्या ६७ वर्षात केंद्र आणि राज्य सरकारांनी धरणे, कालवे,

औद्योगिक वसाहती, शहरीकरण, औद्योगिकरण, रस्त्यांचे रुंदीकरण, अशा विविध कारणांसाठी लाखो एकर जमिनी शेतकऱ्यांकडून अक्षरश: कवडीमोलाने हिसकावून घेतल्या.

ब्रिटिशांच्या काळातील जुनाट आणि कालबाह्य झालेला भूमीसंपादन कायदा राबवत, लाखो शेतकऱ्यांना भूमीहीन केले. शेतकऱ्यांकडून काढून घेतलेल्या जमिनी राज्य सरकारांनी मात्र प्रचंड किमतीने विकून आपले उखळ पांढरे करून घेतले. पश्चिम बंगालमध्ये नंदीग्राम आणि सिंगूर परिसरातील हजारो एकर जमिनींच्या संपादनाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांचा गोळीबार झाला. ६० च्यावर शेतकरी त्या आंदोलनात ठार झाले. तरीही शेतकऱ्यांच्या हिताचा कळवळा दाखवणाऱ्या त्या सरकारने जमिनींच्या संपादनाची कारवाई काही रद्द केली नाही.

उत्तर प्रदेशातील दिल्ली जवळ असलेल्या नोएडा आणि परिसरातील दहा गावातील हजारो एकर जमिनी बहुजन समाज पक्षाच्या सरकारने सक्तीने ताब्यात घेतल्या. त्या दडपशाहीला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर अत्याचाराचा बुलडोझर त्या सरकारने फिरवला होता.

महाराष्ट्रातील शेकडो धरणे, लघु पाटबंधारे, कालव्यांच्या प्रकल्पासाठीही सरकारने माती मोलाने लक्षावधी एकर जमिनी बळकावलेल्या आहेत. या धरणामुळे विस्थापित झालेल्या सर्व धरणग्रस्तांचे अद्यापही विकसनशील पुनर्वसन राज्याच्या स्थापनेला ५५ वर्षे उलटली तरीही झालेले नाही. ज्यांच्या अपूर्व त्यागामुळे धरणांच्या आणि कालव्यांच्या क्षेत्रात नंदनवन फुलले, त्या परिसरातील शेतकऱ्यांनाही धरण–ग्रस्तांच्या सुखदु:खाशी काही देणे घेणे राहिलेले नाही.

सरकार तर धरणग्रस्तांची उपेक्षाच करते आणि समाजही त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काहीही करीत नाही. त्यामुळेच धरणग्रस्तांनी कितीही आंदोलने केली तरी, निगरगट्ट सरकारला पाझर फुटत नाही. कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यां–च्या आत्महत्यांचे सुरू असलेले सत्र थांबत नाही. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने मंजूर केलेला मूळचा सुधारित भूमी संपादन कायदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने स्वीकारून तो अंमलात आणल्याशिवाय धरणग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार नाही. केंद्राने आधी पुनर्वसन आणि मग धरण हे धोरण अंमलात आणायला हवे. कोणत्याही धरण किंवा सार्वजनिक विकासाच्या कामासाठी जमिनींचे संपादन करण्यापूर्वीच, त्या प्रकल्पाने विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांना

नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम दिलीच पाहिजे, त्याशिवाय भूमिसंपादन कायदेशीर होणार नाही, असा कायदाच शेतकऱ्यांच्या हितासाठी लागू करायला हवा.

- **धरणग्रस्तांची फरपट**

कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सांगली जिल्ह्यातल्या चांदोली धरणग्रस्तांनी, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी धरणे आंदोलन सुरू केल्याने, महाराष्ट्रातल्या धरणग्रस्तांच्या गेली ५० वर्षे सुरू असलेल्या फरपटीवर झगझगीत प्रकाशझोत पडला आहे. माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत १९७६ मध्ये चांदोली प्रकल्पाचा प्रारंभ झाला. ५८ टी. एम. सी. क्षमतेचे हे धरण बांधून पूर्णही झाले. पण, या धरणाच्या पाण्यात बुडालेल्या सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातल्या हजारो विस्थापित धरणग्रस्तांचे सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे विकसनशील पुनर्वसन चाळीस वर्षानंतरही झालेले नाही. तुमचे धरण आणि आमचे मरण, पाणी तुमच्या पिकांना, आम्ही लागलो भिकेला?, अशा घोषणा देत चांदोलीसह सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातल्या हजारो धरणग्रस्तांनी रस्त्यावर उतरून उग्र आंदोलने केली. धरणाच्या पाण्यात जलसमाधी घ्यायच्या धमक्याही दिल्या. आंदोलने केल्यावर जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडून धरणग्रस्तांच्या सर्व समस्या निश्चित कालावधीत सोडवायची आश्वासने दिली जातात. धरणग्रस्त त्यांच्या पुनर्वसन झालेल्या गावी परतताच प्रशासन सोयीस्करपणे त्यांना दिलेली आश्वासने विसरतात. सरकारच्या धोरणानेच नांदते संसार वाऱ्यावर लागलेल्या या धरणग्रस्तांना सरकार आणि प्रशासनाला जाग आणायसाठी पुन्हा आंदोलने करावी लागतात. केवळ दक्षिण महाराष्ट्रच नव्हे, तर राज्यात झालेल्या बहुतांश धरणग्रस्तांचे पुनर्वसन सरकारने अद्यापही केलेले नाही.

धरणग्रस्तांना त्यांच्या मूळ गावातून उठवून पाच पन्नास/शंभर किलोमीटर दूर अंतरावर असलेल्या गावात वसवले गेले. त्यांच्यासाठी वसाहती बांधल्या गेल्या. पण, त्या वसाहतीत पाणी, शाळा, आरोग्य, रस्ते या प्राथमिक सुविधांचीही व्यवस्था सरकारने केलेली नाही. आम्हाला आमच्या घरातून हाकलून लावले, आम्ही काही तुमच्याकडे घरासाठी जागा आणि जमिनी मागितलेल्या नव्हत्या. तुम्हीच आम्हाला या नव्या ओसाड वसाहतीत आणून सोडले.

आम्हाला माणूसकीचे हक्क आणि अधिकार मिळायलाच हवेत, असा धरणग्रस्तांचा अखंड टाहो सुरू आहे. हे सारेच धरणग्रस्त विखुरलेले असल्याने, त्यांच्या मताची फिकीर कोणत्याही राजकीय पक्षांना नाही. कोणत्याही पक्षाच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा उल्लेखही केला जात नाही. सरकार आणि धरणांचे पाणी मिळालेल्या भागातले पुढारी, शेतकरीही धरणग्रस्तांना केव्हाच विसरून गेले आहेत. काळम्मावाडी आणि चांदोली धरणासाठी उग्र आंदोलने सुरू होती, तेव्हा या धरणग्रस्त परिषदांच्या सर्वपक्षीय नेत्यांनी धरणग्रस्तांना **घराला घर आणि फणाला फण?** द्यायची आश्‌वासने दिली होती. धरण परिषदात तसे ठरावही झाले होते. प्रत्यक्षात मात्र या आश्वासनांची पूर्तता राज्यातल्या एकाही धरणाच्या धरणग्रस्तांच्या बाबतीत झालेली नाही. धरणाचे पाणी मिळाल्याने लाखो हेक्टर जमिनी ओलिताखाली आल्या. लाखो शेतकऱ्यांच्या घरात सुखसमृद्धी नांदायला लागली. पण ज्यांच्या त्यागामुळे ही क्रांती घडली, त्या धरणग्रस्तांना सामाजिक न्याय द्यायला लाभक्षेत्रातले शेतकरीही तयार नाहीत, ही अत्यंत दुर्दैवी बाब होय. **पुनर्वसनाचा कायदा** सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातल्या आणि महाराष्ट्रातल्या असंघटित धरणग्रस्तांना न्याय मिळवून द्यायसाठी संतराम पाटील, जीवनराव सावंत, शंकर धोंडी पाटील, नागनाथ अण्णा नायकवडी, डॉ. भारत पाटणकर, ब. ना. राजहंस या नेत्यांनी सरकारच्या विरोधात उग्र आंदोलने केली. धरणग्रस्तांच्या परिषदा घेतल्या. त्यांच्या आंदोलनाच्या दबावामुळे महाराष्ट्र सरकारने १९७८ मध्ये सुधारित पुनर्वसन कायदा करून तो अंमलात आणला. पण त्याची चोख अंमलबजावणी होत नसल्यानेच, राज्यातल्या लाखो धरणग्रस्तांची सुरू असलेली फरपट काही थांबलेली नाही. या धरणग्रस्तांच्या लाखो हेक्टर जमिनी सरकारने १८९४ मधल्या जुनाट ब्रिटिश कायद्याचा वापर करून फुकापासरी ताब्यात घेतला. त्यांच्या जमिनींना योग्य नुकसान भरपाई दिली नाही. काही शेतकऱ्यांच्या जमिनी तर याच राज्यातल्या सरकारांनी एकरी शंभर दोनशे रुपये नुकसान भरपाई देऊन सक्तीने ताब्यात घेतल्या आहेत. भूसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार जाहीर झालेल्या भूसंपादनाच्या निर्णयाच्या विरोधात थेट उच्च न्यायालयातच धाव घ्यावी लागत असल्याने, बहुतांश धरणग्रस्तांना न्याय मागायची दारेच या जुनाट आणि जुलमी कायद्याने बंद झालेली होती.पुनर्वसनाच्या गोंडस नावाखाली जिल्ह्या-जिल्ह्यातल्या धरणग्रस्तांचे पूर्ण पुनर्वसन अद्यापही झालेले नाही. शेकडो

धरणग्रस्तांना नवी घरे बांधायसाठी आर्थिक सहाय्य मिळालेले नाही. पुनर्वसनाच्या नावाखाली त्यांना दिलेल्या पर्यायी जमिनी पूर्णपणे त्यांच्या ताब्यात मिळालेल्या नाहीत. शेकडो धरणग्रस्तांना मिळालेल्या जमिनीतून अनेक गावच्या धनदांडग्या शेतकऱ्यांनी हाकलून लावले आहे. धरणग्रस्तांना सरकार न्याय देत नाही आणि त्यांचा आवाजही किवंड्या झालेल्या सरकारच्या कानापर्यंत पोहोचत नाहीत. आम्हाला न्याय द्या, या पलीकडे धरणग्रस्तांची काहीही मागणी नाही. पण सरकार तो न्याय नाकारात असल्यानेच महाराष्ट्रातल्या लाखो धरणग्रस्तांना वारंवार आंदोलने करावी लागत आहेत. केंद्रात काँग्रेसचे सरकार सत्तेवर असताना केलेल्या भूमीसंपादन कायद्यात शेतकऱ्यांना भूमी संपादनापोटी चौपट मोबदला द्यायची तरतूद करण्यात आली. शेतकऱ्यांना भरडून काढायचा निर्धार केला आहे. सरकारने भूमी संपादनासाठी काढलेल्या वटहुकूमाद्वारे संपादित जमिनीच्या विरोधात न्यायालयात जायचा अधिकारही नाकारण्यात आला होता. सर्व विरोधी पक्षांनी या विधेयकाला संघटितपणे विरोध केल्यानेच नमलेल्या सरकारने हा अधिकार पुन्हा बहाल केला असला, तरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतून सक्तीने हाकलून लावायचा निर्धार केला आहे. जमिनींच्या संपादनाचा जाहीरनामा सरकारने काढल्यावर, संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यायची तरतूद सरकारने वगळली आहे. हा कायदा लागू झाल्यास सरकारवर धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी कायदेशीरपणे राहणार नाही. संपादित केलेल्या जमिनींचा कायद्यानुसार मोबदला दिल्यावर सरकार हात वर करायला मोकळे होईल. आधी पुनर्वसन आणि मग धरण आणि प्रकल्प असा कायदा अंमलात आल्याशिवाय रस्ते, धरणे आणि प्रकल्पग्रस्तांची गेले अर्धशतक सुरू असलेली ही ससेहोलपट थांबणार नाही.

- **जैतापूरचा वणवा**

जैतापूरच्या वादग्रस्त अणुऊर्जा प्रकल्पाला आपल्या जमिनी द्यायला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांनी आणि परिसरातील जनतेने पेटवलेल्या आंदोलनाचा वणवा शमवायसाठी केंद्र सरकारने या प्रकल्पग्रस्तांसाठी ऐंशीपट वाढीव नुकसानभरपाई द्यायच्या निर्णयामुळे ही समस्या अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. जैतापूरच्या नियोजित अणुऊर्जा प्रकल्पामुळे हा परिसर आणि समुद्रातील पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याने गेली दोन वर्षे प्रकल्पाविरोधात सुरू असलेले उग्र आंदोलन थांबलेले नाही. पोलिसांच्या बळावर ते दडपून टाकायचा, मोडायचा,

उधळून लावायचा राज्य सरकारने केलेला प्रयत्न काही यशस्वी झाला नाही. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एकाचा बळी गेल्याची घटनाही घडली आणि या आंदोलनाचा अधिकच भडका उडाला. सरकारने संबंधित शेतकऱ्यांचा आणि परिसरातल्या ग्रामस्थांचा विरोध डावलून सक्तीने या प्रकल्पासाठी जमिनींचे संपादनही सुरू केले. पाच गावातील २ हजार ३३६ शेतकऱ्यांची ९०० हेक्टर जमीन भारतीय अणुऊर्जा प्रकल्पाकडे २२ जानेवारी २०१० रोजी हस्तांतरित करण्यात आली. कंपनीने या जमिनीचा ताबा घेतल्यावरही शेतकऱ्यांनी आपला विरोध संघटितपणे सुरूच ठेवला. १४ कोटी ७७ लाख ३९ हजार रुपये ही नुकसानभरपाईची रक्कम केंद्र सरकारने भू-संपादन कार्यालयात जमा केल्यावरही बहुतांश शेतकऱ्यांनी ती स्वीकारलेली नाही. ब्रिटिश काळातील जुनाट कायद्यानुसार माती मोलाने या जमिनींचे संपादन सरकारने केले होते. २४७ शेतकऱ्यांनी २ कोटी २३ लाख रुपयांची रक्कम स्वीकारली. नुकसानभरपाईचा हा दर बाजारभावापेक्षा अत्यंत कमी तर होताच, पण तो स्वीकारायला शेतकऱ्यांचा विरोधही होता.

नव्या निर्णयानुसार जैतापूर परिसरातल्या पाच गावातल्या प्रकल्पग्रस्तांना हेक्टरी २८ हजार ऐवजी हेक्टरी २२ लाख ५० हजार अशी नुकसानभरपाई दिली जाणार आहे. वाढीव नुकसान भरपाई जाहीर केल्यावर प्रकल्पग्रस्तांचा विरोध संपेल आणि अणुभट्टी उभारणीचा मार्ग खुला होईल, असे राज्य आणि केंद्र सरकारला वाटत होते. प्रत्यक्षात मात्र बहुतांश प्रकल्पग्रस्तांनी ही वाढीव नुकसानभरपाईची रक्कमही साफ नाकारत, हा प्रकल्पच आमच्या परिसरात नको, असे जाहीर केल्याने, सरकारचीही कोंडी झाली आहे. धरणग्रस्तांवर अन्याय जैतापूरच्या अणुऊर्जा प्रकल्पग्रस्तांना वाढीव नुकसानभरपाई द्यायला कुणाचाही विरोध असायचे काही कारण नाही. ती त्यांना मिळायलाही हवी. पण प्रकल्पग्रस्तच ती स्वीकारायला तयार नसल्यामुळे ही कोंडी फोडायची समस्या कायमच रहायची शक्यता आहे.

प्रकल्पात ज्यांच्या जमिनी जातात, बुडतात. जे शेतकरी निराधार आणि भूमिहीन होतात, त्यांच्या पुनर्वसनाचा कायदा महाराष्ट्र सरकारने १९७८ मध्ये केला. या सुधारित कायद्याच्या अंमलबजावणीनंतर धरणग्रस्तांचे भिज क्षेत्रातच पुनर्वसन होईल, अशी अपेक्षा होती. पण तसे घडलेले नाही. राज्यातल्या हजारो धरणग्रस्तांची ससेहोलपट थांबलेली नाही. १८८६ मधल्या

जुनाट, कालबाह्य, भूमिसंपादन कायद्यान्वये सरकारने अक्षरश: कवडी मोलाने, धरणे, कालव्यांसाठी शेतकऱ्यांच्या लाखो एकर जमिनी हिसकावून घेतल्या. त्यांचे विकसनशील पुनर्वसन अद्यापही केलेले नाही. सातारा, सांगली, कोल्हापूरसह राज्यातल्या बहुतांश धरणांच्या कालव्यांमुळे निराधार झालेल्या हजारो धरणग्रस्तांना वारंवार रस्त्यावर उतरून आंदोलने करावी लागतात. धरणग्रस्तांचे त्याच धरणाच्या भिज क्षेत्रात पर्यायी जमिनी देऊन पुनर्वसन करायचे सरकारचे धोरण अपयशी ठरले आहे.

मूळ गावठाणापासून शंभर–सव्वाशे किलोमीटर दूरवर त्यांचे पुनर्वसन करणारे हे सरकार धरणग्रस्तांच्या बाबतीत गंभीर नाही. धरणांच्या मागणीसाठी आंदोलने करणाऱ्यांनाही या विस्थापित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाची कसलीही जाणीव नाही. ३७ वर्षांपूर्वी बांधकामे सुरू झालेल्या काळम्मावाडी (दूधगंगा), चांदोली (वारणा), या मोठ्या धरणप्रकल्पांपासून ते सातारा जिल्ह्यातल्या उरमोडी, तारळी आणि जुन्या कोयना धरणग्रस्तांचेही योग्य पुनर्वसन अद्यापही झालेले नाही.

स्वातंत्र्यापूर्वी झालेल्या पुणे जिल्ह्यातल्या मुळशी धरणग्रस्तांना सरकारने न्याय दिलेला नाही. आधी पुनर्वसन आणि मग धरण, हे धोरण राज्य सरकार स्वीकारायला तयार नाही. ज्यांच्या त्यागामुळे लाखो हेक्टर क्षेत्राला पाणी मिळाले, ज्यांच्या जीवनात समृध्दीची गंगा आली. त्या लाखो शेतकऱ्यांनाही धरणग्रस्तांच्या समस्यांची कसलीही जाणीव नाही. उलट धरणग्रस्तांना दिलेल्या पर्यायी जमिनीतून त्यांना हाकलून काढायच्या घटनाही महाराष्ट्रात घडलेल्या आहेत. धरणासाठी जमिनीचे संपादन करताना सरकार विकसनशील पुनर्वसनाचे आश्वासन देते. जमिनींचे संपादन केल्यावर मात्र सरकारला या आश्वासनाची आठवणही राहत नाही. मूठभर धरणग्रस्तांचा टाहो सरकारच्या कानापर्यंत पोहोचतही नाही. पाणी तुमच्या पिकाला, आम्ही लागलो भिकेला', अशा घोषणा देत, राज्यातल्या धरणग्रस्तांना रस्त्यावर उतरून आंदोलने करावी लागतात. सामाजिक न्याय आणि महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, राजर्षि छ. शाहू महाराजांचा पुरोगामी वारसा आम्ही चालवत असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या महाराष्ट्रात धरणग्रस्तांची ही अशी परवड गेली पन्नास वर्षे अखंडपणे सुरू आहे. ती संपवायची राज्यकर्त्यांची इच्छा नाही. त्यामुळेच

राज्यातल्या धरणांच्या, प्रकल्पांच्या कामांना जोरदार विरोध सुरूच आहे. बाजारभावाप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना नुकसानभरपाई मिळायलाच हवी आणि त्याबरोबरच आधी पुनर्वसन आणि मगच धरण, याच धोरणाची अंमलबजावणी सरकारने करायला हवी. तरच 'सामाजिक न्यायाच्या' तथाकथित धोरणाला काही अर्थ राहील. अन्यथा प्रकल्पग्रस्थांवरचा हा सामाजिक अन्नयाय संपणारा नाही.

**धरणग्रस्त आश्वासनांच्या झुल्यावर** (वैभव साळकर) दोडामार्ग पंचेचाळीस कोटींचे अंदाजपत्रक असलेले तिलारी धरण दीड हजार कोटींवर जाऊन पोहोचले. ३५ वर्षांनंतर प्रकल्पदेखील पूर्ण झाला. मात्र, ज्यांच्या त्यागावर हा प्रकल्प उभा राहिला, त्या तिलारीच्या धरणग्रस्तांचा प्रश्न मात्र काही सुटलेला नाही.

वनटाईम सेटलमेंटचा प्रश्न सध्या धरणग्रस्तांसाठी जीवन मरणाचा ठरला आहे. परंतु त्यासंबंधीची फाईल शासनाच्या लालफितीमुळे वित्त विभागाकडे पडून आहे. त्यामुळे सध्या तरी हा प्रश्न मार्गी लागण्याची आशा धुसर बनल्याने धरणग्रस्तांचा वनवास संपणार तरी कधी? असा आर्त सवाल तिलारीचा भूमिपुत्र येथील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला विचारतो आहे. दोन वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी ई. रविंद्रन यांनी पुनर्वसन गावठणांचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण करताना या पुनर्वसन गावठणांची पाहणी केली होती. त्यावेळी धरणग्रस्तांच्या पाठपुराव्यामुळे काही कामे मार्गी लागली. मात्र, वनटाईम सेटलमेंटचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.

- **तिलारी धरण–**

घरटी एक नोकरी देण्याचे शासनाने दिलेले आश्वासन न पाळल्याने दोन वर्षांपासून तिलारीचे धरणग्रस्त आंदोलन करीत आहेत. दीड वर्षांपूर्वी थेट तिलारीच्या कालव्यातच तब्बल दोन वेळा प्रत्येकी ३० व २० दिवस ठिय्या आंदोलन करून धरणग्रस्तांनी कालव्याद्वारे गोव्याला जाणारे पाणी अडविले होते. या आंदोलनाची दखल तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री यांनी घेत तिलारी धरणग्रस्तांची भेट घेऊन चर्चा केली असता नोकरी ऐवजी वनटाईम सेटलमेंट म्हणून विशिष्ट रक्कम धरणग्रस्तांना खास बाब म्हणून देण्याचा पर्याय निवडण्यात आला आणि त्यावरच

धरणग्रस्तांनी आंदोलन मागे घेतले. पुढे दोन्ही राज्यांच्या कंट्रोल बोर्डाच्या बैठका घेऊन प्रत्येक धरणग्रस्त दाखला धारकास पाच लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला.

परंतु अंमलबजावणी झालेली नाही. सध्याच्या घडीला धरणग्रस्तांना एकरकमी अनुदानाची रक्कम देण्यासंबंधीची फाईल राज्याच्या वित्त विभाग कार्यालय नंबर तीनच्या अधिकाऱ्यांपुढे पडून आहे. यामध्ये एकूण धरणग्रस्तांची संख्या, त्यापैकी किती धरणग्रस्तांना नोकरी लागली आणि संयुक्त प्रकल्प असलेल्या राज्यातील प्रकल्पांची संख्या नसल्याच्या त्रुटी काढण्यात आल्या आहेत. परिणामी ही फाईल पुन्हा जलसंपदा विभागाकडे पाठविण्यात येणार आहे.

गेल्या ३५ वर्षांनंतर तिलारी धरण उभे राहिले. महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या संयुक्त पुढाकारातून हे धरण साकारले. आज दोन्ही राज्यांना तिलारी धरणामुळे मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. तिलारीच्या पाण्यामुळे गोवा राज्यात कृषी क्रांती झाली. ओसाड जमिनी ओलिताखाली आल्या. ज्यांच्या त्यागावर धरण उभे आहे त्या धरणग्रस्तांच्या वाट्याला गेली ३५ वर्षे तरी वनवासच आला आहे. धरणासाठी जमिनी संपादित करताना घरटी एक नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना अनेकवेळा आंदोलने, उपोषणे करावी लागली.

- **पर्यटन विकास–**

सन १९७८ च्या दरम्यान तिलारी धरणासाठी पाल, पाटये, सरगवे, आयनोडे, शिरंगे गावातील लोकांना धरणासाठी जमीन संपादित करण्याच्या नोटिसा पाठविण्यात आल्या.

या जमिनी ताब्यात घेताना शासनाने धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबरोबरच पुनर्वसन गावठणात १३ सुविधा देण्याचे आश्वासन दिले. तसेच रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे, याकरिता घरटी एक नोकरी देण्याचे गाजर दाखविण्यात आले. त्यामुळे धरणग्रस्तांनी आपल्या समृद्ध आणि सुपीक असलेल्या जमिनींवर तुळशीपत्र सोडून वडिलोपार्जित घरादाराचा त्याग केला. आपल्या त्यागातून धरण साकारल्यास त्याचा फायदा आपल्याच शेतकरी बांधवांना

होईल, हा त्यामागच्या धरणग्रस्तांचा हेतू होता. मात्र, प्रत्यक्षात धरण पूर्ण झाल्यावर भलतेच घडले. घरटी एक नोकरी सोडाच, ज्या ठिकाणी पुनर्वसन केले गेले, त्या पुनर्वसन गावठणात नागरी सुविधांसाठी धरणग्रस्तांना आंदोलने, उपोषणे करावी लागली.

- **उजनी धरण–**

उजनी धरणाच्या निर्मितीनंतर येथील पाण्याचा लाभ अनेकांना झाला. सोलापूर जिल्ह्यासह पुणे, नगर जिल्ह्यातील काही गावांचे नंदनवन झाले. परंतु ज्यांनी पिढ्यांपिढ्या जगण्याची साधने, शेती, घरेदारे, गावेच्या गावे प्रकल्पासाठी दिली, त्या भूमिपुत्रांना मात्र आजही विस्थापित झालेल्या ठिकाणी अपमानित जिणं जगावं लागत आहे. आजही कित्येक विस्थापितांना सरकार साध्या मूलभूत सुविधाही देऊ शकले नाही. (वैभव गाढवे– सकाळ वृत्तसेवा, सोलापूर)

धरणात पाणी अडविल्यानंतर गेल्या ३५ ते ४० वर्षांत झालेल्या प्रत्येक विधानसभा व लोकसभा निवडणुकीत धरणग्रस्तांचा प्रश्न चर्चिला गेला. उजनी धरणग्रस्तांच्या न्याय्य–हक्कांसाठी अनेक आंदोलने, मोर्चे झाले. अलीकडे हा संघर्ष कमीही झाला आणि आता उरली आहे, फक्त संघर्षाची धग. उजनीच्या पाणलोट क्षेत्रात आज पाण्यामुळे ऊस कारखानदारी वाढली आहे. लोकांचे उत्पन्न वाढले आहे, ही गोष्ट खरी. मात्र सोलापूर जिल्ह्यातील ६७ , पुणे ३३, नगर तीन या विस्थापित गावांची काय अवस्था आहे. विस्थापित झालेल्या गावांपैकी बॅकवॉटरमध्ये असलेल्या गावांना तरी पाण्याचा लाभ झाला, बागायतीमुळे आर्थिक संपन्नता आली. ज्यांची संपूर्ण गावे, जमिनी पाण्यात गेल्या. त्यांचे नामोनिशाण त्या गावात राहिले नाही. त्यांची अवस्था आज बत्तर आहे. ज्यांच्या जमिनी वाचल्या, ते बागायतदार झाले. ज्यांच्या गेल्या, ते देशोधडीला लागले. ज्यांना मायेची माणसं, आपला गाव, शिवार सोडायचा नव्हता, ती कुटुंबे भूमिहीन अवस्थेत मोलमजुरी करून जीवन कंठत आहेत. सध्या सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ६२ गावठाणांमध्ये उजनी धरणांमुळे विस्थापित झालेले लोक राहतात. त्यांच्या वाट्याला कायम संघर्षच आहे. पंढरपूर तालुक्यात विस्थापितांच्या सहा ग्रामपंचायती झाल्या; पण त्यांना अद्याप महसुली गावांचा दर्जा मिळाला नाही. तसेच ११ गावांना महसुली दर्जा

देण्यासाठीचे प्रस्ताव गेल्या दोन वर्षांपासून पडून आहेत. धरणात बुडालेल्या बॅकवॉटर आणि विस्थापित झालेल्या अनेक गावांना महसुली दर्जा असला तरी गावठाण डिक्लेरेशन झालेले नाही. धरणामुळे विस्थापित झालेल्या गावांचे पंढरपूर, मोहोळ, माढा या तालुक्यांमध्ये पुनर्वसन करण्यात आले. पुनर्वसन झालेल्या गावांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या १८ नागरी सुविधा देणे बंधनकारक आहे. पण अनेक गावांमध्ये स्मशानभूमी, पिण्याचे पाणी, चांगले रस्ते अशा कोणत्याच सुविधा नाहीत. (कै.) यशवंतराव चव्हाण यांनी धरण बांधतेवेळी अगोदर विस्थापितांचे योग्य पुनर्वसन करा, असे सांगितले होते. मात्र त्यांच्या या सल्ल्याकडे सर्वांनीच सोईस्कर दुर्लक्ष केल्याची भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये आहे. धरणाच्या आराखड्यात कुठेही धरणग्रस्तांचा साधा उल्लेखही नाही. यावरून सरकारला किती गांभीर्य आहे, हे लक्षात येते. नंतरच्या काळात अनेक राजकारण्यांनी अनेक घोषणा केल्या; पण त्याचे पुढे काहीच झाले नाही. माजी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री आणि तत्कालीन पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी एनटीपीसी प्रकल्पामध्ये पाच टक्के प्रकल्पग्रस्त युवकांना रोजगाराच्या संधी देणार अशी घोषणा केली होती. मात्र तीही नंतर हवेतच विरून गेली. उजनी धरणाच्या निर्मितीवेळी पुनर्वसन प्रक्रियेदरम्यान जी पिढी साठी–सत्तरीत होती, ती पिढी आज हयात नाही. त्यांची मुले, नातू, पणतू आज न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. भाजप–सेना युतीच्या सरकारदरम्यान अरुण भाटिया नावाचे आयुक्त होते. त्यांनी धरणग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. प्रयत्नही सुरू केले. परंतु त्यांच्याही पदरी निराशाच आली. पुनर्वसन भागात ३५ वर्षांपूर्वी बांधलेले रस्ते, शाळा, पाणीपुरवठा योजना, गटारी, स्मशानभूमी व इतर नागरी सुविधा आज मोडकळीस आलेल्या आहेत. जिथे काही प्रमाणात सुविधा दिल्या तिथे हीच अवस्था; इतरत्र मात्र सगळाच दुष्काळ आहे.

- **दुय्यम दर्जाची वागणूक**

१९७५–७६ च्या सुमारास उजनी धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले. शासनाने कवडीमोल किमतीने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. ज्यांना जिल्ह्यात पर्यायी जमिनी मिळाल्या, तिथे गेलेल्या धरणग्रस्तांना स्थानिक नागरिकांनी कधीच चांगली वागणूक दिली नाही. तसेच राजकीय प्रतिनिधित्व नाकारले जात असल्याची भावना तर कायमच विस्थापितांमध्ये राहिली आहे. साधी

ग्रामपंचायतीची निवडणूक लढवायची म्हटलं, तरी शक्य होत नाही. बघा हा बाहेरून आला आणि आमच्यावर राज्य करू पाहतो, असा स्थानिकांचा तोरा असतो. यातून काही धरणग्रस्तांचे खून झाल्याने अनेकांनी पुनर्वसन झालेल्या गावांमधून पळ काढल्याचीही उदाहरणे आहेत. (मोहन अनपट, जिल्हाध्यक्ष, श्रमिक मुक्ती दल, सोलापूर)

- **पुनर्वसन लटकविणाऱ्या अधिकाऱ्यांना धरणात ढकला!**

धरणग्रस्त शेतकऱ्यांचे दशको न् दशके पुनर्वसनाचा प्रश्न भिजत घोंगडे ठेवणाऱ्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याला आता धरणातच फेकून दिले पाहिजे, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने संताप व्यक्त केला. धरण प्रकल्पामुळे बेघर झालेल्या शेतकऱ्याने दाखल केलेल्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती मंजुळा चेल्लर आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने हा संताप व्यक्त केला. (मुंबई उच्च न्यायालय)

राज्य सरकारने १९७० साली चासकमान धरण प्रकल्पासाठी घर आणि शेतजमीन संपादित केली. मात्र गेल्या पंचेचाळीस वर्षांत आपल्या कुटुंबाचे पुनर्वसन केले नाही, असा आरोप करणारी याचिका बाजीराव बोंबळे यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. आम्हाला पुणे जिह्यातील दावाडी गावात पर्यायी जागा देण्याचा आदेश द्या, अशी विनंतीही याचिकेत केली आहे. त्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती मंजुळा चेल्लर आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने याचिकेची गंभीर दखल घेऊन राज्य सरकारच्या कारभारावर संताप व्यक्त केला. या अधिकाऱ्याला बसायला आसन दिले जाते. तो दरमहा पगार घेतोय. त्याला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वाटय़ाला आलेले हाल दिसत नाहीत का? आपण शेतकऱ्यांच्या बाबतीत काय वागतोय याची जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याला लाज वाटली पाहिजे,अशा शब्दांत संताप व्यक्त केला. ४७ वर्षांपूर्वी राज्य सरकारने चासकमान धरणासाठी बाजीराव बोंबळे यांचे घर आणि शेतजमीन संपादित केली. मात्र त्यांच्या पुनर्वसनाचे भिजत घोंगडे सरकारदरबारी तसेच राहिले.

भौगोलिकदृष्ट्या डोंगरालगतची गावे, ऐतिहासिक स्थळे असलेला हा गट असून, शेती व शेतीजोड व्यवसाय येथे होतो. पवना धरणातील बंद जलवाहिनी प्रकल्प रद्द व्हावा, येथील पवना

धरणग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न ५० वर्षात सुटलेला नाही. पुसाणे धरणग्रस्तांचा प्रश्न १९९९ पासून सुटला नाही. मळवंडी–ठुले धरणग्रस्त प्रश्न प्रलंबित आहे. येथील रस्ते सुधारून दळणवळाची सोय व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या विभागाला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याची मागणी आहे. शिवणे, चांदखेड, कुरुंज, बेबडओहळ, जवण, शिळीम येथे बस थांबे उभारावे चांदखेड येथे मुलीसांठी महाविद्यालय उभारणे गरजेचे आहे. पाणीसाठा मुबलक असूनही अनेक गावे टंचाईग्रस्त आहेत. आढले–डोणे प्रादेशिक पाणी योजना बंदच आहे. त्याचप्रमाणे गुलाब फुले, पालेभाज्या, सुवासिक इंद्रायणी तांदूळ, दूध यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पवनानगर, चांदखेड, बेबडओहळ येथे आठवडे बाजार सुरू व्हावा, अशी मागणी आहे. शेतकरी संस्था ही पवनमावळ मधील ४९ गावांचा मोठी संस्था असून, ती तोट्यात आहे.

नामदेव ठुले (माजी सरपंच) : गटाच्या वाडीवस्त्यावर पाणी पोचत नाही. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारून ग्रामीण मुलांना चांगले शिक्षण मिळावे. जिल्हा परिषदेच्या शाळांना व अंगणवाडीला इमारती नवीन उभाराव्यात. तालुक्यातून जेवडे सदस्य जिल्हा परिषदेवर निवडून गेलेल्यांनी मावळ तालुक्यासाठी जादा निधी आणावा. तानाजी शेंडगे (माजी उपसरपंच) : तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सर्व रस्ते खड्डेमय आहे ते सुधारावे. धरणग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे. प्रत्येक गावातील अंतर्गत रस्त्यांची कामे पूर्ण व्हावीत.

वैषाली खुंटाळे (स्थानिक महिला) : महिलांसाठी पवनानगर येथे रोजगार प्रशिक्षण मिळावे, स्वंतत्र शौचालय उभारावे, पवनानगर येथे पोलिसांची चौकी उभारावी.

राजेंद्र देशमुख (स्थानिक नागरिक) : बेबडओहळ येथील ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण सुधारणे गरजेचे आहे. बेबडओहळ पुलाचे काम लवकर व्हावे. शिवणे सडवली पवना नदीवर पूल उभारावा.

### ४.४.३ प्रकल्प ग्रस्तांबाबत शासनाचे धोरण

महाराष्ट्र शासनाने, पाटबंधारे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याकरीता पाच विकास

महामंडळांची स्थापन केली. त्यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांचा समावेश आहे. या महामंडळाचे मुख्य अधिकारी हे शासनाच्या सचिव दर्जाचे असून त्यांना कार्यकारी संचालक असे पदनाम देण्यात आले आहे. स्थापनेनंतर सुरूवातीच्या काळामध्ये, या महामंडळांना खुल्या बाजारातून, निधी उभा करण्याची, परवानगी देण्यात आली होती. सध्या या सर्व महामंडळांसाठी महाराष्ट्र पाटबंधारे वित्त महामंडळाव्दारे एकत्रित निधी उभा केला जातो. जे प्रकल्प महामंडळाच्या अखत्यारित येत नाहीत ते जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली येतात. सध्या अस्तीत्वात असलेल्या सर्व पाटबंधारे विकास महामंडळांची पूर्नरचना ही नदी विकास अभिकरणामध्ये करून, नदी खोऱ्याच्या नियोजन व व्यवस्थापनामध्ये बदल करून, राज्याच्या सिंचन क्षमतेस बळकटी आणण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस पाऊल उचलले आहे. भौगोलिकदृष्ट्या राज्याचे ५ नदी खोऱ्यामध्ये विभाजन करण्यात आले आहे. यामध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा व कोकण भागातील पश्चिमवाहीनी नद्या यांचा समावेश आहे. या ५ नदी खोऱ्यांच्या व्यवस्थित नियोजनासाठी त्यांचे विभाजन पुन्हा २५ उप–खोऱ्यांत करण्यात आले आहे.

सिंचन सुविधांचे नियोजन व विकासांची कामे शासनाने, जलसंपदा विभाग, ग्रामीण विकास व जल संधारण विभाग यांचेकडे सोपिवली आहेत. ज्या मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांचे लागवडी योग्य क्षेत्र २५० हेक्टर पेक्षा जास्त आहे, त्यां प्रकल्पांचे सर्वेक्षण, नियोजन व संकल्पन बांधकाम व जलव्यवस्थापनाची कामे हे जलसंपदा विभागामार्फत करण्यात येतात. ज्या पाटबंधारे प्रकल्पांचे लागवडी योग्य क्षेत्र हे २५० हेक्टर पेक्षा कमी आहे त्यांचे सर्वेक्षण, नियोजन, बांधकाम व व्यवस्थापन हे ग्रामीण विकास व जलसंधारण विभागाकडे सोपिवण्यात आले आहे. या व्यतिरिक्त कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे नियोजन, बांधकाम व व्यवस्थापन, उपसा सिंचन योजना, वळण बंधारे, पाझर तलाव, गावतळी ल.पा.तलाव व १०० हेक्टर पेक्षा कमी लागवडी योग्य क्षेत्र असलेले लघु पाटबंधारेची कामे जिल्हाच्या स्थानिक पातळीवर, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास विभागाकडे सोपविण्यात आलेली आहेत. शेतकऱ्यांना सिंचन व्यवस्थापनामध्ये सहभागी करुन घेण्याची शासनाची

भूमिका अधिक मूर्त स्वरुपात प्रत्यक्षात आणण्यासाठी सिंचन प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचे प्रचालन व व्यवस्थापन लोकांकडून व लोकांसाठी होणे हीच लोकशाहीची मूल्याधिष्ठित परिभाषा आहे. याच तत्वाला अनुसरुन, विधीमंडळात सविस्तर चर्चा होवून सर्व लाभार्थींना समान न्याय देणारा व दुर्बल शेतकऱ्यांना पाण्याचा अधिकार देणारा महाराष्ट्राच्या सिंचन विकासाचा ध्यास ठेवणारा व पुच्छभागातील शेतकऱ्यांच्या अस्मितेची कास धरणारा कायदा अस्तित्वात आला आणि तो म्हणजे महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ होय. महाराष्ट्र शासनाने पाणी वापर संस्थांना हा कायदा लागू केला आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांला वैयक्तिकरित्या पाणी देण्यात येणार नाही, तर विभाग केवळ पाणी वापर संस्थेलाच घनमापन पध्दतीने पाणी उपलब्ध करुन देईल व शासन केवळ पाणी वापर संस्था व शेतकरी यांमधील दुवा राहील. पाणी वापर संस्था स्थापन करुन त्या सिंचन व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांचेकडे हस्तांतर करुन शासनाने त्यामध्ये सुलभता आणली आहे. हे जलसंपदा व्यवस्थापनाचे फार मोठे साध्य आहे असेच म्हणावे लागेल.

इतर काही राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे ही जल धोरण आहे. सन २००३ सालापासून महाराष्ट्र शासनाने राज्य जलनितीचा अवलंब केला आहे. नदीखोऱ्यांच्या जल व्यवस्थापनासाठी या जलनितीचा अवलंब केला आहे. या धोरणामध्ये प्रकल्पग्रस्तांचे प्रथम पुनर्वसन करणे व त्यांना त्यांचे लाभ देणे या बाबींना प्राधान्य देण्यांत आले आहे. महाराष्ट्र राज्याची जलनिती ही दूरदृष्टीचे व सर्वसमावेशकतेचे उत्तम उदाहरण आहे. वाढती लोकसंख्या व पाणीटंचाई यामुळे विविध विभागातील पाणी उपभोक्त्यांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांचेमध्ये होणारे संघर्ष व तंटे टाळण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची स्थापना ऑगस्ट–२००५ मध्ये केली. देशामध्ये अशाप्रकारचे हे पहिलेच नियामक प्राधिकरण आहे. राज्यातील उपलब्ध जलस्त्रोताचे समन्यायी पध्दतीने, समान वितरण व खात्रीने सिंचन व्यवस्थापन करण्याकरिता सदरची संस्था कटीबध्द आहे. राज्यशासनाने कायदयान्वये, सिंचन प्रकल्पांचा जललेखा, प्रकल्पांचे स्थिरचिन्हांकन करण्याच्या दृष्टीने पाउले उचलली आहे. सन–१९९९ पासून राज्यशासनाने दरवर्षी सिंचन प्रकल्पांची सद्यस्थितीदर्शक अहवाल प्रसिध्द करणे चालू केले आहे. ऑस्ट्रेलिया नंतर महाराष्ट्र हे नियमितपणे प्रकल्पांचा जललेखा अहवाल प्रसिध्द

करणारे पहिले राज्य ठरले आहे.

प्रकल्प स्तरापासून व्यवस्थापनाच्या शाखा कार्यालयस्तरापर्यंत जललेखा ठेवण्याच्या पध्दतीचा अवलंब केला जातो. गेल्या ७ वर्षापासून स्थिरचिन्हांकन व जललेखा प्रसिध्द करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातच नव्हेतर आंतरराष्ट्रीय पातळीस्तरावरील सुध्दा एकमेव उदाहरण आहे. सिंचन प्रकल्पांचे स्थिरचिन्हांकन व जललेखा करण्याच्या पध्दतीमुळे व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेमध्ये पाणी व्यवस्थापनाची उत्तम जाण आली आहे, त्यामुळे सिंचन व्यवस्थापनामध्ये सुधारणा होण्यास याचा चांगला उपयोग झाला आहे. या सिंचन प्रकल्पांच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ झाल्याने सिंचन प्रकल्पांचे प्रचालन व व्यवस्थापनाचा खर्च त्यामधून करणे शक्य होत आहे. अशा रितीने जलस्त्रोताचे उत्तम व्यवस्थापन व त्यांचे प्रभावी अंमलबजावणी यामुळे महाराष्ट्र हे भारतातील सिंचनामध्ये एक अग्रेसर राज्य ठरले आहे.

- **जलसपंदा विभागाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे**
- **प्रगती निदर्शक टप्पे –**

१. महाराष्ट्र हे भारतातील मोठ्या राज्यांपैकी तिसऱ्या क्रमांकाचे भौगोलिक क्षेत्रफळ असणारे राज्य आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ ३०.०८ द.ल. हेक्टर्स एवढे आहे. राज्याचे अंतीम सिंचन निर्मित क्षेत्र सुमारे १२.६ द.ल. हेक्टर्स असून त्यापैकी ८.५ द.ल. हेक्टर्स हे भूपृष्ठावरील आणि ४.१ द.ल. हेक्टर्स भूजल या स्त्रोतापासूनचे आहे. जून २०१० अखेर राज्यातील एकूण भूपृष्ठीय निर्मित सिंचन क्षेत्र ४.६ द.ल. हेक्टर्स आहे.

२. महाराष्ट्र राज्याची निर्मित सिंचन क्षमता राज्य निर्मितीच्या वेळेस म्हणजे सन १९६० साली ३.८६ लाख हेक्टर होती. तर जून २०१० अखेर ८६ मोठया, २५८ मध्यम व ३१०८ लघु अशा ३४५२ प्रकल्पांव्दारे ४७.३७ लाख हेक्टर सिंचन क्षमता (राज्यस्तर) निर्माण झालेली आहे. या शिवाय स्थानिकस्तर प्रकल्पांव्दारे १४.२० लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. अशी राज्याची एकूण निर्मित सिंचन क्षमता आतापर्यंत ६१.५७ लाख हेक्टर पर्यंत पोहोचलेली आहे.

३. राज्यातील एकूण पाणीवापरापैकी, अंदाजे ८०% पाणी वापर सिंचनासाठी, १२%

पिण्यासाठी (घरगुती वापरासाठी),

४. महाराष्ट्र राज्याने जास्तीत जास्त क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी व धान्य उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचन प्रकल्प उभारण्यात तसेच सिंचन व्यवस्थापनामध्ये नवीन प्रयोग करण्यात अग्रक्रम ठेवला आहे. जसे महाराष्ट्र राज्याची जलनिती, पाणी वापर संस्थांची स्थापना, तसेच सिंचन प्रकल्पांचे जललेखा व स्थिरचिन्हांकन अशा नवीनतम बाबी राज्यात यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. ज्यायोगे देशातील इतर राज्यांना देखील यांचा चांगला लाभ मिळू शकेल.

५. महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभागाव्दारे (GOM WRD) जलक्षेत्राच्या पुर्नरचनेसंबधी पुढाकार घेवून खालीलप्रमाणे महत्वपूर्ण पावले उचलेली आहेत. ज्यायोगे सिंचन प्रकल्पांची कार्यक्षमता सुधारण्यास निश्चितपणे मदत होत आहे.

**(अ) राज्य जलनिती (२००३):**

अग्रेसर अशा मोजक्या राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक असे राज्य आहे की ज्यास स्वत:ची जलनिती आहे. महाराष्ट्र राज्य सन२००३ पासून नदी खोऱ्यांच्या जलव्यवस्थापासाठी एकात्मिक जलसंपदा व्यवस्थापनांतर्गत (IWRM) जलनितीचा अवलंब करीत आहे. ही जलनिती नदी खोरे व्यवस्थापनाला (RBM) बळ देणारी आहे, या धोरणांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे आधी पुनर्वसन करणे, त्यांना त्यांचा लाभ देणे व नंतरच धरण बांधकाम करणे या बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे.

**(ब) जलदर निश्चितीकरण :**

पाटबंधारे प्रकल्प स्वयंपूर्ण व्हावेत म्हणून, त्यांचा वार्षिक देखभाल व दुरुस्तीचा संपूर्णतया खर्च भागविण्याच्या दृष्टीकोनातून सिंचन व बिगर सिंचनाचे आधारभूत दर ठरविण्यात आले आहेत. ह्या उद्दिष्टपूर्तीसाठीच जल दर निश्चितीकरण करण्यात आले.

**(क) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५:**

शेतकऱ्यांच्या सहभागातून, सिंचन विकासाची जुनी परंपरा महाराष्ट्र राज्याला आहे. विदर्भातील मालगुजरी तलाव आणि उत्तर महाराष्ट्रातील फड सिस्टीम ही त्या परंपरेतील उदाहरणे

आहेत. सिंचन व्यवस्थापनामध्ये शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्याची शासनाची भूमिका आहे, म्हणून पाणीवापरदारांना शक्तीशाली बनविणारा कालव्याच्या/चारीच्या पुच्छ भागातील लाभधारकांना व दुर्बल शेतकऱ्यांना न्याय देणारा व महाराष्ट्राच्या सिंचन विकासाचा ध्यास घेणारा कायदा अस्तित्वात आणला गेला आणि हा कायदा म्हणजेच महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ होय.

**याची मुख्य वैशिष्ठे खालील प्रमाणे आहेत.**

- सिंचनाचे पाणी फक्त पाणीवापर संस्थेसाठीच दिले जाईल.
- पाणी वापर संस्थेस दिले जाणारे पाणी हे घनमापन पध्दतीने दिले जाईल.
- पिके निवडण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना असेल.
- पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये महिला प्रतिनिधी आणि पाणी वापरदारास पुरेसे प्रतिनिधीत्व असणार आहे.
- लाभक्षेत्रातील प्रत्येक शेतकरी हा पाणी वापर संस्थेचा सदस्य असेल.
- सिंचन लाभधारकांना, पाणी वापर संस्था स्थापन करणे, महाराष्ट्र शासनाने, बंधनकारक केलेले आहे. आतापर्यंत ४२६० पाणी वापर संस्था नोंदणी कृत झाल्या असून १५,८७,१८८ हेक्टर्स क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे.

**(ड) महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण (MWRRA)**

महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्ये महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण कायदा (MWRRA) लागू केलेला आहे. ऑगस्ट २००५ मध्ये शासनाने जल नियामक प्राधिकरण स्थापन केलेले आहे. जलक्षेत्रासंबंधी हे देशातील पहिलेच प्राधिकरण आहे. राज्यातील जलस्त्रोतांचे नियमन व संनियंत्रण करण्याची जबाबदारी या प्राधिकरणांकडे सोपविण्यात आली आहे. ज्यायोगे, जलस्त्रोताचे न्यायी, समान व हमीपूर्वक व्यवस्थापन करता येईल. शेती, औद्योगिक,पिण्याचे पाणी इ. विविध पाणी वापरदारांच्या सार्वजनिक सुनावणीमधून पाण्याचे दर ठरविण्याचा अधिकार देखील महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरणाला असेल. पाणी वापर

अधिक कार्यक्षमतेने होण्यासाठी, पाण्याच्या व्यापारीकरणाच्या दराचे निकष देखील या प्राधिकरणामार्फत निश्चित केले जातील. नियामक प्राधिकरणाने, राज्यातील निवडक प्रकल्पांसाठी, स्थापन झालेल्या पाणी वापर संस्थांना, पाणी व्यवस्थापनाचे अधिकार दिलेले आहेत.

**(ई) नदीखोरे विकास प्राधिकरण :**

बहुउद्देशीय प्रकल्पांचे नियोजन आणि नदीखोरे पातळीवर पाण्याच्या स्त्रोतांचे व्यवस्थापन सक्षमरितीने करण्यासाठी सद्य:स्थितीतील पाटबंधारे विकास महामंडळांची (IDC's), नदीखोरे विकास प्राधिकरणामध्ये (RBAs) पुर्नरचना करण्यांत येत आहे.

६. पाटबंधारे विकास महामंडळाचे भौगोलिक कार्यक्षेत्र हे त्या–त्या नदी खोऱ्यांच्या सीमेपर्यंत असून, नव्या भूपृष्ठीय जलस्त्रोताच्या योजना विकसित करणे,सद्यः स्थितीतील बहुद्देशीय प्रकल्पांचे बांधकाम त्यांचा वापर इ. चे नियोजन करणे ही पाटबंधारे विकास महामंडळाची मुख्य जबाबदारी आहे.

७. स्थिर चिन्हांकन (Benchmarking) हे पाटबंधारे प्रकल्पांच्या कार्यपध्दतीमधील सुधारणांच्या मूल्यमापनासाठी आहे. आस्ट्रेलिया नंतर अशा प्रकारचे नियिमतपणे बेंचमार्किंग अहवाल प्रसिध्द करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे.

**पाणी वापर क्षमतेमध्ये सुधारणाः**

मागील काही वर्षात पाणीवापर क्षमता ही १०१ हेक्टर/दलघमी वरून ११९ हेक्टर/दलघमी पर्यंत वाढल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**८. महाराष्ट्र जल क्षेत्र सुधार प्रकल्प (मजसुप्र) :**

पाटबंधारे क्षमतेमध्ये वाढ करणे, पाण्याची उत्पादकता व स्थैर्यता वाढविणे, यांसाठी सिंचन व्यवस्थापन शेतकऱ्यांकडे हस्तांतरीत करणे ही अत्यंत महत्वाची बाब बनली आहे म्हणून कालवा प्रणाली, पाणी वापर संस्थाकडे हस्तांतरीत करण्यापूर्वी कालव्याचे नुतनीकरण करुनच ती शेतकऱ्यांकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. या कामी, निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने

जागतिक बँकेचे अर्थ सहाय्य घेतलेले आहे व त्यातून नूतनीकरणाची कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र जल क्षेत्र सुधार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ६.७ लक्ष हेक्टर लाभक्षेत्र, पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे. पाण्याच्या उपलब्धतेनुसार, पाण्याचे समन्यायी वाटप करण्याचे अधिकार पाणी वापर संस्थांना प्रदान करण्यात आलेले आहेत. पाणी वापर संस्थेला पाणी घनमापन पध्दतीने देण्यात येईल, यामुळे पाण्याचा वापर, पूर्ण क्षमतेने व काटकसरीने होण्यासाठी निश्चितपणे मदतच होईल.

**९. कोयना जलविद्युत प्रकल्प जलाशय छेद प्रक्रिया :**

कोयना जलविद्युत प्रकल्प, ता.पाटण, जि.सातारा, या प्रकल्पाच्या, कोयना टप्पा क्र.४ च्या कामामध्ये, भारतातच नव्हे तर आशिया खंडातच प्रथमत: जलाशय छेद प्रक्रिया (Lake tapping) चा अवलंब करण्यात आला. त्याचबरोबर भूगर्भीय गॅस इन्सुलेटेड कळयंत्र (Gas Insulated Switchgear) चा ही प्रथमत: अद्यावत तंत्रज्ञान, जलसंपदा विभागानेच, देशात आणले आहे.

**१०. जलविद्युत प्रकल्पांच्या विकासाबाबत संक्षिप्त :**

महाराष्ट्र राज्यामध्ये उच्च मागणीच्या काळात सध्या वीजेचा प्रश्न अत्यंत भेडसावत आहे. वीजेची कमतरता भरुन काढण्यासाठी व महाराष्ट्र वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी म्हणून, जलसंपदा विभागाने जलविद्युत प्रकल्पांद्वारे,वीज निर्माण करुन, राज्यातील तुटवडा भरुन काढण्यासाठी भरीव पावले उचलली आहेत.

**११. बांधा–वापरा हस्तांतरीत करा तत्वावरील छोट्या जलविद्युत प्रकल्पांची निर्मिती :**

महाराष्ट्रास मागील काही वर्षापासून विजेची टंचाई भासत आहे. उर्जेचे नियोजन करताना महत्तम मागणी काळात विजेचा पुरवठा करणेसाठी, पुरेशी वीज निर्मिती क्षमता असणे गरजेचे आहे. विविध पध्दतीने विद्युत निर्मितीपैकी जलविद्युत प्रकल्पांद्वारे विद्युत निर्मिती हा एक प्रमुख स्त्रोत आहे. दिवसाच्या ठराविक काळात असणाऱ्या, जादा वीजेची मागणी (Peak Demand)

भागविण्यासाठी, ठराविक काळात वीजकेंद्र चालवून, आवश्यकतेनुसार वीज निर्मिती करणे, जलविद्युत केंद्रामुळे सहज शक्य आहे. म्हणून शासनाने सन१९९९ मध्ये महाराष्ट्र सिंचन आयोग स्थापित करून एक निश्चित धोरण तयार केले आहे. या धोरणानुसार राज्यात लघु व सूक्ष्म जलविद्युत निर्मिती केंद्रासह, उदंचन जलविद्युत निर्मिती प्रकल्पांद्वारेदेखील विद्युत निर्मिती करण्याचे निश्चित केले आहे.

वरंधघाट, वरसगांव व पानशेत या उदंचन प्रकल्पांना (Pumped Storage Schemes) ऑक्टोबर २०१२ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, त्या तिन्ही उदंचन योजनांद्वारे २९०० MW विद्युत निर्मिती केली जाणार आहे.

छोटे जलविद्युत प्रकल्प बांधा–वापरा– हस्तांतरण तत्वाचे मुख्य उद्देश :

- खाजगी क्षेत्राचा समावेश करून पर्यावरण हानी टाळून विद्युत निर्मिती वाढविणे.
- खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीस पोषक वातावरण निर्माण करणे.
- सदरील धोरण राबविण्यासाठी योग्य रचना करणे.

### ४.४.४ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील महत्त्वाची तरतूदी

महाराष्ट्र राज्यातील विविक्षित प्रकल्पामुळे बाधा पोहचलेल्या व्यक्तीच्या पुनर्वसनाशी संबंधीत कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे आणि त्यांच्याशी संबंधीत किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करणे ह्या करिता महाराष्ट्र शासनाकडून हा अधिनियम केला.

**प्रकल्प बाधीत व्यक्ती म्हणजे–**

अ) एखाद्या प्रकल्पाच्या प्रायोजनाकरीता, कलम १४ अन्वये ज्या भोगवटादाराची प्रकल्पबाधीत परिमंडलातील जमीन (गावठाणातील जमीन धरून) संपादित करण्यात आली असेल, अशी भोगवटादार व्यक्ती.

ब) शेतमजूर असलेली व्यक्ती– 'शेतमजूर' म्हणजे बाधीत परिमंडळात कोणतीही जमीन धारण न करणारी, परंतू ती जमीन ज्यात आहे, असे क्षेत्र कलम १३ अन्वये बाधित परिमंडळ

म्हणून घोषित केले जाण्याच्या लगतपूर्वी पाच वर्षापेक्षा कमी असेल इतकी वर्षे त्या शेतजमिनीवर मुख्यतः त्या जमीनीवर शारीरिक कष्ट करून त्याद्वारे आपला चरितार्थ चालविण्यापासून जिला मुकावे लागले आहे अशी व्यक्ती.

क) लाभधारी– कोणत्याही प्रकल्पाच्या संबंधात 'लाभधारी' म्हणजे त्या प्रकल्पापासून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्तिशः किंवा समाज म्हणून किंवा संस्था, कंपनी अथवा कारखाना म्हणून ज्याला लाभ मिळतो असे कोणीही.

एकूण होणाऱ्या वेगवेगळ्या विस्थापनामध्ये धरणांमुळे होणारे विस्थापन हे सर्वात मोठे कारण आहे. ह्यामध्ये ७५ ते ८०% लोकांचे विस्थापन झालेले आहे पैकी फक्त २५% लोकांचे पुनर्वसन पूर्ण झालेले आहे, बाकी लोकांचे पुनर्वसन अजूनही पूर्ण झालेले नाही.

पुनर्वसनामध्ये ४०% लोक हे आदिवासी आहेत तसेच गरीब व दुर्बल घटकांमधील आहेत. महाराष्ट्रात जवळपास ४५०० धरणे बांधलेली आहेत त्यापैकी जास्तीत जास्त धरणे हे आदिवासी व मागास भागांमध्ये बांधलेली आहेत. त्यामुळे पुनर्वसनासंदर्भात व कुटुंबांच्या आर्थिक स्थितीबाबत अधिकाधिक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

महाराष्ट्रात कुकडी प्रकल्प हा महत्त्वपूर्ण प्रकल्प मानला जातो याच पाच धरणे एकत्रीत नियोजन करून बांधलेली आहेत ही सर्व धरणे मुख्य नदी भिमा व तिच्या उपनद्यांवर बांधलेली आहेत. ह्या धरणामध्ये येडगाव, माणिकडोह, डिंभे, वडज, पिंपळगाव जोगे ही धरणे बांधलेली आहेत ह्या धरणांमध्ये जास्तीत जास्त आदिवासी गावे व कुटुंबे प्रभावीत झालेले आहेत.

संशोधक धरणग्रस्तांचे विस्थापन झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास करून तो समोर आणण्याचा प्रयत्न करत आहे. विस्थापनाचे प्रामुख्याने दोन प्रकार निदर्शनास आले आहेत. ते म्हणजे १) पूर्वीच्या गावाजवळ केलेले पुनर्वसन व २) पूर्वीच्या (मूळ) गावापासून लांब अंतरावर केलेले पुनर्वसन ह्या दोन प्रकारच्या पुनर्वसनामध्ये फरक आहे ह्या फरकाचा अभ्यास संशोधक ह्या संशोधनाद्वारे अभ्यास करू इच्छित आहे.

### ४.४.५ भूमि संपादन अधिनियम, १८९४

### भूमी अधिग्रहण वटहुकूम २०१४

''लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालविले लोकांचे राज्य!'' भारतावर दीडशे वर्षे राज्य करणारे इंग्रज फक्त शासक होते. त्यांनी लोकांचे राज्य लोकांसाठी नाही चालविले. भारत ही वसाहत स्वतःच्या (इंग्लंड) देशाच्या प्रगतीसाठी वापरली. १८९४ चा जमीन अधिग्रहण कायदा हा असाच त्यांच्या सोयीचा कायदा. या कायद्यान्वये Whenever it appears to the Government the land in any locality is needed or is likely to be needed for any public purpose or for a company, a notification to that effect shall be published in the Official Gazette? म्हणजे आले सरकाराचिये मना, तिथे कुणाचे चालेना.

सरकारला वाटलं की एखाद्या सार्वजनिक किंवा खाजगीकार्याकरता जमीन पाहिजेय, सरकारी गॅझेटात तसे छापून आणा की लगेच जमीनमालकांनी जमीन दिली पाहिजे. वेगवेगळ्या औद्योगिक प्रकल्पांना होणारा स्थानिक विरोध, धरणे– सैनिकी प्रकल्प यांनी विस्थापित होणाऱ्या जनतेचे प्रश्न, धाकदपटशा आणि लाचखोरीने होणारे काही अधिग्रहित प्रकल्प आणि विकासकामांसाठी लागणारा वेळ या सगळ्यांमुळे भारतभर या १८९४ च्या कायद्यात बदल होण्याची गरज निर्माण झाली. या संदर्भाने कायद्यात थोडी दुरुस्ती करणारे एक विधेयक २००७ साली मांडण्यात आले पण २००९ च्या निवडणूकांच्या धामधुमीत हे बिल वाहून गेले. नव्या सरकारने परत २०११ साली हे विधेयक नव्याने आणले. सरकारने विधेयक मांडायचे, विरोधकांनी त्यात काही उणीवा दाखवायच्या, समाजकारण्यांनी राजकारण्यांनी धरणे धरायचे, मोर्चे काढायचे, मग प्रस्तावित विधेयकात सरकारने काही बदल करायचे, पुन्हा पुढच्या अधिवेशनात विधेयक मांडायचे. हा खेळ २ वर्षे रंगला.अखेर २०१३ च्या शेवटच्या अधिवेशनात ह्या विधेयकाला कायद्याचे स्वरूप मिळाले. मूळ विधेयकात तोपर्यंत तब्बल १५७ सुधारणा झाल्या होत्या. भारतात प्रथमच हा 'रास्त मोबदला आणि पारदर्शी प्रक्रिया कायदा' The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement 2013 अर्थात : भूमी अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्व्यवस्थापनात योग्य भरपाई व पारदर्शकतेच्या हक्काचा कायदा. या कायद्यात काही बदल घडवून आणण्यासाठी

मोदी सरकारने ३१ डिसेंबर २०१४ रोजी एक वटहुकूम जारी केला.

बदललेल्या तरतुदींचे मूळ रूप आणि त्यात केलेले बदल पुढीलप्रमाणे :

१) मूळ कायद्यात पायाभूत सुविधा (infrastructure) या संकल्पनेतून खासगी इस्पितळे, खासगी शिक्षणसंस्था आणि खासगी हॉटेल्स जाणीवपूर्वक वगळली होती. म्हणजेच हा कायदा अशा प्रकल्पांना लागू नव्हता. वटहुकुमाद्वारे खासगी शिक्षणसंस्था व खासगी इस्पितळांचा कायद्याच्या तरतुदीत समावेश करण्यात आलेला आहे.

२) मूळ कायद्यात जिथे जिथे private company असा उल्लेख होता तिथे तिथे private entity असा बदल केला गेला आहे. म्हणजे हा कायदा व त्याचा लाभ खासगी क्षेत्रातल्या कंपन्यांनाच नाही तर व्यक्ती व अन्य आस्थापनांनाही लागू होईल.

३) मूळ कायद्यानुसार जिथे खासगी कंपन्या त्यांच्या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित करणार होत्या तिथे किमान ८०% प्रकल्पबाधितांची पूर्वसंमती आवश्यक होती. पीपीपी अर्थात खासगी व सार्वजनिक क्षेत्रांच्या सहयोगाने राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांसाठी हा आकडा ७०% होता. वटहुकुमाद्वारे अनेक प्रकारच्या प्रकल्पांसाठी अशा पूर्वपरवानगीची, सहमतीची गरज राहणार नाही. यात गरिबांसाठी व माफक किंमतीतील गृहप्रकल्प, औद्योगिक पट्टे अर्थात industrial corridors, पायाभूत सुविधा देणारे प्रकल्प तसेच पीपीपी प्रकल्पांचा समावेश आहे, ज्यासाठी ८०/७० % प्रकल्पग्रस्तांच्या पूर्वसहमतीची गरज नाही.

४) वटहुकूमानुसार पुढील प्रकारांत मोडणाऱ्या प्रकल्पांसाठी भूमी अधिग्रहण करताना शासन सोशल इम्पॅक्ट ॲनालिसिसमधूनतसेच अन्नसुरक्षा सदर्भाने असलेल्या जमीन अधिग्रहित करण्यासंबंधीच्या नियमांतून सूट घेऊ शकेल.

अ) देशाच्या संरक्षणासाठी, संरक्षणसिद्धतेसाठी, संरक्षण–उत्पादनांसाठीचे प्रकल्प

आ) ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, यात विद्युतीकरणही आले.

इ) परवडणाऱ्या दरातील घरे व गरिबांसाठी घरे

ई) औद्योगिक पट्टे Industrial corridors

३) पायाभूत सुविधा व सामाजिक पायाभूत सुविधांकरिता खासगी व सार्वजनिक क्षेत्रांच्या सहयोगाने राबवले जाणारे PPP असे प्रकल्प ज्यांत जमिनीची मालकी शासनाकडेच राहील. (यात मुख्यत्वे वैद्यक सुविधा व शैक्षणिक संस्था) इथे सोशल इम्पॅक्ट ॲनालिसिस तसेच अन्न सुरक्षेसाठी केलेल्या नियमांची थोडक्यात माहिती पाहू.

शासनासमोर सार्वजनिक हितासाठी भूमीअधिग्रहणाचा प्रस्ताव येईल तेव्हा शासन त्या त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे(पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका) मत विचारात घेईल आणि त्यांना बरोबर घेऊन त्या त्या भागातील सोशल इम्पॅक्ट ॲसेसमेंट स्टडी हाती घेईल. सहा महिन्यांत हा अभ्यास पूर्ण करून त्याचे रिपोर्ट्स प्रसिद्धीस दिले जातील. या अभ्यासाअंतर्गत येणाऱ्या गोष्टी–

१) भूमी अधिग्रहण सार्वजनिक हितार्थ आहे वा नाही?

२) किती कुटुंबांवर त्याचा परिणाम होईल, त्यातली किती विस्थापित होतील?

३) परिसरातील स्थावर मालमत्ता, वसाहती व सार्वजनिक वापराच्या जागांवर होणारा परिणाम

४) जितकी भूमी अधिग्रहित करायचा प्रस्ताव आहे तितक्या जमिनीची खरेच गरज आहे का?

५) अन्यत्र प्रकल्प स्थापित करणे शक्य आहे का?

६) प्रकल्पाचे सामाजिक परिणाम, त्यांच्या निवारणात येणारा खर्च व प्रकल्पापासून होणाऱ्या लाभाची तुलना

७) प्रकल्पबाधित भागातील जनतेची सार्वजनिक सुनावणी

सामाजिक परिणामांच्या अभ्यासावर आधारित या परिणामांच्या व्यवस्थापनाचा आराखडा बनवला जाईल. सामाजिक परिणामांचा अभ्यास करतानाच पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास केला जाईल.

या रिपोर्टवर एका तज्ञ समितीकडून दोन महिन्यांत प्रकल्पासंबंधाने मत (कारणांसकट) मागवले जाईल. हे मत नकारात्मक असतानाही शासनाने प्रकल्प राबवायचे ठरवले त्यामागची कारणे लेखी नोंदवली जातील.

थोडक्यात भूमी अधिग्रहण करताना तपासावयाच्या बाबी :

१) प्रकल्प सार्वजनिक हितार्थ आहे.

२) प्रकल्पापासून होणारे लाभ हे दुष्परिणामांच्या व खर्चाच्या तुलनेत अधिक आहेत.

३) प्रकल्पासाठी शक्य तितकी कमीत कमी भूमी अहिग्रहित केली जावी.

४) आधीच अधिग्रहित केलेली पण वापराविना पडून असलेली दुसरी जमीन त्या परिसरात नाही, असेल तर ती या प्रकल्पासाठी वापरावी.

जिथे भूमी अधिग्रहित करण्याचा निर्णय होईल तिथे ज्याने विस्थापितांची संख्या; पर्यावरण आणि लोकांवरचे दुष्परिणाम लघुतम राहील अशी आणि इतकीच जमीन ताब्यात घ्यावी. तातडीची गरज असेल तिथे (देशाचे संरक्षण, नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेली आणीबाणीची परिस्थिती) सोशल इम्पॅक्ट ॲनालिसिस न करता तीस दिवसांची नोटिस देऊन भूमी अधिग्रहित करायची तरतूदही आहे. जलसिंचनाची सोय असलेली व एकापेक्षा अधिक पिकांखालची शेतजमीन अपवादात्मक परिस्थिती वगळता अधिग्रहित करू नये. अशी शेतजमीन अधिग्रहित केली तर त्याच प्रमाणात जमीन शेतीसाठी तयार करणे किंवा त्यासाठीच्या खर्चाची तरतूद करणे. शेतीखालची कशाप्रकारची, एकंदरित किती जमीन अधिग्रहित करता येईल याच्या राज्यवार वा जिल्हावार मर्यादा ठरवणे. या तरतुदी रेल्वे, महामार्ग, मोठे रस्ते, सिंचनासाठीचे कालवे, विद्युतवाहिन्या इ.साठी लागू असणार नाहीत.

५) २०१३ च्या कायद्यानुसार त्याही आधीच्या म्हणजे १८९४ च्या कायद्यानुसार अधिग्रहित केल्या जात असलेल्या जमिनींची प्रकरणे जिथे पूर्णत्वास गेलेली नाहीत तिथे नव्या कायद्यानुसार भरपाई देणे बंधनकारक केले आहे. अंतिम निर्णय होऊनही पाच वर्षांहून अधिक काळात जमिनीचे हस्तांतरण झाले नसेल किंवा भरपाई अदा झाली नसेल तिथे ती नव्या कायद्यानुसार दिली जाईल. हाच नियम जिथे बहुतांश भूधारकांना (जुन्या कायद्याने) भरपाई दिली गेली नसेल तिथे ती सगळ्याच भूधारकांना नव्या कायद्याने दिली जाईल. वटहुकुमानुसार पाच वर्षे मोजताना कोर्ट–लवादांकडे प्रकरण प्रलंबित असतानाचा किंवा भरपाई कोर्टात/वेगळ्या खात्यात जमा केलेली असल्यास तो कालावधी धरला जाणार नाही.

६) मूळ कायद्यानुसार : शासनाच्या एखाद्या विभागाने या कायद्याच्या अंमलबजावणीत अपराध केला तर विभागप्रमुखाला जबाबदार धरून तो कारवाईस आणि शिक्षेस पात्र असेल. वटहुकुमानुसार : क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १९७ प्रमाणे योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय न्यायालयाला अशा अपराधाची दखल घेता येणार नाही. (अर्थात योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी असल्याशिवाय अशा चूक करणाऱ्या खात्याविरुद्ध न्यायालयाकडे तक्रार करता येणार नाही.)

७) मूळ कायदा : अधिग्रहित केलेली व ताब्यात घेतलेली जमीन पाच वर्षे वापराविना पडून राहिली तर ती जमिनीच्या मूळ मालकाला परत करावी वा सरकारी लँड बँकेत वळती करावी. वटहुकूम : पाच वर्षांऐवजी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी निर्धारित केलेला कालावधी किंवा पाच वर्षे, यापैकी जे नंतर होईल ते. अर्थात प्रकल्प राबवण्यासाठी किमान पाच वर्षे व त्यापेक्षा जास्त, जितका ठरवला जाईल तितका काळ मिळेल.

८) भारतात जमीन अधिग्रहण निरनिराळ्या कायद्यांअतर्गत होतं , जसे रेल्वेसाठी, अणु उर्जेसाठी, मेट्रोसाठी. या सगळ्या कायद्यांखाली होणाऱ्या भूमी अधिग्रहणालाही या कायद्याचे नियम सरकारने ठरवलेल्या तारखेपासून लागू होतील.कायदा अंमलात आल्यापासून एका वर्षात सरकारने जाहीर करणे अपेक्षित आहे (होते) वटहुकूमानुसार १ जानेवारी २०१५ पासून या कायद्याचे नियम लागू होतील. या कलमाचा उद्देश भूमीअधिग्रहण कायद्यात सांगितल्यापेक्षा कमी भरपाई अन्य कायद्यांखाली दिली जाऊ नये असा दिसतो.

९) मूळ कायदा : कायद्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींच्या निवारणार्थ केंद्रशासन योग्य त्या तरतुदी करेल किंवा आदेश देईल. पण असे कायदा लागू झाल्यापासून दोन वर्षांपर्यंतच करता येईल. वटहुकूम : दोन वर्षांऐवजी पाच वर्षांपर्यंत करता येईल. चर्चेचा परिघ : कायद्यातील बदललेल्या कलमांचा नक्की परिणाम, त्यांची अपरिहार्यता समजून घेणे.

भूमी, अधिग्रहण व कायदा मे २०१४ मध्ये एनडीए सरकार निवडून आले आणि त्यांनी मेक इन इंडिया नावाची संकल्पना देशासमोर ठेवली. या संकल्पनेला पूरक अशा सोयीसुविधा तातडीने निर्माण करण्याची घोषणा सरकारने केली. भूमी अधिग्रहण अध्यादेश,२०१४ हे त्या

दिशेने टाकले गेलेले एक महत्वाचे पाउल आहे असे म्हटले गेले. या वक्तव्यानुसार नवीन उद्योग उभारण्यासाठी पैसा गुंतवण्याची गरज आहे जो परकीय गुंतवणुकीतून येईल आणि हे उद्योग सुरु करण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे जमीन. अगदी सोप्या भाषेत सांगायचे झाले तर सार्वजनिक कामांसाठी जमीन संपादित करण्याची प्रक्रिया म्हणजे भूमी अधिग्रहण. हा एक असा विषय आहे जो आज देशभर वादाचा मुद्दा झालेला आहे. पण भूमी अधिग्रहण हा मुद्दा काही आज चर्चेत आलेला नाही. २००७ पर्यंत भूसंपादन कायदा, १८९४ प्रमाणे सगळे व्यवहार व्हायचे. पण हे सगळ्यांना कळत होते की हा कायदा न्यायाने वागणारा नाही. म्हणून १९९८ मध्ये हा कायदा दुरुस्त करण्याची प्रक्रिया सुरु झाली आणि तब्बल १० वर्षांनंतर भूसंपादन कायदा, २००७ हा लोकसभेमध्ये पहिल्या युपिए सरकारने प्रस्तुत केला. लोकसभेत मान्यता मिळूनही या विधेयकाचे रुपांतर कायद्यात नाही झाले कारण याला राज्यसभेत मान्यता नाकारण्यात आली. म्हणून २०११ मध्ये युपिए च्या दुसऱ्या सरकारने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहातीकरण कायदा प्रस्तुत केला ज्याला २०१३ मध्ये आणखी मोठे नाव मिळाले आणि ?भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहातीकरण, न्याय्य भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act (RFCLARR) 2013 हा कायदा अस्तित्वात आला. एनडीएने (विरोधी पक्ष) देखील सकारात्मक प्रतिक्रिया देऊन हा कायदा आणण्यास मदत केली. हा कायदा आणण्याचा युपिए चा हेतू हा होता की जमिनीचा जास्तीत जास्त वापर सार्वजनिक कल्याणासाठी व्हावा आणि भूमी धारकांना योग्य भरपाई मिळावी. पण या कायद्यावर उद्योगधारक व काही राज्यसरकारांकडून टीका झाली. म्हणून ३१ डिसेंबर २०१४ मध्ये या तक्रारींची नोंद घेत या एनडीए सरकारने नवीन अध्यादेश जारी केला आणि देशभरात वादाचे वादळ उठले. सर्वात प्रथम आपल्याला हे जाणून घेण्याची गरज आहे की मुळात १८९४ चा कायदा लोकांना जुलुमी का वाटत होता आणि तो बदलण्याची मागणी इतक्या तीव्रतेने का होत होती.

१) १८९४ च्या कायद्यानुसार एकदा अधिकाऱ्याने ठरवले की एखादी जमीन मिळवायची आहे तर कुठल्याही परिणामांचा विचार न करता ती जमीन अधिग्रहण करण्यात यायची.

२) भूमी अधिग्रहणाबद्दल कोणाकडेही आवाहन करण्याची सोय या कायद्यात नव्हती. सेक्शन ५(अ) मध्ये एक ढोबळ तरतूद होती पण त्यानुसार केलेल्या तक्रारी किंवा सूचना मानण्याची बांधिलकी त्या अधिकाऱ्यांवर नव्हती.

३) या कायद्यामध्ये अधिग्रहणामुळे प्रभावित लोकांचे पुनर्वसन व पुनर्वसाहातीकरणाबद्दल कोणतीही तरतूद नव्हती.

४) एखादी जमीन अधिग्रहण करण्यावेळी Urgency Clause वापरला जायचा. पण हा Clause वापरण्यामागचं कारण कधीही स्पष्ट करण्यात आले नाही. त्यामुळे जवळजवळ प्रत्येकवेळी भूमी अधिग्रहण हा अर्जन्सीचा मुद्दा असायचा. हे सेक्शन सर्वात जास्त टीकेला पात्र ठरले.

५) भरपाईची रक्कम कमी मिळणे हा सुद्धा एक महत्वाचा मुद्दा होता. ही रक्कम प्रचलित दराने देण्याऐवेजी मूळ मुल्यानुसार (सर्कल रेट) दिली जायची जी कालबाह्य झाली असायची. या अशा काही अन्यायकारक गोष्टींमुळे हा कायदा बदलण्यात यावा अशी सगळ्यांची मागणी होती. म्हणून आधीच्या कायद्यातल्या चुका पुन्हा होऊ न देता ?लोकहित? हे उद्देश्य ठेऊन २०१३ मध्ये नवीन कायदा बनवण्यात आला. या कायद्यातील काही मुद्द्यांमुळे सर्वानुमते याला मंजुरी मिळण्यास मदत झाली. २०१३ च्या कायद्यातील महत्वाच्या तरतुदी

१) मूळ मुल्यामुळे (सर्कल रेट) होणाऱ्या अन्यायावर तोडगा म्हणून या कायद्यानुसार ग्रामीण भागात जमिनीच्या बाजारभावाच्या चारपट तर शहरी भागात दुप्पट अशी भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली.

२) पुनर्वसन व पुनर्वसाहातीकरणाला महत्व देऊन पहिल्यांदा त्याबद्दल तरतुदी करण्यात आल्या. यानुसार जमीन, घर, नोकरी, योग्य रक्कम, इ. फायदे ज्यांच्या जमिनी घेतल्या आहेत त्यांना देऊन त्यांची नुकसान भरपाई करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

३) या कायद्यानुसार आधीच्या काळात ज्यांना त्यांची नुकसानभरपाई मिळाली नाही अशा लोकांना योग्य ती रक्कम देण्याची तरतूद आहे. शिवाय ज्यांची जमीन ५ वर्षांपूर्वी अधिग्रहण केली असेल आणि त्याचा मोबदला दिला गेला नसेल किंवा त्या जागेचा ताबा घेतला गेला नसेल तर सर्व प्रक्रिया पुन्हा नव्याने नव्या कायद्यानुसार सुरु करण्यात येईल अशी यात नोंद

आहे.

४) सार्वजनिक–खाजगी भागीदारी सम्बन्धित प्रकल्प असेल तर त्या जमिनीच्या अधीग्रहणामुळे प्रभावित होणाऱ्या ७०% लोकांची संमती आणि खाजगी प्रकल्पांसाठी ८०% संबंधित लोकांची संमती लागेल अशी तरतूद या कायद्यात आहे. शिवाय, या कायद्यानुसार संबंधित प्रकल्पाचे ?सामाजिक प्रभाव मुल्यांकन? (Social Impact Assessment, SIA) करणे बंधनकारक आहे असे यात नमूद केले होते. कारण त्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाचा प्रभाव पर्यावरण व सामाजिक जीवनावर होणार आहे का हे तपासणे अत्यंत गरजेच आहे.

५) जर अधिग्रहण केलेली जमीन वापरली गेली नसेल तर या काद्यानुसार राज्यसरकारला ती जमीन पुन्हा तिच्या मालकाला किंवा State Land Bank ला परत करण्याचा अधिकार दिला आहे.

६) जमिनीची भरपाई म्हणून मिळालेल्या रकमेवर आयकर किंवा stamp duty आकारण्यात येणार नाही असेही या कायद्यात म्हटले गेले आहे. या कायद्याला सर्व स्तरांवरून टीकेला सामोरे जावे लागले. शेतकऱ्यांचे म्हणणे होते की भरपाईची रक्कम अपुरी आहे. तसेच सिंचन प्रकल्पांना सूट देणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे खाजगी उद्योगधारकांना भूसंपादन प्रक्रियेत समाविष्ट करून घेणे या गोष्टींना शेतकऱ्यांचा व चळवळीतील लोकांचा विरोध झाला होता. तसेच दुसरीकडे उद्योगपती, कारखानदार आणि राज्यसरकार यांच्यासुद्धा वेगळ्या तक्रारी होत्या. त्यांच्यामते या कायद्यामुळे भूसंपादनाच्या प्रक्रियेत किचकटपणा निर्माण होऊन यामुळे विकासप्रकल्पांसाठी जमिन मिळवण्याचा जो कालावधी आहे तो लांबेल आणि विकासप्रकल्प रखडल्यामुळे विकासदर मंदावेल. विशेष म्हणजे युपिए चेच सरकार असलेल्या बऱ्याच राज्यांनी देखील य कायद्याबद्दल नाराजी व्यक्त केली. २०१३ च्या कायद्याचे नशीब फार काही चांगले नसल्यामुळे खूप कमी काळातच नवीन सरकारने त्याच्यापासून नाक मुरडले आणि भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहातीकरण, न्याय भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार अध्यादेश, २०१४ प्रस्तुत केला. हा अध्यादेश ३१ डिसेम्बर २०१४ रोजी आणण्यात आला. लोकसभेत याला मंजुरी मिळाली असली तरी

राज्यसभेत याला मान्यता मिळालेली नाही. सर्व ताक्रकिंची नोंद घेत या अध्यादेशात समाविष्ट केलेल्या काही महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत–

१) २०१३ च्या कायद्यात जी प्रभावित होणाऱ्या लोकांच्या संमतीची तरतूद होती ती या अध्यादेशात ५ कारणांकरिता जमीन अधिग्रहण करताना वगळण्यात आली आहे. १. सार्वजनिक–खाजगी भागीदारीतील प्रकल्प, २ रस्ते, वीज निर्मिती सारखी ग्रामीण बांधकामे, ३ रास्त दरातील घरबांधणी, ४ औद्योगिक कॉरीडोर आणि ५ संरक्षण कारणे.

२) ग्रामीण विकास खात्याने असा सुद्धा बदल सुचवला आहे की ?सामाजिक प्रभाव मुल्यांकन? ची तरतूद वगळूनच टाकावी किंवा फक्त मोठ्या सार्वजनिक–खाजगी भागीदारीतील प्रकल्पांनाच लागू करण्यात यावी. या तरतुदीमुळे भूमी अधिग्रहणाच्या प्रक्रियेमध्ये विलंब होईल असे या गटाचे म्हणणे आहे.

३) २०१३च्या कायद्यानुसार जुन्याकाळी जमीन अधीग्रहाण केल्याबद्दल भरपाई देण्याची जी तरतूद होती ती काढून टाकावी असे या अध्यादेशामध्ये सुचवण्यात आले आहे. ही भरपाई दिल्यामुळे राज्याच्या अर्थखात्यावर जास्त भार येईल असे या सरकारच्या अभ्यासकांचे म्हणणे आहे.

राज्यघटनेने संपत्तीचा अधिकार हा आर्टिकल ३१ अंतर्गत मुलभूत अधिकार म्हणून भारतीय नागरिकांना दिला होता. पण ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार १९७८ पासून हा मुलभूत अधिकार न राहता आर्टिकल ३०० अ अंतर्गत घटनात्मक अधिकार झाला आहे. दिग्गजांचे म्हणणे आहे की संपत्तीचा अधिकार हा मुलभूत अधिकार म्हणून नाही ठेवता येणार कारण जर सरकारी अधिकाऱ्यांकडून या अधिकाराचे उल्लंघन झाले तर थेट सर्वोच्च न्यायालयाकडे हा खटला जाईल. शिवाय आर्टिकल ३१(२) नुसार बाजारभावाएवढी पूर्ण किंमत भरपाई म्हणून द्यावी लागेल. न्यायमूर्ती चिनप्पा यांच्या मते ही तरतूद सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय आणि समता या सांविधानिक तत्वांचे उल्लंघन करणारी आहे. आर्टिकल २२६ नुसार संपत्तीच्या संबंधित तक्रारीसाठी आता राज्यातील उच्च न्यायालयात जाता येऊ शकते. जमीन मिळवण्याची प्रक्रिया महाग व गुंतागुंतीची केली आहे अशी २०१३ च्या कायद्यावर टीका होती. शिवाय भूमी अधिग्रहणाची प्रिलिमिनरी नोटीस पाठवण्यापूर्वी पूर्व संमतीची जी अट होती त्याला सुद्धा बऱ्याच

राज्य सरकारांनी विरोध केला कारण त्यांचे म्हणणे होते की प्रत्येकवेळी नोटीस पाठवण्याआधी त्या जमीनधारकांची ओळख पटवून घेणे हे खूप किचकट काम असेल. एका अर्थाने त्यांचे म्हणणे ग्राह्य धरता येऊ शकते. एकीकडे राज्यसरकार आणि उद्योगधारकांचा हा टीकेचा सूर असताना दुसरीकडे प्रख्यात अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांच्यानुसार औद्योगिक प्रकल्पांसाठी शेतकी जमिनीचा वापर करण्यावर जो या २०१३च्या कायद्याने निर्बंध लावला आहे तो देशाला अधोगतीकडे नेणारा आहे. त्यांचे म्हणणे आहे की जगातील कित्येक मोठी आणि प्रगत शहरे आज सुपीक जमिनीवरंच उभी आहेत. २०१३ च्या कायद्याची शिफारस सुमित्रा महाजन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली होती. काही अभ्यासक या कायद्याचे सौम्य स्वरात समर्थन करत आत्ताच्या अध्यादेशावर ताशेरे ओढत आहेत. योगेंद्र यादव यांचे म्हणणे आहे की हा कायदा आल्यावर जरा वातावरण सौम्य झाले होते. १८९४च्या कायद्यानुसार जबरदस्तीने जमीन हडपण्याचे जे काही काम सुरु होते त्यावर ताळेबंध लावणारा हा २०१३चा कायदा होता. नर्मदा बचाव आंदोलनासारख्या मोठ्या चळवळी या भूमी अधिग्रहणाच्या विरोधात रुपास आल्या होत्या. या सर्वांना थोडं समाधान देणारा हा कायदा होता. पण हा नवीन अध्यादेश १८९४च्या कायद्यापेक्षा क्रूर आहे असे योगेंद्र यादव यांचे म्हणणे आहे. प्रख्यात पत्रकार पी. साईनाथ यांच्यामते भूमी अधिग्रहण हे शेतकऱ्यांसाठी किंवा विकासासाठी नसून फक्त जमीनीच्या व्यवहारांसाठी आहे. या कायद्यानुसार बहुपीक येणाऱ्या जमिनींना अगदी खूप गरज असेपर्यंत हात लावला जाणार नाही असं म्हटलं आहे. पण मुळात गरीब लोकांकडे एक पिक उगवणाऱ्या शेतीची मारामार असताना त्यांच्याकडे बहुपीक उगवणारी जमीन कुठून येणार? त्यामुळे या भूमी अधीग्रहणाचा सर्वात जास्त परिणाम दलित आणि आदिवासींवर होणार आहे असं त्यांचं म्हणणं आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्येला देखील हे विधेयक मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे असही त्यांचा म्हणणं आहे. पी.साईनाथ ओडिशामधील लोखंडाचं उत्खनन करायला येणाऱ्या ?पॉस्को? या कंपनीचं उदाहरण देत म्हणतात की आपण या परकीय कंपन्यांना आपल्या देशातील नैसर्गिक संपत्तीची नासधूस करण्याचा अधिकार देत आहोत या भूमी अधिग्रहण विधेयकामुळे.

डाव्या विचारधारेसोबतच उजव्या विचारधारेनेसुद्धा एनडीएच्या अध्यादेशाबद्दल नाराजी

व्यक्त केली आहे. भारतीय किसान संघाचे म्हणणे आहे की शेतीच्या जमिनींना हात लावण्यापेक्षा ओसाड पडलेल्या ज्या जमिनी आहेत त्या औद्योगीकीकरणासाठी सरकारने द्याव्या. शिवाय लोकांची संमती घेण्याची तरतूद जी या अध्यादेशातून काढून टाकण्यात आली आहे तिचा पुन्हा यात समावेश करावा. विश्व हिंदू परिषदेचे म्हणणे आहे की आम्ही भूमी अधिग्रहणाच्या विरोधात नाही आहोत, पण या अधीग्रहणामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होता कामा नये. प्रवीण तोगडिया म्हणतात की ६०% जनता जी इतर सर्वांची भूक भागवते त्या जनतेवर उपाशी झोपायची वेळ येऊ नये सरकारच्या कुठल्याही पाउलामुळे. भारतीय जनता पक्षाचे माजी प्रेरणास्त्रोत के.एन.गोविंदाचार्य विचारतात की भाजपने निवडणुकीच्यावेळी २०१३ चा भूमी अधिग्रहण कायदा बदलण्याचे कोणतेही आश्वासन दिले नसताना आता इतक्या घाईघाईने हा अध्यादेश आणण्यामागे सरकारची काय मानसिकता आहे. या उदाहरणांवरून लक्षात येते की या अध्यादेशाला कुठल्याही विशिष्ट गटाचा विरोध नसून सामान्यपणे ज्यांना कळतंय की याने सामान्य नागरिकांवर अन्याय होणार आहे अशा सर्वांचा विरोध आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे भूमी अधिग्रहण म्हणजे राज्य किंवा केंद्र सरकारची विकास कामांसाठी, औद्योगिकीकरणासाठी आणि शहरीकरणासाठी खाजगी जमीन संपादन करण्याची प्रक्रिया. पण हा विकास म्हणजे नेमका कोणता विकास, कशाचा विकास, असे काही प्रश्न उपस्थित होतात. म्हणजे विकास कामांच्या नावाखाली जमीन अधिग्रहीत करून औद्यगिक कॉरीडोर बांधणे, आय टी पार्क उभारणे, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) स्थापन करणे, खाजगी दवाखाने आणि शाळा बांधणे ज्यांची पायरी चढताना सर्व सामान्य व्यक्तीला त्याची आयुष्याची तुटपुंजी आठवते म्हणजे विकास आहे का, असा प्रश्न पडतो. त्यावर सरकारचे म्हणणे आहे की अधीग्रहणामुळे प्रभावित लोकांना भरपाई तर देऊच शिवाय त्यासोबत नवीन रोजगाराचीसुद्धा व्यवस्था केली जाईल. जन्मभर शेती करणाऱ्या एखाद्या व्यक्तीला जर उद्या अचानक मासेमारी करावी लागली तर या नवीनप्रकारे उदरनिर्वाह करण्याच्या प्रक्रियेत स्थिरावण्यात किती वेळ जाईल त्याचा, याचा विचार झाला पाहिजे. मध्यंतरी असे सांगण्यात आले होते की प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीला नोकरी देण्यात येईल. यावर काही लोकांचे म्हणणे होते की आम्ही एका घरातील १२ जण जर २ एकर शेती करून आमचे पोट भरत असू आणि उद्या आमची जमीन गेल्यावर अमच्यापैकी

एकालाच काम करायला मिळाले तर आम्ही सगळ्यांनी आमचे पोट कसे भरायचे. या सर्व गोष्टी लक्षात घेता भूमी अधीग्रहाणामुळे नक्की कुठल्या प्रकारचा विकास होणार आहे आणि कोणाचा होणार आहे याचा विचार केला पाहिजे. असे म्हणता येईल की २०१३ च्या कायद्याबद्दल ग्रामीण विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे आलेल्या काही तक्रारी काही प्रमाणात योग्य होत्या कारण खरच सर्व सामान्यांच्या विकासाठी, सामाजिक विकासासाठी हाती घेतलेल्या प्रकल्पांनादेखील यातील लांबलचक गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे विलंब होण्याची शक्यता आहे. म्हणून या नवीन अध्यादेशाने सर्व कामे इतकी सोपी केली आहेत की तुमचा उद्देश काही असो, तुम्हाला सामाजिक विकास करायचा असो वा नसो, सरकार तुम्हाला त्यांच्यामते सोयीस्कर अशा कुठलीही फारशी अडचण न येणाऱ्या पद्धतीने जमीन मिळवून देईल.

**४.४.६ पुनर्वसन सद्यस्थिती :-**

महाराष्ट्रातील पश्चिमेस असलेल्या सह्याद्रीच्या रांगेत वसलेला सुंदर असा भाग तो म्हणजे सातारा या भागाची भौगोलिक रचना ही धरण बांधण्यासाठी नैसर्गिकता पुरेपूर सोयीस्कर होती. धरण बांधणीमुळे इतर दुष्काळी भागातील लोकांची पिण्याच्या पाण्याच्या सोयीबरोबर शेतीच्या पाण्याची सोय होऊन दुष्काळग्रस्तांनबरोबर आपल्या महाराष्ट्राचा विकास होणार व त्याच बरोबर महाराष्ट्राच्या आर्थिक विकासावर ही त्यांचा चांगला परिणाम होईल. याचे संपूर्ण श्रेय जाते ते फक्त ज्यांनी धरण बांधण्यासाठी आपल्या शेतजमिनी, राहत्या घराच्या जमिनी त्या धरणात दिली.

कोयना, कन्हेर, धोम, टेंबू अशीकाही प्रसिद्ध धरणे आहेत .त्यात आणखी एक बनलेलं धरण म्हणजे परळी विभागातील कृष्णाखोऱ्यातील उरमोडी धरण हे सज्जन गडाच्या खाली अतिशय प्रचंड मोठा भाग व्यापलेला हे धरण साताऱ्या बरोबर सांगली भागातील लोकांना अतिशय उपयुक्त ठरणारे आहे .कित्येक लोकांनी, पूर्वजांच्या वाडवडीलांची जमीन, आपली घरे, त्यांच्या आठवणी त्या धरणात सोडल्या.

ज्यांनी आपल्या जमिनी धरणासाठी दिल्या. शासनाने मात्र त्या जमिनीचा कवडीमोल मोबदला दिला. त्यातच अनेक राजकारण्यांनी आपली पोळी भाजून घेतली. सर्वसामान्य

गावकऱ्यांच्या वाट्याला फक्त दु:ख आल.कृष्णाखोरे धरण प्रकल्प अधिकाऱ्यांनी तर त्या स्थानिक लोकांना त्यांच्या पुनर्वसनाचे मोठ मोठे आश्वासने दिली.ती म्हणजे घरे, पाणी, वीज, रोजगार, शिक्षण पण ज्या लोकांनी जमिनी दिल्या. त्यांना १० बाय १५ ची पत्र्याची घरे दिली. तसेच ज्यांच्या पाण्याखालच्या जमिनी घेतल्या त्यांच्या माथी आता ओशाड माळरान, गवत न उगवणारे भूखंड मारले आहे. पुर्वी जे नातेवाईक त्यांच्या जवळ होते. ते आत पुनर्वसनामुळे दूर गेले आहे. शेजारी असणारे गावं गावातील ओळखीची जुनी माणस आता दूरवरही दिसत नाही. ज्याचं बालपण हिरव्या झाडांच्या पानाफुलांनमध्ये, खळखळत्या झऱ्या, नद्यांमधून झाले. त्यांना आता हिरवी झाडे, नद्या दिसत नाही.

आज या धरणग्रस्थांना पुर्वी जवळ असलेली जमीन आत ५/६ मैल अंतरावर असल्यामुळे तसेच जमीन पिकवण्यासाठी पुरेसे अर्थसहाय्य नसल्यामुळे हे धरणग्रस्त दुसऱ्यांच्या शेतात काम करून रोजगार मिळवतात.धरणग्रस्तांच्या सुधारणेसाठी अनेक प्रकारच्या योजना राबवल्या जातात. परंतु त्या योजनेचा लाभ गरजूंना मिळ्त नाही.पण तरीही हे धरणग्रस्त नवीन गावात, नवीन लोकांत, नव्या चैतन्याने स्वत:चे जीवन जगतात.

### ४.४.७ पुनर्वसन धोरण व कार्यक्रम (महत्त्वाचे शासन निर्णय) आढावा

संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील पुनर्वसनाबाबत शासनाने धोरण व कार्यक्रम ह्यामध्ये शासनाने महत्त्वाचे शासन निर्णयांचा आढावा घेतला आहे. पुनर्वसनाबाबत शासनाची भूमिका येथे मांडण्याचा प्रयत्न केला असून महत्त्वाच्या शासन निर्णयांच्या महत्वपूर्ण बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१. 'आधी पुनर्वसन मग धरण' या तत्वानुसार अवलंबविण्याच्या पुनर्वसनाच्या कार्यपद्धतीबाबत. (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. एस–३०/प्रक्र.३५/र–१, दिनांक १५ सप्टेंबर, २००४)

प्रकल्पाचा प्रत्यक्ष कामासाठी तसेच पुनर्वसनाच्या कामासाठी असणारा निधी नियोजन कालावधीमध्ये उपलब्ध होत नसल्यामुळे पुनर्वसनाची कामे खोळंबून राहतात, पुनर्वसनाच्या

कामाचा एकत्रित आराखडा तयार करण्यात येत नाही. त्यामुळे पुनर्वसन कामात सातत्य राहत नाही. पण जमीनीचा प्रश्न, निधीची कमतरता इ. कारणामुळे प्रकल्पाचे काम रखडल्याने शेतकऱ्यांना अडचणी येतात. प्रकल्प ग्रस्तांमध्ये असंतोष निर्माण होतो. त्यामुळे 'आधी पुनर्वसन मग धरण' ह्या तत्वाच्या पालनासाठी प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये कार्यपद्धती विहित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या संबंधीच्या तरतुदी ह्या शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेल्या आहेत.

२. पुनर्वसन अधिनियमांतर्गत भोगवटादार वर्ग–२ म्हणून वाटप झालेल्या जमीनीचे भोगवटादार वर्ग–१ मध्ये रूपांतर करणेबाबत. (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए–२००४/प्र.क्र.९१/र–१, दिनांक ११ जून, २००४)

ज्या पाटबंधारे प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९७६/ १९८६ लागू झालेला आहे. त्या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांपैकी जे प्रकल्पग्रस्त पूर्वीचे भोगवटादार वर्ग–१ मध्ये मांडणारे असतील व त्यांना वाटप झालेली पर्यायी जमीन ही भोगवटादार वर्ग–१ मध्ये मोडणारी असेल तर वाटप झालेल्या दिनांकापासून दहा वर्षानी त्याचे रूपांतरण भोगवटादार वर्ग–१ मध्ये होईल. त्यासाठी त्यांना कोणतेही मूल्य भरण्याची आवश्यकता नाही. तसेच जे प्रकल्पग्रस्त पूर्वीचे भोगवटादार वर्ग–१ मध्ये मोडणारे असतील तर ते पर्यायी जमिनीचे वाटप झालेल्या दिनांकापासून दहा वर्षानंतर विहित अधिमूल्य भरून, ती जमीन भोगवटादार वर्ग–१ मध्ये बदलून घेण्यास पात्र असतील.

३. पुनर्वसित गावठानात प्रकल्प बाधितांना दिलेल्या भूखंडावर त्यांना घर बांधण्यासाठी हुडको कडून कर्ज सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीजे–१०८७/प्र.क्र.१ (१९८७) र–१, दिनांक २५ मार्च, १९९१)

महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ मधील तरतुदीनुसार प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याकरिता त्यांच्या संमतीने नवीन गावठान बसविले जाते. या गावठाणाला वरील कायद्याच्या कलम १० (३) मध्ये उल्लेखिलेल्या तेरा नागरी सुविधा पुरविल्या जातात. गावठाण अनेक भूखंडात विभागून सदर भूखंड, कब्जे हक्कांची रक्कम

होऊन प्रकल्पबाधित कुटुंबाना वाटण्यात येतात. १) कुटुंबातील व्यक्तींची संख्या २) कुटुंब शेतकरी आहे की बिगर शेतकरी ह्या निकषावर भूखंडाची जागा दिली जाते. शेतकरी कुटुंबात असणाऱ्या व्यक्तींची संख्या पाच पेक्षा जास्त नसते तेव्हा ३७० चौ.मी. भूखंड दिला जातो. कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाच पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक वाढीव तीन व्यक्तीं मागे आणखी १८५ चौ.मी. वाढीव क्षेत्रफळाचा भूखंड देता येतो. अशा तऱ्हेने कुटुंबाला जास्त ७४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड दिला जातो, घराचे सामान वहातूक करण्यासाठी मदत केली जाते.

प्रकल्प बाधिताला नवीन गावठाणात दिलेल्या भूखंडावर घर बांधता यावे म्हणून आणि त्यावर बांधण्यात यावयाचे घर याचे तारणावर खालील प्रमाणे दर साल दर शेकडा ६.१/४ टक्के दराने घर बांधणी कर्ज दिले जाते. त्यासाठी दोन वर्ग ठरविण्यात आले आहेत.

खातेदार आणि बिगर खातेदार प्रकल्पबाधिताला तीन हप्त्यात कर्ज दिले जाते. शासनातर्फे घरकुल योजनेखाली हाऊसिंग ॲन्ड अर्बन डेव्हलपमेंट कार्पोरेशन (हुडको) कडून कर्ज घेतले जाते ह्या विषयीची तरतूद वरील शासन निर्णयाद्वारे केला आहे.

४. प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए-०४१०/प्र.क्र.१४६/र-१, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१०)

महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासकीय अधिकारी त्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे जिल्हा पुनर्वसन अधिकारी, उपसचिव, पुनर्वसन व भूसंपादन, अशासकीय संस्था प्रतिनिधी यांचे सदस्याच्याखाली समिती गठीत करण्यात आल्या बाबतचा निर्णय ह्या शासन निर्णयात केला असून ह्या समितीच्या कार्यकक्षा काम असतील ह्या बाबतच्या तरतूदी वरील शासन निर्णयात केला आहे.

५. सन १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन नवीन/विस्थारीत गावठाणात पुरवावयाच्या नागरी सुविधांच्या कामात प्रशासकीय वित्तीय मान्यता व

निधीबाबत (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०११/प्र.क्र.८०/र.८, दिनांक २४ मे, २०१२)

ह्या शासन निर्णयामध्ये नागरी सुविधांच्या कामासाठी रुपये १ कोटी पर्यंतच्या अंदाजपत्रकास वित्तीय मंजूरीसह मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त रु. १ कोटी व रूपये ५ कोटी पर्यंतच्या अंदाजपत्रकास वित्तीय मंजूरी व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकाराबाबत निर्णय घेण्यात आला आहे. नागरी सुविधा कामासाठी निधी मागणी कामाची अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता इ. बाबींच्या तरतुदी ह्या शासन निर्णयात करण्यात आलेल्या आहेत.

६. पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधांच्या कामाची देयके कंत्राटदारास ग्रामपंचायत/प्रकल्पग्रस्त समितीच्या शिफारशीनंतर आरटीजीएस द्वारे देणे. (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. पुनर्व–२०१६/८६३१/२०१६/मो.प्र–२, दिनांक १ डिसेंबर, २०१२)

प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाच्या नागरी सुविधांची कामे केली जातात ह्या कामांमध्ये बऱ्याचश्या त्रुटी असल्याच्या तक्रारी प्रकल्पग्रस्तांकडून वारंवार केल्या जातात. उदा. गुणवत्ता योग्य नाही, अपूर्ण कामे, त्यामुळे ह्या कामे करते वेळी ग्रामपंचायत/प्रकल्पग्रस्त समिती यांचा सुद्धा कामाच्या देखभालीमध्ये समावेश असावा व समितीचे नाहरकत/ काम समाधानकारक झाल्याचे प्रमाण ग्रामपंचायत/प्रकल्पग्रस्त समितीकडून मिळाल्यानंतरच कंत्राटदाराची देयके आरटीजीएस ने अदा करणेत यावीत ह्या बाबतचे आदेश दिलेले आहेत.

७. प्रकल्प बाधीत व्यक्तींचे पुनर्वसन : लाभक्षेत्रातील संपादनपात्र क्षेत्र ठरविण्यासाठी निकष (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए–२०१६/सीआर–३९४१/र.१ दिनांक १४ नोव्हेंबर, १९८६)

एखाद्या भूधारकाचे लाभ क्षेत्रातील संपादनपात्र क्षेत्र ठरवित असतांना त्या भूधारकांची लाभक्षेत्रा बाहेरील जमीन विचारात घेण्यात येऊ नयेत. ह्या बाबतचा निर्णय ह्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे.

८. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन : स्वतंत्र पुनर्वसन यंत्रणेचे अधिकार व कर्तव्ये (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए-२००६/प्र.क्र.१(५)/र.१, दिनांक १७.३.२००६)

महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींची पुनर्वसन अधिनियम १९९९ हा दिनांक १७ एप्रिल, २००२ पासून अमंलात आलेला आहे. विविध विकास प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन ह्या संदर्भात केंद्र सरकारने फेब्रु. २००४ मध्ये राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००३ जाहिर केले. ह्या धोरणानुसार प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करणे निधी, प्रत्यक्ष काम पूर्ण करून घेणे/कामामध्ये प्रकल्पग्रस्तांचा सहभाग वाढविणे पुनर्वसन कामात सुसुत्रता आणणे व कार्यक्षमरितीने अंमलबजावणी करणेसाठी केंद्राने जाहिर केलेल्या धोरणात सुसंगत असे राज्याचे धोरण असावे त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या अखत्यारीतील पुनर्वसन यंत्रणेचे अधिकार कर्तव्य १. मंत्रालयस्तर, २. क्षेत्रीय स्तर ३. महसुली विभाग स्तर जिल्हा स्तर अशा विविध स्तरावरील यंत्रनेचे अधिकार कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत.

९. प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन : गाऱ्हाने निराकरण यंत्रना स्थापन करणेबाबत. (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए-२००६/प्र.क्र.१(९)/र.१, दिनांक १७.३.२००६)

महाराष्ट्रातील विविध प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींची पुनर्वसनाची कार्यवाही होत असतांना प्रकल्प बाधितांचे काही गाऱ्हाने असल्यास त्याचे निराकरण करणारी 'गाऱ्हाणी निराकरण यंत्रणा' स्थापन करण्याविषयीचे निर्णय ह्या मध्ये पारित केलेले आहेत. तसेच गाऱ्हाने निराकरण यंत्रणेचे अधिकार कार्यपद्धती ह्याचा उल्लेख या शासन निर्णयात केलेला आहे.

१०. प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन : लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पामुळे (पाटबंधारे प्रकल्प) बाधीत व्यक्तींना पुनर्वसनाच्या देय सुविधाबाबत (महसुल विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क्र.१(३)/र.१, दिनांक १७.४.२००६)

ह्या शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम १ (४) अ मध्ये नमुद तरतुदींच्या अनुषंगाने पाटबंधारे प्रकल्पात हा शासन निर्णय लागू राहिल.

१. पुनर्वसन गावठाणात नागरी सुविधा,

२. पुनर्वसन प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त कुटुंबास देय लाभ सुविधा

अ) गोठे बांधणी अर्थसहाय्य,

ब) दुकाने/शेडसाठी अर्थ सहाय्य

क) स्वयंरोजगार ह्या संबंधातील देय लाभाबद्दलचे आदेश तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपद्धती.

३. अनुसूचित जमातीच्या प्रकल्पग्रस्त कुटुंबियासाठी अतिरिक्त सुविधा/लाभ

४. अरुंद पट्ट्यामध्ये जमीन संपादन केल्यास मोबदला अधिक अनुदान ह्या बाबतचे सर्व निर्णय आदेश वरील शासन निर्णयात नमुद केलेले आहे.

वरील प्रमाणे शासन निर्णयाप्रमाणेच आणखी ही शासन निर्णय भूसंपादन, पुनर्वसन ह्या बाबतीत झालेले आहे. संशोधकाने ह्या सर्व निर्णयाचा आढावा घेऊन त्यांचे संदर्भ संशोधन लेखनात विविध ठिकाणी वापरलेले आहेत. शासन पातळीवर नियम, निर्णय व कायदे केलेले आहेत. परंतू ह्या निर्णयाची अंमलबजावणी मध्ये त्रुटी/कमतरता प्रकल्पग्रस्तांना त्यांचे हक्क व न्याय मिळविणे साठी मोठा आधार निर्माण झालेला आहे.

### ४.४.८ पुनर्वसन कार्यात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

**१.शाश्वत संस्था**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव ब्लॉकमधील एक स्वयंसेवी संस्था असलेल्या शाश्वत यांना संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) च्या विषुववृत्त इतिहासातील रिओ वॉटर रिसोर्सेज व्यवस्थापन संस्था (आरओओ +२०) २० जून रोजी ब्राझीलमध्ये स्थैर्यप्राप्तीबद्दल संयुक्त राष्ट्रांची परिषद. एनजीओला १५,००० यूएस डॉलर्स प्राप्त झाले. शशवत्त यांनी लोक, नैसर्गिक आणि संवेदनक्षम समुदायांसाठी स्थानिक विकास समाधानासाठी योगदान दिले आहे. शाश्वत यांना त्याच दिवशी 'इक्विटर प्राइज २०१२' देखील बहाल करण्यात आले. पुरस्कार एक प्रशस्तिपत्र आणि यूएस ५,००० समाविष्ट. जगभरातील सुमारे २५ संस्थांना विषुववृत्त पुरस्कार २०१२ सादर केले गेले. आनंद कपूर, शशवेटचे संस्थापक सदस्य, पर्यावरण कार्यकर्त्या सुनीता नारायण आणि बांगलादेशातील नोबेल शांती पुरस्कार प्राप्त मोहम्मद युनूस यांच्याकडून विशेष मान्यता पुरस्कार स्वीकारले.

कुसुम कर्णिक आणि कपूर यांनी १ ९ ८१ मध्ये आंबेगाव तालुक्यामधील दुर्गम भागातील आदिवासींमध्ये काम सुरु केले. शाश्वत संस्था १ ९९ ६ मध्ये नोंदणीकृत झाले आणि ते डिंभे धरणातील पाटबंधारे क्षेत्रातील कातकरी, ठाकर आणि महादेव कोळी आदिवासींबरोबर काम करीत आहेत. आदिवासींच्या मदतीने शाश्वत, मासेमारी करणाऱ्या मासेमारीसाठी मासेमारी करणाऱ्या नौका, जाळी मिळविण्यासाठी तसेच दिंबे जलाशयांमध्ये मासेमारी विकसित करण्यास सक्षम आहेत. सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन मुंबई आणि राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळासारख्या अनेक सरकारी विभागांनी या प्रकल्पाला पाठिंबा दर्शविला आहे. आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक पडकई यंत्रणेद्वारे धरण क्षेत्रातील धरणांच्या पाण्याच्या वरच्या खड्ड्यांवरील लहान आणि नवीन भातखाचरे जमीन तयार करण्यास मदत झाली आहे आणि ही एक सरकारी योजना आता अस्तित्त्वात आहे. स्थानिक सरकारच्या सहकार्याने व भागीदारीमुळे संस्थेने पाण्याचे पीक सिंचनला दिंबे जलाशय सुमारे लागवडीखालील जमिनीवर पाठिंबा दिला आहे. जे पाणी पातळी कमी झाल्यानंतर उदयास येते, असे शाश्वत चे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त कर्णिक यांनी सांगितले. विद्या बाळे, अध्यक्ष, शाश्वत म्हणाले

की, धान्योत्पादनामध्ये सुसह्य सुधारणा झाली आहे, आणि नऊ गावातील लोकांना कामाच्या शोधात स्थलांतर करण्याची आवश्यकता नाही. गावांत सुमारे जंगले जतन केले आणि शाश्वत च्या समर्थनार्थ त्यांच्या वन संवर्धन पद्धती दस्तऐवजीकरण, जे वन्यजीव अभयारण्य व्यवस्थापन स्थानिक मध्ये सहभाग जाहिरात आहे. ग्रामीण स्वयंसेवक आणि पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या एका गटाने शालेय विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याबद्दल एक निवासी प्राथमिक शाळा चालवली आहे, त्यांनी आदिवासी मुलांच्या वसतिगृहाची आणि आदिवासी क्रीडा अकादमी सुरू करण्याच्या दिशेने सुरुवात केली असून त्यांचे आरोग्यसेवा कार्यक्रम महिला व मुलांवर केंद्रित आहे.

### अ. जंगलाचे संरक्षक

भीमाशंकर जंगल महाराष्ट्रातील महाराष्ट्र, पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यामधील रिमोट, डोंगराळ, सरळ उतार, उच्च पाऊस पश्चिम घाट भागात स्थित आहे. हे कुमारी, सदाहरित, मेघ जंगल एक लहान पण चांगला पॅच आहे. महादेव कोळी आदिवासी हे या परिसरात अनेक शतकांपासून रहात असून ते या पर्यावरणातील आहेत. त्यांनी योग्य आणि अनोखी जीवनशैली, वृत्ती आणि तत्त्वज्ञान विकसित केले आहे. आणि या कारणांमुळे, त्यांच्या पर्यावरणातील शतकांपासून आतापर्यंत टिकून आहे.

### ब. शेती ते मासेमारी : डिंभेच्या आदिवासींचा प्रवास–

डिबे धरणामुळे विस्थापित झालेल्या अनेक आदिवासींनी आपली जमीन गमावली परंतु त्यांचे जीवनमान्य गमावले नाही. त्यांनी पिंजरा मत्स्य शेती उचलली आणि एक पर्यायी शेतीची लागवड केली.

महाराष्ट्रातील भीमाशंकर येथील पर्यटनस्थळाजवळ डिबे धरणाजवळ आहे. १३.५ दशलक्ष घनमीटर क्षमतेसह, धरणाने १२५३ कुटुंबे उद्ध्वस्त केल्या, ११ गावे पाण्याखाली गेली आणि २००० साली पूर्ण झाल्यानंतर काही १३ गावांचा आंशिकरित्या प्रभावित झाला. आज १ ९ गावे दिंबे जलाशयच्या तळ्यावर वसलेली आहेत. जमीन हेक्टर. यामुळे प्रभावित शेतक–यांना आपले शेतजमीन गमवाव्या लागल्या आणि काही पर्याय सोडून गेले, ज्यात नोकर्या शोधण्यासाठी जवळच्या शहरांना जावे लागले. त्या वेळी काही खेड्यांमध्ये जीवनमान

सुधारण्यासाठी क्षेत्रातील काम करणा-या मंचाच्या बाहेर असणारा एक स्वयंसेवी संस्था शशव चित्रात आला. एक मासेमारी सहकारी निर्मिती आहे शाश्वत लोकांना एकत्रितपणे एक सहकारी बनविण्याच्या संकल्पनेशी विचार करत आहेत ज्यामुळे ते विस्थापित आदिवासी शेतकर्यांसाठी पर्यायी स्वरूपाचे जीवन जगू शकतील. त्या वेळी त्यांना धरणाच्या साठ्यामध्ये मासेमारी संगोपन व माशांच्या संगोपनाची कल्पना आली.

**३. डिबे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सहकारी सोसायटी मर्यादित,**

डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सहकारी सोसायटी मर्यादित, दिगदची स्थापना सन २००६ मध्ये झाली. मत्स्यव्यवसाय विभागात, मत्स्यबीज रु. ९ लाख आणि ९००० बोटांचे किंमत रू. ३.८० लाख हे पहिल्या वर्षातील जलाशयमध्ये ठेवले जावेत. मत्स्यव्यवसाय सोसायटीच्या विनंतीवर शाश्वतने आदिवासी विकास विभागाला (टीडीडी) प्रत्येकी रु. अनुदान देण्याचा प्रस्ताव दिला. ५,३७,३६० ठेका रकमेच्या, सुरक्षा ठेव आणि मत्स्य बियाण्याचे मूल्य त्यांना रू. ३९,९०० मत्स्य बियाण्यांच्या किंमतीत आणि शशवतीने रु. स्विसएड कडून लाभार्थी म्हणून ४१,००३ मत्स्यव्यवसाय विभागातील सर्व मत्स्यबीज पुरवण्यासाठी ३ वर्षे लागली. शाश्वतचे आनंद कपूर म्हणतात, आम्ही एकत्रितपणे २७ टन माशांसाठी दरवर्षी कापणी केली आणि पुढील तीन-चार वर्षांतही ती मोडण्यास तयार आहोत. पिंजलेल्या मासेमारीस सुरुवात होण्यापूर्वी, शेतकर्यांनी फारच कमी पैसे दिले. काही रुपये म्हणून कमी. एक पीक हंगामासाठी ३०,००० आता महिला पिंजर्या कायम राखण्यातही सहभागी आहेत. याव्यतिरिक्त, त्यांना आर्थिक व्यवस्थापन करण्याबद्दल त्यांना मदत करण्यासाठी स्वमदत गटांबरोबर जोडले गेले आहे. २००६ पासून या गटात २१४ मासेमार कुटुंबे एकत्र आले आहेत.

- **नापीक जमिनीची लागवड** (पडकई लागवड)

शाश्वतमार्फत डिंभे जलाशयाच्या परिसरामध्ये डोंगर उताराची पडकई जमिन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यामध्ये प्रत्यक्ष लाभार्थ्यांचा सहभाग घेऊन पडकई जमिन सुधारण्यासाठी हाती घेण्यात आला.

## २. महाराष्ट्र आरोग्य मंडळ

१९९० मध्ये महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या वतीने सिकल सेल ॲनीमियासाठी डिंभे परिसरामध्ये काम सुरू झाले नाही. बिनशर्त सेवेकडे जाताना दिवाळीत ग्लोबल गिव्हिंग सारख्या अनेक सल्लागारांनी आपल्या कामात विश्वास ठेवण्यासाठी मदत करण्यासाठी सहकार्य केले. त्यांचे संबंध केवळ सातत्यपूर्ण आधार प्रदान केले नाही परंतु आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देखील ओळख आणि प्रमाणीकरण प्रदान केले. महाराष्ट्र आरोग्य मंडळाने जागतिक स्तरावर प्रथम प्रशिक्षणाचे काम करण्याची संधी दिली. नवीन लाभार्थींसाठी निदानाची सुविधा आणि नवीन आणि जुन्या कोयता सेल रुग्णांसाठी १००% औषध पुरवठा दर मिळवणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र आरोग्य मंडळातर्फे आरोग्य संबंधित विविध विकासात्मक प्रकल्प डिंभे परिसर व पुनर्वसित गावांमध्ये १९९० पासून राबविले जात आहेत.

- **नॅशनल इन्स्टिटयूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट (NISD), पुणे**

नॅशनल इन्स्टिटयूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, पुणे ह्या संस्थेतर्फे १९९७ साली डिंभे धरणग्रस्त गावांसाठी व १९९९ साली पिंपळगाव जोगे धरणग्रस्तांसाठी विकासात्मक रचनात्मक कामे सुरु केली.

- **डिंभे धरण :-**

डिंभे धरणग्रस्तांसाठी सुरवातीच्या काळात संस्थेने प्रथम बेसलाईन सर्वे करून धरणग्रस्तांची इतंभूत माहिती जमा केली. विस्थापित गावातील काही प्रमुख गावकऱ्यांना घेवून धरणग्रस्तांच्या प्रश्नासंबंधी जाणून घेतले. सर्व प्रथम विस्थापनामुळे त्या वेळी कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले ह्या बाबत चर्चा करण्यात आली व सर्वप्रथम विस्थापन झालेल्या गावांमधील धरणग्रस्तांना राहण्याची व्यवस्था नव्हती. शासनाने तात्पुरत्या स्वरूपात तयार केलेल्या पत्र्याच्या शेड मध्ये राहण्याची व्यवस्था होती. त्या ठिकाणी अनेक प्रश्न होते. पिण्याच्या पाण्याची समस्या नविन जमिनी मिळाल्या असतांना त्यांचे ताबे घेणे, अडथळे असणाऱ्या जमिनीबाबत अनेक प्रश्न, समस्या येत होत्या. त्यामध्ये संस्थेने सुरवातीस ट्री कलप

योजनेतून ५० ते ६० धरणग्रस्थांना उद्योग व्यवसायासाठी, शेळ्या, कोंबड्या ह्या साठी आर्थिक मदत केली व त्या धरणग्रस्त कुटुंबानी स्वतःचा व्यवसाय सुरु केला.

- **गटबांधणी–**

नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, पुणे मार्फत सुरवातीच्या काळात आंबेगाव गावठाण, कळंबई, गावडेवाडी, महिलांच्या बचतगटांची निर्मिती करून त्यांची बांधणी केली. बचत गटांची बांधणी करतांना इतरही गटांची बांधणी उदा. युवक गट, शेतकरी मंडळे, भजन मंडळे यांची नवीन पुनर्वसन वसाहतीमध्ये केली व ह्या कामास सुरूवात झाली.

- **जमिन सपाटीकरण–**

नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, पुणे मार्फत सुरवातीच्या काळात पुनर्वसन गावरानातील धरणग्रस्त शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर प्रश्न समोर आला. तो जमिनीबाबतचा पुनर्वसीत शेतकऱ्यांना मिळालेली जमिन हा खडकाळ व उंच सखल व पडित होती. उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीमधून उत्पादन सुरु करण्यासाठी नवीन जमिनीचे सपाटीकरण ''ऑस्टेलियन हाय कमिशन'' यांचे सहकार्याने सुरु करण्यात आले व त्यामध्ये जवळपास ५०० एकर नवीन जमिनीचे सपाटीकरण १० गावांमध्ये करण्यात आले. त्याच सोबत आयजीएसएस ह्या संस्थेनेही आर्थिक मदत देऊन हे कार्य पुढे चालू ठेवले.

- **विविध शासकीय योजना –**

जमीन सपाटीकरण सुरु असतांनाच शासन, कृषी विभाग, महसुल विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या विविध योजनांची माहिती व त्यासाठी अर्ज करणे पाठपुरावा करणे व धरणग्रस्तांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी संस्थेतर्फे प्रयत्न केले गेले.

- **संस्थेच्या विकासात्मक कार्यक्रमात धरणग्रस्तांचा सहभाग–**

संस्थेचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे धरणग्रस्त, पुनर्वसित कुटुंबांसाठी विविध विकासात्मक कार्यक्रम राबवित असतांना संस्थेने धरणगस्तांचा १०० टक्के सहभाग ह्या कामात राहिल याची

काळजी घेतली व विविध योजना, जमिन सपाटीकरण ह्या कार्यक्रमात लाभार्थींचा आर्थिक व शारीरिक सहभाग घेवून जमिन सपाटीकरण योजना सुरु केली.

- **धरणग्रस्तांचे संघटन–**

ही सर्व कामे करित असतांना डिंभे धरणग्रस्त कृती समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नांची सोडवणूक, शासकीय विभाग व अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून विविध प्रश्न सोडविण्यासाठी संस्थेतर्फे महिला बचत गट महासंघाची स्थापना करण्यात आली व महिला संघटनाच्यामार्फत दबावगट तयार करून विविध गावातील नवीन मिळालेल्या जमिनी संदर्भात मूळ मालकांकडून निर्माण केल्या जाणाऱ्या अडथळ्यांची प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला गेला. ह्या सोबतच धरणग्रस्तांसाठी हॅबेटेट फॉर ह्युमॅनिटी ह्या संस्थेच्या आर्थिक सहकार्याचे धरणग्रस्तांसाठी घरबांधणी प्रकल्प करण्यात आला.

- **पिंपळगाव जोगे प्रकल्प –**

नॅशनल इन्स्टिटयूट फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, पुणे मार्फत संस्थेने २००० साली पिंपळगाव जोगे पुनर्वसित धरणग्रस्त कुटुंबियांसाठी विविध विकासात्मक प्रकल्प सुरु केले. ह्या मध्ये महिला बचत गटांची स्थापना जवळ–जवळ १२ महिला बचत गटांची सुरवातीच्या काळात स्थापना करून ह्या भागातील संघटन बांधले. पिंपळगाव जोगे धरणग्रस्तांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हा भाग अतिशय दुर्गम व आदिवासी आहे. पुणे, ठाणे व अहमदनगर ह्या तिन्ही जिल्ह्यांच्या सिमेवर हे धरण व पुनर्वसित कुटुंबे राहत आहेत.

- **आरोग्य व स्वच्छता कार्यक्रम–**

Water Aid ह्या आंतराष्ट्रीय संस्थेच्या आर्थिक सहकार्याने २००० साली पिंपळगाव जोगे पुनर्वसित धरणग्रस्तांसाठी पिण्याची पाणी व आरोग्य स्वच्छता ह्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये पुनर्वसित कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालय बांधणी कार्यक्रम अंतर्गत जवळपास ३०० कुटुंबांना शौचालय बांधणी करण्यात आली. त्याचबरोबर २००३ मध्ये कन्सीलेट जनरल ऑफ जपान ह्या जपान अंबेसीच्या सहकार्याने जमीन सपाटीकरण कार्यक्रम

सुरु झाला. पिंपळगाव जोगे विभागातील जमिनी ह्या जास्त खडकाळ असल्याने जे.सी.बी. यंत्राचा वापर करणे उपयुक्त होते म्हणून जेसीबी यंत्राच्या सहाय्याने जवळपास आजपर्यंत ७०० ते ८०० एकर जमिनीचे सपाटीकरण सुरू आहे.

- **शिक्षण, आरोग्य, उपजिविका वृधी कार्यक्रम–**

चाईल्ड फंड इंडिया ह्या आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्थेतर्फे पिंपळगाव विभागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचा दर्जा सुधारणे साठी शैक्षणिक गुणवता विकास, शिक्षकांचे प्रशिक्षण शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना इ. कामे संस्थेतर्फे केली जात आहेत. उपजिविका वृधी कार्यक्रमाअंतर्गत बचत गटांमार्फत पुनर्वसित कुटुंबांना उपजिविकेसाठी छोट्या शेतीपुरक उपजिविका साधनांची उपलब्धता व व्यवसाय विकास हे कार्यक्रम संस्थेतर्फे घेण्यात आले.

संस्थेतर्फे पुनर्वसित कुटुंबांसाठी स्थायी विकासात्मक कार्यक्रम केले. शासनाकडे जमिनी सपाटीकरण कोणतेही उपक्रम नसतांना संस्थेने इतर सामाजिक संस्थाच्या माध्यमातून सपाटीकरण कार्यक्रम राबवून शेतमजूर असलेल्या शेतकऱ्यांना शेतकरी म्हणून निर्माण करण्याचे कार्य केले.

### ४.४.९ प्रकल्पबाधित व्यक्तींचा पुनर्वसन कार्यातील सहभाग

कोणत्याही प्रकल्प बाधीत व्यक्तींचा पुनर्वसन कार्याची जबाबदारी ही शासनाची असते. प्रकल्पासाठी करण्यात येणारे भूमिअधिग्रहण, पुनर्वसन ह्या सर्व प्रक्रियेमध्ये बाधीत व्यक्तींचा सहभाग असणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण प्रकल्पग्रस्त, प्रकल्पबाधीत व्यक्ती पिढ्यान–पिढ्या त्या भागात राहत असल्याने तया भागाविषयीची माहिती ही स्थानिक लोकांनाच असते. स्थानिक लोक प्रकल्प अधिकारी, अभियंते व व्यवस्थापनाला स्थानिक परिसराबद्दलच्या बारकाव्याची माहिती देतात व ह्या माहितीच्या आधारे पुनर्वसन कार्य अतिशय सुकर होऊन प्रभावी व आदर्श होण्यासाठी मदत होऊ शकते. महत्त्वाची बाब म्हणजे निसर्ग साभाळण्यामध्ये स्थानिक लोकांचा मोठ्या प्रमाणावर वाटा आहे. निसर्गाचे रक्षण करून प्रकल्प उभारणीसाठी स्थानिक लोकांचा सल्ला निश्चितच उपयुक्त होऊ शकेल. म्हणूनच पुनर्वसन कार्यात पुनवर्सित

लोकांना त्यांना रहावयाच्या ठिकाणांची निवड शेतीची निवड, आवश्यक त्या नागरी सुविधांचा अग्रक्रम ठरविणे ह्या निर्णयामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे तसेच प्रकल्प अंमलबजावणी मध्ये स्थानिकांचा सहभाग राहिल्यास त्याचा निश्चितपणे फायदा प्रकल्पाला होणार आहे.

**टहहरी धरणः**

टिहरी धरण नेहमी स्थानिक लोकसंख्येच्या धोक्याचे म्हणून ओळखले जात होते ज्यांना भगीरथी नदीचा विचार नाही उपजीविकेचे एक साधन म्हणून, परंतु पिढ्यांना ते धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक संबंध आहेत. १९६५ मध्ये जेव्हा श्री प्रख्यात अभियंता आणि केंद्रीय मंत्री के. एल. राव यांनी या भागाचा दौरा केला, लोकांनी त्यांच्याबद्दल आक्षेप व्यक्त केला आणि प्रकल्पाला विरोधा केला. तरीसुद्धा, नियोजन आयोगाने १९७२ मध्ये या प्रकल्पाला मंजुरी दिली. १९७३ साली, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया भारताने या प्रकल्पाच्या विरोधात आंदोलन केले. तथापि उत्तर प्रदेश सरकारने प्रशासकीय मान्यता मिळविली या बदलाचा पाठपुरावा करून टिहरी जिल्ह्यातील ३५ गावांनी या प्रकल्पाचा विरोध केला. जिल्हा परिषद देखील या प्रकल्पाचा विरोध केला परंतु शासनाने त्यास पुढे जाण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या कारवाईला टिहरी धरणाचा विरोध करणेसाठी संघर्ष समितीची (टीबीव्हीएसएस) स्थापना झाली, ज्याने धरणाचे बांधकाम करण्याचे एकमताने एकमत केले.

याकडे दुर्लक्ष करून, शासनाने बांधकाम करार दिला ज्यामुळे सर्व विभागांतील तीव्र निषेध झाले सोसायटी .१८ विरोधी धोरणामध्ये प्रेस मोहिम, अहवाल, सेमिनार व दावा वादाच्या मुद्द्यावर या प्रकरणात केवळ विस्थापन व पुनर्वसनच्या दिशेनेच नव्हे तर सरकारच्या उदासीनतेचाही धोका आहे प्रकल्पाद्वारे विचारलेल्या आपत्तिमय प्रमाणात. तेहरी हायड्रो इलेक्ट्रिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (टीएचडीसी) ची स्थापना करण्यात आली प्रकल्प अंमलबजावणी. पर्यावरण मंजुरी मिळत नसली तरी सुरुवातीच्या फंडांना सोडण्यात आले आणि त्यानंतर वित्तपुरवठा करण्यात आला मंत्रालयाने आग्रह केला की निधीचा अधिक मोबदला मिळण्यासाठी मंजुरी प्राप्त करणे. पर्यावरण मंत्रालयामध्ये तज्ज्ञांचा समावेश आहे अशी शिफारस

करण्यात आली की प्रकल्पाला असुरक्षित नाही फक्त म्हणूनच क्लिअर केले जाणार नाही परंतु महत्वाच्या बाबींसंबंधी माहिती जसे की, पुनर्वसन, आपत्ती नियोजन, पाणबुडी व्यवस्थापन इ. उपलब्ध नव्हते. हा अहवाल स्वीकारण्याऐवजी, व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सरकारने एक तज्ज्ञ समितीची स्थापना केली या समितीचे एक तज्ञ भूकंपशास्त्रज्ञ होते, ते आंतरराष्ट्रीय विख्यात विनोद गौर होते समितीने ९अंकांपेक्षा अधिक भूकंपाच्या रिश्टर स्केलवर होण्याची शक्यता लक्षात ठेवली आहे. तरी समितीने सुरुवातीला सहमती दिली.

- **सिंचन कायदे:**

विविध राज्यांतील वेगवेगळ्या सिंचन कायदे आहेत ज्या अंतर्गत जमिनीच्या अधिकाऱ्यांवर व्यापक अधिकार दिले जातात. त्यांच्यापैकी भरपूर या तरतुदी दंडात्मक स्वरुपाच्या आहेत आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी लोकांच्या पुढाकाराच्या विरोधात जा. शक्ती पोलिसांच्या मदतीसाठी प्रोजेक्ट्सची माहिती रोखण्यापासून ते बंदी घालतात सिंचन सोबत राजस्थानमधील अलवर जिल्ह्यात तरुण भारत संघ (टीबीएस) चे उदाहरण सर्वोत्तम आहे. टीबीएस एक स्वयंसेवी संघटना होती, ज्याने स्थानिक सहकार्य मिळविले होते आणि कोरड्या व शुष्क प्रदेशांना पाणी आणले होते राजस्थान या कार्याला अनुदानित व स्वत: समुदायांनी चालवले जात असे. परवानगी प्राप्त झाली तरी गट विकास अधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडून राज्य शासनाने यू टर्न व विचार केला शासनाच्या डोळ्यात, त्यांच्यामार्फत टाक्या टाकून टाकलेल्या समाजासहित कारवाई करणे, योग्यरित्या बांधले गेले नाहीत आणि अशाप्रकारे जवळून राहणाऱ्या लोकांना धोक्यात आणू शकतात. पण शासनाच्या सावधगिरीचा त्याग करणे, कायदेशीरपणे स्वीकृत आणि तांत्रिकदृष्ट्या ध्वनी टाक्यांची निर्मिती शासनाकडून करण्यात आली टीबीएस ने बांधले आहे.

टीबीएसने आणखी एक कारण हे खनिजांच्या विरोधात होते. सर्व पावसाचे पाणी या खाणींमध्ये नाहीसे झाले. खाणी देखील चराईच्या जमिनीतून वंचित गुरेढोरे आणि मानवी व प्राण्यांचे जीवन धोक्यात आले. टीबीएसने सर्वोच्च न्यायालयात संपर्क साधला आणि त्याला दिले सुप्रीम कोर्टाने सुप्रीम कोर्टात कोणताही सुव्यवस्था ठेवू नये असे सुचविले होते. टीबीएसवर

निषेध करत राज्य शासनाने खनिज उपक्रम चालू ठेवायचे आणि खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले कार्यकर्त्यांवर हल्ला करण्यात आला आणि राजेंद्र सिंह यांच्या जीवनावरही प्रयत्न केले गेले. किंबहुना खनी मालकांनी राजेन्द्र यांच्यावर हल्ला केला. जी न्यायमूर्ती एम. सी. जैन सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. खटला चालविणाऱ्या खानांपैकी एकाने कोर्टाचा अवमान केला त्याला एक आठवड्याचा तुरुंगात टाकला. ९९सर्वोच्च न्यायालय केंद्राने अरावलीला एक नाजूक इको सिस्टीम आणि बंदी घालण्यात येणारा खाण घोषित केले. ही अधिसूचना कोंडलेली होती माझे मालक या प्रतिसादात १९९३ साली टीबीएसने तीन–महिन्याच्या सत्याग्रहाचे आयोजन केले. काही वर्षांनंतर, राज्य सरकार सकारात्मक प्रतिसाद देत आहे आणि कबूल केले की टीबीएसने केलेल्या कामामुळे जंगलांचे पुनरुत्थान झाले आहे. राज्य

सिंचन विभागाने टीबीएसच्या अवैध आणि धोक्यात पाडलेल्या धरणाद्वारे बांधलेल्या धरणास सहकार्य सुरू केले. हे लक्षात येते की लाखो लोकांच्या संख्येवर मोठ्या प्रमाणात विस्थापन झाले आहे आणि चालू आहे प्रतिकूल, विशेषत: गरीब, दलित आणि आदिवासी या संदर्भात सरकारची आणि प्रशासकांची वृत्ती या विषयी निषेध आंदोलन केले गेले आहे, परंतु खूप काही अपवाद वगळता ते होऊ शकत नाहीत यशस्वी म्हटले अधिकृत गुप्त ॲक्ट १९२३ सारख्या निंदात्मक कायद्यांचा राज्य वापर, फौजदारी प्रक्रिया संहिता, टाडा, पोटा आणि काही सिंचन कायदे देखील विरोध आंदोलन दडपण्याची कारण आहे. शेवटी एक जण असा निष्कर्ष काढू इच्छितो की देशाची आर्थिक प्रगती अत्यंत महत्वाची आहे, परंतु ती आणि करू शकत नाही लोकांच्या खर्चात नाही.

**समारोप :–**

संशोधकाने अभ्यासविषया संदर्भात प्रकल्पग्रस्तांची सद्यस्थितीवर विविध बाबींची चर्चा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मागील ५०–६० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या धरणांचे तसेच महाराष्ट्रातील प्रमुख विकास प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, विकास प्रकल्प ऐतिहासिक पार्श्वभूमी भारतातील स्वातंत्र्यापूर्वीचे विकास प्रकल्प व स्वातंत्र्यानंतरचे भारतात व महाराष्ट्रात निर्माण केलेले विविध विकास प्रकल्प अभ्यास करून ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अभ्यास क्षेत्रातील डिंभे धरण प्रकल्प व पिंपळगाव जोगे धरण प्रकल्प ह्या बाबतची सविस्तर माहिती घेऊन ती ह्या प्रकरणामध्ये मांडण्यात आली आहे. ह्या धरणांमध्ये आदिवासी समाजाचे मोठ्या प्रमाणावर पुनर्वसन झालेले आहे. धरणामुळे आदिवासी समाजाच्या निर्माण झालेल्या समस्या ह्या प्रकरणामध्ये मांडण्यात आलेल्या आहेत.

विविध प्रकल्पग्रस्त, प्रकल्पाच्या योग्य पुनर्वसन व न्याय हक्कांसाठी उभ्या राहिलेल्या विविध चळवळी, प्रकल्पग्रस्तांची सद्यस्थिती तसेच प्रकल्पग्रस्तांबाबत शासनाचे धोरण ह्या सर्व बाबींचा अभ्यास करून वरील प्रकरणामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शासनातर्फे पुनर्वसन अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायदा मधील महत्त्वाच्या तरतूदी, भूमि संपादन अधिनियम, १९९९ मधील महत्त्वाच्या तरतूदी, पुनर्वसन धोरण व कार्यक्रम ह्यामध्ये विविध शासन निर्णयांचा आढावा घेऊन ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचा पुनर्वसन कार्यातील सहभाग त्यांनी अभ्यास क्षेत्रात केलेले कार्य व प्रत्यक्ष पुनर्वसन कार्यात प्रकल्पबाधीत व्यक्तींचा सहभाग ह्यावर अभ्यास करून त्यांची मांडणी ह्या प्रकरणामध्ये केलेली आहे.

वरील प्रकरणामध्ये संशोधकाने विस्थापना संदर्भातील पुनर्वसन, शासकीय धोरण, भारतातील, महाराष्ट्रातील विविध प्रकल्प व प्रकल्पाचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक, राज्य पातळी तसेच विशेष चळवळींचा आढावा घेऊन चळवळींच्या द्वारे धरण प्रकल्पग्रस्थांनी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेले आंदोलने व चळवळींचा मांडण्यात आल्या आहेत. तसेच धरणग्रस्त प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांची झालेली विविध आंदोलने चळवळींचा आढावा घेतलेला आहे. एकूणच वरील आढाव्यावरून असे दिसून येते की धरण प्रकल्पग्रस्थांना त्यांचे हक्क, न्याय मागण्या सोडविण्यासाठी संघर्षच करावा लागलेला आहे व शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी ह्या ठिकाणी योग्य प्रकारे झाली नसल्याचे मत धरणग्रस्थांकडून व्यक्त होत आहेत.

***

# प्रकरण पाचवे

# संकलित तथ्यांचे विश्लेषण

प्रस्तावना

५.१ धरणग्रस्तांची लोकसंख्येविषयी माहिति

५.२ धरणग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन

५.३ विस्थापित कुटुंबाचे पुनर्वसनातील अडथळे

५.४ पुनर्वसनामुळे निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्या

५.५ गृहितकृत्याची पडताळणी

# प्रकरण पाचवे
# संकलित तथ्यांचे विश्लेषण

**प्रस्तावना–**

''धरणग्रस्त कुटुंबियांच्या पुनर्वसनामुळे उद्‌भवणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समस्यांचा अभ्यास'' (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर आणि डिंभे धरण ता. आंबेगाव, जि. पुणे) या अभ्यासासाठी निवड क्षेत्रातील उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

**५.१ धरणग्रस्तांची लोकसंख्येविषयी माहिती–**

**सारणी क्रमांक ५.१**

**उत्तरदात्याच्या वयाबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **उत्तरदात्यांचे वय** | **वारवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १८ ते २५वर्षे | ३ | .८ |
| २६ ते ३५ | ९० | २२.५ |
| ३६ ते ४५ | १६८ | ४२.० |
| ४६ ते ५५ वर्षे | ११४ | २८.५ |
| ५६वर्षे च्या पुढील | २५ | ६.३ |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.१ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या उत्तरदात्यापैकी एकूण ४२ टक्के उत्तरदाते ३६ ते ४५ वर्षे वयोगटातील आहेत. २८ टक्के उत्तरदाते ४६ ते ५५ वर्षे वयोगटातील आहेत. २२ टक्के उत्तरदाते २६ ते ३५ वयोगटातील आणि ८ टक्के उत्तरदाते १८ ते २५ वयोगटातील असल्याचे दिसून येते तर सर्वात कमी ६ टक्के उत्तरदाते वय वर्षे ५६ च्या पुढील आढळून आले आहेत. यावरील असे सिद्ध होते की, धरणाच्या विस्थापनानंतर कुटुंबांचे अधिकार हे पुढील पिढीकडे हस्तांतरीत झालेले आहेत. १९९९ मध्ये


धरणांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ही कुटुंबे विस्थापित झाली त्यानंतर कुटुंब प्रमुखाची जबाबदारी या कुटुंबाच्या मुलाकडे आली म्हणूनच ४२ टक्के कुटुंब प्रमुख हे ३६ ते ४५ वर्षे वयोगटातील आढळून आले आहेत.

**सारणी क्रमांक ५.२**

**उत्तरदात्यांच्या धर्माबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **उत्तरदात्यांचा धर्म** | वारवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ३९७ | ९९.२ |
| मुस्लिम | १ | ०.३ |
| बौद्ध | २ | ०.५ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.१**
**उत्तरदात्याचा धर्म**





वरील सारणी ५.२ व आलेख क्र. ५.१ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या उत्तरदात्यापैकी एकूण ९९.२ टक्के उत्तरदाते हे हिंदू धर्मातील आढळून आले तर ०.५ टक्के उत्तरदाते बौद्ध धर्मीय व ०.३ टक्के उत्तरदाते मुस्लिम धर्मीय आहेत. यावरून असे सिद्ध होते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरण क्षेत्रात राहणारी कुटुंबे ही जास्तीत जास्त हिंदू धर्मीय होती.

**सारणी क्रमांक ५.३**

**उत्तरदात्याच्या जातीबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **उत्तरदात्यांच्या जाती** | वारवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| महादेव कोळी | २७७ | ६९.३ |
| महार | ३ | .८ |
| चांभार | २ | .५ |
| कुंभार | ३ | .८ |
| मातंग | १ | .३ |
| नवबौद्ध | ७ | १.८ |
| मुस्लिम, | १ | .३ |
| मराठा | १०३ | २५.८ |
| इतर | १ | .८ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.२**
**उत्तरदात्यांची जात**




वरील सारणी ५.३ व आलेख क्र.५.२ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ६९.३ टक्के उत्तरदाते हे महादेव कोळी या जमातीचे

आहेत, २५.८ टक्के उत्तरदाते हे मराठा जातीचे आहेत, १.८ टक्के उत्तरदाते हे नवबौद्ध जातीचे आहेत. तर उर्वरित महार, चांभार, मातंग, मुस्लिम, कुंभार व इतर जातींच्या उत्तरदात्यांची संख्या १ टक्क्यापेक्षा कमी आहेत. यावरून असे सिद्ध होते की, ह्या दोन्हीही धरणक्षेत्रामध्ये बाधित झालेली जास्तीत जास्त कुटुंबे ही महादेव कोळी या आदिवासी जमातीची दिसून आलेली आहेत.

महत्त्वाची बाब म्हणजे पिंगळगाव जोगे धरण क्षेत्र व डिंभे प्रकल्प क्षेत्र ह्या मध्ये आदिवासी कुटुंबांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ह्याचे महत्त्वाचे कारण हे दोन्हीही धरणे सह्याद्री डोंगरदऱ्यांमध्ये आहे व आदिवासी समाज हा डोंगरदऱ्यांमध्ये राहत आलेला आहे. व ह्या दोन्हीही धरणग्रस्त भागामध्ये आदिवासींची संख्या जास्त दिसून येते. वरील सारणीनुसार ६९.३% उत्तरदाते हे महादेव कोळी समाजाचे आहेत. धरणप्रकल्पाचा नकारात्मक परिणाम आदिवासींच्या जीवनावर झालेला दिसून येतो. जबरदस्तीच्या पुनर्वसनामुळे त्यांची पारंपारिक सामुहिक जगण्याची पद्धत मोडीत निघते त्यांचे सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त होते विकासाचे लाभार्थी होण्याऐवजी ते विकासाचे बळी होतात.

महाराष्ट्रातील डिंभे आणि पिंपळगाव जोगा ह्या धरणांच्या बाबतीत आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे मिळतात. (२०००)


१. आदिवासी कुटुंबाच्या आर्थिक विकासात कमालीची घसरण झाली.
२. ५४% आदिवासी कुटुंबाना प्रत्यक्ष लाभक्षेत्रात जमीन न मिळाल्याने प्रकल्पाचा फायदा झाला नाही.
३. ५७% आदिवासी कुटुंबांना जमीनीच्या बदल्यात जमीन मिळाली नाही.
४. पाळीव प्राण्यांचे प्रमाण ८२% टक्क्यांनी घसरले (६५२० पुनर्वसनापूर्वी पाळीव प्राणी पुनर्वसनानंतर १२२० पाळीव प्राणी)
५. पुनर्वसित गांवामध्ये शाळा, रस्ते बांधले पण बाजार, दवाखाने, स्मशानभूमी अशा सोयी गावांमध्ये उपलब्ध नव्हत्या, पूर्वीपेक्षा गावापासूनचे अंतर वाढले आहे.

## सारणी क्रमांक ५.४

## उत्तरदात्याच्या शिक्षणाबाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| उत्तरदात्यांचे शिक्षण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| प्राथमिक (१ ली ते ४ थी) | १६९ | ४२.३ |
| माध्यमिक शिक्षण(५ वी ते १० वी) | १५९ | ३९.८ |
| उच्च माध्यमिक (११ वी ते १२ वी) | २३ | ५.८ |
| पदवीधर | ४ | १.० |
| पदव्युत्तर | १ | .३ |
| इतर (डीएड, बीएड, इजि. आयटीआय) | १ | .३ |
| निरक्षण | ४३ | १०.८ |
| एकूण | ४०० | १००.० |

## आलेख क्रमांक ५.३
## उत्तरदात्याचे शिक्षण




वरील सारणी ५.४ व आलेख क्र.५.३ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ४२.३ टक्के उत्तरदात्यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. ३९.८ टक्के उत्तरदात्यांनी माध्यमिक शिक्षण घेतले असल्याचे दिसून येते. ५.८ टक्के हे उच्च माध्यमिक, १ टक्के उत्तरदाते हे पदवीधर आहेत, ०.३ टक्के उत्तरदात्यांनी

पदव्युत्तर व व्यावसायिक शिक्षण घेतले आहे. आणि १०.८ टक्के उत्तरदाते हे निरक्षर दिसून आले. यावरून असे सिद्ध होते की, बहुसंख्य उत्तरदाते प्राथमिक शिक्षण घेतलेले असून याचबरोबर निरक्षरांचे प्रमाण देखील लक्षणिय आहे. एकूणच ह्या परिसरात शिक्षणाची प्रमाण कमी आहे असे दिसून आले.

आदिवासींचा विकास आणि शैक्षणिक प्रगती हे एकमेकांशी निगडीत आहेत. स्वातंत्र्यानंतर शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक सवलती देऊ केल्या. आश्रमशाळा, वसतिगृहे, शिष्यवृत्या, इ. मार्गाने सरकारने प्रयत्न केले आहेत. असे असूनही आदिवासींची शैक्षणिक प्रगती झाली नाहीच. आदिवासी भागातील शाळांमधे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची पातळी अजून फार निकृष्ट आहे. मैदानी प्रदेशांतील ग्रामीणांच्या सहवासामुळे प्रगत झालेले विभाग सोडले, तर दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षणाभावी दारिद्र्यातून सुटका नाही, अशाच दुष्टचक्रात आदिवासी वावरत आहेत. स्थानिक भाषेतून शिक्षण देणे आवश्यक असताना अनोळखी आणि न समजणार्या भाषेतून शिक्षण देण्याचा जबरदस्तीने प्रयत्न केला जात आहे. स्थानिक शिक्षकांची कमतरता असल्याने समाजाबाहेरचे शिक्षक नेमले गेले. त्यांना आदिवासींबद्दल कधी आपुलकीच नसल्याने किंवा सक्तीने अशा भागात पाठवल्याने कामात चालढकल करणे आणि 'नोकरी करणे' इतपतच त्यांनी त्यांचे कर्तव्य केले. परिणामी आदिवासी मुलांची, जे पहिल्यांदाच शाळेत जात होते, त्यांची पुर्ण पिढी खर्या अर्थाने शिकलीच नाही.


**सारणी क्रमांक ५.५**

**उत्तरदात्याच्या व्यवसायाबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| व्यवसाय | वारवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | ११८ | २९.५ |
| शेतमजूरी | २४३ | ६०.८ |
| मजूरी | १७ | ४.३ |
| इतर व्यवसाय | २२ | ५.५ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.४**

**उत्तरदात्यांचा व्यवसाय**




वरील सारणी ५.५ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ६०.८ टक्के हे शेतमजूर आहेत. २९.५ टक्के उत्तरदात्यांचा व्यवसाय शेती आहे व ४.३ टक्के लोक मजूर आहेत. ५.५ टक्के उत्तरदाते हे इतर व्यवसायात असल्याचे दिसून आले. यावरून असे सिद्ध होते की, धरण बांधण्यापूर्वी शेतकरी असलेली ६०.८ टक्के कुटुंबे ही शेतमजूर झालेली आहेत. धरण बांधण्यापूर्वी/विस्थापनापूर्वी सर्व कुटुंबांचा व्यवसाय हा शेती होता परंतू धरण बांधकाम विस्थापनानंतर शेतकरी कुटुंबे ही शेतमजूर झाली आहेत. शेती धरणात गेल्यामुळे त्यांना शेतीत उत्पादन घेता येत नाही. रोजच्या आर्थिक मिळकतीसाठी कुटुंबातील व्यक्तींना शेतमजूरीसाठी लाभक्षेत्रातील २० ते २५ कि.मी. लांब अंतरावरील गावांमध्ये रोज जावे लागते. ही मजूरी हंगामी स्वरूपाची असून महिन्यातून ४ ते ६ महिने ह्या काळातच उपलब्ध असते.

## सारणी क्रमांक ५.६

## धरणग्रस्त कुटुंबाची सदस्याची संख्या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| कुटुंबाची सदस्याची संख्या | वारवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| १ ते ४ | १८० | ४५.० |
| ५ ते ८ | २१३ | ५३.१ |
| ९ ते १२ | ३ | .८ |
| १३ पेक्षा जास्त | ४ | १.१ |
| एकूण | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.६ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ५ ते ८ सदस्य संख्या असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ५३.१ टक्के आहे. १ ते ४ सदस्य संख्या असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ४५ टक्के आहे. ९ ते १२ सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ०.८ टक्के आहे तर १३ पेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १.१ टक्के आढळून आले. यावरून असे दिसते की काही कुटुंबे ही एकत्रित राहत होती व कुटुंबाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होता. तसेच महत्त्वपूर्ण बात म्हणजे ह्या विभागात राहणारी जास्तीत जास्त कुटुंबे ही आदिवासी समाजाची असल्याने कुटुंबातील सदस्यांची संख्या ५ ते ८ सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या जास्त आढळून येत आहे. त्या भागात कुटुंबे ही एकत्रित राहणे पसंत करत असल्याचे कुटुंबातील व्यक्तींची संख्या जास्त दिसून येते.


**सारणी क्रमांक ५.७**

**धरणग्रस्त कुटुंबाची कुटुंब पद्धती बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **कुटुंब पद्धती** | **वारवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एकत्रित कुटुंब पद्धती | २७३ | ६८.३ |
| विभक्त कुटुंब पद्धती | १२७ | ३१.८ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.५**

**कुटुंब पद्धती**




वरील सारणी ५.७ व आलेख क्र.५.५ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ६८.३ कुटुंबे ही एकत्रित कुटुंब पद्धती अवलंबिलेली कुटुंबे आहेत व ३१.८ टक्के कुटुंबे ही विभक्त कुटुंब पद्धती अवलंबिलेली कुटुंबे आहेत. यावरून असे सिद्ध होते की, विस्थापनानंतरही धरणग्रस्त कुटुंबे एकत्रित वास्तव्य करत आहेत. पारंपारिक मूळ संस्कृतीमध्ये एकत्रित कुटुंबाना जास्त प्राधान्य दिले जात होते व नंतरच्या काळात ही ते टिकून आहे असे दिसते. डिंभे व पिंपळगाव जोगे विभागातील कुटुंबामध्ये एकत्रित कुटुंब पद्धतीत राहत आहेत. कुटुंबांमध्ये जास्तीत जास्त लोक हे एकत्रित पणे राहणे पसंत करत आहेत. त्यामुळे कुटुंब पद्धती ही एक विशिष्ट बंधनात बांधलेली होती.


**सारणी क्रमांक ५.८**

**कुटुंबातील कमावणारे सदस्याची माहिती दर्शविणारी सारणी**

| **कमावणारे सदस्य** | **वारवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| ४ ते ५ सदस्य | ७३ | १८.३ |
| १ ते २ सदस्य | २८७ | ७१.८ |
| ३ ते ५ सदस्य | ३८ | ९.५ |
| ६पेक्षा जास्त | २ | ०.६ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.६**

**कुटुंबातील कमावणारे सदस्य (%)**




वरील सारणी ५.८ आणि आलेख ५.६ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ७१.८ टक्के कुटुंबातील १ ते २ सदस्य हे कमावणारे आहेत. १८.३ टक्के कुटुंबातील ४ ते ५ सदस्य आहेत. ९.५ टक्के कुटुंबातील ३ ते ५ सदस्य कमवणारे आहेत तर ०.६ टक्के कुटुंबामध्ये ६ पेक्षाजास्त सदस्यांना रोजगार उपलब्ध आहे. यावरून असे सिद्ध होते की, उत्पन्नाचे साधन लांब अंतरावर असल्यामुळे १ ते २ सदस्य बाहेरगावी रोजगार मिळविण्यासाठी जातात व त्यांना एकच उत्पन्नाचे साधन उपलब्ध आहे.

कुटुंबातील ४ ते ५ सदस्यांना रोजगार उपलब्ध असे १ (३%) उत्तरदाते आढळून आले.आहे कारण त्यांना शेती व शेतमजूरी हे दोन्हीही रोजगाराची साधने उपलब्ध आहेत. त्याच प्रमाणे सर्वच्या सर्व कुटुंबाना वर्षभर रोजगार उपलब्ध नाही. कारण जवळपास ६०% पेक्षा जास्त व्यक्ती ह्या शेत मजूरी करत आहेत त्यामुळे हंगामी स्वरूपाचा रोजगार उपलब्ध आहे.


**सारणी क्रमांक ५.९**

**उत्तरदात्यांची उपजीविकाबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| उपजीविकेची साधने | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| शेती | १३५ | ३३.८ |
| शेतमजूरी | २१५ | ५३.८ |
| मजूरी | २४ | ६.० |
| कुशल कामगार | १ | .३ |
| इतर व्यवसाय | २५ | ६.३ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्रमांक ५.७**

**उत्तरदात्यांची उपजीविका (%)**




वरील सारणी ५.९ आणि आलेख ५.७ वरून असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे व डिंभे धरणाच्या एकूण उत्तरदात्यापैकी ५३.८ टक्के उत्तरदात्यांची उपजीविका ही शेतमजूरीवर अवलंबून आहे. ३३.८ टक्के उत्तरदात्यांची उपजिवीका शेतीवर अवलंबून आहे, ६.३ उत्तरदाते

कामगार तर ६ टक्के उत्तरदाते इतर व्यवसायावर उपजिवीका करत असल्याचे दिसून येते. तर ०.३ टक्के उत्तरदाते कुशल कामगार आहेत. यावरून असे सिद्ध होते की, जास्तीत जास्त उत्तरदात्यांची उपजिवीका ही शेतमजूरीवर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे विस्थापनामुळे यांच्याकडे शिल्लक जमिन कमी आहे. ज्या उत्तरदात्यांना शिल्लक जमिन आहे त्या जमिनीला सिंचन सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे वर्षातील जास्त काळ शेतमजूरी हाच पर्याय उपलब्ध आहे.

### ५.२ धरणग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन :–

**सारणी क्रमांक ५.१०**

**धरणग्रस्त कुटूंबाना शासनाकडून पुनर्वसनाच्या मोबदल्यात मिळालेली जमीनी बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **पुनर्वसनाच्या मोबदल्यात मिळालेली जमीन** | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २२३ | ५५.८ |
| नाही | १७७ | ४४.३ |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.१० वरुन असे दिसून येते की, ५५.८ टक्के धरणग्रस्त कुटूंबाना शासनाकडून पुनर्वसनाच्या मोबदल्यात जमीन मिळाली आहे व एकूण ४४.३ धरणग्रस्त कुटूंबाना जमीन मिळालेली नाही. त्यांची जमीन धरणात गेली आहे धरणग्रस्त कुटूंबाना. त्यांना त्याबदल्यात जमीनीला जमीन मिळालेली नाही. या संदर्भातील विशेष बाब म्हणजे पिंपळगांव जोगे धरण प्रकल्पाच्या धरणग्रस्तांना नवीन जमीनी मिळालेल्या नाहीत. त्यांची शिल्लक असलेली जमीन जी डोंगर उतारावर आहे. तीच शिल्लक राहिलेली आहे. आंबेगाव डिंभे धरणग्रस्तांना शासनाकडून जमीनीच्या बदल्यात जमीन मिळालेल्या आहेत.त्यातील बहुतांश जमीनी ह्या अडचणीच्या आहेत. बऱ्याच मुळ मालकाकडून जमीन करण्यामध्ये अडथळे निर्माण केले जातात. ह्यातून निष्कर्ष असा निघतो की, आंबेगाव डिंभे धरणग्रस्तांना जमीनच्या बदल्यात जमीन मिळाली आहे व पिंपळगांव जोगे च्या धरणग्रस्तांना शासनाकडून जमीनीचा बदल्यात जमीन मिळाली नाही.


### सारणी क्रमांक ५.११

### धरणग्रस्त कुटूंबाकडे शिल्लक जमीनीबाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| कुटूंबाकडे शिल्लक जमीन | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३६८ | ९२.० |
| नाही | ३२ | ८.० |
| **एकूण** | ४०० | १००.० |

### आलेख क्रमांक ५.८

### धरणग्रस्त कुटूंबाकडे शिल्लक जमीनीबाबतची माहिती




वरील सारणी ५.११ व आलेख क्र.५.८ वरुन असे दिसून येते की, एकूण प्रतिसादापैकी ९२.० टक्के धरणग्रस्त कुटूंबाकडे शिल्लक जमीनी आहेत व ८.० टक्के कुटूंबाकडे शिल्लक जमीनी नाहीत. शिल्लक असलेल्या जमीनीमध्ये पिंपळगांव जोगे धरण प्रकल्पातील २०० उत्तरदात्याना नवीन जमीनी न मिळाल्यामुळे जुन्या असलेल्या जमीनीवरच त्यांची शेती व उपजिविका अवलंबून आहे. ह्या जमीनी डोंगर उतार व खाचखळग्यांच्या असल्याने उत्पादनक्षम नाहीत. तसेच पिंपळगाव जोगे परिसर हा जास्त पाऊस पडणाऱ्या क्षेत्रामध्ये येत असल्याने तेथे चार महिने भरपूर पाऊस पडतो त्यामुळे तेथे भात सोडून काहीही पिक घेता येत नाही परंतू उरलेले आठ महिने तेथे पाण्याचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर होत असतो तेथे पिण्यासाठी सुद्धा पाणी उपलब्ध नसते त्यामुळे ज्या शिल्लक जमिनी आहेत त्या उत्पादनक्षम नाहीत.


**सारणी क्रमांक ५.१२**

**बागायत जमीनी बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **बागायत जमीनी** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ४४ | ११.० |
| नाही | ३५६ | ८९.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

**आलेख क्र ५.९**

**बागायत जमीन**




वरील सारणी ५.१२ व आलेख क्र. ५.९ वरुन असे निदर्शनास येते की, ११.० टक्के धरणग्रस्त कुटूंबाकडेच बागायती जमीनी आहेत व ८९.० टक्के कुटूंबाकडे उपलब्ध जमीनी ही जिरायती कोरडवाहू पडीत आहेत.ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे नवीन मिळालेल्या जमिनीमध्ये सिंचनाची सोय उपलब्ध नाही. कारण पुनर्वसनानंतर मिळालेल्या जमिनी ह्या कोरकडवाहू पडीक आहेत. ज्या ११% जमिनी बायायती आहेत त्यामध्ये जमीन मालकाकडून १२ प्रकारची पिके घेतली जातात. बागायती जमिनीमध्ये इतर शेतकऱ्यांकडून पाणी घेऊन पिकाला दिले जाते. त्यामध्ये निश्चितपणे अनिश्चितता आहे. कारण ह्या पाण्यासाठी इतर शेतकऱ्यांवरच अवलंबून रहावे लागते.

**सारणी क्रमांक ५.१३**

**जिरायत जमीनी बाबतची माहिति दर्शविणारी सारणी**

| **जिरायत जमीनी** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २०९ | ५२.३ |
| नाही | १९१ | ४७.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.१३ वरुन असे दिसून येते की, ५२.३ टक्के धरणग्रस्त कुटूंबाकडे जिरायती जमीनी आहेत. ह्या जमीन पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. ह्या जमीनीमध्ये ज्वारी, बाजरी, कडधान्य अशा प्रकारची पिके पावसावर अवलंबून आहेत. परंतू पावसाच्या लहरीपणा चा फटका मागील १०–१५ वर्षात शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळे कमी प्रमाणात उत्पन्न मिळत आहे व जिरायती जमिनीत जी पिके घेतली जातात त्यातून आर्थिक उत्पन्न मिळत नाही जे पिकते ते वर्षभर कुटुंबासाठी वापरले जाते उरलेले विक्री केले जाते.

जिरायत जमीनीत प्रामुख्याने मठ, मुग, हरभरा, इ. कडधान्य पिकविले जाते. परंतु ह्या उत्पन्नातून आर्थिक लाभ हा अत्यंत कमी प्रमाणात मिळतो. त्यामुळे जिरायत जमीनीत पिकविलेले कडधान्य हे वर्षभर कुटुंबाची गरज भागविणे. कमी पाण्याची उपलब्धता असल्याने व पिकांमुळे लगेच आर्थिक फायदा होत नसल्याने शेतकऱ्यांचेही म्हणावे तितके लक्ष ह्या पिकांकडे राहत नाही. म्हणून शेतीतले उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात नाही. एकूणच जिरायत जमीनी मधून उत्पन्न मोठ्या प्रमाणावर मिळत नाही.


**सारणी क्रमांक ५.१४**

**पडीत जमीनी बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| पडीत जमीनी | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १४० | ३५.० |
| नाही | २६० | ६५.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

**आलेख क्र ५.१०**

**पडीत जमीनीबाबतची माहिती**




वरील सारणी ५.१३ व आलेख क्र.५.१० वरुन असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यापैकी ३५ टक्के धरणग्रस्त कुटूंबाकडील उपलब्ध / मिळालेल्या जमीनी ह्या पडीत आहेत. खाजखळगे व डोंगर उताराच्या जमीनीमुळे त्यांना कोणतेही पिके घेता येत नाहीत. त्यामुळे ह्या जमीनी मिळालेल्या असून त्याचा फायदा धरणग्रस्त व कुटूंबाना मिळत नाही. शासनामार्फत अधिग्रहित केलेल्या जमिनी ह्या पडीत प्रकारातील असतात कारण कोणीही सुपीक जमीन शासनास देत नाही म्हणून जी जमीन पडीत आहे तिथ जमिन सिलींग मध्ये दिली

जाते. प्रामुख्याने जमीन पडीत राहण्याचे मुख्य कारणे ही जमीनीत जाण्यासाठी रस्ता नाही, पाण्याची सुविधा नाही, आजूबाजूला असणारी शेती पिकत नाही. त्यामुळे पडीत जमीन सुपीक करण्यासाठी कमीत कमी ८ ते १० वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे ह्या प्रकारच्या जमीनी धरणग्रस्तांना मिळाल्या तरी त्या उत्पादनक्षम होण्यास वेळ लागतो.

**सारणी क्रमांक ५.१५**

**विस्थापनापूर्वीची जिरायत जमीनी बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **विस्थापनापूर्वीची जिरायत जमीन** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| नाही | ३७३ | ९३.३ |
| १ एकर | २० | ५.१ |
| २ एकर | १ | ०.३ |
| ३ ते ४ एकर | ५ | १.६ |
| ५ ते १० एकर | १ | ०.३ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.१५ वरुन असे दिसून येते की, उत्तदात्यांनी सांगितल्यानुसार १ एकर जिरायती जमीनी असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ही ५.१ टक्के होती. तसेच २ एकर जमीन असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०.३ टक्केहोती.म्हणजेच १ एकर जमीन धारण केलेल्या उत्तरदात्यांची संख्या ही ५ टक्के होती. ह्या सर्वावरून असे दिसून येते की, धरणबांधण्यापूर्वी मुळ भावात जिरायती जमिनी अत्यंत कमी प्रमाणात होत्या. तसेच उपलब्ध जमिनीला वर्षभर पाणी मिळल्यामुळे बागायती होत्या. बागायती जमिनी मध्ये भात हे मुख्य पीक होते. भाताचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. म्हणजेच विस्थापनापूर्वी जिरायती जमिनीची संख्या कमी होती. तसेच ज्या जमिनी जिरायती होत्या त्या जमिनीत पावसाळ्यात व पावसाळ्यानंतर ह्या जमिनीवर जनावरांसाठी चराऊ क्षेत्र जोपासले जात होते. त्यामुळे विस्थापनापूर्वी ह्या जमिनीत जनावरांना चारा मिळत होता. जिरायत जमीनीचा मोठ्या प्रमाणात फायदा होत होता. एकूणच धरण बांधण्यापूर्वी त्या भागातील प्रत्येक जमीन ही उपयोगात येत होती व त्याचा फायदा जास्तीत जास्त होत होता.

## सारणी क्रमांक ५.१६

## मूळगावात जिरायत जमीनीची माहिति दर्शविणारी सारणी

| मूळगावात जिरायत जमीनीची माहिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| १ एकर | ११२ | २८.८ |
| २ एकर | ३२ | ८.१ |
| ३ एकर | ११ | २.८ |
| ४ एकर | ५ | १.३ |
| ५ एकर | २ | ०.५ |
| ६ एकर च्या पुढे | १ | ०.३ |
| नाही | २२ | ५८.४ |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.१६ वरुन असे दिसते की, मुळ गावात एकूण उत्तरदात्यांपैकी ५८.४ टक्के धरणग्रस्त कुटूंबाकडे जिरायती जमीनी नाहीत. याचाच अर्थ असा की, वरील कुटूंबाचा जुन्या गावात असलेल्या जमीनी ह्या बागायती होत्या. ह्यामध्ये १ एकरापर्यंत जिरायती जमीनी असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २८.८ टक्के इतकी आहे व ६ एकरच्या पुढे जिरायती जमिनी असणाऱ्या धरणग्रस्त कुटूंबाची संख्या ०.३ टक्के इतकी आहे म्हणजेच मुळ गावातील जमीनी ह्या पाणी पुरवठा करता येण्याजोग्या होत्या. गावे नदीकाठावर असल्यामुळे जमीनींना पाणी पुरवठा करणे शक्य होते.

पुनर्वसनामध्ये शासनाकडून भरपाई म्हणून मिळालेल्या जमिनी ह्या कोरडवाहू व डोंगर उतार व खाच खळग्यांच्या जमिनी आहेत. कारण लाभक्षेत्रातील किंवा सिलींग मधील गावातील शेतकरी कधीही चांगल्या सुपीक जमिनी शासनाला देत नाहीत. त्यामुळे पुनर्वसनामध्ये धरणग्रस्तांना मिळालेल्या जमिनी ह्या कोरडवाहू व पडीत आहे. पाण्याची सोय, सिंचनाची सोय नसल्याने त्या जमिनीत पिके घेता येत नाहीत. ज्या ११% कुटुंबाकडे बागायती जमिनी आहेत त्या त्यांनी स्वत: विकसित केलेल्या जमिनी आहेत.

**सारणी क्रमांक ५.१७**

**नवीन गावात जिरायती जमीनीची माहिती दर्शविणारी सारणी**

| **नवीन गावात जिरायती जमीनीची माहिती** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ एकर | ३४६ | ८६.५ |
| २ एकर | ३७ | ९.३ |
| ३ एकर | ८ | २.० |
| ४ एकर | ३ | ०.८ |
| ५ एकर | १ | ०.३ |
| ६ एकर च्या पुढे | ३ | ०.८ |
| ७ एकर | २ | ०.५ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.१७ वरुन असे दिसते की, सर्वच उत्तरदात्यांना नवीन पुनर्वसित ठिकाणी जिरायती जमीन मिळाली आहे. तसेच शिल्लक असलेली जमीन सुध्दा जिरायती आहे. १ एकर जिरायत जमीन असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ८६.५ टक्के इतकी आहे व २ एकर जमीन असणाऱ्या उत्तदात्याची संख्या ९.३ टक्के इतकी आहे. ३ एकर व त्यापेक्षा जिरायत जमीन असणाऱ्या लाभार्थी कुटूंबाची संख्या अगदी कमी आहे. पुनर्वसनामध्ये नविन मिळालेल्या जमिनी ह्या १ ते ३ एकर आहेत म्हणजेच ह्या जमिनी धारण केलेले शेतकरी अल्प भूधारक या प्रकारात मोडतात. पूर्वीच्या काळी मोठे शेतकरी असलेली कुटुंबे पुनर्वसनानंतर अल्प भूधारक व भूमिहीन झाले आहेत असे दिसून येते.

**सारणी क्रमांक ५.१८**

**जुन्या गावात पडीत जमीनीची माहिती दर्शविणारी सारणी**

| जुन्या गावात पडीत जमीनीची माहिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| ० एकर | २५२ | ६३.० |
| १ एकर | १३७ | ३४.३ |
| २ एकर | ८ | २.० |
| ३ एकर | ३ | ०.८ |
| एकूण | ४०० | १००.० |

वरील सारणी क्र. ५.१८ वरून असे दिसून येते की, जुन्या पूर्वीच्या गावात पडीत जमीन नसणाऱ्या कुटूंबाची संख्या ६३.० टक्के इतकी होती म्हणजेच कोणत्याही मार्गाने शेतीला पाणी मिळत होते व उत्पादन घेतले जात होते. १ एकर पडीत जमीन असणाऱ्या उत्तदात्यांची संख्या ३४.३ टक्के आहे. तसेच २ एकर व त्यापेक्षा जास्त जमीन पडीत असणाऱ्या कुटूंबाची संख्या तुलनेने कमी २.८ टक्के इतकी होती. महत्त्वाची बाबत म्हणजे पडभत जमीनी ह्या पडीत असल्यातरी त्या उपयुक्त होत्या. कारण त्या भागातील जनावरे यांना राखण्यासाठी ह्या जमिनीचा वापर होत होता. तसेच त्या जमीनीत जंगलाची वाढ ही चांगल्या प्रमाणात होत होती. त्यामुळे झाडे, मध व इतर उपयुक्त बाबीही मिळत होत्या. त्यामुळे जमिनी पडीत असल्यातरी त्यातून फायदा होत होता. म्हणजेच जुन्या गावातील परिस्थिती ही एकंदरीत सुब्बाता देण्यासाठी होती म्हणूनच जुन्या गावामधील सर्वच बाबी ह्या तेथील राहणाऱ्या कुटुंबाच्या फायद्याच्या होत्या.

**सारणी क्रमांक ५.१९**

**नवीन पुनर्वसित ठिकाणी पडीत जमिनधारणा दर्शविणारी सारणी**

| **नवीन पुनर्वसित ठिकाणी पडीत जमिनधारणा** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ एकर | २७४ | ६८.५ |
| २ एकर | १०३ | २५.८ |
| ३ एकर | ६ | १.५ |
| ४ एकर | ८ | २.० |
| ५ एकर | ५ | १.३ |
| ६ एकर | १ | ०.३ |
| ७ एकर | ३ | ०.८ |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.१९ वरुन असे दिसते की, पुनर्वसित नवीन ठिकाणी सर्व उत्तरदात्यांनी धरणग्रस्त कुटूंबानी पडीत जमीन धारण केलेली आहे. १ एकर पडीत जमीन धारण करण्याऱ्या उत्तरदात्या कुटूंबाची संख्या ६८.५ टक्के आहे. २ एकर पडीत जमीन धारण केलेल्या उत्तरदात्या पुनर्वसित कुटूंबाची संख्या २५.८ टक्के इतकी आहे. म्हणजेच आंबेगाव व पिंपळगाव जोगे ह्या दोन्ही विभागात नवीन पुनर्वसित ठिकाणी मिळालेल्या / शिल्लक राहिलेल्या जमीनी ह्या पडीत आहेत.

## सारणी क्रमांक ५.२०

## कुटूंबाची इतर मालमत्ता दर्शविणारी सारणी

| कुटूंबाची इतर मालमत्ता | होय वारंवारीता | टक्केवारी | नाही वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| घर | ३९९ | ९९.८ | १ | ०.२ |
| खुला प्लॉट | ४२ | १०.५ | ३५८ | ८९.५ |
| दुकान | ४ | १.० | ३९६ | ९९.० |
| शेतीची औजारे | २३१ | ५७.८ | १६९ | ४२.३ |
| दुचाकी | ५२ | १३.० | ३४८ | ८७.० |
| चार चाकी | ० | ०.० | ४०० | १०० |
| ट्रॅक्टर | २ | ०.५ | ३९८ | ९९.५ |
| इतर | २ | ०.५ | ३९८ | ९९.५ |

वरील सारणी ५.२० वरुन असे दिसून येते की, पुनर्वसनानंतर उत्तरदात्यांची कौटुंबिक मालमत्ता जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला असून त्यामध्ये ९९.८ टक्के उत्तदात्यांना स्वत:चे घर उपलब्ध आहे. तसेच १०.५ टक्के उत्तरदात्यांकडे खुला प्लॉट उपलब्ध आहे. उत्तरदात्यापैकी १ टक्के कुटूंबाकडे दुकाने आहेत. त्यामध्ये पुनर्वसन कॉलनीत घरातच दुकान सुरु केलेले असून तेथेच दैनंदिन गरजेचा किराणा, धान्य विक्री केल्या जातात. एकूण ५७.८ टक्के उत्तरदात्यांकडे शेतीची औजारे उपलब्ध आहेत. १३ टक्के कुटूंबाकडे दुचाकी आहे. काळानुसार होणाऱ्या बदलामुळे दुचाकी ही आवश्यक गोष्ट झलेली आहे. ०.५ टक्के कुटूंबाकडे ट्रॅक्टर आहे.

**सारणी क्रमांक ५.२१**

**जुन्या मुळ गावातील शाळेची सोय उपलब्धता दर्शविणारी सारणी**

| **जुन्या मुळ गावातील शाळेची सोय** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १९२ | ४८.० |
| नाही | २०८ | ५२.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.२१ वरुन असे दिसते की, जुन्या गावात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध असल्या बाबतचे मत ४८ टक्के उत्तरदात्यांनी नोंदविलेले आहे. तसेच ५२ टक्के उत्तरदात्यांनी गावातच शाळा उपलब्ध नसल्याबाबत उत्तर दिलेले आहे. आंबेगाव डिंभे परिसरातील जुने गावे ही अतिशय दुर्गम भागात होती. रस्ते इतर सुविधा उपलब्ध नव्हत्या व त्या भागात प्रत्येक गावात शाळा उपलबध नव्हती. पिंपळगाव जोगे विभागातील परिस्थिती सुध्दा ह्या सारखीच आहे. त्यामुळे मुळ गावी सर्वच गावामध्ये शाळा उपलब्ध नव्हत्या. तसेच लोक हे छोटया वाड्या, वस्त्यांमध्ये पुर्वीच्या काळात शाळा उपलब्ध नव्हत्या.

संशोधन विभागातील गावे ही डोंगरदऱ्यांमध्ये वसलेली असल्यामुळे तो भाग निश्चित दुर्लक्षीत होता. त्यामुळे शैक्षणिक सुविधांकडे शासनाचे शिक्षण विभागाचे म्हणावे तितके लक्ष ह्या भागाकडे नव्हते. त्याच सोबत जिल्हा मुख्यालयापासून ह्या गावांचे अंतर १५० कि.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे मुल्यांकन व देखरेख ह्या बाबतीत शिक्षण विभाग अपुरा पडत होता तसेच हा भाग जास्त पाऊस पडणाऱ्या क्षेत्रात असल्याने पावसाळयात चार महिने गावांमधील शाळा बंदच राहत असत ह्याचा सर्वात मोठ्या प्रमाणात शिक्षणाची गुणवत्ता विकसित झाली नाही.

**सारणी क्रमांक ५.२२**

**जुन्या गावातील शाळेचा प्रकार दर्शविणारी सारणी**

| **जुन्या गावातील शाळेचा प्रकार** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| प्राथमिक (१–४) | २०८ | ५२.० |
| माध्यमिक (५–१०) | १५ | ३.७ |
| उच्च माध्यमिक (११–१२) | १० | २.५ |
| शाळा नाही | १६७ | ४१.८ |
| कॉलेज व त्यापुढे | ०.० | ०.० |
| इतर | ०.० | ०.० |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.२२ वरुन असे दिसते की, ५२ टक्के उत्तदात्यांच्या गावात प्राथमिक शाळा उपलब्ध होती. १५ टक्के उत्तदात्यांच्या गावात माध्यमिक शाळा उपलब्ध होती. ३.७ टक्के उत्तरदात्यांच्या मुळ गावात उच्च माध्यमिक शाळा उपलब्ध होती व ४१.८ टक्के उत्तरदात्यांनी शाळा नसल्याचे उत्तर नोंदविले आहे. तसेच दोन्हीही विभागात डिंभे व पिंपळगाव व त्यापुढील शिक्षण उपलबध नव्हते. तसेच आय टी आय सारखे व्यावसायीक प्रशिक्षण सुविधाही उपलब्ध नव्हती. जुने गावे ही अतिशय दुर्गम भागात असल्याने तेथे शासनामार्फत शाळांची सुविधा केली होती. परंतु शाळांची गुणवताच्या बाबतीत त्याचे मुल्यमापन होत नव्हते. तसेच हा भाग अतिशय दुर्गम व पावसाळी प्रदेशातील असल्याने पावसाळी वातावरण चार महिने असल्याने ह्या भागात पाऊस मुबलक प्रमाणात पडत होता त्या काळात शिक्षणाची गुणवत्ता राखणे अवघड बाब होती कारण अतिशय दुर्गम भागात पाऊस पडल्यानंतर रस्त्यांची स्थिती अतिशय खराब, चार महिने भरपुर पाऊस अशा अवस्थेत शाळांची स्थिती अतिशय बिकट होती.

### ५.३ विस्थापित कुटुंबाचे पुनर्वसनातील अडथळे :–

**सारणी क्रमांक ५.२३**

**गावापासून शाळेचे अंतर दर्शविणारी सारणी. (शिक्षणाची सुविधा)**

| गावापासून शाळेचे अंतर | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| दोन किलोमीटर पेक्षा कमी | ६३ | १५.८ |
| ३ ते ५ कि.मी. | १०४ | २६.० |
| ५ ते १० कि.मी. | ० | ० |
| १० कि. मी. पेक्षा जास्त | ० | ० |
| शिक्षणाची सुविधा गावातच आहे | २३३ | ५८.३ |
| **एकूण** | ४०० | १०० |


वरील सारणी ५.२३ वरुन असून दिसते की, स्वत:चे गावात शाळा उपलब्ध नसलेल्या पैकी ३७.७ टक्के उत्तरदात्यांना २ कि.मी पेक्षा कमी अंतरावर मुलांमुलींना शिक्षणासाठी पाठवावे लागत होते. तसेच ६२.३ उत्तरदात्यांना आपल्या मुलीमुलींना तीने ते ५ किलोमीटर अंतरावर शाळेत पाठवावे लागत होते. ५ कि.मी किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर शाळेत जावे लागण्या बाबतचे मत एकाही उत्तरदात्याने नोंदविले नाही. साधारणपणे ५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर शाळेमध्ये जावे लागत असल्यामुळे मुलींचे शिक्षण सातवीनंतर बंद होत होते कारण त्यापुढील शिक्षणासाठी मुलींना बाहेरगावी पाठविण्यास पालक तयार होत नव्हते. त्यामुळे जास्तीत जास्त मुली सातवीच्या पुढे शिक्षण घेत नव्हत्या.

### सारणी क्रमांक ५.२४

### गावापासून शाळेत जाण्यासाठी उपलब्ध दळणवळण/वाहतूक सुविधा दर्शविणारी सारणी.

| **गावापासून शाळेत जाण्यासाठी उपलब्ध वाहतूक सुविधा** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ११ | २.८ |
| नाही | १५६ | ३९.० |
| शिक्षणाची सुविधा गावातच आहे | २३३ | ५८.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

### आलेख क्र ५.११
### गावापासून शाळेत जाण्यासाठी उपलब्ध दळणवळणाची सुविधा




वरील सारणी ५.२४ व आलेख क्र.५.११ असे दिर्शविते की, २.८ टक्के उत्तरदात्यांनी गावापासून शाळेत जाण्यासाठी साधणे उपलब्ध असल्या बाबतचे मत नोंदविलेले आहे व ३९.० टक्के उत्तरदात्यांनी सुविधा नसल्याबाबतचे मत नोंदविले आहे. दळणवळणाची साधनेही उपलब्ध नव्हती त्यामुळे गावात शाळा उपलब्ध नसलेल्या गावातील मुलामुलींना शिक्षणासाठी पायी जावे लागत होते. पिंपळगाव जोगे व डिंभे ह्या दोन्हीही धरणांचे बांधकाम ९० च्या दशकात सुरु झालेले होते त्या पूर्वीच्या काळात ह्या भागात तशीही दळणवळणाची साधणे कमीच होती. आदिवासी भाग असल्यामुळे तालुक्याच्या गावावरून तसेच जिल्ह्याच्या ठिकाणाहून मुक्कामी गोड्या गावांमध्ये येत होत्या.


**सारणी क्रमांक ५.२५**

**नवीन पुनर्वसित गावात शाळा (शिक्षणाची सोय) असल्याबाबत दर्शविणारी सारणी.**

| नवीन पुनर्वसित गावात शाळा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३७२ | ९३.० |
| नाही | २८ | ७.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

**आलेख क्र ५.१२**

**नवीन पुनर्वसित गावात शाळा (शिक्षणाची सोय)**




वरील सारणी ५.२५ व आलेख क्र.५.१२ वरुन असे दर्शविते की, नवीन गावात शिक्षणाची सोय शाळा उपलब्ध असल्या बाबतचे मत ९३ टक्के उत्तदात्यांनी नोंदविलेले आहे व ७ टक्के उत्तरदात्यांनी त्यांच्या नवीन पुनर्वसित गावात शाळा उपलब्ध नसल्याचे मत नोंदविलेले आहे. जुन्या गावाच्या तुलनेत नवीन गावात शिक्षणाच्या सुविधा उंचावलेल्या दिसून येतात. तसेच काळानुरुप झालेला शिक्षणा बाबतच विकास ह्यास कारणीभूत आहे असे संशोधन काळात वाटते.

**सारणी क्रमांक ५.२६**

**पुनर्वसित गावात शाळा व इयत्ता दर्शविणारी सारणी**

| **पुनर्वसित गावात शाळा व इयत्तेची उपलब्धता** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| प्राथमिक (१–४) | २२३ | ५५.८ |
| माध्यमिक (५–१०) | ११२ | २८.० |
| उच्च माध्यमिक (११–१२) | ३१ | ७.८ |
| पदवी | ६ | १.५ |
| पदवीत्तर | ० | ०.० |
| इतर | ० | ०.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |


वरील सारणी ५.२६ वरुन असे निदर्शनास येते की, ५५.८ टक्के उत्तरदात्यांनी त्यांच्या पुनर्वसित गावात प्राथमिक शाळा असल्या बद्दल नोंदविले आहे. २८ टक्के उत्तरदात्यांशी त्यांच्या गावात शाळा माध्यमिक पर्यंत असल्याचे नोंदविले आहे. ७.८ टक्के उत्तरदात्यांनी उच्च माध्यमिक शाळेची सुविधा असल्या बाबत सांगितले आहे. नवीन पुनर्वसीत गावात पदवी किंवा पदवी झाल्यावर शिक्षणाची सोय नसल्याचे दिसून येते. अजूनही नवीन गावात शाळा नसल्याचे मत ७ टक्के उत्तरदात्यांनी नोंदविले आहे.

**सारणी क्रमांक ५.२७**

**नवीन पुनर्वसित गावापासून शाळेचे अंतर दर्शविणारी सारणी**

| **नवीन पुनर्वसित गावापासून शाळेचे अंतर** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| २ कि.मी पेक्षा कमी | १६ | ०४.० |
| २ ते ५ कि.मी. | १२ | ०३.० |
| शिक्षणाची सुविधा गावातच आहे | ३७२ | ९३.० |
| **एकूण** | **४००** | **१००** |

**आलेख क्र ५.१३**
**नवीन पुनर्वसित गावापासून शाळेचे अंतर**




वरील सारणी ५.२७ व आलेख क्र.५.१३ वरुन असे दिसून येते की, ५७.१टक्के उत्तरदात्यांनी सांगितल्याप्रमाणे मुलांना शाळेत जाण्यासाठी २ कि.मी च्या पर्यंत प्रवास करावा लागतो व २ ते ५ कि.मी. प्रवास करावा लागणाऱ्या उत्तरदात्याच्या कुटूंबाची संख्या ४२.९ टक्के आहे.

**सारणी क्रमांक ५.२८**

**नवीन पुनर्वसित गावात शिक्षणाच्या संधीची उपलब्धतता झालेली प्रगती दर्शविणारी सारणी.**

| **नवीन पुनर्वसित गावात शिक्षणाच्या संधीची उपलब्धतता** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २४८ | ६२.० |
| नाही | १५२ | ३८.० |
| **एकूण** | ४०० | १०० |

वरील सारणी ५.२८ वरुन असे दिसून येते की, ६२.० टक्के उत्तरदात्यांचे मतानुसार पूर्वीचे गाव व नविन पुनर्वसित गाव ह्या मध्ये उपलब्ध असलेल्या संधीमध्ये सुधारणा झाल्याचे सांगितले. कारण काळानुसार शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते आहे. डिंभे धरणाच्या विस्थापीत हे मंचर गावच्या परिसरातील गावामध्ये वसलेले आहे. तसेच हा भाग विकसनशिल आहे. त्यामुळे शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ किंवा सुधारणा झाली नसल्याबाबत ३८.० टक्के उत्तरदात्यांनी सांगितले आहे. याविषयी पिंपळगांव परिसरात असणाऱ्या शिक्षणाच्या सोयी व संधी बाबत सुधारणा झाली नसल्याचे दिसून येते आहे.

शिक्षण घेण्यासाठी ह्या भागातील मुला–मुलींना अतिशय अडचणींना सामोरे जावे लागत होते. जास्त पावसाच्या प्रमाणामुळे शाळेच्या इमारतीची पडझड, तसेच इमारतींची देखभाग ही व्यवस्थीत रित्या होत नव्हती. त्यामुळे एकूणच शिक्षणाची पातळी ही खालावलेली होती. तसेच नवीन गावात सुद्धा अजूनही ४२.९% लोकांना २ ते ५ कि.मी. पर्यंतचा प्रवास शिक्षणासाठी करावा लागतो. परंतु काळानुरूप होणाऱ्या बदलामुळे ह्या प्रवासासाठी सध्या साधने उपलब्ध आहेत म्हणून सर्वच नवीन पुनर्वसन गावठाणापासून बाहेर शिक्षणासाठी जाण्यासाठी सुविधा वाढलेल्या आहेत.

**सारणी क्रमांक ५.२९**

**जुन्या गावापासून नवीन पुनर्वसित गावचे अंतर दर्शविणारी सारणी.**

| **जुन्या गावापासून नवीन पुनर्वसित गावचे अंतर** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| २ कि.मी.पेक्षा कमी | १६२ | ४०.५ |
| ३ ते ५ कि.मी. | ३८ | २.५ |
| ३१ ते ४० कि.मी. | ३४ | ८.५ |
| ४० ते ५० कि.मी. | ७१ | २१.८ |
| ५० ते १०० कि.मी. | ६७ | १९.८ |
| १०० कि.मी. व त्यापेक्षा जास्त | २८ | ७.० |
| **एकूण** | ४०० | १०० |

वरील सारणी ५.२९ वरुन असे दिसून येते की, ४०.५ व २.५ टक्के उत्तरदाते हे २ ते ५ कि.मी. अंतरावर विस्थापीत झालेले असून ही संख्या पिंपळगांव जोगे धरणग्रस्तांची आहे. ह्या धरणाचे विस्थापन परिसरात झालेले आहे. ह्या धरणापैकी सर्व विस्थापीत कुटूंबे बाहेरच्या परिसरात जावून विस्थापीत होण्यास तयार नव्हते, परंतु आंबेगाव डिंभे धरणग्रस्तांची परिस्थिती उलट आहे. ह्या धरणात विस्थापीत झालेल्या कुटूंबाचे पुनर्वसन ३० कि.मी. ते १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर करण्यात आलेले आहे. त्यामुळे येथील धरणग्रस्त वेगवेगळया गावामध्ये विस्थापीत झालेले आहेत.


**सारणी क्रमांक ५.३०**

**धरणामध्ये गेलेली जमीन दर्शविणारी सारणी.**

| **धरणामध्ये जमीन गेली का** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३९७ | ९९.२ |
| नाही | ३ | ०.८ |
| **एकूण** | ४०० | १०० |

**आलेख क्र ५.१४**

**धरणामध्ये गेलेली जमीन**




वरील सारणी ५.३० व आलेख क्र.५.१४ वरुन असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी ९९.२ टक्के उत्तरदात्याची शेतजमीन धरणात गेलेली आहे व ३०.८ टक्के उत्तरदात्यांची शेतजमीन धरणात गेलेली नसून त्यांचे घर धरण क्षेत्रात गेलेले आहे.

डिंभे धरण क्षेत्रामधील धरणग्रस्तांमध्ये बऱ्याच प्रमाणात बागायती जमिन गेलेली होती. ह्या भागातील कुटुंबे ही आदिवासी जमातीची होती व एकत्रित कुटुंबपद्धती असल्याने जमीनधारणा अधिक मोठ्या प्रमाणावर होती म्हणूनच सर्वच्या सर्व उत्तरदात्यांच्या जमीनी ह्या बुडीत क्षेत्रात गेल्या पिंपळगाव जोगे धरण क्षेत्रातील सर्वच्या सर्व कुटुंबाच्या जमिनी ह्या धरण खेत्रात गेलेल्या आहेत.

**सारणी क्रमांक ५.३१**

**विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडील जनावरांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडील जनावरांची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३२३ | ८०.८ |
| नाही | ७७ | १९.२ |
| **एकूण** | ४०० | १०० |

वरील सारणी ५.३१ दर्शविते की, धरणापूर्वी ८०.८% उत्तरात्यांकडे जनावरे होत. कारण दोन्हीही विभागातील गावे ही नदीकाठी वसलेली होती. तसेच हा भाग आदिवासी, डोंगर दऱ्यांचा असल्याने व वर्षभर पाणी उपलब्ध असल्याने जनावरांना चारा मुबलक प्रमाणात होतो व जनावराव्दारे मिळणारे उत्पन्न ही चांगले होते त्यामुळेच ह्या परिसरात धरण बांधण्यापूर्वी जनावरे पाळली जात होती.

जनवरांद्वारे मिळणारे उत्पन्न ही चांगल्या प्रकारे होते गायी म्हशी पासून दूध विक्री करून कुटुंबात पैसा मिळत होता. बहुतेक कुटुंबांकडे जनावरे होती ह्या जनावरांनाच चरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जंगल, चराऊ राण उपलब्ध असल्यामुळे जनावरांना सांभाळण्याचा खर्च जवळपास नव्हताच. म्हणूनच जनावरांपासून मिळणारे उत्पन्नामुळे कुटुंबाला हातभार लागत होता. धरणापूर्वी जास्तीत जास्त कुटुंबाकडे शेळ्या होत्या शेळी ही गरीबाची गाय समजली जात होती. त्यामुळे शेळीच्या द्वारे मिळणारे उत्पन्न हे सहज उपलब्ध होणारे होते शेळ्यांना चराऊ क्षेत्र मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यामुळे खर्च कमी होता एकूणच जनावरांपासून मिळणारे उत्पन्न धरणापूर्वी मोठ्या प्रमाणावर होते.


**सारणी क्रमांक ५.३२**

**विस्थापनापूर्वी धरणग्रस्तांकडे असणाऱ्या बैलांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **विस्थापनापूर्वी धरणग्रस्तांकडे असणाऱ्या बैलांची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ बैल | ३२ | ८.० |
| २ बैल | २८१ | ७०.३ |
| ४ बैल | ८ | २.० |
| ६ बैल | १ | ०.३ |
| ८ बैल | १ | ०.३ |
| बैल नसलेल्या कुटुंबे | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

**आलेख क्र ५.१५**

**विस्थापनापूर्वी धरणग्रस्तांकडे असणाऱ्या बैलांची संख्या**




वरील सारणी ५.३२ व आलेख क्र.५.१५ वरुन असे दिसून येते की, पिंपळगांव जोगे, डिंभे धरण परिसरातील जुन्या गावामध्ये शेतीसाठी बैल वापरले जात होते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ह्या परिसरात भातशेती होत होती व भात खाचराचे प्लॉट छोटे छोटे असतात. ही शेती करण्यासाठी बैल उपयुक्त होते. तसेच ह्या भागात डोंगराळ परिसर असल्याने जनावरास चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत होता. त्यामुळे बैलाचा वापर शेतीसाठी होत होता.

**सारणी क्रमांक ५.३३**

**विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या गार्यींची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या गार्यींची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ गायी | ४१ | १०.३ |
| २ गायी | ५३ | १३.३ |
| ३ गायी | १२ | ३.० |
| ४ गायी | १९१ | ४७.८ |
| ६ गायी | १४ | ३.५ |
| १० गायी | ६ | १.५ |
| १५ गायी | ५ | १.३ |
| ८० गायी | १ | ०.३ |
| गायी नसलेली कुटुंबे | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३३ वरुन असे दिसते की, विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे गायींची संख्या जास्त होती. त्यामध्ये ४ गायी असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ५९.१ टक्के इतकी होती. २ गायी असणाऱ्या कुटूंबाची संख्या १६.४ टक्के व गायी असणाऱ्या कुटूंबाची संख्या १२.७ टक्के इतकी दर्शविते.

**सारणी क्रमांक ५.३४**

**विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या म्हशीची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **विस्थापनापूर्वी धरणग्रस्त कुटूंबाकडे असणाऱ्या म्हशीची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ म्हैस | २५४ | ६३.५ |
| २ म्हशी | ६६ | १६.५ |
| ३ म्हशी | ०३ | ०.८ |
| म्हशी नसलेली कुटुंबे | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३४ वरुन असे दिसून येते की, जुन्या गावात उत्तरदात्यांचे कुटूंबात १ म्हैस असणाऱ्या कुटूंबाची संख्या ७८.६ टक्के इतकी होती. २ म्हशी असण्याचा कुटूंबाची संख्या २०.४ टक्के, ३ म्हशी असण्याचा कुटूंबाची संख्या ००.९ टक्के इतकी होती म्हणजेच जवळपास सर्व कुटूंबाकडे जुन्या गावात म्हशी होत्या.

**सारणी क्रमांक ५.३५**

**जुन्या गावात कुटूंबाकडे असणाऱ्या शेळयांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **तपशिल** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ शेळी | १६९ | ४२.३ |
| २ शेळयां | ७९ | १९.८ |
| ३ शेळयां | ४६ | ११.५ |
| ४ शेळयां | २२ | ५.५ |
| १० शेळयां | ७ | १.८ |
| शेळ्या नसलेली कुटुंबे | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३५ वरुन असे दिसून येते की, जुन्या गावात उत्तरदात्यांचे कुटूंबात १ शेळी असणाऱ्या कुटूंबाची संख्या ५२.३ टक्के इतकी होती. २ शेळयां असण्याचा कुटूंबाची

संख्या २४.५ टक्के, ३ शेळयां असण्याचा कुटूंबाची संख्या १४.२ टक्के इतकी, ४ शेळयां असण्याचा कुटूंबाची संख्या ०६.८ टक्के इतकी, १० शेळयां असण्याचा कुटूंबाची संख्या २.२ टक्के इतकी होती म्हणजेच जवळपास सर्व कुटूंबाकडे जुन्या गावात शेळयां होत्या.

**सारणी क्रमांक ५.३६**

**धरणग्रस्त कुटूंबाकडील जुन्या गावात कोंबड्यांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **धरणग्रस्त कुटूंबाकडील जुन्या गावात कोंबड्यांची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| ५ कोंबड्या | ९२ | २३.० |
| ६ कोंबड्या | २४ | ६.० |
| १० कोंबड्या | १३४ | ३३.५ |
| १५ कोंबड्या | ७३ | १८.३ |
| कोंबड्या नसलेली कुटुंबे | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३६ वरुन असे दिसून येते की, जुन्या गावात उत्तरदात्यांचे कुटूंबात ५ कोंबड्या असणाऱ्या कुटूंबाची संख्या २८.५ टक्के इतकी होती. ६ कोंबड्या असण्याचा कुटूंबाची संख्या ७.४ टक्के, १० कोंबड्या असण्याचा कुटूंबाची संख्या ४१.५ टक्के इतकी, १५ कोंबड्या असण्याचा कुटूंबाची संख्या २२.६ टक्के इतकी होती. जुन्या गावात मोठ्या प्रमाणावर कोंबड्या धरणग्रस्त उत्तरदात्यांकडून पाळल्या जात होत्या. याचे महत्वाचे कारण म्हणजे त्याचा दुहेरी फायदा त्यांना मिळत असे. कोंबड्यांची अंडी कुटूंबात सतत उपलब्ध असायची. तसेच मांसासाठीही कोंबड्याचा वापर होत होता. महत्वाची बाब म्हणजे अंडी कुटंबाची गरज भागवून उरलेल्या अंड्याची विक्री करणे. तसेच कोंबड्याची विक्री करुनही कुटूंबाला पैसे मिळत होते.

## सारणी क्रमांक ५.३७

## जुन्या गावात उत्तरदात्यांना जनावरांपासून मिळणारे उत्पन्न दर्शविणारी सारणी.

| जनावरांपासून मिळणारे उत्पन्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. १०००० | ९४ | २३.५ |
| रु. १०००० ते रु. २०००० | ३४ | ८.५ |
| रु. २१००० ते रु. ३०००० | ७८ | १९.५ |
| रु. ३१००० ते रु. ४०००० | ७२ | १८.० |
| रु. ४१००० ते रु. ५०००० | २५ | ६.३ |
| रु. ५१००० ते रु. ७०००० | १६ | ४.० |
| रु. ७१००० ते रु. १००००० | ४ | १.० |
| जनावर नाही | ७७ | १९.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३७ वरुन असे दिसून येते की, ६०.८ टक्के लोकांचे विस्थापनापूर्वी जुन्या गावात मिळणारे उत्पन्न हे १०,००० पर्यंत होते व १,००,००० पर्यत उत्पन्न मिळणारे उत्तरदाते १ टक्के इतके होते. हे उत्पन्न कमी असले तरी ते दुय्यम उत्पन्न होते. इतर वेळी शेती सोबत हे उत्पन्न वर्षभर मिळत असे. अडीअडचणीच्या काळात ह्या उत्पन्नाचा हातभार कुटूंबांना मिळत असे त्यामुळे धरण बांधण्यापूर्वी आर्थिक बाजू भक्कम होती असे दिसते.

## सारणी क्रमांक ५.३८

## विस्थापनापूर्वी उत्तरदात्यांची बागायती शेती दर्शविणारी सारणी.

| विस्थापनापूर्वी उत्तरदात्यांची बागायती शेती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३४३ | ८५.८ |
| नाही | ४२ | १०.५ |
| शेती नाही | १५ | ०३.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३८ वरुन दिसून येते की, विस्थापनापूर्वी उत्तरदात्या धरणग्रस्त ८५.८ टक्के कुटूंबाकडे शेतीसाठी बागायती सुविधा उपलब्ध होत्या. जुन्या ठिकाणाची गावे ही नदीकाठी वसलेली होती. त्या वेळी पाण्याची स्थिती चांगली होती व वर्षातील जास्तीत जास्त काळ शेतीसाठी पाणी उपलबध होते.

**सारणी क्रमांक ५.३९**

**विस्थापनापूर्वीची बागायती शेतीसाठी सिंचन साधनाची उपलब्धता दर्शविणारी सारणी**

| **विस्थापनापूर्वीची बागायती शेतीसाठी सिंचन साधनाची उपलब्धता** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| विहीर | ३४३ | ५२.० |
| नदी | १६२ | २४.३ |
| ओढा | ७९ | १९.८ |
| इतर | १ | ०.३ |
| बागायत सुविधा नसलेली कुटुंबे | १५ | ३.८ |
| एकूण | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.३९ वरुन असे दिसते की, ७१.८ उत्तरदात्यांना शेतीसाठी विहीरींची सुविधा होती. बहुतेक विहीरी ह्या नदीच्या जवळ असल्याने विहीरींना पाण्याची शाश्वत उपलब्धता होती व ह्या पाण्यातून शेतीचे उत्पन्न चांगल्या प्रकारे मिळत होते. विहीरीं बरोबरच नदीतून सिंचनासाठी पाणी मिळविणाऱ्या कुटूंबांची संख्या १६.३ टक्के इतकी होती. ओढ्याव्दारे ११.८ टक्के उत्तरदात्या कुटूंबाना शेतीसाठी पाणी मिळत होते. एकंदरीतच जुन्या गावात शास्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध होती.

**सारणी क्रमांक ५.४०**

**विस्थापनापूर्वीची शेतीसाठी पाणी उपलब्धता असण्याचा कालावधी दर्शविणारी सारणी.**

| **शेतीसाठी पाणी उपलब्धता असण्याचा कालावधी** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| वर्षभर | २१३ | ५५.३ |
| ८ महिने | १२१ | ३०.३ |
| ६ महिने | ४९ | १२.३ |
| ४ महिने | २ | ०.५ |
| बागायत सुविधा नसलेली कुटुंबे | १५ | ३.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.४० वरुन असे दिसून येते की,५५.३ कुटूंबाकडे शेतीसाठी वर्षभर पाणी पुरवठ्याची सोय होती. वर्षातील ८ महिने पाणी उपलबध असणाऱ्या कुटूंबाची संख्या ३१.४ इतकी होती. वर्षातील ६ महिने पाणी उपलबध असणाऱ्या कुटूंबाची संख्या ही १२.७ टक्के इतकी वर्षातील ४ महिने पाणी उपलबध असणाऱ्या कुटूंबाची संख्या ही ०.५ टक्के इतकी होती म्हणजेच शेतीसाठी वर्षभर पाणी उपलब्ध असणाऱ्या कुटूंबाची संख्या अधिक होती.

**सारणी क्रमांक ५.४१**

**बागायती शेतीसाठी सिंचनाची सुविधेबद्दलची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **सिंचनाची सुविधा** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| डिझेल इंजिन | ३८५ | ८२.८ |
| इले. मोटार | ० | ०.० |
| इतर | ० | ०.० |
| बागायत सुविधा नसलेली कुटुंबे | १५ | ३.६ |
| एकूण | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.४१ वरुन असे दिसून येते की, शेतीसाठी सिंचनामध्ये डिझे्ल इंजिनाची उपलबधता असणाऱ्या कुटूंबाची संख्या १०० टक्के इतकी होती. जुन्या गावात विस्थापनापूर्वी गावात विजेची उपलब्धता नव्हती त्यामुळे डिझे्ल इंजिनाचा वापर करुन शेतीसाठी पाणी पुरविले जात होते. बागायती शेतीसाठी सिंचन साधनाची उपलब्धता दर्शविते.

**सारणी क्रमांक ५.४२**

**जुन्या गावात शेतीमध्ये कोणती पिक पध्दती / पिके घेतली जात होती ह्या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| पिक पध्दती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| ऊस | २ | ०.५ |
| गहू | १४२ | ३५.५ |
| बाजरी | १६२ | ४०.५ |
| ज्वारी | ११३ | २८.२५ |
| भात | १८६ | ४६.५ |
| हरभरा, मठ,मुग | १२४ | ३१ |
| मका | १०९ | २७.२५ |
| भाजीपाला | ४१ | १०.२५ |
| इतर | १० | २.५ |

वरील सारणी ५.४२ वरुन असे दिसून येते की, विस्थापनापूर्वी ४६.५ टक्के उत्तरदाते हे भाताचे उत्पादन घेते होते. ह्या भागातील जमीनी भातशेतीसाठी उपयुक्त होत्या. तसेच हा भाग सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांमुळे असल्याने ह्या भागात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण जास्त होते. पावसाळयात भात शेती मोठ्या प्रमाणावर केली जात होती. उरलेल ८ महिन्याचे गहू, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, भाजीपाला व फळभाज्या व फळांचे उत्पन्न घेतले जात होते. म्हणजेच वर्षभर शेती उत्पन्न देत होती. धरणग्रस्त कुटूंबाना शेतीतून शास्वत व अधिक उत्पन्न मिळत होते.

## सारणी क्रमांक ५.४३

## विस्थापनापूर्वी शेतीतून जुन्या गावात मिळणारे उत्पन्ना बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| विस्थापनापूर्वीचे उत्पन्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| रु. १०००० | ३९ | ९.८ |
| रु. १०००० ते रु. २०००० | ४६ | ११.५ |
| रु. २१००० ते ३०००० | ५१ | १२.८ |
| रु.३१००० ते ४०००० | ४२ | ९.५ |
| रु. ४१००० ते ५०००० | ३१ | ७.८ |
| रु. ५१००० ते ७०००० | १६ | ४.० |
| रु. ७१००० ते १००००० | ४६ | ११.५ |
| रु. १००००१ ते १५०००० | ९९ | २४.८ |
| रु. १५१००० ते २००००० | २३ | ५.८ |
| रु. २००००० ते ३०००० | ४ | २.० |
| रु. ३००००० ते ५००००० | ३ | ०.८ |
| **एकूण** | ४०० | १०० |

वरिल सारणी ५.४३ वरुन असे दिसून येते की, जुन्या गावात शेतीतून १ लाख ते १.५ लाख उत्पन्न मिळणाऱ्या कुटूंबाची संख्या २४.८ टक्के इतकी होती. वर्षभरात १०००० ते ५०,००० वर्षात मिळविणाऱ्या कुटूंबाची संख्या अधिक होती. शेतीतून मिळणारे उत्पन्न प्रथम स्त्रोत असल्याने वर्षभर शेतीतून उत्पन्न घेतले जात होते व त्यातून उत्पन्नही मिळत होते. विस्थापनापूर्वी शेतजमीनीची खाते फोड झाली नव्हती.कुटूंबातील सदस्यांची संख्याही जास्त होती. एकत्रीत कुटूंबात जमीन धारण जास्त प्रमाणात होती त्यामुळे उत्पन्नही अधिक मिळत होते.

**सारणी क्रमांक ५.४४**

**धरणग्रस्त कुटुंबे विस्थापनापूर्वी शेती कसण्यासाठी कोणती सुविधा वापरत होते बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **विस्थापनापूर्वी शेती कसण्यासाठी सुविधा** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| बैल | ३०५ | ७६.३ |
| ट्रॅक्टर | ० | ०.० |
| पारंपारीक पध्दत | ९० | २२.५ |
| मॅन्युअल | ५ | १.३ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरिल सारणी ५.४४ वरुन असे दिसून येते की, विस्थापनापूर्वी ७६.३ टक्के धरणग्रस्त शेतकरी शेती कसण्यासाठी, मशागत करण्यासाठी बैल वापरत होते. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्या काळात कुटूंबाकडे बैल उपलबध होते. चारा उपलबध होता व बैल वापरणे सोयीचे होते.पारंपारीक पध्दतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २२.५ टक्के होते. पूर्वी च्या जमिनी ह्या डोंगर उतारावर होत्या. प्लॉट तुलनेने लहान लहान होते. ह्या मध्ये पारंपारीक पध्दतीने शेती केली जात होती.


**सारणी क्रमांक ५.४५**

**विस्थापनापूर्वी शेतीचे काम नसतांना कुटूंबातील व्यक्ती कोणत्या प्रकारचे काम करत होत्या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **कामाचा प्रकार** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| शेतमजुरी | ११३ | २८.३ |
| मजुरी | ७९ | १९.८ |
| जनावरे चारणे | ३४२ | ८५.५ |
| सरपन गोळा करणे | ३८२ | ९५.५ |

**आलेख क्र ५.१६**

**विस्थापनापूर्वी शेतीचे काम नसतांना कुटूंबातील व्यक्ती कोणत्या प्रकारचे काम होते**




सारणी क्र. ५.४५ व आलेख क्र. ५.१६ ज्या कुटूंबाना वर्षभर शेतीला पाणी पुरवठा नव्हता त्यांना स्वत:चे शेतात काम नसतांना ८५.५ टक्के कुटूंबातील सदस्य हे जनावरे चारणे ही कामे करत होती. विस्थापनापूर्वी उत्तदात्यांकडे जनावरांची उपलबधता चांगली होती. २८ टक्के लोक हे शेतमजुरी करत होते व १९.८ टक्के कुटूंबे ही मजुरी काम करत होती परंतु ही मजुरीही शेतीच्या संबंधीतच होती. हा भाग पावसाळी असल्याने पावसाळयासाठी सरपन ४ महिने पुरेल एव्हढे जमा केले जायचे त्यामुळे ९५ टक्के उत्तरदाते सरपन गोळा करत असल्या बाबतचे मत नोंदविले आहे.


**सारणी क्रमांक ५.४६**

**नवीन जमीन खरेदी बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **नवीन जमीन खरेदी** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १५ | ३.८ |
| नाही | ३८५ | ९६.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

**आलेख क्र ५.१७**

**नवीन जमीन खरेदी (डिंभे प्रकल्प) बाबतची माहिती**




वरील सारणी ५.४६ व आलेख क्र.५.१७ वरुन असे दिसते की, एकूण उत्तरदात्यांपैकी फक्त ३.८ टक्के धरणग्रस्त कुटूंबानी पुनर्वसनानंतर नवीन जमीनी खरेदी केलेल्या आहेत. ९६.३ टक्के उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिलेले आहे. विस्थापनानंतर नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या मोबदल्याचा विनियोग मुलांचे शिक्षण, लग्न, जमिनीसाठी कोर्टात भांडणे ह्या साठी मोठ्या प्रमाणावर झाला. त्यामुळे नवीन जमीन घेणे सर्वच शेतकऱ्यांना शक्य झालेले नाही. व ज्या ३.८ टक्के कुटुंबांनी जमिनी घेतल्या त्यांची एकत्रित कुटुंब पद्धती होती व कुटुंबातील एक व्यक्ती तरी नोकरीस असून त्यामुळे आर्थिक स्थिती मजबूत होती व जमिनी खरेदी करण्यास आर्थिक पाठबळ मिळाले.


**सारणी क्रमांक ५.४७**

**विस्थापनानंतर नवीन खरेदी केलेल्या जमीनीची बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| विस्थापनानंतर नवीन खरेदी | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४६ | ११.५ |
| नाही | ३५४ | ८८.५ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्र ५.१८**

**नवीन जमीन खरेदी (पिंपळगाव जोगे प्रकल्प) बाबतची माहिती**




वरील सारणी ५.४७ व आलेख क्र.५.१८ वरुन असे दिसते की, ११.५ टक्के धरणग्रस्त विस्थापीत कुटूंबानी विस्थापनानंतर नवीन जमीनी शेत जमीनी खरेदी केलेल्या आहेत असे दिसते. कारण धरणात गेलेल्या जमीनीचा मोबदला आर्थिक स्वरूपात मिळाल्यानंतर ह्या धरणग्रस्त शेतकऱ्यांनी नवीन ठिकाणी जमीन खरेदी केल्या ८८.५ टक्के धरणग्रस्त कुटूंबानी नवीन शेत जमीन खरेदी केली नाही.


**सारणी क्रमांक ५.४८**

**विस्थापनानंतर मिळालेल्या बागायती जमीनीची बाबतची माहिती दर्शविणारी सारणी. (एकर)**

| विस्थापनानंतर मिळालेली बागायती जमीन | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| ० | ३८७ | ९६.८ |
| १ | ८ | २.० |
| २ | ३ | ०.८ |
| ३ | १ | ०.३ |
| १० | १ | ०३ |
| एकूण | ४०० | १००.० |

**आलेख क्र ५.१९**

**विस्थापनानंतर मिळालेल्या बागायती जमीनीची बाबतची माहिती**




वरील सारणी ५.४८ व आलेख क्र.५.१९ वरुन असे दिसून येते की, पुनर्वसनानंतर एक एकर बागायती जमीन असणाऱ्या कुटूंबाची संख्या २ टक्के इतकी होती व २ व ३ एकर बागायती जमीन उपलब्ध असणाऱ्या कुटूंबाची संख्या ०.३ टक्के इतकी होती म्हणजेच मिळालेल्या बागायती शेतीचे प्रमण अत्यंत कमी होणे व एकूण ४ टक्के कुटूंबाकडेच बागायती जमीनीची उपलब्धता होती.

**सारणी क्रमांक ५.४९**

**जिरायती जमीनीची बाबतची माहिती दर्शविणारी सारणी. (एकर)**

| जिरायती जमीनीची | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| ०.३ | १ | ०.३ |
| ०.४ | १ | ०.३ |
| ०.५ | ७ | १.८ |
| ०.६ | १ | ०.३ |
| १ | ३६ | ९.० |
| १.५ | ८७ | २१.८ |
| २ | २२९ | ५७.३ |
| २.५ | २१ | ५.३ |
| ३ | ८ | २.० |
| ४ | ४ | १.० |
| ५ | १ | ०.३ |
| ६ | २ | ०.५ |
| ७ | १ | ०.३ |
| ८ | १ | ०.३ |
| एकूण | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.४९ वरुन असे दिसून येते की, वरील सारणीवरुन असे दिसते की, २ एकर जिरायती जमीन असणाऱ्या उत्तरदात्या कुटूंबाची संस्था ही ५७.३ टक्के इतकी होती म्हणजेच २ एकर जिरायती जमीन सर्वसाधारणपणे जास्तीत जास्त कुटूंबाकडे उपलब्ध होती. मिळालेल्या जमीनीमध्ये ३ गुंठे जाणुन ते ८ एकर पर्यत जमीन धारणा होती. ही जमीन पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

## सारणी क्रमांक ५.५०

## धरणग्रस्त विस्थापीत शेतकऱ्यांना मोबदला मिळालेल्या जमीनीपैकी पडीत जमीनीची माहिति दर्शविणारी सारणी.

| **शेतकऱ्यांना मोबदला मिळालेल्या जमीनीपैकी पडीत जमीन (एकर)** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | ३१० | ७७उ५ |
| १.२ | २ | ०उ५ |
| १.५ | १ | ०.३ |
| २ | ४६ | ११.५ |
| ३ | १३ | ३.३ |
| ३.५ | १ | ०.३ |
| ४ | १४ | ३.५ |
| ५ | ७ | १.८ |
| ६ | ३ | ०.८ |
| ७ | ३ | ०.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.५० वरुन असे दिसते की, ७७.५ टक्के कुटूंबाकडे विस्थापनानंतर पुनर्वसित ठिकाणी १ एकर पडीत जमीन होती. मूळ मालकांकडून मिळालेली जमीन ही कोणतेही पिके न येणारी व अडचणींच्या ठिकाण होती.

वरील तक्त्यामध्ये २ टक्के एकर जमीनी उपलब्ध असणाऱ्या कुटूंबाची संख्या ११.५ टक्के इतकी आहे असे दर्शविते म्हणजेच सर्व विस्थापीत पुनर्वसित शेतकऱ्यांना मिळालेल्या जमीनीपैकी जास्तीत जास्त जमीन ही पडीत होती.

## सारणी क्रमांक ५.५१

## विस्थापनानंतर धरणग्रस्त शेतकरी कुटूंबे जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या साधनां बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.

| जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या साधनांची उपलब्धता | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४२ | १०.५ |
| नाही | ३५८ | ८९.५ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.५१ वरुन असे दिसते की, विस्थापनानंतर शेती कसण्यासाठी बैल वापरणाऱ्या कुटूंबाची संख्या १०.५ इतकी आहे. जुन्या गावाच्या तुलनेत ही संख्या अतिशय कमी दिसते. शेती कसण्यासाठी ट्रॅक्टर वापरणाऱ्या शेतकरी कुटूंबाची संख्या ८९.२ टक्के इतकी दिसून येते.

## सारणी क्रमांक ५.५२

## विस्थापनानंतर धरणग्रस्त शेतकरी कुटूंबे जमीन कसण्यासाठी वापरत असलेल्या आधुनिक साधनांबाबतची माहिती दर्शविणारी सारणी.

| आधुनिक साधनांबाबतची माहिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५७.२ | ८९.२ |
| नाही | ४३ | १०.८ |
| एकूण | ४०० | १००.० |

वरील सारणी क्र. ५.५२ वरून असे दिसून येते की, पारंपारीक पध्दतीने संस्था कोणताही शेतकरी जमीन कसत नाही.ह्या सारणीवरुन असे दिसते की,  विस्थापन नंतर शेती कसण्याच्या पध्दतीने बदल होऊन ट्रॅक्टर सारख्या औजाराव्दारे शेती कसण्याचे प्रमाण वाढले आहे व जुन्या काळात बैल वापरण्याचा शेतकऱ्यांची संख्या तुलनेने कमी झालेली आहे. पारंपारीक व शारिरीक श्रमाने शेती कसण्याचा प्रकार बंद झालेला दिसून येतो.

**सारणी क्रमांक ५.५३**

**विस्थापीत कुटूंबाकडे सध्या उपलब्ध असणाऱ्या जनावरांबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **जनावरांबाबतची माहिती** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २७ | ६.८ |
| नाही | ३७३ | ९३.२ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.५३ वरुन असे दिसून येते की, ९३.२ टक्के विस्थापीत कुटूंबाकडे सध्या जनावरे नाहीत. म्हणजेच विस्थापनानंतर जनावरे पाळण्याच्या पध्दतीमध्ये अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. नवीन गावात जनावरे असणाऱ्या कुटूंबाची संख्या ६.८ टक्के इतकीच दिसून येते.

**सारणी क्रमांक ५.५४**

**उत्तरदात्यांकडे असलेल्या पशुधना (बैल) बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **पशुधन** (बैल) | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ बैल | १ | ०.३ |
| २ | ८ | २.० |
| ३ | २ | ०.५ |
| ४ | १ | ०.३ |
| ० | ३८८ | ९७.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.५४ वरुन असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यापैकी यफक्त २ टक्के उत्तरदात्यांकडे सध्या २ बैल आहे. तसेच ३ बैल असणाऱ्यांची संख्या ०.३ टक्के आणि बैल असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०.३ इतकी आहे. ह्या सारणीवरुन असा निष्कर्ष निघतो की, पुनर्वसनानंतर धरणग्रस्त विस्थापीत शेतकऱ्यांकडे सध्या बैलांची संख्या कमालीची घटली आहे. सध्या बैल नसणाऱ्यां विस्थापीत शेतकऱ्यांचे प्रमाण ९७ टक्के इतके आहे. नवीन पुनर्वसन गावामध्ये उत्तरदात्यांकडे बैल नाहीत.

**सारणी क्रमांक ५.५५**

**उत्तरदात्यांकडे असलेल्या पशुधना(गायी) बाबतची माहिति दर्शविणारी सारणी.**

| **पशुधन (गायी)** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | १७ | ४.३ |
| २ | ११ | २.८ |
| ३ | २ | ०.५ |
| ४ | २ | ०.५ |
| ० | ३६८ | ९२.० |
| **एकूण** | **४००** | **१००.** |

सारणी क्रमांक ५.५५ वरून असे दिसून येते की, गायींची संख्या सुध्दा कमी झाल्याचे आढळून येते. ९२ टक्के उत्तदात्यांकडे सध्या गायी नाही. एक गाय असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण ९.३ टक्के, २ गायी असणाऱ्यांचे प्रमाण २.८ टक्के, ३ गायी असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण ०.५ टक्के इतके आहे.

**सारणी क्रमांक ५.५६**

**उत्तरदात्यांकडे सध्या असलेल्या म्हशींची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **पशुधन** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एक म्हैस | १५ | ३.८ |
| दोन म्हशी | ७ | १.८ |
| तीन म्हशी | १ | ०.३ |
| चार म्हशी | ३७७ | ९४.३ |
| **एकूण** | **४०० १००.०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक ५.५६ वरून असे दिसून येते की, १ म्हैस पाळणाऱ्या पुनर्वसित उत्तरदात्यांची संख्या ३.८ टक्के, २ म्हैस असणाऱ्या पुनर्वसित कुटूंबाची संख्या १.८ व ५ म्हैस असणाऱ्या कुटूंबाची संख्या ०.३ टक्के इतकी आहे. ह्या सारणीवरुन असा निष्कर्ष निघतो की, ९२.३ टक्के धरणग्रस्त पुनर्वसित उत्तरदात्यांकडे म्हैस पाळल्या जात नाहीत.

**सारणी क्रमांक ५.५७**

**उत्तरदात्यांकडे सध्या असलेल्या शेळ्यांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **पशुधन** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एक शेळी | ४ | १.० |
| दोन शेळ्या | ५ | १.३ |
| चार शेळ्या | १ | ०.३ |
| शेळी नाही | ३९० | ९७.५ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.५७ वरुन असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यापैकी २.५ टक्के उत्तरदात्याकडेच शेळी पाळली जात आहे. पूर्वीच्या तुलनेत शेळयांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. शेळी ही गरीबाची गाय मानली जाते. गायी बैल व म्हशीच्या तुलनेत शेळी पाळणे सोपे आहे.परंतु तरी सुध्दा पुनर्वसनानंतर शेळी पाळली जात नाही.

**सारणी क्रमांक ५.५८**

**उत्तरदात्यांकडे सध्या असलेल्या कोंबड्यांची संख्या दर्शविणारी सारणी.**

| **कोंबड्यांची संख्या** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| कोंबड्या नाहीत | ३९८ | ९९.५ |
| २ कोंबड्या असलेले | २ | ०.५ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.५८ वरुन असे दिसून येते की, कोंबड्यांच्या संख्येत सुध्दा घट झाल्याचे दिसून येते. नवीन गावात उत्तरदात्यांकडून कोंबड्या पाळल्या जात नाहीत.

## सारणी क्रमांक ५.५९

## विस्थापीत कुटूंबांना नवीन शेतजमीनीचा ताबा मिळविण्यासाठी आलेल्या समस्यांची स्थिती दर्शविणारी सारणी.

| नवीन शेतजमीनीचा ताबा मिळविण्यासाठी आलेल्या समस्या | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३०९ | ७७.३ |
| नाही | ९१ | २२.८ |
| **इकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.५९ वरुन असे दिसून येते की, ७७.३ विस्थापीत पुनर्वसित कुटूंबांना नवीन जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी व जमीन कसण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यांना जमीनी मिळविण्यात अडचणी आलेल्या आहेत.

## सारणी क्रमांक ५.६०

## पुनर्वसित शेतकऱ्यांना नवीन मिळालेलया जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या समस्या आल्या त्याबाबतची माहिती संख्या दर्शविणारी सारणी.

| जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी आलेल्या समस्या | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| मुळ मालकाकडून अडथळे | १७९ | ४४.८ |
| पाळण्याची सुविधा नाही | २२१ | ५५.३ |
| रस्त्याची सुविधा नाही | १६३ | ४०.८ |
| इतर अडचणी | ७९ | १९८.१ |

वरील सारणी ५.६० वरुन असे दिसते की, ४४.८ टक्के उत्तरदात्यांना मुळ मालकांकडून निर्माण होणाऱ्या अडथळयांना सामोरे जावे लागते. जमीन कसण्यात मुळ मालकाकडून अडथळे निर्माण केले जातात. ५३.३ टक्के शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी नसल्यामुळे शेती करण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. ४०.८ टक्के कुटूबांना शेतात जाण्यासाठी रस्ते सुविधा नसल्याने शेतजमीन कसण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. एकंदरीतच सर्व धरणग्रस्तांना.

**सारणी क्रमांक ५.६१**

**पुनर्वसित शेतकऱ्यांकडे मुळ जमीनी पैकी शिल्लक असलेल्या जमीनीची स्थिती बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **मुळ जमीनी पैकी शिल्लक असलेल्या जमीनी** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| जमीनीशिल्लक नाही | २७४ | ६५.५ |
| १ एकर पेक्षा कमी | ११९ | २९.५ |
| १ ते २ एकर | ५ | १.३ |
| २ ते ३ एकर | १ | ०.३ |
| ५ ते १० एकर | १ | ०.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.६१ वरुन असे दिसून येते की, पुनर्वसित शेतकऱ्यांकडे मुळ जमीनी पैकी ६५.५ टक्के धरणग्रस्तांकडे जमिनी शिल्लक नाहीत. एक एकरापेक्षा कमी जमिनी शिल्लक असणाऱ्या धरणग्रस्त शेतकऱ्यांची संख्या ही २९.५ टक्के इतकी आहे. १ ते २ एकर जमिन शिल्लक असणाऱ्या धरणग्रस्तांची संख्या १.३ टक्के इतकी तर २ ते ३ एकर व ४ ते १० एकर जमिनी शिल्लक असणाऱ्या कुटुंबांची संख्या ०.३ टक्के इतकी आहे. वरील विश्लेषणावरून असे दिसते की, मुळ गावात शिल्लक असणाऱ्या जमिनी ह्या अत्यंत कमी आहेत. त्यामुळे त्यांना मुळ गावात शेतीही करता येत नाही. धरणाच्या जलसाठ्यातील पाण्याचा वापर करून शेती करता येत नाही.

**सारणी क्रमांक ५.६२**

**मुळ जमीनीपैकी शिल्लक जमीनीची एकरानुसार मिळालेल्या बागायती जमीनीची स्थिती बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| बागायती जमीनीची स्थिती (एकर) | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| भूमिहीन | ३७४ | ९३.५ |
| १ | १९ | ४.७५ |
| २ | १ | ०.२५ |
| २.५ | ४ | १ |
| ३ | १ | ०.२५ |
| १० | १ | ०.२५ |
| एकूण | ४०० | १०० |

ह्या सारणी ५.६२ वरुन असे दिसून येते की, १ एकर बागायती जमीनी असणाऱ्या उत्तदात्यांचे प्रमाण ४.७५ टक्के इतके आहे. २ एकर जमीन असणाऱ्या पुनर्वसित कुटूंबाचे प्रमाण ०.२५ टक्के इतके आहे. २.५ एकर जमीनी असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १ टक्के आहे. उत्कृष्ट जमीन असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण ०.२५ टक्के व १० एकर बागायती जमीन असणाऱ्या पुनर्वसित उत्तरदात्यांचे प्रमाण ०.२५ टक्के इतके दिसून आले म्हणूनच बागायती जमीनी असणाऱ्या शेतकऱ्यांचे एकूण प्रमाण २.५ टक्के इतकेच आहे. जमीनीही ताबा मिळाल्यानंतर पाण्याची सुविधा झाल्यामुळे बागायती झालेल्या आहेत.

## सारणी क्रमांक ५.६३

## पुनर्वसित शेतकऱ्यांना मिळालेल्या कोरडवाहू जमिनीची स्थिती बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.

| मिळालेल्या कोरडवाहू जमिनीची स्थिती | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| भूमिहीन | ३४ | ८.५ |
| ०.३ | १ | ०.३ |
| ०.४ | १ | ०.३ |
| ५.६ | ११ | २.८ |
| १ | १ | ०.३ |
| १.५ | १६५ | ४१.३ |
| २ | ४७ | ११.८ |
| २ | १२२ | ३०.५ |
| २.५ | ३ | ०.८ |
| ३ | ८ | २.० |
| ४ | ४ | १.० |
| ५ | २ | ०.५ |
| ८ | १ | ०.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरिल सारणी ५.६३ वरुन असे दिसून येते की, २५.३ टक्के कुटूंबाकडे १ एकर जमीन आहे. एक एकर पेक्षा कमी जमीन असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण १ टक्के पेक्षा कमी आहे.

## सारणी क्रमांक ५.६४

## बागायती जमीनीसाठी उपलब्ध असणाऱ्या सिंचन सुविधा बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| बागायती जमीनीसाठी उपलब्ध असणाऱ्या सिंचन सुविधा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| सिंचन सुविधा नाही | ३५४ | ८८ |
| विहीर | ५ | १.३ |
| नदी | ६ | १.५ |
| ओढा | ५ | १.३ |
| इतर | ३० | ७.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.६४ वरुन असे दिसून येते की, धरणग्रस्तांकडे सध्या उपलब्ध असलेल्या बागायत जमिनीची सिंचन सुविधा उपलब्ध नसणाऱ्या धरणग्रस्त कुटुंबांची संख्या ८८ टक्के इतकी आहे. तसेच ज्यांच्याकडे सुविधा आहे त्यांची संख्या १२ टक्के इतकी आहे. त्यात विहिर, नदी, ओढा ह्याचा समावेश आहे. इतर म्हणजे दुसऱ्याकडून तात्पुरत्या स्वरूपात पाणी घेऊन बागायती शेती करणाऱ्यांचे प्रमाण ७.३ टक्के इतके आहे.

## सारणी क्रमांक ५.६५

## पुनर्वसितांना जमीन ताब्यात मिळाल्यापासून प्रत्यक्ष उत्पादन घेईपर्यत लागलेल्या कालावधीची माहिती दर्शविणारी सारणी.

| जमीन ताब्यात मिळाल्यापासून प्रत्यक्ष उत्पादन घेईपर्यत लागलेल्या कालावधी | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| लगेच | १४ | ३.५ |
| ६ महिन्यापर्यंत | १ | ०.२५ |
| १ वर्षापर्यंत | १२५ | ३१.२५ |
| १ वर्षापेक्षा जास्त | १८६ | ४६.५ |
| ३ वर्षापेक्षा जास्त | ७४ | १८.५ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.६५ वरुन असे दिसून येते की, नवीन पुर्नवसित जमिनीचा ताबा मिळाल्यापासून पहिले पिक घेईपर्यत एक वर्षा पेक्षा जास्त काळ लागलेल्या उत्तरदात्यांची संख्या ४६.५ टक्के इतकी आहे. एक वर्ष लागलेल्यांचे प्रमाण ३१.२५ इतके आहे. तीन वर्षापेक्षा जास्त काळ लागलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण १८.५ टक्के इतके आहे.सहा महिन्यापेक्षा कमी काळ लागलेल्या शेतकऱ्याचे प्रमाण ०.२५ टक्के इतके असून जमीन ताब्यात मिळाल्यापासून लगेच कसण्यास सुरुवात झालेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३.५ टक्के खर्च आहे.

**सारणी क्रमांक ५.६६**

**जमीनीचा ताबा मिळाल्यापासून प्रत्यक्ष पहिले पीक होईपर्यंत लागलेल्या विलंबात झालेल्या आर्थिक नुकसानी झाल्या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी.**

| **विलंब काळातील नुकसान** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३५५ | ८८.७५ |
| नाही | ४५ | ११.२५ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.६६ वरुन असे दिसून येते की, ८८.७५ उत्तरदात्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे नोंदविले आहे. कारण जुनी जमीनी धरण प्राधिकरणाने ताब्यात  घेतल्यावर त्याचे पिके व उत्पन्न पूर्णपणे बंद झाले. तसेच नविन जमीनीत कोणतेही उत्पादन घेता येत नव्हते. त्याची कारणे पुढील प्रमाणे उत्तरदात्यांनी सांगितली ती म्हणजे जमीन उंच सखल भागातील, डोंगर उताराची, पडीत, रस्त्याच्या सोयी नसने, मुळ मालकाकडून जमीन कसण्यातील अडथळे यांचा समावेश आहे.

**सारणी क्रमांक ५.६७**

**पुनर्वसित नवीन गावठाण मध्ये शासनाच्या सहकार्याने एखादा नवीन व्यवसाय सुरु केला या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **शासनाच्या सहकार्याने नवीन व्यवसाय** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ००.० | ००.० |
| नाही | ४०० | १००.० |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.६७ वरुन असे दिसून येते की, पुर्नवसीत नविन ठिकाणी दोन्ही प्रकारच्या पुनवसनामध्ये जवळचा व दुसऱ्या अंतरावरील शासनाच्या सहकार्यांना, मदतीने, प्रेरणेने पुढकाराने पुर्नवसीत कुटूंबाकरीता कोणत्याही प्रकारचा नविन व्यवसायाची सुरुवात झालेली आढळून येत नाही. १०० टक्के लोकांचे असे आहे की, कोणत्याही प्रकारचा नविन व्यवसाय शासनाच्या सहकार्याने सुरु झालेला नाही. शासन निर्णयानुसार आरपीए–२००६ नुसार शासनातर्फे स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी पात्र उमेदवारांना अर्थसहाय्य दिले जाईल असे निर्णय झाला होता.

**५.४ पुनर्वसनामुळे निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्या :–**

**सारणी क्रमांक ५.६८**

**जुन्या गावात साजरे केले जात असणाऱ्या सण, उत्सव याबाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| **जुन्या गावात साजरे केले जात असणाऱ्या सण** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| दिवाळी | २१५ | ५३.७५ |
| होळी | १८५ | ४६.२५ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ५.६८ वरुन असे दिसून येते की, पुर्नवसनापूर्वी पुर्वीच्या जुन्या गावामध्ये पारंपारीक व परिसराला अनुरुप सण साजरे होताना दिसतात. होळी (शिमगा) हा सण अधिक मोठ्या प्रमाणात व उत्साहाने साजरी होताना दिसत होती. ५३७५ टक्के कुटूंब होळीचा

उत्सव अधिक मोठ्या प्रमाणात साजरा करत होते. ४६.२५ टक्के कुटूंब दिवाळी व इतर सण साजरा करताना दिसतात.

**सारणी क्रमांक ५.६९**

**जुन्या गावातील सामाजिक उपक्रमाबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| **जुन्या गावातील सामाजिक उपक्रम** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| जत्रा | ४०० | १०० |

वरील सारणी क्र. ५.६९ वरुन असे दिसून येते की, जुन्या पुर्नवसीत गावामध्ये सामाजिक उपक्रमामध्ये मुख्यत: गावाची जत्रा ही मोठ्या प्रमाणात साजरी केली जात आहे. जत्रेच्या नियमीत बाहेर गावी गलेले लोक गावात येऊन उत्साहात सहभागी होत, आणि त्या निमित्ताने त्यांच्या गावी एकत्रित होत असत. जत्रेच्या निमित्ताने मंदीरे, सभामंडपे याची सुधारणा डागडुजी तसेच इतर गावकऱ्यांना सोईस्कर होतील असे उपक्रमांवर एकत्रित येऊन चर्चा निर्णय या निमित्ताने घेतले जात होते.

**सारणी क्रमांक ५.७०**

**जुन्या गावातील करमणूकीची साधने दर्शविणारी सारणी.**

| **जुन्या गावातील करमणूकीची साधन** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| तमाशा | २७५ | ६८.८ |
| भारुड | ९३ | २३.३ |
| कोकणी खेळ | ३२ | ८.० |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी ५.७० वरुन असे दिसून येते की, जुन्या गावांमध्ये लोककला आधारीत करमणुकीची साधने होती. त्यामध्ये तमाशा, भारुड व कोकणी मैदानी खेळ आदी घेतले जात असे. या सर्वामध्ये सर्वांचीच लोकप्रिय तमाशा ६८.८ टक्के त्यानंतर भारुड २३.३ टक्के आणि कोकणी खेळ ८.० टक्के प्रमाणात असे.

**सारणी क्रमांक ५.७१**

**जुन्या गावातील रुढी–परंपरा दर्शविणारी सारणी**

| **जुन्या गावातील रुढी–परंपरा** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| मोढा | ४०० | १००.० |
| एकूण | **४००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ५.७१ वरुन असे दिसून येते की, जुन्या गावामध्ये परंपरेनुसार आठवड्यातून एक दिवस सुटटीचा दिवस म्हणून मोढा पाळण्याची पध्दत होती. आठवड्यातून एक दिवस ठरविला असेल त्यादिवशी गावातील सर्व लोक मोढा पाळत असत. या दिवशी निश्चित केले जाणारे शेतीची कामे व इतर व्यवसाय सुटटी म्हणून घेत असे. यादिवशी महिला जंगलातून सरपन आणणे व इतर घरगुती कामे करत व पुरुष शेतीची औजारे दुरुस्ती व देखभाल,गुरांची स्वच्छता, देखभाल इ. कामे क रत असत.

**सारणी क्रमांक ५.७२**

**नवीन गावातील सामाजिक उपक्रमाबाबतची माहिती दर्शविणारी सारणी .**

| **नवीन गावातील सामाजिक उपक्रम** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| सामाजिक कार्यक्रम | १५७ | ३९.३ |
| काहीही नाही | २४३ | ६०.८ |
| **एकूण** | **४००** | **१००** |

वरील सारणी क्र. ५.७२ वरुन असे दिसून येते की, नवीन पुर्नवसनाच्या ठिकाणी जुन्या गावापेक्षा त्यामानाने सामाजिक उपक्रम हे कमी घेतले जातात ३९.३ टक्के पुर्वीच्या ठिकाणी ज्याप्रमाणे एकोपा गावातील लोकांचा हाता त्यामानाने नविन ठिकाणी एकीचा व एकोप्याचे संबंधी प्रस्थापीत होऊ न शकल्यामुळे सामाजिक उपक्रम हे कमी प्रमाणात होताना आढळतात.

**सारणी क्रमांक ५.७३**

**नवीन गाव व जुने गाव यांच्यामधील सांस्कृतिक फरक/बदल या बाबतचे मत दर्शविणारी सारणी**

| नवीन गाव व जुने गाव यांच्यामधील सांस्कृतिक फरक/बदल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४०० | १००.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ५.७३ वरुन असे दिसून येते की, नवीन गावात पुनर्वसन झालेल्या कुटूंबाच्या सांस्कृतिक फरक जाणवतो का त्या प्रश्नाचे उत्तर सर्व उत्तदात्यांनी होय असे दिले आहे. कारण नवीन गावात पुनर्वसन झाल्यामुळे जुन्या गावात एकत्र राहणारी सर्व कुटूंबे ही एकाच समाजाची होती. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या सांस्कृतिक परंपरा विस्थापितामुळे विस्कळीत झाली. नवीन गावात हे सांस्कृतिक बदल जाणवतो.

**सारणी क्रमांक ५.७४**

**पुनर्वसनापुर्वी धरणग्रस्त कुटूंबाचे जीवन दर्शविणारी सारणी**

| तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| सलोख्याचे व एकोप्याचे | २४० | ६०.० |
| सोदार्याचे | ३६ | ९.० |
| परस्पर विश्वासाचे | १२४ | ३१.० |
| वरीलपैकी काहीही नाही | ०० | ०.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरिल सारणी ५.७४ वरुन असे लक्षात येते की, ६० टक्के लोकांना पुर्वीच्या ठिकाणी लोकांचे एकमेकांशी संबंध  सलोक्याचे व एकोप्याचे होते असे वाटते. सौदर्याचे संबंध होते असे ९ टक्के लोकांना वाटतेच. तसेच परस्पर एकमेकांमध्ये विश्वास होता असे ३१ टक्के लोकांना वाटते. यावरुन पुर्वीच्या ठिकाणी लोकांना भावनिक पातळीवर अधिक सुरक्षीत व आनंदायी वातावरण होते असे  वाटते.

## सारणी क्रमांक ५.७५

## पुनर्वसनाच्या ठिकाणी कुटुंबावर विस्थापनाचा परिणाम सामाजिक जीवनावर झाला असल्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| कुटुंबावर विस्थापनाचा सामाजिक परिणाम | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४०० | १००.० |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरिल सारणी ५.७५ वरुन असे दिसून येते की, दोन्ही प्रकारच्या पुर्नवसानंतर त्यांचा सामाजिक जिवनावर परिणाम झालेला आहे. १०० टक्के लोकांचे असे मत आहे की, नवीन ठिकाणी पुर्नवसनानंतर ते दुरवरचे अंतर असो की, जवळच्या अंतरावर असो पुर्नवसनाच्या त्यांच्या सामाजिक जिवनावर परिणाम झालेला दिसून येतो.

## सारणी क्रमांक ५.७६

## नवीन पुनर्वसित ठिकाणी इतर कुटूंबाशी असणाऱ्या संबंधाविषयी माहिती दर्शविणारी सारणी

| पुनर्वसित ठिकाणी इतर कुटूंबाशी संबंध | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १९ | ४.८ |
| नाही | ३८१ | ९५.३ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |


वरील सारणी ५.७६ वरुन असे लक्षात येते की, पुर्नवसानंतर दोन्ही प्रकारच्या पुर्नवसनामध्ये नविन पुर्नवसीत ठिकाणी कुटूंबाशी त्याचे संबंध सलोख्याचे आहेत असे अनुरूप असलेले फक्त ४.८ लोकांना असे वाटते की, नवीन ठिकाणी पुर्नवसन झाल्यानंतर पुर्वीप्रमाणे त्यांचे कुटूंबाचे एकमेकांशी घनिष्ठ आणि सलोख्याचे संबंध प्रस्तापीत होऊ शकले नाहीत.

**सारणी क्रमांक ५.७७**

**नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी अनोळखी कुटूंब व लोकांमुळे उत्तरदात्याचे जिवनावर होणारा परिणाम याविषयी माहिती दर्शविणारी सारणी**

| पुनर्वसित ठिकाणी अनोळखी कुटुंबाचा परिणाम | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २२१ | ५५.२ |
| नाही | १७९ | ४४.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

**आलेख क्र ५.२०**
**नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी अनोळखी कुटूंब व लोकांमुळे उत्तरदात्याचे जिवनावर होणारा परिणाम याविषयी माहिती**




वरील सारणी ५.७७ व आलेख क्र.५.२० वरुन असे दिसून येते की, ५५.२ टक्के उत्तरदात्याचे मते नवीन गावात पुनर्वसनाच्या ठिकाणी आजूबाजूच्या गावातील अनोळखी, कुटूंबे व लोकांमुळे त्याचा परिणाम पुनर्वसितांच्या जीवनावर झाला आहे. परंतु ४४.८ टक्के लोकांनी अनोळखी लोकांच्यामुळे जीवनावर परिणाम झाला नाही असे मत नोंदविले.

## सारणी क्रमांक ५.७८

## पुर्नवसन झालेल्या नविन ठिकाणी तुम्ही पूर्वीसारखे आनंदी व समाधानी सामाजिक जीवन जगता याबाबतचे मत दर्शविणारी सारणी

| **पुर्नवसित ठिकाणी पूर्वीसारखे आनंदी व समाधानी जीवन** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १३० | ३२.५ |
| नाही | २७० | ६७.५ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.७८ वरून असे दिसून येते की, पुनर्वसनापूर्वी व नवीन ठिकाणी पुर्वीसारखेच आनंदी असल्याचे मत नोंदविण्याऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३२.५ टक्के आहे. तसेच पुर्वीसारखे आनंदी व समाधानी जीवन जगत नसल्याचे मते ६७.५ टक्के उत्तरदात्यांनी नोंदविले आहे. कारण पुनर्वसनामुळे नवीन ठिकाणी आल्यामुळे जीवन जगण्याशी संघर्ष करावा लागत आहे. नवीन गावात सर्व गोष्टी नव्याने सुरुवात कराव्या लागल्या आहे. जुन्या गावात अनेक पिढ्यांलाच त्याच ठिकाणी राहत होत्या त्यामुळे वडिलोपार्जीत संपत्ती, मालमत्ता व इतर बाबी पुढील पिढीकडे हस्तांतरीत होत होत्या, धनधान्य, पाणी जनावरे ह्या गोष्टी मुबलक होत्या त्यामुळे गावात सर्व पुनर्वसित आनंदी होते.

## सारणी क्रमांक ५.७९

## नवीन ठिकाणी काही जातीय व धार्मिक तेढ निर्माण झाली का या विषयी माहिती दर्शविणारी सारणी

| **जातीय व धार्मिक तेढ** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १८७ | ४६.८ |
| नाही | २१३ | ५३.३ |
| **एकूण** | ४०० | १००.० |

वरील सारणी ५.७९ वरुन असे दिसते की, नवीन पुनर्वसीत गावामध्ये जीवन जगत असतांना जातीय तेढ, भेदभाव निर्माण झाले असे वाटते का ह्याबाबत ४६.८ उत्तरदात्यांनी होय

हे उत्त दिले कारण नवीन गावात वेगवेगळया जातीधर्माचे लोक एकत्र आले आहेत. पुनर्वसित म्हणून वेगळी वागणूक नेहमीच दिली जाते. असे उत्तदात्यांचे मत आले.ह्यात ५३.३ टक्के उत्तरदात्यांनी नाही असे उलट दिले आहे. कारण पिंपळगांव जोगा विभागातील गावामधील पुनर्वसन लांब अंतरावर झाले नसल्यामुळे ती कुटूंबे जुन्याच परिसरातच राहत असल्याने जाती व तेढ निर्माण झाले नसल्याचे मत नोंदविले.

**सारणी क्रमांक ५.८०**

**नवीन ठिकाणी विविध जाती धर्माचे लोक एकत्र आल्यामुळे त्याचा परिणाम धरणग्रस्तांच्या सामाजिक जिवनावर झाला या बाबतचे मत दर्शविणारी सारणी**

| **विविध जाती धर्मांचा परिणाम** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २०१ | ५०.२ |
| नाही | १९९ | ४९.८ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.८० वरुन असे दिसून येते की, ५०.२ उत्तरदात्यांनी नवीन पुनर्वसित ठिकाणी विविध जाती धर्माचे लोक एकत्र असल्यामुळे त्याचा परिणाम धरणग्रस्तांच्या सामाजिक जिवनावर झाला आहे. ह्याबाबत होय असे मत नोंदविले आहे. कारण जुन्या गावात एकाच जातीधर्माचे लोक वर्षानुवर्षे एकत्र राहत असल्यामुळे धार्मिक बाबी व सर्वांचे एकमत होते परंतु नवीन गावात मुळ गावचे लोक राहत असल्याने धार्मिक वातारणात नवीन घडामोडी झाल्यामुळे सामाजिक जिवनामध्ये निश्चीतच बदल झालेला जाणवतो. तसेच ४९.८ टक्के लोकाच्या जिवनात फरक न झाल्याचे मत नोंदविले आहे.

## सारणी क्रमांक ५.८१

## नवीन पुनर्वसन ठिकाणी गेल्यामुळे तुमच्या रुढी परंपरा यामध्ये बदल झाला का या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| रुढी परंपरामध्ये बदल | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १९९ | ४९.८ |
| नाही | २०१ | ५०.२ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरील सारणी ५.८१ वरुन असे दिसून येते की, नवीन पुनर्वसन ठिकाणी गेल्यामुळे तुमच्या रुढी परंपरामध्ये बदल झाल्याचे मत ४९.८ टक्के उत्तरदात्यांनी नोंदविले आहे. याचे कारण जुन्या आदिवासी भागामध्ये राहत असल्याने आदिवासींच्या परंपरा पाळल्या जात होत्या, गावात आठवड्यातून एक दिवस मोंढा पाळाला जात होता त्यामुळे एक दिवस माणसांना, स्त्रियांना हक्काची सुखे मिळत असे. तसेच विविध चांगल्या रुढी परंपरा पाळल्या जात होत्या पुनर्वसनामुळे निश्चितच त्यामध्ये बदल झाला आहे असे मत नोंदविले ५०.२ टक्के उत्तरदात्यांनी रुढी परंपरामध्ये कोणताही बदल न झाल्याचे मत नोंदविले आहे.

## सारणी क्रमांक ५.८२

## पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाच्या उपाययोजना समाधानकारक आहेत का या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| शासनाच्या उपाययोजनाबाबत समाधानकारक | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १५ | ३.८ |
| नाही | ३८५ | ९६.२ |
| **एकूण** | **४००** | **१००.०** |

वरिल सारणी ५.८२ वरुन असे लक्षात येते की, पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाच्या उपाय योजनाच्या बाबतीत असमाधानकारक आहे असे दिसून येते. ९६.२ टक्के लोकांना असे वाटते की, पुनर्वसनाच्या उपाय योजना मध्ये अनेक त्रुटी कमतरता व अंमलबजावणीच्या पातळीवर अडचणी आहेत त्यामुळे लोक समाधानी नाहीत असे दिसून येते.

## सारणी क्रमांक ५.८३

## नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग/वापर या बाबतची माहिती दर्शविणारी सारणी


| नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग | वारंवारीता |
|---|---|
| घरबांधणी | ३६० |
| जमीनीची दुरुस्ती | १२४ |
| जनावरे खरेदी | ५ |
| औजारे खरेदी | ३ |
| दैनंदिन गरजांची पूर्तता | २६७ |
| नवीन जमीन खरेदी | ५ |
| मुलांचे शिक्षण | १० |
| नोकरी | १२ |
| इतर कोर्ट केस पुनर्वसन संबंधित कामे | २१३ |

टीप : वरील सारणी शासनाकडून मिळालेल्या नुकसान भरपाईबद्दल उत्तरदात्यांच्या एकत्रित मते दर्शविते.

वरील सारणी ५.८३ व आलेख क्र.५.२१ वरून असे दिसून येते की, नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा वापर घरबांधणीसाठी केलेल्या उत्तरदात्यांची संख्या ३६० आहे. जमिनीची दुरुस्तीसाठी रक्कम वापरली अशा उत्तरदात्यांची संखया १२४ इतकी आहे. इतर पुनर्वसनाच्या कामासाठी उदा. कोर्ट केस, पुनर्वसनाच्या कामासाठी संबंधित विभागात वेळोवेळी जाणे त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी रक्कमेचा वापर करणाऱ्या उत्तरदात्यांची संखया २१३ इतकी आढळून आली. तसेच दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी रक्कम वापरलेल्या उत्तरदात्यांची संख्या ही २६७ इतकी असल्याचे आढळून आहे. जनावरे खरेदी, औजारांची खरेदी, नविन जमिन खरेदी, मुलांचे शिक्षण व नोकरीसाठी रक्कम वापरणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या अत्यंत कमी आहे. एकूणच नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या मोबदल्याच्या रक्कमेचा वापर घरबांधणी दैनंदिन गरजा, कोर्ट केस, पुर्वसनाच्या कामासाठी केलेल्या उत्तरदात्यांची संख्या

अधिक असल्याचे आढळून आले. कारण पैसा हातात मिळाल्यानंतर त्यावेळी असणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जास्तीत जास्त रक्कमेचा वापर झाल्याचे दिसून आले. म्हणजेच मोबदला म्हणून मिळालेल्या रक्कमेचा उपयोग नियोजन पूर्वक झाला नसल्याचे दिसून येते.

**आलेख क्र ५.२१**
**नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग/वापर**




**सारणी क्रमांक ५.८४**

**योग्य पुनर्वसनाच्या दृष्टीने धरणग्रस्तांच्या सूचना बाबतची माहिती दर्शविणारी सारणी**

| योग्य पुनर्वसनाच्या दृष्टीने धरणग्रस्तांच्या सूचना | वारंवारीता |
|---|---|
| प्रथम पुनर्वसन व नंतर धरण' धोरणाची तंतोतत अंमलबजावणी करावी | ३७६ |
| प्रकल्पग्रस्त कुंटुबांना त्यांची जमिन अधिग्रहण केल्यानंतर त्वरीत धरणग्रस्तांचे दाखले देण्यात यावेत | ३८२ |
| गाव पातळी, तालुका पातळीवर सक्षम तक्रार निवार यंत्रणा/प्रशासन असावे. | २९५ |
| पुनर्वसन सहभागाने | २२६ |
| गमावलेल्या मालमत्तेचा बाजार भावा प्रमाणे मोबदला मिळावा | ३६४ |

टीप : वरील सारणी योग्य पुनर्वसनाच्या दृष्टीने धरणग्रस्तांच्या सूचना बाबत उत्तरदात्यांची एकत्रित मते दर्शविते.

वरील सारणी ५.८४ वरून असे दिसून येते की, धरण बांधकाम सुरु करण्यापूर्वी विस्थापित लोकांचे पुनर्वसन सुरू करावे. ‘प्रथम पुनर्वसन व नंतर धरण’ या धोरणाची तंतोतत अंमलबजावणी करावी.सर्व प्रकल्पग्रस्त कुंटुबांना त्यांची जमिन अधिग्रहण केल्यानंतर त्वरीत धरणग्रस्तांचे दाखले देण्यात यावेत. पुनर्वसनाचे पुनर्स्थापनेच्या ठिकाणी विस्थापनाचे विकल्प निवडण्यासाठी लोकांचा सहभाग असावा. गाव पातळी, तालुका पातळीवर सक्षम तक्रार निवार यंत्रणा/प्रशासन असावे. प्रभावित शेतकऱ्यांच्या गमावलेल्या मालमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी प्रभावित व्यक्तींचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकते यांच्या सहभागाने मूल्यांकन समिती मार्फत व्हावी.

## ५.५ गृहितकृत्याची पडताळणी :

**गृहितकृत्य क्र.१** : ''पिंपळगाव जोगे आणि डिंभे येथील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे स्वरूप, पद्धती व धरणग्रस्तांच्या मतांचा विचार केला जात नाही तसेच सहभागी पुनर्वसनाची प्रक्रियेचा योग्य पद्धतीने वापर होत नाही.''

सदर गृहितकृत्य हे उत्तरदात्यांनी नोंदविलेल्या वर्णनात्मक मतांवर अवलंबित आहे. सारणी क्रमांक ५.८२ नुसार पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाच्या उपाययोजनांच्या बाबतीत पुनर्वसित शेतकरी असमाधानी दिसून आले होते. कारण भूसंपादन, पुनर्वसन ह्या बाबतीत पुनर्वसित कुटुंबांचा सहभाग न घेता अंमलबजावणी झाली आहे. तसेच धरणग्रस्तांच्या मतांचा विचार केला नाही असे दिसून येत आहे. नवीन जमिनी देतांना पुनर्वसितांच्या अडचणींचा विचार ह्या मध्ये केला जात नाही असे दिसून आले आहे. या सर्वांची मांडणी करता संशोधकाने मांडलेले गृहीतकृत्य सिद्ध झाले आहे.

**गृहितकृत्य क्र.२** : ''धरणग्रस्तांचे मुळगावाजवळ झालेल्या पुनर्वसनापेक्षा प्रकल्पस्थळापासून दूर अंतरावर झालेल्या पुनर्वसनामुळे सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक व कौटुंबिक इ. बाबतीत आर्थिक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.''

सदर गृहितकृत्य हे उत्तरदात्यांनी नोंदविलेल्या वर्णनात्मक मतांवर अवलंबित आहे. सारणी क्रमांक ५.२९ नुसार नवीन गावाचे जुन्या गावापासूनचे अंतराची मांडली केलेली असून त्याद्वारे असे दिसून येते की, पिंपळगाव जोगे धरण प्रकल्पातील विस्थापितांचे पुनर्वसन मुळ गावापासून अगदी जवळ म्हणजे ३ कि.मी. पेक्षा कमी अंतरावर झालेल्या धरणग्रस्तांची संख्या ४०.५ टक्के दिसून येते. तसेच सारणी क्र. ५.३१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे धरणापूर्वी ८०.८ टक्के पुनर्वसित कुटुंबांकडे जनावरे होती त्यामध्ये बैल, गायी, म्हशी, शेळ्या ह्या प्रकारची जनावरे होती. ह्या सर्वापासून मिळणारे उत्पन्न हे अधिक मिळत होते तसेच ह्या जनावरांना चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध होता. व सांभाळण्याचा खर्च ही कमी होता. परंतु सारणी क्र. ५.५३ नुसार विस्थापनानंतर कुटुंबांकडे उपलब्ध असणाऱ्या जनावरांची संख्या ६.८ टक्के इतकीच झाल्याचे आढळून आले. एकंदरीतच जनावरांच्या संख्येमध्ये घट झाल्याचे दिसून आले. तसेच सारणी क्र.

५.३८ नुसार विस्थापनापूर्वी उत्तरदात्यांची बागायती शेती ही ८५.८ टक्के इतक्या कुटुंबाकडे होती. सारणी क्र. ५.३९ नुसार विस्थापनापुर्वी बागायती शेती साठी शाश्वत सिंचन सुविधा असणाऱ्या कुटुंबाची संख्या ९७ टक्के इतकी होती ह्याच प्रमाणे पुनर्वसनानंतर सारणी क्र. ५.६४ नुसार सिंचन सुविधा उपलब्ध असणाऱ्या कुटुंबांची संख्या ही ८८ टक्के झाली आहे. तसेच पुनर्वसनापूर्वी जुन्या गावात सारणी क्र. ५.६८ नुसार दिवाळी होळी व इतर सण मोठ्या प्रमाणावर साजरे करणाऱ्या कुटुंबांची संख्या १०० टक्के होती परंतु पुनर्वसनानंतर त्यामध्ये घट झाल्याचे दिसून येते. ह्या वरूनच असे सिद्ध होती की, दोन्हीही प्रकारात उदा. मुळगावाजवळ व दूर अंतरावर झालेल्या विस्थापनातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व कौटुंबिक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

**गृहितकृत्य क्र.३** : ''कोणतेही प्रकल्पासाठी शेतकऱ्यांकडून भूसंपादन करून प्रकल्प कार्य सुरू करण्यापर्यंत शासनाचा पुढाकार हा प्रभावशाली व सहभागी पद्धतीचा असतो. परंतु त्या तुलनेत प्रकल्प कार्य पूर्ण झाल्यानंतर धरण ग्रस्तांकडे तुलनेन शासनामार्फत कमी लक्ष दिले जाते. त्यामुळे बऱ्याच परिस्थितिमध्ये धरणग्रस्त हे आधारहिन व एकीकडे पडल्यासारखे वाटतात.''

सदर गृहितकृत्य हे उत्तरदात्यांनी नोंदविलेल्या वर्णनात्मक मतांवर अवलंबित आहे. सारणी क्रमांक ५.६५ नुसार पुनर्वसितांना जमीन ताब्यात मिळाल्यापासून प्रत्यक्ष उत्पादन होईपर्यंत १ वर्षापेक्षा जास्त कालावधी लागलेल्या पुनर्वसित शेतकऱ्यांची संख्या ९५ टक्के इतकी असल्याचे दिसून आले. तसेच सारणी क्र. ५.६६ नुसार जमीनीचा ताबा मिळाल्यापासून प्रत्यक्ष पहिले पीक घेईपर्यंत लागलेल्या विलंबामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीत झालेल्या धरणग्रस्त कुटुंबांची संख्या ८८.७५ टक्क असल्याचे दिसून आले. म्हणजेच पुनर्वसनांनतर जमिनी कसणे व उत्पादन घेणे ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागल्याचे दिसून येते. व हे सिद्ध होते की शासनामार्फत पुनर्वसन पूर्व परिस्थितील धरणग्रस्तांकडे कमी लक्ष दिले जाते व धरणग्रस्त एकाकी पडतात.

**गृहितकृत्य क्र.४** : ''धरणग्रस्तांना शासनाकडून मिळणारी नुकसान भरपाई व मोबदला यांचा योग्य पद्धतीने नियोजनपूर्वक गुंतवणूक व वापर झाला तरच धरणग्रस्तांना त्याचा लाभ होऊ शकतो. अन्यथा अनेक धरणग्रस्तांच्या बाबतीत ह्या बाबींचा विवेकपूर्वक वापर झाला नसल्याचे दिसून येते.''

सदर गृहितकृत्य हे उत्तरदात्यांनी नोंदविलेल्या वर्णनात्मक मतांवर अवलंबित आहे. सारणी क्रमांक ५.८३ वरून असे दिसून येते की, शासनाकडून नुकसान भरपाई म्हणून मिळालेल्या रक्कमेचा विनियोग हा घर बांधणी दैनंदिन गरजांची पूर्तता व इतर पुनर्वसनासंबंधीत इतर कामासाठी प्रवास व इतर खर्चासाठी झाला असल्याचे दिसून येते.

जमिनीची दुरुस्तीसाठी ३१ टक्के कुटुंबांनी रक्कम वापरली ती तुलनेत अत्यंत कमी संख्या आहे कारण विस्थापनानंतर मिळालेल्या रक्कमेचा वापर उपजिविकेची साधने निर्माण करणे, मुलांचे शिक्षण, नोकरी, जमिनीची सुधारणा, नोकरी, औजारे खरेदी इ. कामांसाठी विवेकपूर्ण झाला नाही म्हणूनच असे सिद्ध होते की नुकसान भरपाईचा वापर का विवेकपूर्ण पद्धतीने केला गेला नाही.

**गृहितकृत्य क्र.५** : ''धरणग्रस्तांच्या पुनर्वसन व विकास कार्यात शासनाबरोबरच काही स्वयंसेवी संस्था, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्या–साठी प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.''

सदर गृहितकृत्य हे उत्तरदात्यांनी नोंदविलेल्या वर्णनात्मक मतांवर अवलंबित आहे. संशोधकाने गटचर्चेद्वारे तसेच दुय्यम स्त्रोतापासून मिळविलेल्या माहितीतून असे दिसून येते की, धरणग्रस्त विस्थापितांच्या न्याय हक्कांसाठी, चळवळी, आंदोलनाद्वारे हक्क व मागण्या प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. तसेच जमिन सपाटीकरण, आरोग्य शिक्षकांची स्थिती सुधारण्यासाठी विविध स्थरावर काम केले जात आहे. मच्छीमार सोसायट्यांची स्थापना करून उपजिविकेसाठी विस्थापिताना मार्ग दाखविण्यात आला आहे. तसेच ह्या संस्थांच्या कार्याची व्याप्ती ही विशिष्ट धरणापूरतीच मर्यादित आहे. परंतू स्थायी विकास, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत विविध स्थरावर प्रयत्न केले जात आहेत हे गृहितकृत्य सिद्ध होत आहे.

***

# प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

## ६.१ निष्कर्ष :–

''धरणग्रस्त पुनर्वसित कुटुंबियांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन'' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील डिंभे व पिंपळगाव जोगे ह्या धरणांमुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांचा अभ्यास करण्यात आला आहे. संख्यात्मक व गुणात्मक तथ्यांच्या आधारे विस्थापितांच्या समस्यांचे अध्ययन करून पुढील प्रमाणे निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आलेल्या आहेत.

**निष्कर्ष :–**

१. अभ्यासक्षेत्रातील बहुतांश धरणग्रस्त हे महादेव कोळी या अनुसूचित जमातीचे आढळून आले आहे.
२. अभ्यासक्षेत्रातील बहुतांश धरणग्रस्तांचे शिक्षण प्राथमिक स्तरापर्यंतच पूर्ण झालेले दिसून आले आहे.
३. अभ्यासक्षेत्रातील धरणग्रस्त कुटुंबियांचा व्यवसाय शेतमजूरी असल्याचे दिसून आले.
४. अभ्यासक्षेत्रातील बहुतांश कुटुंब हे एकत्रित कुटुंब पद्धतीचे जीवन जगत असल्याचे आढळून आले आहे.
५. अभ्यासक्षेत्रातील डिंभे धरणग्रस्त कुटुंबांना शासनामार्फत नविन जमिनी देण्यात आलेल्या आहेत तर पिंपळगाव जोगे धरणग्रस्तांना नविन जमिनी देण्यात आलेल्या नाहीत असे दिसून येते.
६. अभ्यासक्षेत्रातील डिंभे धरणग्रस्त कुटुंबियांना शासनामार्फत मिळालेल्या नविन जमिनी ह्या जास्तीत जास्त जिरायत प्रकाराच्या असल्याचे दिसते.
७. अभ्यासक्षेत्रातील पिंपळगाव जोगे धरणग्रस्त कुटुंबियांची उपजिवीका त्यांच्या शिल्लक असलेल्या जमिनीवर सुरू आहे तसेच शिल्लक जमिनी ह्या डोंगर उतारावर व खाच खळग्यांमध्ये असल्याचे आढळून आले.

८. अभ्यासक्षेत्रातील डिंभे व पिंपळगाव जोगे धरणग्रस्त कुटुंबियांच्या पुनर्वसनापूर्वी बहुतांश जमिनी ह्या बागायती स्वरूपाच्या होत्या परंतु पुनर्वसनानंतर त्यांना शासनाकडून मिळालेल्या किंवा शिल्लक असलेल्या जमिनी ह्या जिरायती अथवा पडीक प्रकारातील असल्याचे आढळून आले आहे.

९. अभ्यासक्षेत्रातील दोन्हीही धरणांमुळे विस्थापित झालेल्या कुटुंबियांना नविन ठिकाणी घरासाठी शासनामार्फत जागा दिल्याचे दिसून येते.

१०. अभ्यासक्षेत्रातील डिंभे धरणग्रस्त कुटुंबियांना नविन विस्थापित गावांमध्ये शिक्षणाच्या सोयी–सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्या तर पिंपळगाव जोगे धरणग्रस्त पुनर्वसित गावांमध्ये शिक्षणाच्या सोयीमध्ये पूर्वीपेक्षा कोणताही बदल झाला नसल्याचे दिसून येते.

११. अभ्यासक्षेत्रातील गावांमध्ये शिक्षणाच्या सोयीचे अंतर जुन्या गावांमध्ये जास्त असल्याचे आणि दळणवळणाच्या सुविधा नसल्याचे आढळून आले.

१२. अभ्यासक्षेत्रातील डिंभे प्रकल्पग्रस्त पुनर्वसित नविन गावांमध्ये शिक्षणाच्या सोयींचा विस्तार व संधीची उपलब्धता पिंपळगाव जोगेच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येते.

१३. अभ्यासक्षेत्रातील डिंभे धरणग्रस्तांचे पुनर्वसन झालेल्या नविन गावांचे अंतर मूळगावापासून ४० ते १०० कि.मी. असल्याचे आढळून आले, आणि पिंपळगाव जोगे नविन पुनर्वसन झालेल्या गावांचे मूळ गावांपासूनचे अंतर ३ कि.मी. पेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे.

१४. अभ्यासक्षेत्रातील दोन्हीही धरणांमुळे ९९ टक्के कुटुंबियांच्या जमिनी ह्या धरणासाठी अधिग्रहण केले असल्याचे दिसून येते.

१५. अभ्यासक्षेत्रातील गांवामध्ये विस्थापनापूर्वी ८० टक्के कुटुंबियांकडे जनावरे उपलब्ध होती तर विस्थापनानंतर ही संख्या फक्त ११ टक्के वर असल्याचे आढळून आले आहे.

१६. अभ्यासक्षेत्रातील जुन्या गावात शेतीपूरक व्यवसायातून व जनावरांपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न हे रु. १०,००० पर्यंत असलेली ६० टक्के कुटुंबे आढळून आली तर विस्थापनानंतर जनावरांपासून मिळणारे उत्पन्न हे मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याचे आढळून आले. तथापि, विस्थापनापूर्वी गावरान जनावरांची संख्या जास्त होती व त्यांच्यापासून मिळणारे उत्पन्न

कमी प्रमाणात होते परंतु विस्थापनानंतर संकरितवाणाच्या जनावरांपासून मिळणारे उत्पन्न वाढले, पण जनावरांची संख्या कमी झाली.

१७. अभ्यासक्षेत्रातील धरणग्रस्तांच्या विस्थापनापूर्वी ८६ टक्के कुटुंबांकडे वर्षातील ८ महिने शेतीसाठी पाणी उपलब्ध होते आणि विस्थापनानंतर फक्त ११ टक्के कुटुंबांकडे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता असल्याचे दिसून येते.

१८. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसनापूर्वी सिंचन सुविधेसाठी डिझेल इंजिनचा वापर १०० टक्के होत होता, पुनर्वसनानंतर बागायती क्षेत्रासाठी विद्युत पंपाचा वापर केला जात आहे परंतु ती संख्या अत्यंत कमी असल्याचे आढळून आले.

१९. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसनापूर्वी शेतीमध्ये भात, गहू, बाजरी, ज्वारी, हरभरा, मठ, मुग, मका, भाजीपाला हे पिकविण्याऱ्या धरणग्रस्त शेतकऱ्यांचे प्रमाण ८० टक्क्यापेक्षा जास्त होते, पुनर्वसनानंतर हे प्रमाण ८ टक्क्यांवर आले आहे, तसेच पिकांमध्ये बाजरी, ज्वारी, हरबरा हीच प्रमुख पिके घेतली जात असल्याचे आढळून येते.

२०. अभ्यासक्षेत्रातील धरणग्रस्त कुटुंबे पुनर्वसनापूर्वी शेती कसण्यासाठी ७६ टक्के कुटुंबे बैलांचा वापर करत होती, तर विस्थापनानंतर नविन पुनर्वसित क्षेत्रामध्ये फक्त १० टक्के कुटुंबेच बैलांचा वापर करत असल्याचे दिसून येते. तसेच पारंपारिक पद्धतीने एकही शेतकरी जमिन कसत नाही असे दिसून येते.

२१. अभ्यासक्षेत्रातील विस्थापित कुटुंबियांना शासनाकडून मिळालेल्या नविन जमिनीचा ताबा मिळविण्यासाठी ७७ टक्के कुटुंबियांना अडचणींना सामोरे जावे लागले आहे, त्यात मुळ मालकाकडून अडवणूक करणे, रस्त्यांची सुविधा, पाण्याची उपलब्धता ह्या प्रमुख कारणांचा समावेश असल्याचे दिसून येते.

२२. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसितांना नविन जमिन ताब्यात मिळाल्यापासून प्रत्यक्ष उत्पादन होईपर्यंत १ वर्षापेक्षा जास्त कालावधी लागलेल्या धरणग्रस्त विस्थापित कुटुंबियांची संख्या ६५ टक्के असल्याचे दिसून येते.

२३. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसित नविन गावठाणांमध्ये शासनाच्या सहकार्याने एकाही पुनर्वसित कुटुंबाने उद्योग व्यवसाय सुरु केला नसल्याचे आढळून येते.

२४. अभ्यासक्षेत्रातील कुटुंबाना प्रत्यक्ष जमिनीचा ताबा मिळाल्यापासून नविन जमिनीत प्रत्यक्ष पिक घेईपर्यंतच्या कालावधीत आर्थिक नुकसान असल्याचे निदर्शनास आले तसेच त्या दरम्यान झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई शासनाकडून मिळाली नाही असे दिसून येते.

२५. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसनापूर्वी जुन्या गावात दिवाळी, होळी हे सण अत्यंत आनंदाने साजरे होत होते, तुलनेने नविन गावांमध्ये हे सण साजरे करण्याच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

२६. अभ्यासक्षेत्रातील जुन्या गावांमध्ये गावची जत्रा मोठ्या प्रमाणावर साजरी केली जात होती. त्या निमित्ताने गावातील सामाजिक प्रश्न सोडविले जात होते, परंतु तुलनेने नविन गावांमध्ये जत्रा साजरी होत नाही, त्यामुळे लोक एकत्र येत नाही, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा होत नसल्याचे दिसून येते.

२७. अभ्यासक्षेत्रातील मूळ गाव व नविन गावांमध्ये सांस्कृतिक बदल झाल्याचे आढळून आले आहे.

२८. अभ्यासक्षेत्रातील जुन्या गावांमधील धरणग्रस्त कुटुंबियांचे जीवन सलोख्याचे, एकोप्याचे, सौदार्हयाचे व परस्पर विश्वासचे होते तुलनेने नविन गावांमध्ये ह्यामध्ये घट झाल्याचे दिसून येते.

२९. अभ्यासक्षेत्रातील नविन पुनर्वसित ठिकाणी तेथील प्रस्थापित कुटुंबाशी पुनर्वसितांचे संबंध सलोख्याचे,  नसल्याचे आढळून आले. तसेच कुटुंबियांचे जीवन आनंदी व समाधानी नसल्याचे आढळून आले आहे.

३०. अभ्यासक्षेत्रातील नविन पुनर्वसित गावांमध्ये विविध जाती–धर्माची लोक एकत्र आल्यामुळे सामाजिक जीवनात बदल झाल्याचे आढळून आले. सामाजिक अभिसरण झाल्याचे दिसून येते.

३१. अभ्यासक्षेत्रातील नविन पुनर्वसित ठिकाणी जुन्या गावात असलेल्या रुढी, परंपरांमध्ये बदल झाल्याचे ४९ टक्के कुटुंबियांनी नमूद केले आहे.

३२. अभ्यासक्षेत्रातील पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाच्या उपाययोजना, पुनर्वसितांच्या मते समाधानकारक नसल्याचे मत नोंदविले आहे.

## ६.२ समाजकार्याची मध्यस्ती :–

विविध प्रकल्प उभारणी मध्ये समाज कार्य हा महत्त्वाची भूमिका बजावत असतो. त्यामुहे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन, प्रकल्पाची पूर्वतयारी, पुनर्वसनानंतरची कार्यवाही व मदत ह्यामध्ये समाजकार्याचा योग्य तऱ्हेने व योग्य वेळी वापर झाल्यास प्रकल्प उभारणी, विस्थापन व पुनर्वसन ह्यामुळे उद्‌भवणार प्रश्न, अडचणी निश्चित पणे कमी करता येणे शक्य होऊ शकते. ह्यामध्ये समाजकार्याच्या विविध पद्धतीचा वापर करून प्रश्न सोडविणे सोपे होऊ शकते याचे महत्वाचे कारण म्हणजे. समाज विविध भौगोलिक, मानसिकते ने एकत्र राहत असतो व त्यानुसार समाजातील बांधीलकी, संबंधाची जपवणूक ही होत असते. विविध सामाजिक स्थरांमध्ये समाजाची विभागणी झालेली आपणास दिसून येते. त्या त्या स्थरानुसार जीवन जगण्याची पद्धती, एकसंघपणा प्रत्येक स्थरांतील गटांमध्ये दिसून येत असतो ह्या एकत्र राहणाऱ्या गटाची सामाजिक प्रश्न एक सारखे असल्यामुळे त्यांना त्या प्रश्नाची सोडवणूक सहजपणे करता येत होती. परंतु विस्थापनासारख्या परिस्थितीमुळे समाजीक ह्या सर्व घटकांची विभागणी वेगवेगळ्या ठिकाणी झाली.

ह्या समुहामध्ये राहणाऱ्या कुटुंबांची अर्थव्यवस्था, संस्कृती ह्या सर्व एक सारख्या असतात. समुदाय केवळ भौगोलिक बाबींपेक्षा मानसिक गटबद्धता ह्या मध्ये बांधला गेलेला असतो.

### ६.२.१ समुदाय संघटन (Community Organization) :–

समाजामध्ये अशा प्रकारचे विविध गट आहेत त्यांचे काही स्वारस्य सामान्य असतात. सर्व समुदायाची रूची सामान्य वेगाने होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला त्यांच्या मुळ निवासस्थानापासून, गावापासून जबरदस्तीने विस्थापन करून त्याचे स्थलांतर केले जाते. समुदाय विस्कळीतपणा निर्माण होतो कोणताही समाज पूर्णपणे व्यवस्थित नसेल तसेच सामाजिक व्यवस्था एकात्मता प्रदान करते आणि समुदायात अनुकूल अशी प्रक्रिया आहे जी समुदाय आयोजनाचे कार्य सुरु करणे, पोषण करणे ही प्रक्रिया विकसित होते. समुदाय संयोजन सामाजिक स्वरूपाच्या काही विशिष्ट मूल्यांविषयी आदर निर्माण करेल हे बदल

सांधनांद्वारे करता येतील. समुदाय संघटन ही सामाजिक कल्याणासाठी समायोजना घडविण्याची व त्याची देखरेख करण्याची प्रक्रिया आहे. एका भौगोलिक क्षेत्रातील सामाजिक कल्याणाची आवश्यकता आणि सामाजिक कल्याण संसाधनांमध्ये वाढ करता येईल.

**६.२.२ वैयक्तिक घटक : –**

एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाकरिता लोकांच्या वर्तणुकीमागील मानसिकता व भावविवशता, लोकांबद्दलची आस्था, त्यांच्या कल्याणाची आस, संयम तसेच वर्ग, संस्कृती, धर्म व वंश याबद्दलची पूर्वग्रहविरहित दृष्टी या गुणांची आवश्यकता आहे. एखाद्या व्यक्तीचे आयुष्य बदलविण्याकरिता आवश्यक असलेला आदर्शवाद, सामाजिक योगदान देणारे कार्य करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याची क्षमता, तुमच्या या योगदानाबद्दलचा अभिमान, प्रेरक भूमिका व व्यक्तिगत पातळीवरील परिपूर्णता हे घटकदेखील महत्त्वाचे आहेत. प्रतिकूल परिस्थितीत कार्य करण्याची क्षमता आणि समस्यांचा स्वीकार करून त्या सहन करण्याची ताकद हे गुण सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये असणे गरजेचे आहे. समाजकार्याच्या क्षेत्रात मोस्ट बिझी असणाऱ्या व्यक्ती या निष्ठावान आणि सदसद् विवेकबुद्धी जागृत ठेवून कार्य करणाऱ्याच असतात.

**६.२.३ समाजकार्याच्या शाखा :**

समाजकार्य अथवा सामाजिक कार्य म्हणजे लोकांच्या सामाजिक, आर्थिक व वैयक्तिक/ व्यक्तिगत समस्यांचे निर्णयन करणे होय. सामाजिक कार्यकर्ते समुपदेशन, चर्चा, स्त्रोतांची वृद्धी, सामाजिक जागरूकतेचा प्रसार, सामाजिक उपक्रम व आरोग्य सेवा यांच्या माध्यमातून लोकांच्या समस्या सोडवतात. लोकांना चांगली वागणूक देणे, त्यांच्या वागणुकीचे मूल्यांकन करणे, त्यांचे मानसिक आरोग्य व भावनिक समस्या याकडे लक्ष पुरविणे हा सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचाच एक भाग आहे. प्रत्येक व्यक्ती आणि समाज हा विविध प्रकारच्या समस्यांशी निगडित असल्यामुळे सामाजिक कार्याच्या क्षेत्रात वैविध्यपूर्ण संधी उपलब्ध होतात. यामध्ये पुढील क्षेत्रांचा समावेश असतो.

### ६.२.४ वैद्यकीय सामाजिक कार्य :

जे सामाजिक कार्यकर्ते या क्षेत्रात कार्यरत असतात ते संबंधित रुग्णांना व त्यांच्या कुटुंबीयांना तणाव, व्यक्तिगत समस्या व आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी मदत करतात. परिस्थिती व प्रकृती सुधारण्याच्या मार्गातील अडथळे दूर करणे हे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांचे कार्य असते. रुग्णालयातून घरी पाठविल्यानंतर रुग्णांची शुश्रूषा करणे, गरीब रुग्णांची आर्थिक मदत करणे व दीर्घकालीन आरोग्यनिगाविषयक सेवा पुरविणे हे त्यांचे कार्य असते. तसेच त्या/त्या रुग्णाच्या सामाजिक, भावनिक व आर्थिक परिस्थितीबाबत आरोग्यतज्ज्ञांना माहिती पुरविण्याचे कार्यसुद्धा हे करतात.

### ६.२.५ शालेय सामाजिक कार्यकर्ते :

विद्यार्थ्यांच्या हितासाठी शाळा आणि विद्यार्थ्यांचे घर यांच्यात सुसंबंध/सकारात्मक संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य हे सामाजिक कार्यकर्ते करतात. कौटुंबिक समस्यांचे निवारण करणे व त्यांना भावनिक आधार देणे हा त्याचाच एक भाग आहे. तसेच विद्यार्थ्यांचे समुपदेशन, गृहभेटी, कौटुंबिक मूल्यांकन/मूल्यमापन करणे इत्यादी कार्याचा त्यात अंतर्भाव आहे. अमलीपदार्थ सेवन, भावनिक अस्थिरता, दारूचे व्यसन, लैंगिक समस्या व आजार यासारख्या समस्यांवर चर्चा करणे आणि त्याबाबत योग्य मार्गदर्शन करणे हे शालेय सामाजिक कार्यकर्त्यांचे आणखी एक कर्तव्य आहे.

### ६.२.६ मानसोपचारविषयक सामाजिक कार्य :

भयगंड, भावनिक अस्थिरता, दुर्लक्षित मुले व अध्ययन कौशल्यविषयक समस्येत अडकलेली मुले यांच्याशी निगडित असणाऱ्या समस्या व विमनस्क अवस्थेतील मुलांचे तसेच पौगंडावस्थेतील मुलांचे प्रश्न सोडविणे हे मानसोपचारविषयक सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रमुख कार्य असते. ते मुलांचे मूल्यांकन करून त्यांच्या समस्यांचे मूळ शोधतात. त्याद्वारे उपचार प्रक्रिया सुलभ होण्यासाठी मदत करतात. विविध मानसोपचार रुग्णालयातील विविध रुग्णांच्या गटांना ते नियमितपणे भेट देतात.

### ६.२.७ समूहस्तरावर कार्य :

सामाजिक कार्यकर्ते विशिष्ट समूहांच्या विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्यरत असतात. घरांची कमतरता, बेरोजगारी, स्थानिक सेवा इत्यादीशी निगडित समस्या ते सोडवितात. मूलभूत स्त्रोतांचे वाटप आणि सामाजिक धोरणांची अंमलबजावणी करण्याकरिता ते सहाय्यभूत ठरतात.

### ६.२.८ गुन्हेगार व कैद्यांविषयक सामाजिक कार्य :

सुधारगृहे व तुरुंग येथील सामाजिक कार्यकर्ते गुन्हे आणि समाजविघातक वर्तणुकीला पायबंद घालण्याचे कार्य करतात. सामाजिक कार्यकर्त्यांनी गुन्हा प्रतिबंधक कार्यक्रमांचीही आखणी केली आहे. याद्वारे सकारात्मक वातावरणाची निर्मिती होते.

### ६.२.९ वार्धक्यशास्त्रविषयक सामाजिक कार्य :

वृद्ध/वयस्कर व्यक्तींची निगा राखणे याच्याशी ही शाखा निगडित आहे. वृद्धाश्रमांकरिता अशा वार्धक्यशास्त्रविषयक सामाजिक कार्यकर्त्यांची आवश्यकता असते.

### ६.२.१० बालसंगोपन व कुटुंबसेवा :

बालसंगोपनविषयक सेवांमध्ये पाळणाघरे व बालसंगोपन केन्द्रे चालविणे यांचा समावेश असतो. जन्मजात अपंगत्व असलेल्या मुलांच्या समस्या तसेच भिन्न संस्कृतींशी निगडित मुलांचे प्रश्न यांच्याशी ही शाखा संबंधित आहे.

### ६.२.११ संशोधन :

दारिद्र्य व बेघरपणा यासारख्या सामाजिक समस्यांचे निवारण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सामाजिक संशोधन करतात. सामाजिक समस्यांमागील कारणे व सामाजिक संस्थांची सक्षमता याविषयीसुद्धा ते संशोधन करतात.

संशोधनाचा वापर पुनर्वसन प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो कारण स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशात धरणे बांधली जात आहेत. तसेच विविध विकासात्मक प्रकल्प उभारले जात आहेत. प्रत्येक प्रकल्प उभारणीमध्ये विविध अडचणी, प्रश्न निर्माण होत असतात.

मागील काळातील पूर्वीच्या अनुभवांनुसार अडचणी किंवा प्रश्न यांच्या कारणांचे संशोधन करून प्रकल्प पुनर्वसन आराखडा तयार केला तर तो अतिशय उपयुक्त ठरेल तसेच लोकांचा सहभाग, शासनाची भूमिका, लाभ क्षेत्रातील कुटुंबे, प्रकल्प प्रभावित कुटुंबे व इतर संबंधित घटक या सर्व मुद्यांवर संशोधन करून त्याचा वापर योग्य पुनर्वसनासाठी उपयुक्त ठरू शकेल. तसेच संशोधनामुळे प्रकल्प उभारणीमध्ये निर्माण होणारे प्रश्न, समस्या, अडचणी कमी करता तसेच टाळता येऊ शकतात. संशोधन हे सर्व प्रकल्प प्रभावीत कुटुंबे, लाभक्षेत्रातील कुटुंबे, शासनाचे संबंधित सर्व विभाग यांना सहाय्यकारी ठरेल. म्हणून संशोधनाचा पुनर्वसनामध्ये उपयोग करून प्रकल्प उभारणी योग्य प्रकारे करता येऊ शकते.

### ६.२.१२ समुपदेशन (Conselling):–

समुपदेशन या समाजकार्य तंत्राचा उपयोग विविध विकासात्मक प्रकल्प उभारणी व त्या संदर्भातील आवश्यक प्रक्रियांमध्ये महत्वाची भूमिका बजावतो कारण प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीमध्ये प्रकल्पाबाबतची माहिती, बुडीत क्षेत्राची माहिती, मिळणाऱ्या लाभांची माहिती, प्रकल्प प्रभावीत लोकांपर्यंत समुपदेशनाच्या माध्यमातून पोहचविली तर त्याचा प्रभावी उपयोग होऊ शकतो. प्रकल्प उभारणी करतांना प्रकल्पाची माहिती बऱ्याचदा योग्य पद्धतीने प्रकल्प बाधित कुटुंबांना दिली जात नाही त्यामुळे प्रकल्प बाधित कुटुंबांमध्ये कायम स्वरूपाचा संभ्रम निर्माण होत असतो. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे शोषण झाले, अन्याय झाला ही भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये वाढीस लागते. प्रत्यक्ष पुनर्वसनाच्या वेळी पर्यायी जागा/जमिनी देताना प्रकल्पग्रस्तांना योग्य समुपदेशन केल्यास त्याचा फायदा होऊ शकेल. कारण नविन ठिकाणी जाताना सर्वांच्या मनात अनिश्चितता, भिती, नविन जागेबाबतची माहिती नसणे, मुळ गावातील लोकांचा दबाव ह्या घटकांवर योग्य कारवाई करता येईल. समुपदेशनामुळे योग्य पुनर्वसनाच्या दृष्टीने अधिक चांगले प्रयत्न करता येऊ शकतात. शासकीय विभाग, शासकीय अधिकारी, पुनर्वसनाकडे योग्य लक्ष देत नाहीत. त्याचबरोबर सामाजिक संस्थांचा प्रकल्प बाधित कुटुंबांचे समुपदेशन, प्रकल्पाबाबतची योग्य व पुरेसी माहिती प्रकल्प प्रभावित लोकांना देणे यामध्ये समुपदेशन केल्यास त्याचा फायदा प्रभावी पुनर्वसन करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**६.२.१३ गरजांचे विश्लेषण (**Needs Assessment**):–**

समाजकार्यातील महत्त्वाचे साधन म्हणजे समाजातील विस्थापनाच्या गरजांचे विश्लेषण करून त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी गरजांचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. कारण यापूर्वी धरणे उभारणी करतांना विविध गरजांचे लक्ष दिले गेले नाही. शासनाच्या साचेबंध मार्गदर्शिकेनुसार कायदेशिर नियमावलीनुसारच भूसंपादन, विस्थापन व पुनर्वसन या प्रक्रिया पार पाडल्या जातात. विस्थापितांच्या छोट्या मोठ्या परंतु महत्त्वाच्या गरजांकडे शासकीय यंत्रणांचे लक्ष जात नाही आणि त्यावर योग्य अंमलबजावणी व उपाययोजना केल्या जात नाहीत त्यामुळे विस्थापितांचे प्रश्न वाढत जातात व विस्थापित हे उपेक्षितच राहतात. धरण प्रकल्प उभारणी करत असतांना विस्थापितांच्या छोट्या मोठ्या गरजांना प्राधान्यक्रमाने सोडविले गेले पाहिजे असे केल्यास याचा उपयोग प्रभावी व सकारात्मक पुनर्वसनासाठी करता येऊ शकेल. म्हणूनच समाजकार्य पद्धतीतील गरजांचे विश्लेषणाद्वारे प्रकल्प उभारणीमधील निर्माण होणारे सर्व प्रश्न कमी करता येऊ शकतात तसेच टाळता येऊ शकतात.

**६.२.१४ समाजकल्याण प्रशासन (**Social Administration**):–**

पुनर्वसनातील प्रकल्पबाधित व्यक्तीबाबतच्या पुनर्वसनाची सर्व प्रक्रिया सरकारच्या महसूल व सिंचन विभागामार्फत पूर्ण केली जाते. भूसंपादन, विस्थापन, पुनर्वसन, पुनर्वसनानंतरचे कार्य या सर्व प्रक्रियांमध्ये समाज कल्याण प्रशासनाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. समाज कल्याण प्रशासन हे समाज व नविन पुनर्रस्थापनेमध्ये नविन जीवनातील दुर्लक्षित असणाऱ्या बाबींकडे लक्ष वेधून त्यावर अंमलबजावणीची भूमिका बजावत असतो. समाज कल्याण प्रशासनाला सकारात्मकदृष्टीने पाहणे गरजेचे आहे कारण मानवी जीवनाशी संबंधित जसे शिक्षण, आरोग्य व स्वच्छता, सामाजिक सुरक्षा इत्यादी प्रश्न प्रकल्प बाधित व विस्थापित कुटुंबांमध्ये दिसून येतात. हे प्रश्न सोडवणूक करून समाज कल्याणासाठी प्रयत्न करणारे प्रशासन म्हणून समाज कल्याण प्रशासनाकडे पाहिले जाते. प्रत्येक राष्ट्राला त्यांच्या गरीबीवर मात करण्यासाठी समाज कल्याण प्रशासनाचा मोठ्या प्रमाणावर फायदा होतो.

सुप्रशासनामध्ये पहिली आवश्यक बाब म्हणजे ज्याची जी जबाबदारी आहे त्याच्याकडे त्या जबाबदारीचा हिशोब मागितला जावा, ना त्याच्या खालच्या माणसाकडे ना त्याच्या वरच्या माणसाकडे थेट संबंधित व्यक्तीकडे त्याची विचारणा केली जावी तेव्हाच सुधारणा होईल, आणि त्याचकरिता सुप्रशासन आणि लोकजागृती आणि विचारवंतांची आवश्यकता आहे. ज्याची जबाबदारी आहे तोच त्यासाठी उत्तरदायी असेल हे बंधनकारक असेल. सुप्रशासानाबाबत दुसरे मत असे आहे की, कधीकधी समस्यांच्या मुळाशी सरकार स्वतःच असते. मला हे माहित आहे की मी हे जे बोलत आहे त्यामुळे काय काय झाले आहे. सरकार जितके अलिप्त राहील जनता तेवढीच सामर्थ्यवान होईल आणि देशाला ज्याची गरज आहे ते ती देऊ शकते. सरकारला प्रत्येक ठिकाणी मध्ये यायची गरज नाही. परंतु इंग्रजांच्या काळापासून ही सवय लागली आहे त्याला बदलणे कठीण काम आहे. असे असले तरीही सुप्रशासानासाठी बदल आवश्यक आहे. अडथळे निर्माण करणे, लोकांना वारंवार आपल्याकडे यावे लागणे अशी परिस्थिती का असावी?

सुप्रशासानामध्ये कार्य पद्धती कमी असावी, सामान्य नागरिकांना सुलभतेने कोणतीही बाब समजावी, आम्ही अशी पद्धती विकसित करण्याच्या बाजूने आहोत. राज्यांचा जेवढा थेट संबंध नागरिकांशी येतो तितका केंद्र सरकारचा येत नाही.

तक्रार निवारण प्रणाली ही लोकशाही मधील दुसरी सर्वात मोठी ताकत आहे असे मी मानतो. सरकार जनतेचा आवाज ऐकते का, जर ऐकत असेल तर जबाबदारीने त्याला उत्तर देते का, आपल्या सुप्रशासानाची ही गरज आहे आणि अजून बरेच कार्य बाकी आहे. सामान्यामधील सामान्य नागरिकाची तक्रार ऐकण्याची सर्वोत्तम व्यवस्था असावी आणि निर्धारित वेळेत त्याचे निवारण झाले पाहिजे. त्याला जर काही समस्या असेल तर सरकारी व्यवस्थेने त्याच्याकडे मदतीचा हाथ पुढे केला पाहिजे त्याचा आवाज दाबला नाही पाहिजे.

समाजकार्य ही कल्याणकारी कृती आहे. समाजकार्य हे मानवतावाद, शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक कौशल्ये ह्यांवर आधारित आहे. व्यक्ती, गट किंवा समुदायाचे आयुष्य अधिक परिपूर्ण

करण्याचा त्यात प्रयत्न आहे. ह्या सर्व व्याख्यांचा साकल्याने विचार केल्यास त्यांतील काही प्रमुख उद्देशांची तसेच कार्यपद्धतीची कल्पना येते.

## ६.३ शिफारशी :–

१. धरण बांधकाम सुरु करण्यापूर्वी विस्थापित लोकांचे पुनर्वसन सुरू करावे. 'प्रथम पुनर्वसन व नंतर धरण' या धोरणाची तंतोतत अंमलबजावणी करावी.

२. सर्व प्रकल्पग्रस्त कुंटुबांना त्यांची जमिन अधिग्रहण केल्यानंतर त्वरीत धरणग्रस्तांचे दाखले देण्यात यावेत.

३. पुनर्वसनाचे पुनर्स्थापनेच्या ठिकाणी विस्थापनाचे विकल्प निवडण्यासाठी लोकांचा सहभाग असावा.

४. गाव पातळी, तालुका पातळीवर सक्षम तक्रार निवार यंत्रणा/प्रशासन असावे.

५. प्रभावित शेतकऱ्यांच्या गमावलेल्या मालमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी प्रभावित व्यक्तींचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकते यांच्या सहभागाने मूल्यांकन समिती मार्फत व्हावी.

६. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रकल्पांचे काम पूर्ण होईपर्यंत होऊ नये.

७. पुनर्वसित नवीन गावठानामध्ये अपेक्षित देय नागरी सुविधा कुटुंबांचे विस्थापन करण्या अगोदर करावे.

८. नविन पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा शाश्वत व कायम स्वरूपी मिळावी व पाणी पुरवठा योजनांची देखभाल करण्यासाठी निधीची उपलब्धता करावी.

९. स्थानिक धरणग्रस्तांना धरणात कायम मच्छीमारी करण्याचे अधिकार असावेत.

१०. भूसंपादन ते नवीन जमिनीत पिक घेणे ह्या मधील कालावधीसाठी विलंब नुकसानीच्या मोबदल्याची तरतूद करण्यात यावी.

११. पुनर्वसन भूसंपादन ह्याची प्रलंबिल प्रकरणे तातडीने सोडविण्यासाठी स्वतंत्र यंत्रनेची स्थापना करावी.

१२. शासनाकडून मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम बाजारभावाच्या तुलनेत अतिशय कमी दिली जाते. जमिनीचे मूल्यांकन करताना याबाबत सूक्ष्मनियोजन केले जावे.

१३. प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जागांमध्ये (कॉलनी, कामगारांच्या वसाहती, कार्यालये) उभारलेल्या इमारती प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांच्या विकासासाठी व कल्याणकारी योजना अंमलबजावणीसाठी वापरल्या जाव्यात.

१४. शासनाच्या विरोधात प्रकल्पग्रस्तांनी न्याय हक्कांसाठी कोर्टात दाखल केलेले खटले वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. त्या खटल्याची सुनावणी व निकाल लवकरात लवकर होण्यासाठी विशेष लक्ष द्यावे. जलदगती न्यायालयामार्फत खटले निकाली काढण्यात यावेत.

***

# संदर्भग्रंथ सूची


१. Bhadarge, K. S. (2016). Water Policy of Dr.B.R.Ambedkar.

२. Borse M.N., Research Methodology: Modern Methods and New Techniques

३. Central Water Commission Ministry of Water Resources. (n.d.). *River Development and Ganga Rejuvation.* New Delhi: Central Water Commission.

४. Census of India 2011 ,Junner & Ambegaon Taluka By Unicef

५. Daryaji, H. B. (2012, March). Dr. B.R.Ambedakr'sthought on agriculture and its relevance to current agricultire in India. *Review of research, 1*(6), 1-4.

६. Deshmukh, D. (1992). Maharashtracha Pani Prashan (Marathi).

७. Dams, Displacement and the Human Cost of Development
Posted on June 27, 2014 in Society By Prachi Salve

८. Gupta Santosh - Research Methodology and Statistical Techniques.

९. Government of India, Ministry of Labor and Employment (Oct 2010), 'Report on Employment and Unemployment Survey: 2009-10', Labor Bureau, Chandigarh.

१०. Government of India, Planning Commission (2011), 'India Human Development Report-2011', Planning Commission, New Delhi.

११. John W. Creswell (2011), Research Design, Sage Publication.

१२. *Kaustubh Devale and Suhas Paranjape*, Pani Sangharsh Chalwal :1 A case study from South Maharashtra2, India

१३. Kothari C.R. (2004), Research Methodology, Methods & Techniques, New age International publishers.

१४. Krishnaswami O.R. & M. Ranganathan (2005), Methodology of research in social sciences, Himalaya publishing house, Second revised Edition.

१५. Ministry of Water . (n.d.). *Ambedkar's Contribution of Water resources Development.*

१६. N. Jayram (2012), Manual of Style, Centre for Research Methodology, TISS, Mumbai

१७. Negi R. S. (I.A.S), Gaikwad John (Edited) - Socio Cultural Dynamics of Tribal Development, Tribal research and Traning Institute.

१८. Patankar, B. (1997). Krishna Khoryache Pani- Rahanarya Janthecha Paryay (Marathi). Kasegaon

१९. Ramachandran, P. J. (1990). *Issues in Social Work Research In India.* Bombay: Tata Institute of Social Sciences.

२०. Ross, M. G. (1955). *Community Organization-Theory and Principles.* New York: Harper&Bros.

२१. Sadhu A.N. & Singh Amarjit (1999), Research Methodology in social sciences,

Himalaya publishing house.

२२. Sen Amartya - Development as Freedom, Oxford University press, New Delhi.

२३. Singh, V. (2013). Critical stuyd of legal mechanism for Ressettlement and rehabilitation of Project affected people: a study with Special referance of Bhakra Dam Oustees in Himachal Pradesh. Shimla: Himachal Pradesh University Summer Hill

२४. Vardiwale, S. (207). Psycho-Social Study of Project Affected Families of Sardar Sarovar Project

२५. Wadia, A. R. (1961). *History and Philosophy of Social Work In India* (2nd ed.). Bombay: Allied Publishers.

२६. World Bank. (1995). *Workers in a Integrating World: World Development Report*

२७. Vijay Deshpande, Pani Jeevan

२८. Yadav, N. (2016). *Development Introduction Displacement AStudy ofPopulation affected by Jaypur metro Project*. Jaypur: Jaypur University.

२९. आगलावे प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

३०. ओ. वॉ. व व्ही. हैनसेन (१९६२), इस्रायलन, सिंचन तत्त्वे आणि आचरण, न्यूयॉर्क जॉनविले अँड सन्स, कं.

३१. कविमंडन विजय (१९९८), विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री महेश प्रकाशन.

३२. कादर अस्माल (२०००), (n.d.)

३३. काशिकर राजश्री एस. (२०१२),'महाराष्ट्रातील रोजगार धोरण', महाराष्ट्र : ५० वर्षातील आर्थिक धांडोळा, सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड सोशल स्टडीज, अमरावती.

३४. कुलकर्णी राघवेंद्र व पवार विलास (२०००), जलआशय, ओम पब्लिकेशन

३५. कुसुम कर्णिक (१९९९), धरणग्रस्थांच्या कहाण्या व बेपर्वाह सरकार (मुक्त लेख)

३६. कोठारी स्मिता, राष्ट्र विकासाच्या बळी, ईपीडब्ल्यू, खंड–३१ (२४) पी १४७६ पी १४७७

३७. खतीब के. ए. (२०१५), ''महाराष्ट्राचा भूगोल'' के सागर पब्लिकेशन, पुणे.

३८. घाटगे एल. एन. (१९९७), लेख महाराष्ट्राचा ग्रामी विकास संकल्पना व वास्तव स्थिती, शिवाजी इकॉनॉमिक्स असोशिएशन, कोल्हापूर.

३९. घारपुरे विनायक (१९७६), पाणी पुरवठा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

४०. चौगुले डी. जी. (१९९७), महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाच्या समस्या, शिवाजी विद्यापीठ, आठवे वार्षिक अधिवेशन १३, १४ नोव्हें. १९९७ए शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४१. चितळे माधवराव (१९९९), महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोग अहवाल, महाराष्ट्र शासन

४२. चोळकर पराग (१९८९), मोठी धरणे, पर्यावरणीय व सामाजिक–आर्थिक दुष्परिणाम, परिसर प्रकाशन, पुणे

४३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुणे जिल्हा २०१३, जिल्हा सांखिकी कार्यालय पुणे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे

४४. जैन श्री (१९८१) सिंचन व्यवस्थापनबाबत उच्चधिकार समिती

४५. जोशी बी. एल., विस्थापित समस्या आणि पुनर्वसन, शोधपत्रिका

४६. झामरे जी. एन. (२००५), भारतीय अर्थव्यवस्था– विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४७. दास्ताने संतोष (२०१२), दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे–३०

४८. देसाई बी. बी. (२००५), पुनर्वसन, संवदेना प्रकाशन, पुणे

४९. देशपांडे विजय (१९८१), पाणी जीवन, शासकीय मुद्रणालय, नागपूर

५०. देशपांडे, व्ही. (२००२), प्रकल्प प्रभावित लोक– एक आर्थिक दृष्टीकोन, सामाजिक व आर्थिक विषयावर सादर केलेला पेपर.

५१. देशपांडे शिरिष व कोमावार एस.आर (२००२), विस्थापन, मदत व पुनर्वसन– कायद्याची गरज, शोधपत्रिका.

५२. देशमुख दत्ता (१९९९), महाराष्ट्र पाणी परिषद, (n.d.)

५३. देवासिया व्ही. व्ही. (२००२), विस्थापन पुनर्रस्थापना व सामाजिक कार्य, शोधपत्रिका

५४. नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

५५. पाटील विश्वास (२०१४), झाडाझडती, राजहंस प्रकाशन, पुणे

५६. पाटणकर भारत (१९९७), कृष्णा खोऱ्याचे पाणी राबणाऱ्या जनतेचा पर्याय,

५७. पांगुल नंदा (२००२), नेर तलाव धरण प्रकल्प व वास्तविकता, शोधपत्रिका

५८. बोरूडे रा. र. (२००५), संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे

५९. महाराष्ट्र मानव विकास अहवाल (२०१२), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, महाराष्ट्र शासन.

६०. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ आणि भूसंपादन अधिनियम, १८९४, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगांव.

६१. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, १९९९, खंड–१ महाराष्ट्र शासन

६२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४–१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

६३. महाराष्ट्र शासन (२००८),'महाराष्ट्रातील ग्रामीण', नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६४. मिरदाल गुन्नर (अनुवाद– सरला कारखानीस), आर्थिक सिद्धांत व व अर्धविकसित प्रदेश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

६५. मित्र पी. एल. व अशोक के. (१९९७), सिंचन व्यवस्थापन आणि सिंचन पाणी किंमत, कृषी आणि ग्रामीण विकास राष्ट्रीय बँक (नाबार्ड), मुंबई

६६. **मुळे सुरेखा (फेब्रुवारी २००५): 'रोहयो अंतर्गत पडीक जमिनीचा विकास', लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई.३२.**

६७. सरोदे टी. एम. (२००२), विस्थापितांच्या समस्या व पुनर्वसन, शोधपत्रिका.

६८. सवदी ए. बी. (२००६), द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे.

६९. सोनांकर वंदना व जाधव राजू (२०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', पिअर्सन पब्लिकेशन, दिल्ली.

७०. शर्मा रामनाथ व शर्मा राजेंद्र कुमार(१९९५), 'सामाजिक सर्वेक्षण और अनुसंधान विधियाँ और प्रविधियाँ', एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली.

७१. शिंगणापुरे विजय (२००२), प्रकल्प प्रभावित लोक– सामाजिक विकास आणि समाजकार्य, राष्ट्रीय परिषद, गोसी खु.

**दैनिके**

७२. **दैनिक प्रभात, १६ मार्च, २०१७**

७३. **दैनिक सकाळ, १० जून, २०१७, २१ जाने. १९१७**

७४. **दैनिक ऐक्य, २० मार्च व ११ ऑगस्ट, २०१५**

७५. **महाराष्ट्र टाईम्स, २० डिसें. २०१०.**

**Websites :**

७६. Retrieved from www.aurangabad.com/walmi(n.d.).

७७. http://macp.gov.in. (n.d.).

७८. http://mr.wikipedia.org/wiki. (n.d.).

७९. http://www.mapsofindia.com/maps/india/hydropowerproject.htm. (n.d.).

८०. www.cgiar.org/iwmi. (n.d.). Retrieved from International Water Management Institute, Sri Lanka.

८१. www.info@thewaterpage.com. (n.d.).

८२. www.unesco.org/science/waterday2000. (n.d.). Retrieved from UNESCO.

८३. www.urgewald@kolein.netsurf.de. (n.d.).

८४. www.ijmer.com

८५. http://www.mapsofindia.com/maps/india/hydropowerproject.htm

८६. https://mr.wikipedia.org/wiki

८७. https://mr.wikipedia.org/wiki

८८. http://macp.gov.in/

८९. MKVDC_Website-2.xlsAdiv.

९०. http://admiculture .wordpress.com/20132/12/26

९१. www.mahades.directorate of eco & Stats Maharashtra

# परिशिष्ट–१

## -: मुलाखत अनुसुची:-

संशोधन केंद्र :- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन गुलटेकडी, पुणे411037
संशोधन विषय :- **''धरणग्रस्त पुनर्वसीत कुटुंबीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन'' (विशेष संदर्भ : पिंपळगाव जोगे धरण, तालुका जुन्नर आणि डिंभे धरण तालुका आंबेगाव)**

समस्यांचा अभ्यास.'' (विशेष संदर्भ - पुणे जिल्ह्यातील पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर, व डिंभे धरण, ता. आंबेगाव)

ही माहिती पीएच.डी. च्या संशोधन कार्यासाठी आवश्यक असून ही माहिती पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल तसेच या माहितीचा वापर फक्त शैक्षणिक कामासाठी केला जाईल.

### [ I व्यक्तिगत माहिती ]

1. संपुर्ण नाव :- ----------------------------------------------------------------------------
2. गांव :- ---------------------------------------------------------------------------------
3. वय :- ---------------------------------------------------------------------------------
4. धर्म :- ------------------------------------------ 5. जात :- ------------------------------
6 शिक्षण :--------------------------------------- 7. व्यवसाय :- ---------------------------
8. वैवाहिक स्थिती :- अ) विवाहित ब) अविवाहित

[ II कौटुंबिक माहिती ]

2.1 कुटूंब प्रमुखाचे संपुर्ण नाव :- -------------------------------------------------------
2.2 कुटूंब प्रमुखाचा व्यवसाय :- ---------------------------------------------------------
2.3 कुटूंबाची सदस्य संख्या:- --------------------------------------------------------------
2.4 कुटूंबाचा प्रकार अ) विभक्त ब) संयुक्त (एकत्रीत)
2.5 कुटूंबातील कमावत्या व्यक्तींची संख्या:- ---------------------------------------------
2.6 कुटूंबाच्या उत्पन्नाची साधने :- -------------------------------------------------------
2.7 कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न :- -----------------------------------------------------------
2.8 कुटूंबाकडे किती शेत जमिन आहे
अ) एकर ब) शेतजमिन नाही
2.9 शेतजमिन असल्यास प्रकार
अ) बागायती ब) जिरायती क) पडीत
2.10 तुमच्या मालकीची इतर मालमत्ता :- ---------------------------------------------

## [ III शैक्षणिक माहिती ]

3.1 मुळ (जुन्या) गावात शाळा कितवी पर्यंत होती.

अ. 4 थी ब. 7 वी क. 10 वी ड. 12 वी इ. कॉलेज

3.2 पुढील शिक्षणासाठी किती लांब जावे लागत होते.

अ. 2 किमी च्या आत ब. 3 ते 5 कि.मी. क. 5 ते 10 किमी. ड. 10 किमी च्या पुढे

3.3 शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी मुलामुलींना वाहतुकीचे साधने उपलब्ध होती का.

होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

3.4 नविन पुर्नवसीत गावात शाळा कितवी पर्यंत आहे.

अ. 4 थी ब. 7 वी क. 10 वी ड. 12 वी इ. कॉलेज

3.5 पुढील शिक्षणासाठी किती लांब जावे लागते.

अ. 2 किमी च्या आत ब. 3 ते 5 कि.मी. क. 5 ते 10 किमी. ड. 10 किमी च्या पुढे

3.6 शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी मुलामुलींना वाहतुकीचे साधने उपलब्ध आहेत का.

होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

3.7 नवीन गावात आल्यामुळे मुलामुलींच्या शैक्षणिक संधीमध्ये सुधारणा झाली असे तुम्हाला वाटते का

होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

## [ IV पुर्नवसनाविषयी माहिती ]

4.1 आपले मुळ (जुने) गाव कोणते :- गाव----------------ता--------------जि. -------------

4.2 ज्या गावात विस्थापन झाले ते नवीन गाव---------------ता-----------जि. ---------

4.3 मुळ (जुन्या) गावापासुन नवीन गावाचे अंतर :- कि.मी.

4.4 मुळ (जुन्या) गावात धरणात गेलेली शेती :- एकर

प्रकार :- बागायती जिरायती पडीत

4.5 नविन गावात मिळालेली शेती :- एकर

प्रकार :- बागायती जिरायती पडीत

4.6 मुळ (जुन्या) गावात आपणाकडे जनावरे होती का :- होय / नाही

4.6.1 जर होय तर : गायी बैल शेळी मेंढी इतर

जनावरांपासुन मिळणारे एकुण उत्पन्न :- ----------------------------------------------

4.7 बागायती जमीनीत सिंचनाची व्यवस्था होती का ? :- होय / नाही

जर होय तर कोणती

1. विहीर 2. कॅनॉल 3. नदी 4. ओढा 5. बोअरवेल

4.8 वर्षातून किती महिने शेतीला पाणी उपलब्ध होते

अ. वर्षभर ब. 8 महिने क. 6 महिने ड. 4 महिने

सिंचनासाठी कोणती साधने होती ?

अ. इंजिन ब. इलेक्ट्रीक मोटार क. इतर

4.9 आपण कोणकोणती पिके घेत होता

अ. ऊस ब. गहु क. बाजरी ड. ज्वारी इ. भात ई. कडधान्य

फ. मका ग. भाजीपाला घ. फळबाग

4.10 शेतीतुन मिळणारे एकुण उत्पन्न किती होते :- --------------------------------------------

4.11 शेती करण्यासाठी काय वापरत होते.

अ. बैल ब. ट्रॅक्टर क. पारंपारीक ड़. शारिरिक मेहनतीने

4.12 स्वतःच्या शेतात काम नसेल तेव्हा आपण काय करत होता.

## [ V सद्यस्थिती ]

5.1 पुनर्वसनाचा मोबदला म्हणून मिळालेली शेती एकर

अ. बागायती ब. जिरायती क. पडीत

5.2 बागायती असल्यास सिंचन व्यवस्था कोणती आहे

अ. स्वतःची विहीर ब. सामाईक विहीर क. लिफ्ट इरिगेशन

ड. कॅनॉल इ. दुस-या शेतक--याकडुन पाणी उपलब्ध ई. इतर

5.3 सध्या कोणती पिके घेता

1. ऊस 2. गहू 3. बाजरी 4. ज्वारी 5. मका 6. भात 7. भाजीपाला 8. फळबाग

5.4 सध्याचे शेतीपासुन मिळणारे एकुण उत्पन्न :-- ------------------------------------------

5.5 सध्या शेती कसण्यासाठी कोणकोणती साधने वापरता.

अ. बैल जोडी ब. ट्रॅक्टर क. इतर औजारे ड. पारंपारिक इ. शारिरिक मेहनतीने

5.6 सध्या आपणाकडे जनावरे आहेत का ? होय / नाही

जर होय तर 1. गायी 2. म्हैस 3. बैल 4. शेळी 5. कोंबडी 6. बदक

5.7 ह्या पासुन मिळणारे एकुण वार्षीक उत्पन्न :- ---------------------------------------------

नवीन गावातील शेत जमिन मिळण्यामध्ये काही अडचणी आल्या का ? होय / नाही

जर होय तर खालील पैकी कोणत्या अडचणी

1. मुळ मालकाकडुन जमीन कसण्यात अडथळे निर्माण करणे.
2. पाण्याची सुविधा नसणे किंवा त्याबाबत अडचणी निर्माण करणे.
3. शेतात जाण्यासाठी (वहिवाट) मुळ मालकाकडुन हरकती
4. गावातील इतर लोकांकडुन होणारा त्रास
5. इतर

## [ VI मोबदला मिळालेल्या जमिनीबाबत माहिती ]

1. प्रकल्पासाठी संपादित केलेल्या तुमच्या जमिनी पैकी / मोबदल्यात किती जमिन मिळाली-

---------------------------------------------------------------------------------------

2. बागायती असल्यास सिंचन सुविधा कोणती आहे.

1. विहीर 2. कॅनॉल 3. तलाव 4. विंधन विहीरी 5. दुस-याकडुन पिकासाठी पाणी 6.सामुदायिक विहीर

3. जमीनीचा ताबा मिळाल्यापासुन प्रत्यक्ष जमीन कसणे ह्या मध्ये किती कालावधी गेला व का ?

1. लगेच 2. सहा महिने 3. एक वर्ष 4. एक वर्षापेक्षा जास्त

4. सदर कालावधी मध्ये किती आर्थिक नुकसान झाले व त्याची भरपाई मिळाली का ? होय / नाही

जर होय तर तपशील.

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

## [VII आर्थिक मोबदला ]

1. तुम्हाला जमिनीच्या बदल्यात किती रक्कम आर्थिक मोबदला म्हणुन मिळाला. --------------
2. तुम्हाला मिळालेला मोबदला तुमच्या ग्रहन केलेल्या जमीनीच्या किमतीच्या तुलनेत योग्य आहे का?
   होय / नाही - नसल्यास तपशील
   -----------------------------------------------------------------------------------
3. आर्थिक (रक्कमेचा) मोबदल्याचा विनियोग

1. घर बांधणी 2. नवीन मिळालेल्या जमिनीची सुधारणा 3. मुला मुलींचे लग्न
4. जनावरे खरेदी 5. साधन सामुग्रीव्दारे खरेदे 6. चैन 7. इतर स्पष्ट करा
8. नवीन जमीन खरेदी 9. मुला मुलीचे शिक्षण 10. नोकरी

4. जमीनीच्या उत्पन्नात काही बदल झाले का ? असल्यास तपशील.
   -----------------------------------------------------------------------------------
   -----------------------------------------------------------------------------------
5. पुनर्वसित ठिकाणी उपलब्ध साधन सामृगीव्दारे तुमचा आर्थिक स्थर उंचावण्यास मदत होते का?
   -----------------------------------------------------------------------------------
6. पुनर्वसनाचा एक भाग म्हणून आपल्या कुटुंबातील कोणाला शासनामार्फत नोकरी दिली गेला का.
   होय / नाही- तपशील
7. शासकीय नोकरी मिळाल्यामुळे कौटुंबिक आर्थिक स्थितीमध्ये बदल झाले क़ा?.
   होय / नाही - तपशील
   -----------------------------------------------------------------------------------
8. सध्याचे पुनर्वसनाचे ठिकाण हे धरणापासुन लांब गेल्यामुळे तुमच्या आर्थिक उत्पन्नावर क़ाही परिणाम
   झाले आहे का ? होय किंवा नाही - तपशील
   -----------------------------------------------------------------------------------
   -----------------------------------------------------------------------------------
9. नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी सरकारने केलेल्या मदतीमुळे नवीन व्यवसाय आपण सुरु केले का ?
   होय / नाही - तपशील
   -----------------------------------------------------------------------------------

10. नवीन व्यवसायामुळे आपल्या कौटुंबिक उत्पादन वाढीस हातभार लागला का ? होय / नाही तपशील-

-----------------------------------------------------------------------------------

## [VIII सांस्कृतिक ]

1. जुन्या गावी कोणकोणते सण साजरे करीत होते.

-----------------------------------------------------------------------------------

2. कोणकोणते सामाजिक उपक्रम / कार्यक्रम घेतले जात होते.

-----------------------------------------------------------------------------------

3. करमणुकीची कोणकोणती साधने होती.

-----------------------------------------------------------------------------------------

4. कोणकोणत्या रुढी परंपरा पाळल्या जात होत्या.

-----------------------------------------------------------------------------------------

5. नवीन गावात कोणकोणते सण साजरे करता.

-----------------------------------------------------------------------------------------

6. नवीन गावात कोण कोणत्या सामाजिक उपक्रमात आपण सहभागी होता.

-----------------------------------------------------------------------------------------

7. नवीन आणि जुन्या गावामध्ये तुलनात्मक रित्या सांस्कृतिक, बाबी चालीरिती यामध्ये प्रामुख्याने
कोणकोणते बदल झाले ?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

## [IV सामाजिक ]

1. पुनर्वसनापूर्वीची तुमचे सामान्य जिवन कसे होते ?
   1. सलोख्याचे व एकोप्याचे
   2. सौदार्याचे
   3. परस्पर विश्वासाचे 4. वरील पैकी काही नाही
2. पुर्नवसनाच्या ठिकाणी त्याचा परिणाम तुमच्या सामाजिक जीवनावर झाला असे वाटते का ?
   होय / नाही - तपशील

   -----------------------------------------------------------------------------------------

   -----------------------------------------------------------------------------------------

3. नवीन पुर्नवसन झालेल्या ठिकाणी सर्व कुटुंबाशी लोकांशी तुमचे सलोख्याचे संबंध आहेत का?
होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

4. नवीन पुनर्वसनाच्या नवीन ठिकाणी अनोळखी कुटुंब व लोकांमुळे तुमच्या सामाजिक जिवनावर काही परिणाम झाला का ? होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

5. पुनर्वसन झालेल्या नवीन ठिकाणी तुम्ही पुर्वीसारखे आनंदी व समाधानी सामाजिक जीवन जगता आहात असे तुम्हाला वाटते का ? होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

6. नवीन ठिकाणी काही नवीन जातीय व धार्मीक तेढ निर्माण झाली का ? होय / नाही
असल्यास तपशील -

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

7. नवीन पुनर्वसनाच्या ठिकाणी वेगवेगळे धर्माचे व जातीचे लोक एकत्र आल्यामुळे तुमच्या मध्ये काही
मतभेद निर्माण होऊन तुमच्या सामाजिक जिवनावर परिणाम झाला असे तुम्हाला वाटते का ?
होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

8. नवीन पुनर्वनसन ठिकाणी गेल्यानंतर तुमच्या प्रथा, परंपरा चालीरिती ह्यामध्ये बदल झाले का ?
होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

## [ X इतर ]

1. पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाने केलेल्या उपाययोजना समाधानकारक आहेत का ?
होय / नाही - तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

2. धरणग्रस्तांचे योग्य पुर्नवसन होण्याच्या दृष्टीने तुमच्या क़ाही सुचना आहेत का ?
होय / नाही - असल्यास तपशील

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

माहिती भरणा-याची सही - नाव

# परिशिष्ट–२
## छायाचित्रे



पिंपळगाव जोगे धरण, ता. जुन्नर, जि. पुणे




डिंभे धरण, ता. आंबेगाव, जि. पुणे



प्राथमिक तथ्य संकलन करतांना संशोधन अभ्यासक (पिंपळगाव जोगे)



प्राथमिक तथ्य संकलन करतांना संशोधन अभ्यासक (डिंभे)




**पिंपळगाव जोगे येथील धरणग्रस्त महिला दैनंदिन रोजगारासाठी जात असतांना**



**पिंपळगाव जोगे येथील धरणग्रस्त महिला दैनंदिन रोजगारासाठी जात असतांना**




**पिंपळगाव जोगे येथील धरणग्रस्त महिला दैनंदिन रोजगारासाठी जात असतांना**




**पिंपळगाव जोगे येथील धरणग्रस्त महिला दैनंदिन रोजगारासाठी जात असतांना**

# परिशिष्ट–३


## शासन निर्णय सूची

| अ.क्र. | शासन निर्णय क्र. |
|---|---|
| १. | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरपीए/१०६/१७७७८६–आर–१, दिनांक २९ मे, १९६७ |
| २. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.आरपीए–१०७१/एक्युपेंन्सी/आर.आय. दिनांक ३०.१२.१९७४ |
| ३. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.आरपीए–१०७१/११५८३/आर–१ दिनांक ४.११.१९८० |
| ४. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–१०८२/सीआर–१८५२/आरआय(ए), दिनांक ३ मार्च, १९८३ |
| ५. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए.३५८२/सीआर–२३६/आर–४(ए) दिनांक ११.१०.१९८३ |
| ६. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–१०८६/सीआर–३९४१/र.१, २४.११.१९८६ |
| ७. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–१०८७/प्र.क्र.–१/(१९८७/र–१) दिनांक २५.०३.१९९१ |
| ८. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–१०९२/प्रक्र.४७/र–१, दिनांक ३० एप्रिल, १९९२ |
| ९. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एस–३०/प्र.क्र.३५/र–१ दिनांक १४ सप्टेंबर, २००४ |
| १०. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सीएलएस ०७–०५/प्र.क्र. १९२/(निवारे)/म–३, दिनांक १९ ऑगस्ट, २००५ |
| ११. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क्र. (७)/र–१, दिनांक १७.०३.२००६ |
| १२. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क्र.१(५)/र–१ दिनांक १७.०३.२००६ |
| १३. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क्र.१(९)/र–१, दिनांक १७.०३.२००६ |
| १४. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क्र.१(६)/र–१, दिनांक १७.०३.२००६ |

| | |
|---|---|
| १५. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–२००६/प्र.क.१(३)/र–१, १७.०४.२००६ |
| १६. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरपीए–०४१०/प्र.क्र१४६/र–१ दिनांक १२.११.२०१० |
| १७. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०११/प्र.क्र. ८०/र–८, दिनांक २४.०५.२०१२ |
| १८. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. आरएपीए–२०१५/प्र.क्र.१९४/र–१ दिनांक २० ऑगस्ट, २०१५ |
| १९. | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी–७१४/प्र.क्र.१६७/फ–१ दिनांक १२.१०.२०१५ |
| २०. | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. पुनर्व २०१६/(६३१/२०१६)/मोप्र–२ दिनांक १.१२.२०१६ |

# परिशिष्ट–४

## नकाशा– डिंभे धरण क्षेत्र



# नकाशा– पिंपळगाव जोगे धरण क्षेत्र

